CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

अ 1/20

गोमंतकीय संगीतकार

7.3

आम्नाय-ग्रन्थालय,
भारतनिधि, कचौड़ी
वाराणसी-5

यालय
राणसी-५

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri



Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

आम्नाय-ग्रन्थालय,
भरतनिधि, करौंदी
वाराणसी-5

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

गोमंतकीय संगीतकार

अ : 1/20
आम्नाय-ग्रन्थालय,
भारतनिधि, करौंदी
वाराणसी-5

डॉ. ना. र. मारुलकर
(डॉक्टर ऑफ म्यूझिक)

स्वरमंच
मडगांव – गोवा

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

प्रकाशक :
मो. द. गवंडळकर, अध्यक्ष
सुनीतिभास्कर द. दळवी, चिटणीस
"स्वरमंच"
मडगाव–गोवा

आम्नाय–ग्रंथालय,
भरतनिधि, करौंदी
वाराणसी-5

सर्व हक्क स्वाधीन :
माधव पंडित
आल्तमोंट हौसिंग सोसायटी
मडगाव–गोवा

पहिली आवृत्ती ५ नोव्हेंबर १९७६

रुपये पसतीस : रु. ३५

मुखपृष्ट, सजावट : सुभाष अवचट

व्यक्तिचित्रे : चित्रकार ओके

मुद्रक :
नाना डेंगळे
साधना प्रेस
४३०–३१, शनिवार
पुणे ४११ ०३०

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

हरिः ॐ

आम्नाय-ग्रन्थालय,
भरतनिधि, करौंदी
वाराणसी-5

अर्पण !

ज्ञात आणि अज्ञात
अशा सर्वच गोमंतकीय
कलाकारांच्या चरणी विनम्रभावे !

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

या आवृत्तीसाठी वापरलेल्या सवलतीच्या दरातील कागदाबाबत
महाराष्ट्र शासनाचे आभार.

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

आम्नाय-ग्रन्थालय,
प्रतनिधि, करौंदी
वाराणसी-5

अनुक्रमणिका

			पृष्ठ क्रमांक
◎	ग्रंथाविषयी थोडेसे	...	७– ९
◎	प्रकाशकाचे निवेदन	...	१०– १२
◎	लेखकाचे मनोगत	...	१३– २८
◎	प्रस्तावना : गुणिजनांचे स्मरण – श्री. पु. ल. देशपांडे	...	२९– ३४
१.	योगीराज कै. खाप्रूमाम पर्वतकर	...	१– ९
२.	गानदेवता कै. अंजनीबाई मालपेकर	...	१०– २१
३.	गायनाचार्य कै. पं. रामकृष्णबुवा वझे	...	२२– ३३
४.	हार्मोनिअमवादनमहर्षी कै. विठ्ठलराव कोरगावकर	...	३४– ४४
५.	तबलावादक आणि गायक कै. रामकृष्ण पर्वतकर	...	४५– ५१
६.	व्हायोलिन वादनकार कै. श्रीधर पार्सेकर	...	५२– ६३
७.	हार्मोनिअम वादनपटू कै. मधुकर पेडणेकर	...	६४– ७३
८.	रसिकप्रिय सांगीतिक कै. गोपालकृष्ण भोबे	...	७४– ८६
९.	सूरश्री श्रीमती केसरबाई केरकर	...	८७–१००
१०.	कलामहर्षी रघुवीरमामा रामनाथकर	...	१०१–११०
११.	गानपंडिता श्रीमती मोगूबाई कुर्डीकर	...	१११–१२२
१२.	चतुरस्त्र कलाकार पं. रत्नकांत रामनाथकर	...	१२३–१३५
१३.	गायनहिरा 'पद्मभूषण' सौ. हिराबाई बडोदेकर	...	१३६–१४७
१४.	संगीताचे अग्निहोत्री मलबाराव सरदेसाई	...	१४८–१५४
१५.	हार्मोनिअम वादनकार श्री. बाबी बोरकर	...	१५५–१६३
१६.	अवलिया श्रीगुरुभक्त पं. सीतारामबुवा फातर्फेकर	...	१६४–१७२
१७.	रसिकांचे लाडके- गायक पं. जितेंद्र अभिषेकी	...	१७३–१८३

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

आम्नाय-ग्रन्थालय,
भरतनिधि, करौंदी
वाराणसी-5

ग्रंथाविषयी थोडेसे

'गोमंतकीय संगीतकार' हे पुस्तक सुमारे दहा वर्षांपूर्वीच प्रसिद्ध होणे जरूर होते, परंतु माझ्या सततच्या तीव्र प्रकृति–अस्वास्थ्यामुळे मी वेळच्यावेळी लेखन करू शकलो नाही याबद्दल मीं स्वतःच अत्यंत दिलगीर आहे! या पुस्तकाची सारी प्रेरक शक्ती मडगाव येथील "स्वरमंच" या संस्थेचे समर्थ कार्यकर्ते श्रीमान् माधवरावजी पंडित हीच आहे. कारण पुणे मुक्कामी माझे घरी झालेल्या आमच्या 'संगीता'-वरील सहज चर्चेमधून या विषयावरील गरजेच्या लेखनाची कल्पना मी त्यांना सुचवली. पंडितांनी लगेच तिचा पाठपुरावा केला आणि 'हे पुस्तक तुम्हीच लिहा' अशी मित्रत्वाची आज्ञा करून ते गोव्याला निघून गेले... आणि मी हळूहळू लेखनाच्या उद्योगाला लागलो...

या पुस्तकासाठी विश्वसनीय अशी माहिती मिळविणे हेच सर्वांत अवघड आणि जिकीरीचे काम होते. या कामी माझे बालमित्र–मुंबई आकाशवाणीवरील व्हायोलिनवादनकार श्री. रघुवीररावजी जोशी यांचे मला बहुमोल असे सहाय्य झाले. त्यांच्या सहाय्याअभावी हे लेखन करणे अगदी अशक्यच होते. माझ्या या लेखनासाठी सुमारे पाऊणशे

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

आदरणीय कलाकारांनी स्वतःची माहिती व मुलाखती दिल्या, परंतु प्रस्तुतच्या भागात त्या सर्वांचाच अंतर्भाव करता आला नाही. या सर्वांची माहिती यथाकाल प्रकाशित होईल असा मला विश्वास वाटतो. मित्रवर्य जोशीबुवा व हे सर्व कलाकार यांचा मी ऋणाईत आहे.

माझ्या या पुस्तकाला पद्मश्री पु. ल. देशपांडे यांच्यासारख्या एका श्रेष्ठ साहित्यिकाचा व रसील्या कलाकाराचा शुभाशीर्वाद प्रस्तावनेच्या रूपाने लाभला हे मी माझे मोठेच भाग्य समजतो. माझ्या 'संगीतातील घराणी' या पहिल्या पुस्तकालाही त्यांच्याच प्रस्तावनेचा लाभ घडला होता...हा एक ईश्वरी योगायोगच होय !

या पुस्तकातील विवेचनाच्या दृष्टीने एक नम्र खुलासा करणे अगत्याचे वाटते. तो असा की एकाच प्रणालीच्या गायकांच्या गायकीबाबतच्या चर्चेत क्वचित पुनरुक्ती वाटण्याची शक्यता आहे, परंतु ती अपरिहार्य असते; त्याचप्रमाणे परिभाषेतील काही शब्दप्रयोगही तेच तेच येतात आणि ते टाळण्याचा प्रयत्न केल्यास काहीही अर्थबोध होत नाही असा अनुभव आहे.

या पुस्तकात मीं स्वतःचे असे काही सांगण्याचा फारसा प्रयत्न केलेला नाही. गोमंतकीय मातवर कलाचार्यांच्या सांगीतिक तपःश्चर्येचा खडतर प्रवास किती प्रयासाने पुरा झाला हे वाचकापर्यंत पोचवावे त्याचप्रमाणे शक्यतर त्यांचे मौलिक विचारही संगीत-साधकांपर्यंत पोचावेत इतकाच या लेखन प्रयासामागील मुख्य हेतू आहे.

'गोमंतकीय संगीतकार'च्या कामी माझ्याकडून अक्षम्य दिरंगाई झाली, परंतु "स्वरमंच"च्या सर्व सुहृद कार्यकर्त्यांनी मला आपुलकीने सांभाळून घेऊन माझ्याकडून ही अल्प सेवा करून घेतली याबद्दल या सर्व मान्यवर कार्यकर्त्यांचे मी मनःपूर्वक आभार मानतो ! आदरणीय पु. ल. देशपांडे यांचे आभार मी कसे मानू ? त्यांच्या लाभलेल्या या आशीर्वादानेच मी धन्य झालो आहे !

या पुस्तकातील थोर संगीतकारांची रेखाचित्रे ख्यातनाम चित्रकार श्री. ओके यांनी अगदी अल्पावधीत आणि तितकीच उत्कृष्ट काढून दिली,

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

त्यांचे मी मनःपूर्वक आभार मानतो. मुखपृष्ठ व लेखावरील चित्रे प्रसिद्ध चित्रकार श्री. सुभाष अवचट यांनी उत्तम रीतीने काढून दिली, त्यांचे मनःपूर्वक आभार !

साधना प्रेसचे व्यवस्थापक–संगीतसाधक माननीय नानासाहेब डेंगळे यांनी हे स्वतःचेच पुस्तक समजून मला सर्वच प्रकारे मदत केली म्हणूनच हे पुस्तक इतक्या अल्पमुदतीत प्रकाशित होत आहे. त्यांचे आभार मानून मोकळे होण्यापेक्षा त्यांच्या ऋणात राहणे हेच मला मानवणारे आहे. साधना प्रेसच्या सर्वच कुशल कर्मचाऱ्यांना माझे हार्दिक धन्यवाद !

अखिल भारतीय गांधर्व महाविद्यालय–मंडळासारख्या मातबर संस्थेच्या संगीत महोत्सवाच्या शुभप्रसंगी माझ्या या पुस्तकाच्या प्रकाशनाचा योग यावा हा माझ्या दृष्टीने मोठाच भाग्ययोग आहे.

माझ्या वैयक्तिक अनेक अडचणींतून हे पुस्तक प्रकाशात येत आहे, ही केवळ श्रीमंगेशाचीच कृपा आहे अशी माझी पूर्ण श्रद्धा आहे, त्याचेच स्मरण करून माझे हे निवेदन पुरे करतो.

विजयादशमी,
गांधीजयंती,
दि. २ ऑक्टोबर १९७६,
पुणे.

रसिकांचा सदैव नम्र,
ना. र. मारुलकर
१२ क, गोखले बिल्डिंग.
टिळक रोड, पुणे–३०.

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

प्रकाशकांचे निवेदन

आमच्या 'स्वरमंच' या संस्थेतर्फे डॉ. ना. र. मारुलकरलिखित 'गोमंतकीय संगीतकार' हा ग्रंथ वाचकांच्या हाती सोपविताना आम्हाला होणारा आनंद शब्दातीत स्वरूपाचा आहे।

वास्तविक हा ग्रंथ सुमारे दहा वर्षांपूर्वीच प्रसिद्ध होणार होता. परंतु मध्यंतरीच्या काळात इतक्या अडचणी आल्या की, हा ग्रंथ प्रकाशित करण्याची संधी आम्हाला मिळते की नाही अशी साशंकता निर्माण झाली. मात्र अडचणीतून मार्ग काढण्याचे आमचे प्रयत्न सतत चालू राहिल्याने आणि थोर गोमंतकीय संगीतकारांची पुण्याई अज्ञातरूपाने आमच्या संस्थेच्या पाठीशी उभी राहिल्याने हा ग्रंथ अखिल भारतीय संगीत शिक्षक परिषदेचे नववे अधिवेशन गोव्यात भरत असताना प्रसिद्ध करण्याचा अपूर्व योग आम्हाला लाभला आहे.

ह्या ग्रंथाच्या प्रसिद्धीचे मुख्य श्रेय डॉ. ना. र. मारुलकर आणि आमच्या संस्थेचे संस्थापक-सदस्य श्री. माधव पंडित यांना द्यावयास हवे. या दोघांनी मिळून ग्रंथाची रूपरेषा तयार केली. त्यासाठी आवश्यक ती आणि उपलब्ध असलेली माहिती जमविली. डॉ. मारुलकरांनी तर आपल्या नाजूक प्रकृतीचीही पर्वा न करता मुंबईला अनेक दिवसपर्यंत मुक्काम करून अनेक गोमंतकीय कलावंतांच्या प्रत्यक्ष गाठीभेटी घेतल्या. त्यांच्याशी चर्चा केली आणि त्यानंतरच लेखनास प्रारंभ केला. डॉ. मारुलकर यांचा संगीत क्षेत्रातील अधिकार साऱ्या संगीत जगताला सुपरिचित आहे. त्यांचा 'संगीतातील घराणी' हा बहुमोल ग्रंथ या क्षेत्रात कधीच मान्यता

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

पावलेला आहे. संगीतातील सगळ्या घराण्यांची गायकी साधकाच्या भूमिकेने आत्मसात करणाऱ्या आणि संगीत क्षेत्रातील सगळ्या कलावंतांबद्दल परम आदर-बुद्धी असलेल्या डॉ. मारुलकरांच्याहातून या ग्रंथाचे लेखन व्हावे हा आमच्या दृष्टीने तरी अत्यंत दुर्मिळ असा योगायोग आहे. या ग्रंथात समाविष्ट करण्यात आलेल्या बहुतेक सर्व कलावंतांचा सहवास डॉ. मारुलकरांना लाभलेला आहे. त्या कलाकारांच्या कलानैपुण्याचे दर्शन त्यांना अगदी जवळून झालेले आहे. त्यामुळे त्यांचे लेखन किती प्रत्ययकारी झालेले आहे हे वाचक ठरवतीलच. डॉ. मारुलकरांनी हा ग्रंथ प्रकाशित करण्याची संधी आम्हाला दिली, याबद्दल आम्ही त्यांचे अत्यंत आभारी आहोत.

संगीतातील व साहित्यातील अधिकारी श्री. पु. ल. देशपांडे, त्यांच्या मागे व्यापही मोठा. त्यातूनही वेळ काढून 'गोमंतकीय संगीतकार' या ग्रंथास त्यांनी प्रस्तावना लिहून आम्हास अत्यंत ऋणी केले आहे. त्यांचे मनःपूर्वक आभारी आहोत.

श्री. माधव पंडित हे तर आमच्या संस्थेचे संस्थापक-सदस्य आहेत. संस्थेच्या प्रारंभ काळापासून त्यांनी या संस्थेचे चिटणीसपद अनेक वर्षेपर्यंत मोठ्या कुशलतेने आणि जबाबदारीने सांभाळले. प्रस्तुत ग्रंथाचे सर्व लेखन गोमंतकांत त्यांच्या घरीच डॉ. मारुलकरांनी केले. श्री. पंडित यांनी हा ग्रंथ संस्थेच्यावतीनेच प्रसिद्ध व्हावा म्हणून ज परिश्रम घेतले ते आमच्या दृष्टीने फार मोलाचे आहेत. संस्थेचे आणखी एक संस्थापक-सदस्य आणि भूतपूर्व कोषाध्यक्ष श्री. दयानंदराव नेवगी यांनीही उत्तम सहकार्य दिले. 'स्वरमंच' संस्था या दोघांची अत्यंत आभारी आहे.

साधना विश्वस्त निधीचे चिटणीस श्री. नानासाहेब डेंगळे यांनी या ग्रंथाची अत्यंत सुबक अशी छपाई 'आपले घरचेच कार्य आहे' अशा आत्मीयतेच्या भावनेने केली. ख्यातनाम चित्रकार श्री. ओके यांनी अत्यंत सुंदर अशी रेखाचित्रे काढून व चित्रकार सुभाष अवचट यांनी उत्कृष्ट मुखपृष्ठ व आतील सजावट करून दिली आणि साधना प्रेसच्या सर्व कर्मचाऱ्यांनी छपाईचे काम उत्कृष्ट होण्याच्या दृष्टीने जे सहकार्य दिले, त्याबद्दल या सर्वांचे आम्ही मनःपूर्वक आभारी आहोत. भविष्यकाळात या सर्वांचे जर असेच उत्तम सहकार्य लाभले तर 'गोमंतकीय संगीतकार' या ग्रंथाचा आणखी एक भाग प्रसिद्ध करण्याचा आमचा मानस आहे. संगीत क्षेत्रातील वाचकवर्ग या ग्रंथाचे स्वागत कशा रीतीने करतो यावरच पुढील भागाच्या प्रकाशनाचे भवितव्य ठरेल. या ग्रंथाचे उत्तम प्रकारे स्वागत होईल, अशी अपेक्षा बाळगून आमचे हे प्रकाशकीय निवेदन आटोपते घेतो.

सुनीतिभास्कर द. दळवी
चिटणीस, स्वरमंच

मो. द. गवंडळकर
अध्यक्ष, स्वरमंच
मडगाव–गोवा

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

लेखकाचे मनोगत !

दि. २ ऑक्टोबर १९६४ रोजी लयभास्कर कै. खाप्रूमाम पर्वतकर यांच्या पुण्यतिथी–सभारंभाच्या निमित्ताने मला गोमंतकाच्या पुण्यभूमीचे प्रथमदर्शन घडले. तसे पाहिले तर गोमंतकाचे नाव मी माझ्या वालपणापासूनच ऐकत होतो. हा प्रदेश डोळचांनी एकवार प्रत्यक्ष पहावा, अशी तीव्र उत्कंठाही मला कित्येक वर्षे लागलेली होती. माझ्या काही गोमंतकीय कलाकार मित्रांकडून गोमंतकाची रसभरित वर्णनेही मी सतत ऐकत होतो, परंतु गोमंतकाचे प्रत्यक्ष दर्शन घडण्याचा योग मात्र येत नव्हता. तसे म्हटले तर गोमंतकाच्या भौगोलिक हद्दींवरून मी दक्षिणेत अनेकदा जात असे. त्या वेळीही आपण इतक्याजवळ येऊनही प्रत्यक्ष गोमंतक पाहू शकत नाही, याचे मनस्वी दुःख होई. जीवन ही एक अशी वाव आहे की, तीव्र इच्छा असूनही अगदी सहज शक्य असणाऱ्या गोष्टीसुद्धा योगायोगाच्या अधीन संपूर्णपणे जातात आणि त्याचमुळे आपल्या हेही लक्षात येते की, एका विशिष्ट– अज्ञात– समर्थ अशा एका दिव्य शक्तीकडूनच आपल्या जीवनातील प्रत्येक घटना घडत असते. मानवी इच्छा, आकांक्षा, अपेक्षा ही सर्व त्या शक्तीमार्फतच

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

कमी-अधिक प्रमाणात पुऱ्या होत असतात. आपण त्या शक्तीच्या हातांतील केवळ एक कळसूत्री बाहुले आहोत. "प्रयत्न करणे मनुजाहाती। सिद्धि असे ईशेच्छेवरती" या उक्तीचा अनुभव वयोमानामुळे मला आज पटतो ! परंतु गोमंतकदर्शनाच्या बाबतीत मात्र हा अनुभव मी कित्येक वर्षे अगदी अनाहूतपणे अनुभवीत होतो. एरव्ही गोमंतकदर्शन ही आर्थिकदृष्टचा किंवा व्यावहारिकदृष्टचाही अशक्य अशी गोष्ट मुळीच नव्हती. परंतु तसा योगायोग मात्र नव्हता ! अखेर असा योग लयमहर्षी कै. खाप्रूमाम यांच्या दहाव्या पुण्यतिथीचेनिमित्ताने दि. २ ऑक्टोबर १९६४ रोजी आला.

माझ्या बालपणातील कित्येक वर्षांचा काल कोल्हापूरच्या वास्तव्यात काढण्याचे सौभाग्य मला लाभले. तेथील समस्त खांसाहेब–मंडळींच्या सहवासातच माझे जीवन वाटचाल करीत होते. त्यांच्या या सहवासात गोमंतकीय श्रेष्ठ कलाकार व त्याच संदर्भात गोमंतकाची गौरवपूर्ण वर्णने मी अनेकवार– सतत ऐकत होतो. कै. खाप्रूजी यांच्या लयप्रभुत्वाविषयी गायनसम्राट अल्लादियाखांसाहेबांचेतोंडून मी किती तरी वेळा तारीफ ऐकली आहे. "खाप्रूजी" हे खांसाहेबांचेच अतीव प्रेमाचे नामाभिधान आहे. तसेच एका संगीत परिषदेच्या निमित्ताने तबलावादनपटू कै. कामूराव मंगेशकर यांचे आगमन झाले होते. अतिशय रुबाबदार व्यक्तिमत्व, आकर्षक पेहराव, पायी जरीचे चढाव, अशा सुंदर वेशात कामुरावांनी एखाद्या वनराजाच्या आत्मविश्वासाने व्यासपीठावर पदार्पण केले. एका थोर कलावंताच्या योग्य मिजासीचे ते उत्कट दृश्य माझ्या बालमनावर अगदी कायमचे कोरले गेले. अशा आणखीही काही थोर कलाकारांच्या दर्शनाने मी सुखावलो आहे. माझ्या कुवतीनुसार त्यांच्या चरित्रांतून काही बोधही घेत आलो आहे. मला शिरोधार्य वाटणाऱ्या या कलाकारांना ज्या भूमीने आपल्या कुशीत जन्म दिला, त्यांच्या कलासाधनेच्या कामी सर्वतोपरी सांस्कृतिक आचार–विचारांचे मौलिक खतपाणी घालून त्यांची जोपासना केली, त्यांच्यांत ईर्षा, महत्त्वाकांक्षा, जिद्द या गोष्टी निर्माण केल्या, या कलासाधकांमध्ये तीव्र ध्येयप्रवणता निर्माण केली, कलासाधनेचे अपार कष्ट आनंदाने सोसण्याइतका चिवटपणा दिला आणि आपली ही असंख्य

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

बाळे मोठमोठ्या पदावर चढत आहेत, घोर तपःश्चर्या करीत आहेत, अमाप यश-किर्ती मिळवीत आहेत, उभयकुले ती धन्य करीत आहेत,– हे गोड दृश्य गोमंतकभूमी गेली हजारो वर्षे अगदी सुखासमाधानाने पहात आहे ! अशा या मातृभूमीचे– पुण्यभूमीचे दर्शन घेण्याची माझी उत्कंठा सतत वाढत होती. मी पुण्यास स्थायीक झाल्यानंतर स्वतः खाप्रूमामनीही त्यांच्या गावी– पर्वतावर येण्याविषयी मला आग्रहाचे निमंत्रण कितीतरी वेळा दिलेले होते. त्यांच्या या आमंत्रणानुसार– आज्ञेनुसार मी गोमंतकात आलो... परंतु दुर्दैवाने त्यांच्या पुण्यतिथी समारंभासाठी ! !

प्रत्येकाचे बालमन हे त्याच्या त्याच्या मगदुराप्रमाणे अनेक बाबतींत काहीना काही कल्पना करीत असते. त्यानुसार गोव्याबाबतही मी काही कल्पना केल्या होत्या. आमच्या सांगली–मिरजेसारखेच गोवे हेही एक लहानसेच गाव असावे, अशी मी बालपणापासून जोपासलेली एक कल्पना होती. कानांनी अनेकवार ऐकलेली निसर्गरम्य दृश्ये मनःचक्षूंसमोर प्रभावाने साकार होत होती. जिज्ञासा एकसारखी वाढत होती आणि विचारचक्र जोराने फिरत होते. अशाच परिस्थितीत आमच्या गाडीने दख्खनचा मार्ग झुगारून देऊन गोमंतकाचे हद्दीत प्रत्यक्षात प्रवेश केला... आणि माझे भान नाहीसे झाले ! घोर तपःश्चर्येने अमर ठरलेल्या ब्रह्मर्षींच्या शुभ्र जटेप्रमाणे दूधसागराचे लोभस दृश्य दिसू लागले फणस, सागवान, पळस, यांच्या हिरव्यागार आच्छादनाखाली लपलेल्या विशालकाय डोंगरदऱ्यांचे दर्शन मी कल्पनाचक्षूंनी घेतले. अति रम्य, अति शांत आणि पवित्र अशा या भूमीत सोहिरोबा अंबिये, कृष्णंभट बांदकर, विष्णुदास यांच्यासारखे श्रेष्ठ संत का निर्माण झाले, तेजस्वी कलाकार कसे निर्माण झाले, अशा असंख्य प्रश्नांची उत्तरे मला मनोमनी मिळाली... अपार आनंद झाला.

केवळ संगीतापुरते जरी बोलावयाचे झाले तरी असे दिसून येईल की, आमच्या संगीत क्षेत्राला ललामभूत ठरलेले किती तरी युगप्रवर्तक कलाकार एकटच्या गोमंतकाने आम्हांला पुरविले. गोमंतकाने एकूण किती कलाकार पुरविले, याची गणतीच करता येणार नाही. गोमंतकाचे हातून हे कार्य का झाले, त्याने ते कसे केले आणि त्याच्यामागची प्रेरणा

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

कोणती आहे, हे समजावे अशी मला अतिशय उत्कंठा लागलेली होती. या सर्व कलाकारांनी केवळ पोटापाण्याचा व्यवसाय म्हणूनच ही साधना पार पाडली, हे विधान व्यवहारत: न पटणारे आहे. कारण देवापुढे उभे राहून गाण्यासाठी त्यांनी दहा-पाच पदांचे पाठांतर केले असते तरी त्यांच्या सेवेच्या पूर्वापारच्या नोकऱ्या काही बंद पडत नव्हत्या ! थोड्या श्रमाने होणाऱ्या कामासाठी जिवाचे रान करून प्रयत्नांचे पर्वत उलथे-पालथे करण्याची जरुरीं काय ? कलाकारांच्या अचाट प्रयत्नांमागे काहीतरी समर्थ प्रेरणा असल्याशिवाय :त्यांच्या हातून अशी भरीव कामगिरी होणे अगदी अशक्य. ही प्रेरणा काय आहे, तिचे स्वरूप काय आहे आणि तिच्या सिद्धीचे रहस्य काय आहे, या गोष्टींचा काही बोध व्हावा अशी माझी इच्छा होती. त्या दृष्टीने मी सतत विचार करीत होतो. अशाच वेळी प्रस्तुतच्या पुस्तकाचे लेखनासाठी आणि काही हवापालट करण्यासाठी मी योगायोगाने गोमंतकात आलो. खांडेपार-जवळच्या ओपा या पंधरा-वीस घरे जेमतेम असलेल्या लहानशा वाडीत श्री. माधवराव पंडितांनी बांधलेल्या नवीन पर्णकुटीत माझा मुक्काम दोन महिने होता. ही पर्णकुटी अगदी डोंगरमाथ्यावर असून सभोवताली आगरे आहेत. जरूर ती शांतता तर आहेच. अशा ठिकाणी माझा मुक्काम पडल्याने माझे स्वत:चे चिंतनही वाढू लागले आणि आजपर्यंत माझ्या डोक्यात जे प्रश्न घोळत होते, त्यांची समर्पक उत्तरेही मला मिळाली. ती सर्वच दृष्टींनी मोठी उद्बोधक असल्याने त्यांची चर्चा थोड्या विस्ताराने येथे हेतूपूर्वक करीत आहे.

जीवनात सर्वांत महत्त्वाची गोष्ट कोणती असेल तर ती दीर्घायुष्य ही होय. कोणतीही सुदीर्घ तप:श्चर्या हातून घडण्यासाठी आणि तिच्यात सिद्धी व अनुभूती लाभण्यासाठी दीर्घायुष्यच लाभले पाहिजे. दीर्घायुष्यामध्ये उत्कृष्ट आरोग्य हे अर्थातच अभिप्रेत आहे. कारण आरोग्याशिवाय मिळालेले दीर्घायुष्य हे वरदान नसून ती जीवनाची शिक्षाच असते. एकूण गोमंतकीयांमध्ये उत्कृष्ट दीर्घायुष्याचे प्रमाण मोठे असल्याचे मला दिसून आले. साठ-सत्तर-ऐंशी अशा वयाची, उत्तम आरोग्य असलेली कितीतरी माणसे मी गोमंतकात पाहिली. श्री. पंडितांचे ओपा या वाडीचे एक "भागिले" (जमीन—वाटेकरी) श्री. लक्ष्मणबाबा

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

गावडे यांचे चालू वय सुमारे शंभरीच्या आसपास होते. सतत कष्टाचे काम करीत रहाणे, मोठमोठी ओझी उचलणे, डोंगर चढणे- उतरणे, अनेक मैलांची पायी रपेट सहजावारी करणे—अशा गोष्टी अखेरपर्यंत ते अगदी प्रसन्नपणे करीत असत. दृष्टी उत्तम, कान उत्तम, सर्व दात उत्तम—अखंड सुपारी चावून फोडण्याइतके कणखर—अशा परिस्थितीत हे गृहस्थ उत्तम कार्यप्रवण होते. उन्हाळा, पावसाळा, हिवाळा सर्व काही फक्त एका लंगोटीवर! विहीर बांधण्याचे काम चालू असताना या गृहस्थाने सुमारे पंचवीस चिरे पंचवीस हातांवर उचलून नेऊन ठेविले. त्यांतील एखादा चिरा जागेवर नुसता हलविणे, हेही मला अशक्य झाले. अशा आरोग्याची कितीतरी माणसे गोमंतकात मला दिसली. अंगाने बेताची—स्थूलपणा नाममात्र नाही! ओझे घेऊन दहा-वीस मैल चालणे हे या लोकांना आजही अवघड वाटत नाही.

गोमंतकीय लोक मूलतःच चांगल्या अर्थाने कमालीचे हट्टी आहेत. एखादी गोष्ट करावयाचीच असे त्यांनी मनाशी ठरविल्यास आपल्या जिवाचीसुद्धा ते पर्वा करणार नाहीत. अंगिकारलेली गोष्ट पुरी करतील तेव्हाच ते स्वस्थ बसतील. त्यांच्या कोशात एकूण आळस हा शब्दच नाही. सतत काहीना काही काम, उद्योग, प्रयत्न हा त्यांच्या जीवनाचा स्थायीभाव आहे. इतरापेक्षा माझे काही निराळे, भव्य, दिव्य असे असले पाहिजे ही जिद्द! या जिद्दीपायी ते कोणतेही दिव्य करतील. ईर्षा, महत्त्वाकांक्षा, चिकाटी या आवश्यक गोष्टींचे बाळकडू जणू त्यांना जन्मतःच मिळाले आहे. त्यांच्या प्रकृतिमानातील चिवटपणा ही त्यांना निसर्गानेच दिलेली अद्वितीय देणगी आहे. गोमंतकीयांची कलासक्ती आणि कल्पकता याही गोष्टी विशेष स्वरूपाच्या आहेत, एका अर्थाने त्या जन्मजात आहेत. एखाद्या सिद्धीसाठी कोणत्याही त्यागाची तयारी असलेले हे लोक आहेत. गोमंतक सोडून जे लोक साधनेपायी बाहेर पडले ते पोटासाठी बाहेर पडले असे समजणे ही एक प्रकारची आत्म-वंचनाच ठरेल. कारण गोमंतकात खाण्यापिण्याला आजही कमी नाही तसे पूर्वीतर नव्हतेच!

गोमंतकीयांतील आणखी एक अतिशय महत्त्वाचा गुण म्हणजे त्यांची श्रद्धामयता. हे लोक अत्यंत श्रद्धाळू आहेत. त्यांचे सारे कुलधर्म,

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

कुलाचार ते न चुकता करीत असतात. स्वतःच्या आगरांतील पहिले श्रीफल, पहिला आंबा ते आपल्या ग्रामदेवतेला किंवा कुलस्वामीला विधिपूर्वक अर्पण केल्याशिवाय ते स्वतः खाणार नाहीत. निष्ठा दांडगी! श्रद्धा कोणाची कोठे असावी हा मुळीच महत्त्वाचा प्रश्न नाही, परंतु ती कोठेतरी असलीच पाहिजे. जीवन आणि साधना यशस्वी होण्यास श्रद्धेची अतिशयच आवश्यकता असते. अश्रद्ध जीवन हे सुकाणू नसलेल्या नावेसारखेच असते. गोमंतकीयांना हे थोर सामर्थ्य जन्मतःच लाभलेले आहे. गोमंतकीयांची एकूण रहाणी व आचार हे निसर्गाच्या अगदी सन्निध आहेत. महाराष्ट्रातील कित्येक गावे, कित्येक शहरे निसर्गापासून दूरदूर जाऊ लागली आहेत आणि त्यामुळे त्यांचे जीवन हे एक भावनाशून्य यंत्रच बनत चालले आहे. मुंबईसारख्या शहरात तर झाड किंवा वेल पहाण्यासाठी कित्येक मैल हिंडावे लागेल!

ही सर्व चर्चा इतक्या विस्ताराने करण्याचे कारण इतकेच की, वरील सर्व गुणांचे अभावी गोमंतकीय कलाकार आपली थोर साधना केव्हाच पार पाडू शकले नसते आणि केव्हाही यशस्वी होऊ शकले नसते. गोमंतकीयांची ही जन्मजात गुणवत्ता, त्यांची आनुवंशिकता, हवा–पाणी–अन्न, अतिशय समृद्ध निसर्ग या सर्वांतून तयार झालेली असावी. कारण कोणतेही असो, आमच्या कलेला मात्र ती अतिशय उपकारक ठरलेली आहे, हे आम्ही मोठ्या कृतज्ञतेने मान्यच केले पाहिजे. गोव्याची निसर्गसमृद्धी इतकी अपार आहे की, परमेश्वराने ही भूमी केवळ अध्यात्मसाधना आणि कलासाधना यासाठीच निर्माण केली असावी असे वाटते. गोमंतकात कोठेही नजर टाका, जिकडे तिकडे नारळी, पोफळी, काजू, आंबे यांची प्रचंड आगरेच दिसतील. सारे काही हिरवे–हिरवेगार. अति प्रसन्न. मोठमोठे डोंगरही निसर्गाच्या या हिरव्यागार शालीत लपून बसलेले दिसतील. मँगेनीज मिळविण्याच्या जोराच्या उद्योगामुळे आता मात्र तुरळक कोठे कोठे झाडी तुटू लागली आहे–डोंगर उघडेबोडके दिसू लागलेले आहेत. धनलोभाने मनुष्य काय करणार नाही?

माझ्या आजपर्यंतच्या जीवनात श्रेष्ठ आणि अधिकारी अशा गोमंतकीय कलाकारांच्या थोर कलेचा मी भरपूर आस्वाद घेतला.

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

त्यांपैकी अनेक कलाकार ही माझी श्रद्धा-भक्तिस्थाने आहेत. अनेक गोमंतकीय कलाकारांचा मला निकटचा सहवास घडला. त्यांतील काही माझी गुरुस्थानेही आहेत. या महाभाग कलाकारांनी संगीत कलेच्या महायज्ञात आपल्या सर्वस्वाच्या आहुती दिल्या. आपल्या जीवनातील कित्येक वर्षे-कित्येक तपे या तपःश्चर्येपायी त्यांनी खर्ची घातली. रात्र नाही—दिवस नाही, ऊन नाही—पाऊस नाही, कशाचीही पर्वा न करता संगीत यज्ञाची सांगता करण्यासाठी त्यांनी सर्वस्वाच्या समिधा अर्पण केल्या. परिश्रमाची चिंता नाही, मानापमानाची तमा नाही, उद्याचा विचार नाही, आजचा लोभ नाही, अशा अध्यात्मप्रवणतेने त्यांनी नाद-ब्रह्माची उपासना केली. केवळ संगीतसाधना, हा एकच महामंत्र त्यांनी जीवनभर जपला. संगीत साधनेसाठीच ते जन्माला आले व साधना करीत करीतच जगाला काही दिव्य संदेश देऊन ते अंतर्धान पावले. अशा काही कलाकारांचा अगदी जवळून संबंध येण्याचे भाग्य मला लाभले. अशा थोर कलाकारांनी या कलेपायी जे काबाडकष्ट उपसले, हाडांची काडे केली, त्या सर्व हकीकती आमच्या आजच्या आणि उद्याच्या संगीताभ्यासूंना विशेष उद्‌बोधक, स्फूर्तिदायक व मार्गदर्शी ठरणाऱ्या आहेत, अशी माझी श्रद्धा होती. अशा सिद्ध कलाकारांचे कला-विषयक मननीय व सखोल विचार हेही आमच्या संगीताभ्यासूंना आणि अन्य रसिकांनाही अतिशय उद्‌बोधक ठरणारे आहेत. नव्हे, हे सारे आमच्यासमोर इतिहासरूपाने आलेच पाहिजे, असे मला गेली कित्येक वर्षे वाटत आले आहे. शिवाय अशा कलाकारांचे आणि त्यांच्या सर्व-समर्थ कलेचे कृतज्ञ स्मरण आम्ही सतत ठेवले पाहिजे, त्यांनी आमच्यावर जे ऋण करून ठेवलेले आहे त्या ऋणातून अंशतः तरी मुक्त होण्याचा एकच मार्ग म्हणजे त्यांचे कृतज्ञ स्मरण हाच होय, असेही मला वाटे! याच कल्पनेने अशा काही कलाकारांबाबत निरनिराळ्या बऱ्यावाईट प्रसंगांच्या निमित्ताने वृत्तपत्रांतून व मासिकांतून अनेकदा लेखन करून त्यांना आदरांजली वाहण्याचे कार्य आजवर मी करीत राहिलो, परंतु हे सारे लेखन स्फुट स्वरूपाचे असल्याने त्याला स्थल-कालाच्या मर्यादा पडल्या. या सर्व गोष्टी विस्ताराने मांडण्यास ग्रंथलेखनच आवश्यक व सोयीचे असते. परंतु असे ग्रंथलेखन करणे व ते प्रसिद्ध करणे या दोन्हीही

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

बाबी निदान संगीत क्षेत्राला तरी अद्यापपर्यंत फारशा सुलभ होत नाहीत. मुख्यत: त्या अतिशयच खर्चाच्या होतात. शिवाय त्यांत जोखीमही फार असते. अशा सर्व परिस्थितीमुळे ग्रंथलेखनाची माझी तीव्र इच्छा असूनही — शिवाय ते माझे एक महत्त्वाचे कर्तव्य असूनही त्याला मूर्त स्वरूप देणे अगदी अशक्य होते. माझ्या हातून या विषयावर कधीकाळी काही ग्रंथलेखन होईल असे मला कधी स्वप्नातही वाटले नव्हते, परंतु याबद्दल माझ्या मनात मात्र तीव्र यातना होत होत्या. एक प्रकारची विलक्षण तळमळ होती. हे कार्य कोणीतरी अवश्य केले पाहिजे, कारण ते तितकेच महत्त्वाचे आहे... असे अनंत विचार माझ्या मनात थैमान घालीत होते आणि नेमक्या अशाच एका वेळी मडगाव येथील "स्वरमंच" या संस्थेचे एक उत्साही व कर्तबगार कार्यकर्ते आणि माझे एक जुने स्नेही श्री. माधवराव पंडित हे अचानक पुण्यास माझ्याकडे आले. माझ्या मनात अनेक वर्षे वसत असलेले वरील विचार मी त्यांना सहज अहेतुकपणे बोलून दाखविले. ईश्वरीसंकेत असा विलक्षण की, त्यांना माझी कल्पना आवडली—पटली. तीं त्यांनी मोठ्या जिद्दीने उचलून धरली व तावडतोब "तुम्ही ग्रंथलेखन सुरू करा, आमच्या संस्थेमार्फत मी ते प्रसिद्ध करतो." अशी आज्ञाही करून ते निघून गेले. नंतर ते त्यांच्या कामाला लागले व मी ग्रंथलेखनाचा आराखडा तयार करण्याच्या मागे लागलो.

सकृद्दर्शनी हे काम थोड्या परिश्रमाचे परंतु माझ्या पूर्णत: आवाक्यातले आहे असे मला वाटले होते. याचे मुख्य कारण असे होते की, ज्या कलाकारांबद्दल लिहावयाचे असे मी मनाशी पक्के केले होते, त्यांपैकी बहुसंख्य कलाकार माझ्या प्रत्यक्षपणे डोळ्यांपुढे होते. त्यांचा—माझा थोडा फार परिचयही होता, त्यांची कला माझ्या डोळ्यांपुढे होती, आणि यामुळेच हे कार्य सहजपणे करता येईल, हा माझा समज झालेला होता. या दृष्टिकोनातूनच त्या कलाकारांची माहिती गोळा करण्याच्या उद्योगाला मी लागलो, परंतु प्रत्यक्ष कार्य करताना मात्र हे काम सोपे तर नाहीच. उलट ते खऱ्या अर्थाने "अनंत" अशा स्वरूपाचे आहे याचा मला पदोपदी साक्षात्कार घडू लागला. कारणें अशी : ज्या कलाकारांचे जीवनचरित्र आणि त्यांच्या संगीत साधनेबाबत काही नेमके लिहावयाचे त्या साधनेच्या विशाल

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

वटवृक्षाची पाळेमुळे इतकी दूरवर पसरली आहेत– खोलवर रुजली आहेत की, या विषयावर माझ्यासारख्या बहुसंख्य लेखकांनी या कामी कितीही परिश्रम केले तरीही हे कार्य शेवटी फार मोठ्या प्रमाणावर शिल्लकच राहील! मी प्रत्यक्ष मुलाखती घेताना मला असे आढळून आले की, बहुसंख्य गोमंतकीय कलाकारांच्या गेल्या दहा–वीस पिढ्यांतून हीच साधना चालत आलेली आहे. या अनेक पिढ्यांचे संस्कार पाठीशी घेऊनच आजचे कलाकार कलासंपन्न झाले. अर्थात गेल्या इतक्या पिढ्यांचा इतिहास मिळविणार कसा आणि देणार कोण? अशी परिस्थिती असल्याने माझ्या लेखनाच्या कामी मला काही मर्यादा घालून घेणे जरूरीचे झाले. अशी मर्यादा घातल्यानंतरही बऱ्याच अडचणी निर्माण झाल्या. मर्मज्ञ वाचकांना जी माहिती पुरवायची ती अगदी विश्वसनीय अशीच असली पाहिजे, यावर माझा मुख्य कटाक्ष होता. शिवाय मी स्वतः काय म्हणतो यापेक्षा या तेजस्वी कलाकारांची कला-साधनेबाबत कोणती मते आहेत, हे समजणे हे माझ्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाचे होते व आहे. किंबहुना प्रस्तुतच्या ग्रंथप्रपंचाचा मुख्य भाग माझी स्वतःची मते हा नसून या कर्तव्यनिष्ठ कलाकारांची मते सुसंगतपणे मांडणे हाच आहे. अर्थात हा व्याप सहजावारी पार पाडण्यासारखा नाही, हे प्रत्यक्ष कामाला लागल्यानंतर चांगलेच कळून आले. या कलाकारांच्या वेळोवेळी मुलाखती घेणे, त्यांना अशा कार्याचे महत्त्व पटविणे आणि त्यांच्याकडून आपल्याला हवी असलेली नेमकी माहिती मिळविणे या साऱ्या गोष्टी किती त्रासाच्या आहेत, याचाही अनुभव मला पदोपदी आला. वानगीदाखल या कामातील एकच अनुभव उद्धृत करतो: माहिती घेण्यासाठी बराच प्रयत्न करून भारतीय कीर्तीच्या एका मातबर गोमंतकीय कलाकाराच्या मुलाखतीसाठी मीं गेलो. त्यांना माझ्या या कार्याची रूपरेषा स्थूलमानाने समजावून सांगितली. त्यावर त्यांनी पहिल्याच प्रश्नात मला नामोहरम केले. "तुमच्या या पुस्तकाचा उपयोग काय? पुस्तकानं कलावंत निर्माण होतात का? पुस्तकानं कलावंत निर्माण झाले असते तर आम्ही हाडाची काडं करून, गुरूची सेवा करून, इतका पैसा खर्च करून जी विद्या मिळवली, ती आम्ही मूर्ख होतो म्हणून की काय? तुम्ही हे पुस्तकवगैरे लिहिण्याच्या मुळीच फंदात

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

पडू नका, याचा काहीही उपयोग नाही!" त्या कलाकाराच्या या सरबत्तीने माझी अवस्था काय झाली असेल ती सूज्ञ वाचकांनीच समजून घ्यावी. या कलाकाराचा प्रश्न मुळीच चुकीच नव्हता. संगीतसाधनेपायीच त्यांनी आपली सारी हयात खर्ची घातली. त्यांना महत्त्व पटले ते निव्वळ प्रत्यक्ष साधनेचे! त्याच्या या प्रश्नमालिकेबाबत मी मोठ्या नम्रतेने खुलासा केला. "निव्वळ पुस्तकानं कलाकार केव्हाच तयार झाले नाहीत, होणारही नाहीत, हे मलाही पूर्णतः मान्य आहे. माझ्या या पुस्तकाचा तो हेतूही नाही, परंतु आपल्यासारख्या विद्वान कलाकारांनी स्वतःची संगीतसाधना कोणत्या महत्त्वाकाक्षेनं पार पाडली, किती परिश्रम केले, अडीअडचणीचे डोंगर फोडून आपला हा प्रवास कसा पुरा केला हे समजावे आणि संगीत विषयातील आपली सखोल आणि मार्मिक मते आमच्या जिज्ञासू साधकांपुढे यावीत म्हणजे त्यांतून त्यांना खचित् स्फूर्ती घेता येईल– मार्गदर्शनही घडेल. या ग्रंथलेखनाच्यामागं माझा हा एकच हेतू आहे!" हा खुलासा त्यांना अंशतः तरी पटला असावा, कारण त्यांनी मुलाखत देण्याचे मान्य करून त्यानुसार विस्तृत मुलाखत दिलीही.

या कामी आणखी एक अडचण समजून आली की, संगीतामध्ये गायन, वादन व नृत्य या तिन्हींचा वस्तुतः समावेश होतो. शिवाय गोमंतकीय कलाकारांत या तिन्ही बाजूंच्या श्रेष्ठ कलाकारांची फारच मोठी संख्या आहे. हा इतका मोठा लेखनप्रपंच व्यवस्थितपणे पार पाडणे हेही माझ्या सोयीचे होणारे नव्हते. याचा पूर्ण विचार करून मला ज्यांची माहिती मिळू शकेल असे मुख्यतः गायक, काही तबलावादनकार आणि गायक-नट यांच्यावरच लिहिण्याची मर्यादा घालून घ्यावी लागली.

गोमंतकीय कलाकारांच्या या पुस्तकाच्या निमित्ताने अनेक गाठी–भेटी–मुलाखती घेताना मला काही गोष्टी प्रकर्षाने जाणवल्या. या कलाकारांनी जी अचाट संगीतसाधना पार पाडली ती त्यांच्या मूलतः पिंडामध्ये असलेल्या उल्लेखनीय व आदर्श अशा गुणवत्तेवरच! त्यांची ही दैवी गुणसंपदा पाहून माझे मस्तक अनेकवार नमले! मला हे

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

अगदी प्रामाणिकपणेच सांगावे लागेल की, गोमंतकीय कलाकारांची ही गुणसंपदा इतरत्र अगदी अभावानेच दिसून येते. जुआरी-मांडवी यांच्या पदस्पर्शाने पावन झालेल्या गोमंतकभूमीने आम्हाला काय दिले नाही ? मोठमोठे साधु-संत दिले, श्रेष्ठ गायक– वादक– नर्तक– नट दिले, थोर चित्रकार– शिल्पकार दिले, वीरपुरुष दिले, समर्थ धन्वंतरी दिले, महान देशभक्त– राजकारणी पुरुष दिले, याबावत आम्हाला सदैव कृतज्ञता वाटेलच !

याच प्रसंगाने काही काही गोष्टी मात्र मला विलक्षण खटकल्या. त्यांचाही येथे आवर्जून उल्लेख करणे प्राप्त आहे. ज्या ज्या गोमंतकीय कलाकारांच्या घरांमध्ये दहादहा– वीसवीस पिढ्यांतून आजवर नाद-ब्रह्माचा जयघोष निनादत आलेला आहे, त्यांच्याच घरांतून भावी (आणि आजच्याही) पिढीने तंबोऱ्याला पूर्णतः हद्दपार केल्याचे पाहून मला मनस्वी दुःख झाले. नसत्या चुकीच्या सामाजिक स्वास्थ्याच्या कल्पनेच्या आहारी जाऊन आपल्या या कुलदैवताचा त्याग करण्याचे धाडस तरी त्यांनी कसे केले आणि का केले ? गृहस्थधर्म स्वीकारल्या-नंतर त्याला संगीतसाधना का आड यावी, हे कोडे साक्षात् ब्रम्हदेवालाही उलगडणारे नाही ! आपल्या सर्व प्रकारच्या धार्मिक आणि सामाजिक सुसंस्कारांमध्ये संगीत ही समवाय स्वरूपाची एक अत्यावश्यक बाब अधिकृत समजली जाते. चराचर सृष्टीची निर्मितीही ओंकारापासून झाल्याचेही आपण मान्य करतो. शास्त्रविहीत असलेली ही प्रणवोपासना कलाकारांच्या घरी जन्मलेल्या-वाढलेल्यांना मात्र आज त्याज्य ठरावी हे आमच्या संगीतकलेचे महान् दुर्दैवच होय! आंग्लविद्याविभूषित बी. ए.–एम्. ए.सारख्या उच्चपदवीविभूषीत अन्य प्रांतीय स्त्रिया स्वतःचा प्रपंच आदर्श स्वरूपाचा करूनही संगीतसाधना करीत आहेत. अशी उदाहरणे गोमंतकीयांनी बारकाईने पाहून नंतरच स्वतःबावत निर्णय घेणे हिताचे ठरेल. एरव्ही अविचाराने घेतलेला निर्णय " आम्ही हातचे गमावले " याचा भावी कालांत पदोपदी पश्चात्ताप व्हावा इतक्याच किंमतीचा होय ! गोमंतकाच्या सुजलाम् - सुफलाम् भूमीने आंबे, फणस, श्रीफल, सुपारी, काजू, अननस यांच्याप्रमाणेच कलाकारांचेही अमाप पीक आम्हाला आजवर दिले, त्याच गोमंतकात संगीताची आज

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

काय परिस्थिती आहे ? गोमंतकभूमी उत्कृष्ट कलावंत पुरविण्यास आज असमर्थ ठरली आहे का ? की आम्हीच तिला असमर्थ बनविले ?

केवळ भारतातच नव्हे तर जगातील सर्वच देशांतून संगीत कलेबाबतचे महत्त्व सतत वाढू लागलेले आहे. कलाशास्त्र, सौंदर्यशास्त्र, मानसशास्त्र, आरोग्यशास्त्र आणि वनस्पतिशास्त्र इत्यादी शास्त्रांच्या दृष्टीनेसुद्धा संगीत ही कला तारक आहे– प्रेरक आहे ही कल्पना दिवसेंदिवस सप्रमाण पक्की होत आहे. त्यामुळे या कलेच्याद्वारे मानवी जीवनाला उपकारक ठरावीत, अशी महत्त्वपूर्ण संशोधनेही सर्वत्र सुरू झालेली आहेत. संगीत कलेपासून मिळणाऱ्या खात्रीपूर्वक फायद्यांची आशादायी नोंदही हे शास्त्रज्ञ करू लागलेले आहेत. संगीतकलेसारख्या श्रेष्ठतम कलेचे बाळकडू यशस्वी जीवनासाठी अत्यावश्यक आहे, याबद्दल कोणाचेही दुमत राहिलेले नाही. हे सर्व साध्य होण्यासाठी शालेय जीवनात अगदी सुरवातीपासूनच संगीत हा विषय सक्तीचा करावा, असेही शिक्षणाधिकाऱ्यांनी निश्चित केलेले आहे. त्यानुसार शिक्षणखात्याची प्रत्यक्ष पावलेही पडू लागलेली आहेत. कर्नाटक, मध्य-भारत व उत्तरभारत यांना हे महत्त्व पूर्वीच पटलेले आहे. त्यांच्याकडे पदवी परीक्षांसाठी संगीत हा विषय मान्यतेच्या स्तरापर्यंत केव्हाच पोचलेला आहे. महाराष्ट्रातील विद्यापीठांनीही आता हे दालन आवश्यक म्हणून उघडलेले आहे. सरकारी कला अकादमीचें बहुमोल कार्य तर जनतेपुढे आहेच. संगीत कलेच्या या सर्वत्र वाढत्या स्वागताचा विचार गोमंतकीयांनी आजच करण्याइतका तो महत्त्वाचा आहे. संगीत विद्येचे पालन-पोषण आजपर्यंत मुख्यतः गोमंतकीय स्त्रियांनीच केलेले आहे. बाबलीबाईंसारख्या गानसिंहिणीने आपल्या सामर्थ्यसंपन्न गर्जनेने आमची सारी संगीतसृष्टीच दणाणून सोडली. केवळ संगीतासाठी बाबलीबाईंनी सर्वस्वाचा संन्यास घेतला आणि त्यांच्याच आजच्या लेकी, नाती, स्नुषा या फक्त संगीताचाच संन्यास घेण्यास तयार व्हाव्यात हे एक महान दुर्दैव होय.. आजपर्यंत जेथे सोन्याचा धूर निघाला, त्याच कलाप्रपंचात आज गाडगी-लोटकीसुद्धा दिसू नयेत ही नियतीची एक दुःखपूर्ण किमयाच समजली पाहिजे. इतर सर्व स्त्रिया पूर्वापारची " चूल आणि मूल " ही कोंडी फोडून अनेक क्षेत्रांतून पुरुषांपेक्षाही अधिक पराक्रम दाखवू

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

लागलेल्या आहेत, आणि आमच्या गोमंतकीय मायभगिनीच फक्त या पराक्रमाकडे पाठ फिरवून "चूल आणि मूल" इतकेच सांभाळण्याचे ध्येय आखीत आहेत. इतर क्षेत्रांतून महान कार्य करणाऱ्या स्त्रियांना चूल आणि मूल कोठेही आड येत नाही, परंतु गोमंतकीय स्त्रियांना मात्र संगीत-साधनेच्या आड ते का यावे? गोमंतकीय स्त्रियांचा संगीत-साधना हा एक मूलभूत हक्क आहे, त्यापासून त्यांनी विचलित होणे हे कोणत्याही दृष्टीने समर्थनीय ठरणारे नव्हे. आजच्या गोमंतकीय स्त्रियांनी स्वतःच्या चुकीच्या सामाजिक प्रतिष्ठेच्या कल्पनांचा त्याग करून तंबोरे पुन्हा हाती घेणे जरूरीचे आहे. आता काळ बदललेला आहे.– याच्यापुढेही तो अगदी झपाट्याने बदलणार आहे, याची दखल त्यांनी आजच घेणे जरूरीचे आहे. त्यांच्या संगीतसाधनेने त्यांची चूल, मूल, प्रतिष्ठा आणि त्यांचा एकूण सामाजिक दर्जा यांच्यात वाढच होईल, हे सौ. किशोरीबाई आमोणकर यांच्यासारख्या चूल-मूल सांभाळूनही उत्कृष्ट संगीत-साधना केलेल्या एका सुविद्य गोमंतकीय गायिकेने अपवादाने तरी सिद्ध केलेले आहे.

या सर्वांचा विचार गोमंतकीयांनी व गोमंतकाबाहेर राहणाऱ्या गोमंतकाच्या श्रेष्ठ कलाचार्यांनी वेळीच केला पाहिजे. अशा वेळी "स्वरमंच", "विवेकानंद सोसायटी" व "गोमंतक कला अकादमी" या संस्था संगीतादी ललितकलांच्या पुनरुत्थानार्थ कटिबद्ध झालेल्या आहेत, हे एक सौभाग्यचिन्हच होय. या संस्थांना गोमंतकीय जनतेने फार मोठ्या प्रमाणावर साहाय्य करणे जरुरीचे आहे. गोमंतकाला ललामभूत ठरलेली ही गानविद्या गोमंतकाने प्राणपणाने जपलीच पाहिजे आणि तीही आजच! मुंबईसारख्या ठिकाणी असणाऱ्या गोमंतकीय विद्वान कलाकारांनीही या कार्यास कर्तव्यबुद्धीनेच जोराचा हातभार लावला पाहिजे, असे त्यांना नम्रतापूर्वक सुचवावेसे वाटते.

रसिक वाचकांच्या सोयीसाठी काही खुलासा करणे हे माझ्या-दृष्टीने फार अगत्याचे आहे. पन्नास वर्षांपूर्वीची सामाजिक परिस्थिती आज राहिलेली नाही. ती आमूलाग्र बदललेली आहे. पेहराव, राहणी, आचार-विचार, आहार-विहार यांत आज कितीतरी बदल झालेला

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

आहे. मानवी सुधारणावादी गरजांच्या प्रयत्नांनी आजच्या निसर्गातही फरक पडत चाललेला आहे. सारे जगच अध्यात्म व निसर्ग यांपासून दूरदूर जाऊ लागलेले असून, ते भौतिक सुखसोयींच्या मागे लागलेले आहे. त्यामुळे पूर्वीच्या आमच्या थोर कलाचार्यांचा चिवटपणा, जिद्द, कणखरपणा व आशावाद या सर्व गोष्टी आज अपरिहार्यपणे मोठ्या प्रमाणावर खच्ची झालेल्या आहेत. यामुळे पन्नास वर्षांपूर्वीचा श्रेष्ठ कलाकार व आजचा श्रेष्ठ कलाकार यांच्या कलात्मक पात्रतेची किंवा दर्जाची तुलनाच होण्यासारखी नाही आणि ती तशी कोणी करण्याचा वृथा प्रयत्न करू नये. गायनाचार्य रामकृष्णबुवा वझे हे त्यांच्या काळातील एक श्रेष्ठ कलाकार होऊन गेले. अशा परिस्थितीत आजच्या कोणत्या कलाकाराला आपण त्यांच्या मालिकेत बसवू शकतो? त्यामुळे आजचे मोठे कलाकार हे 'आजच्या काळातील मोठे आहेत" याचे तारतम्य वाचकांनी कृपा करून सतत ठेवावे असे आग्रहाचे सांगणे आहे.

दुसरे असे की, ज्याच्यांजवळ दहा लाख रुपये आहेत त्याला आपण व्यवहारात 'श्रीमंत' म्हणतो, आणि ज्याच्याजवळ दहा कोटी रुपये आहेत त्यालाही आपण श्रीमंतच म्हणतो. श्रीमंत, अति श्रीमंत, किंवा अति-अति श्रीमंत असे वाक्प्रयोग आपण करीत नाही. संगीताच्या रसग्रहणपर लेखनातही परिभाषेची नेमकी हीच अडचण येते, आणि म्हणूनच अशा वेळी लेखकाच्या लेखनकौशल्यापेक्षाही रसिक वाचकांच्या सूक्ष्म तारतम्याची अधिक गरज असते.

मी ज्या ज्या कलाकारांना अनेक वर्षे सतत ऐकले आहे त्यांच्या कलेचे 'मला समजलेले' मर्म मी शक्य तितक्या साक्षेपाने वाचकां-समोर मांडलेले आहे. परंतु खरी गोष्ट अशी की कलाकार जितका मोठा असेल त्या मानाने त्याची कलाही महासागरासारखी खोल, तशीच अतिशय गुंतागुंतीची असते. खुद्द त्या कलाकारालाही त्याच्या कला-मत्तेचा अगदी शंभर टक्के अंत असा कधीच लागत नाही. अशी परि-स्थिती असल्याने मी केलेले रसग्रहण परिपूर्णच आहे असा आग्रह मी कसा धरू शकेन? परंतु नम्रपणे मी इतके विश्वासाने सांगू शकेन की कोणाही कलाकाराच्या यशाचे माप त्याच्या पदरी भरपूर पडले पाहिजे,

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

या सावधानतेनेच लेखन करण्याचा मी प्रयत्न केलेला आहे. माझा प्रयत्न किती प्रमाणात यशस्वी झालेला आहे हे सहृदय वाचकांनीच ठरवावयाचे आहे !

वाचकांना आणखी एक सांगावयाचे ते असे की, या ग्रंथलेखनाच्या कामी काही काही कलाकारांची मला भरपूर माहिती मिळू शकली, तर काही कलाकार आज माझ्या डोळ्यांसमोर असूनसुद्धा त्यांची माहिती मला मुळीच मिळू शकली नाही. काहींची अगदीच त्रोटक मिळाली. दिवंगत कलाकारांबावत तर काय सांगावे ? त्यांची माहिती मिळविणे हे तर महाकर्मकठीण. उदाहरण म्हणून एकच सांगतो— कै. वावली-वाई यांची माहिती मिळविण्यासाठी मी सारी मुंबई पालथी घातली. भावनगरपर्यंत पत्रव्यवहारही केला. या सर्व खटाटोपातून माहिती किती मिळाली ? "वावलीवाई या एक महान गायिका होत्या. त्या केव्हा तरी होत्या आणि केव्हातरी वारल्या !" हीच ती माहिती. अर्थात एवढ्या माहितीवर मी काय व किती लिहू शकणार ? अशीच परिस्थिती अनेक कलाकारांची झालेली आहे. शिवाय ज्यांच्या कलात्मकतेचा मी प्रत्यक्ष आस्वाद घेतलेला आहे, अशा कलाकारांच्यावावत मी काही विस्ताराने लिहू शकलो आहे. लेखाला किती पाने खर्ची पडली यावर मी त्या त्या कलाकारांचे मूल्यमापन केले आहे असे वाचकांनी कृपा करून समजू नये. त्यांच्या कलेचा दर्जा माझ्या लेखनातील पृष्ठे किंवा ओळी यांवर मुळीच अवलंबून नाही !

ज्या गोमंतकीय श्रेष्ठ कलाचार्यांनी स्वतःची संगीतसाधना अपार कष्टाने पार पाडून सिद्धी मिळविली, त्यांच्या जीवनचरित्रांतून आमच्या भावी पिढ्यांना काही बोध व्हावा आणि स्फूर्तीही लाभावी, या एकाच हेतूने या ग्रंथलेखनास मी उद्युक्त झालो. हा हेतू अंशतः यशस्वी झाला तरी माझ्या परिश्रमाचे सार्थक झाल्याची धन्यता मला वाटेल. ईश्वर-कृपेने हे घडो इतकीच मनोमय प्रार्थना !

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

' गुणिजनांचे स्मरण '

पु. ल. देशपांडे

" गोमंतकीय संगीतकार " हे श्री. मारुलकर ह्या एका गुणिजनाने गोमंतकात जन्मलेल्या इतर गुणी जनांचे केलेले स्मरण आहे. भारतीय संगीताच्या क्षेत्रात गाणाऱ्या-वाजवणाऱ्यांना ' गुणी जन ' ही एक सुंदर उपाधी आहे. गुणिजनांनी गुणिजनांचे कौतुक करावे. ' तेच एकमेकांना जाणतात ' अशा अर्थाच्या कित्येक चीजाही आहेत. एखाद्या प्रतिभावान् गायक-नायकाची उत्तम मैफिल जमलेली असताना त्याला मिळालेल्या जाणकाराच्या प्रतिसादाच्या स्मरणातून अशा चीजांचा जन्म झालेला असावा असे मला वाटते. आपण जी काही कामगत केली तिचा जाणिवेने झालेला स्वीकार पाहून मनाला जी धन्यता वाटली असेल त्या धन्यतेतून फुललेल्या ह्या चीजा आहेत. मारुलकरांचा हा ग्रंथ एका परीने त्या चीजेसारखाच आहे. फरक इतकाच की ही ' चीज ' गायकाच्या मनातून न फुलता एका डोळस आणि सश्रद्ध श्रोत्याच्या भूमिकेतून गायन ऐकणाऱ्या गुणिजनाकडून तयार झाली आहे. एका निराळ्या पद्धतीने त्या गुणिजनांना दिलेली आणि लेखनात कोरून ठेवलेली दाद आहे.

दाद देणारे मारुलकर संगीतातले अधिकारी आहेत आणि ज्यांना ही दाद दिली तेही ह्या क्षेत्रांतले ज्ञानवंत अधिकारी आहेत. योगायोग असा की हे सारे श्रेष्ठ कलावन्त गोमन्तकीय आहेत आणि मारुलकरांनी त्यांच्याविषयी आदरभावाने

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

लिहिले आहे. ह्या ग्रंथारंभीचे चार शब्द मीदेखील त्याच आदरभावाने लिहीत आहे. फक्त त्यात आणखी एका व्यक्तीविषयीच्या आदराची मला भर करायची आहे. ती व्यक्ती म्हणजे स्वतः श्री. मारुलकर.

श्री. मारुलकरांचा आणि माझा आता फार जुना म्हणायला हरकत नाही, इतक्या वर्षांपासूनचा परिचय आहे. त्यांच्या यापूर्वीच्या एका ग्रंथालाही मी प्रस्तावना लिहिली आहे. याही ग्रंथाला लिहीत आहे. हे थोडेसे एखाद्या गायकाच्या गाण्याला सवयीच्या तवलजीने वारंवार साथीला बसण्यासारखे आहे. मारुलकरांची साथ करण्याची माझी योग्यता नाही मात्र त्यांच्या स्नेहाची आणि आपुलकीची साथ मला आजवर मिळत आलेली आहे. एखाद्या मैफिलीसंबंधीची त्यांची समीक्षा ऐकताना एरवी अबोल असणाऱ्या मारुलकरांचे संगीतातले पाणी किती खोल आहे याची साक्ष पटते. संगीताकडचे त्यांचे पाहणे हे ज्ञात्याचे पाहणे आहे. त्यात अकारण उचंबळून येणे नाही की अकारण तुटून पडणे नाही. ह्यामागे मला वाटते त्यांनी मनात सतत जतन करून ठेवलेला शिष्यभाव आहे. हा भाव मनात ठेवूनच त्यांनी गायनकलेकडे पाहिलेले आहे. 'गायन' हा त्यांच्या जीवनसाधनेचा विषय असल्यामुळे आदराने मस्तक नमवावे अशा व्यक्ती त्यांना प्रथमतः गायनकलेच्या क्षेत्रातच आढळाव्या हे साहजिक आहे. प्रस्तुत पुस्तकात त्यांना आढळलेल्या गोमंतकीय गुणिजनांचा अंतर्भाव आहे. याचे कारण उघड आहे. भारतीय संगीताला ह्या चिमुकल्या भूप्रदेशाने अलौकिक कलावंतांचे दान दिले आहे. सर्वसामान्य भाषेत ह्याला आपण मातीचा गुण म्हणतो. – गोमंतकाची ख्याती आता लोखंडाच्या खाणीविषयी झाली आहे. यंत्रयुगात माणसापेक्षा धातूनाच सोन्याचे गुण चिकटणे अपरिहार्य आहे. परंतु ही खाण सोन्यासारख्या गुणिजनांचीही होती. 'होती' म्हणायचे कारण कालचक्राच्या परिवर्तनाबरोबर समाजव्यवस्थेची आणि सांस्कृतिक गंगोत्र्यांची उगमस्थाने बदलतात हे आहे.

एक काळ असा होता की 'देवालय' हे संस्कृतीचे उगमस्थान होते. साहित्य-संगीत-कला-नाट्य-नृत्य-चित्र-शिल्प साऱ्यांचा उगम देवालयांच्या परिसरात व्हायचा. संतांचे साहित्य, मंदिरांतील शिल्प, रंगमंडपातील नृत्यगायन ही देवाची पूजा होती. सामान्यजनांनी देवाला दाखवलेल्या नैवेद्याचा प्रसाद म्हणून मिष्टान्नाचा स्वीकार करायचा जसा परिपाठ होता, तसाच ह्या कलांचा आस्वादही–देवाचा प्रसाद म्हणूनच स्वीकारायचा असे. कलावंताची कला कृष्णार्पणमस्तु ह्या भावनेनेच निर्माण होत असे. ह्यातूनच देवाला फुलांनी शृंगारणाऱ्या देवाच्या माळ्यांचा उगम झाला आणि स्वर-पुष्पांनी नटवणाऱ्या गायकगायिकांचा आणि वादकांचाही. दरबारातून राजाचे रंजन करणाऱ्या दरबारी गायकांनाही देवाची सेवा सुटत नव्हती. ह्या परंपरेचे इष्ट आणि अनिष्ट असे दोन्ही परिणाम झाले. देवदासीचे देवदासीपण जन्माने लादले जाणे ही

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

काही भूषणावह गोष्ट नव्हती. त्यातील सामाजिक उच्च-तुच्छतेचा विचार तर घृणास्पद होता. त्या उपेक्षेचा कधी कर्मभोग म्हणून तर कधी कलोपासनेत दंग राहून स्वीकार होत गेला. रोपट्याचे मातीशी, उन्हाशी आणि वाऱ्या-पावसाशी चाललेले झगडणे दिसू नये आणि पाहाणाऱ्याला सुंदर फूलच पाहायला मिळावे अशीच ह्या गोमंतकीय गुणि-जनांच्या कला-साधनेची अवस्था होती. आणि शेवटी स्मरणात राहिली, आल्हाद आणि सुगंध देऊन गेली ती फुले. मातीत जखडलेल्या मुळांचे झगडणे दडले गेले.

अशा ह्या विपरीत सामाजिक अवस्थेतल्या बहुसंख्य कलावंतांनी स्वतःला कलेच्या दुनियेत ज्या निर्धाराने झोकून दिले होते त्यांच्याविषयी समाजाने कृतज्ञ राहायला हवे. अपमान-उपहास सोसून स्वातंत्र्यासाठी झगडणाऱ्या राष्ट्रपुरुषाइतकीच विपरीत परिस्थितीत भोगावी लागणारी उपेक्षा आणि अवहेलना सोसून ती उपेक्षा करणाऱ्या तथाकथित प्रतिष्ठित समाजाला सुरलयीच्या दिव्य लोकांत नेणारे हे कलावंतही श्रेष्ठ आणि वंदनीय आहेत. लयब्रह्माशी तादात्म्य पावलेले खाप्रूमाम हे ऋषीच. प्रतिकूल परिस्थितीच्या झंझावातातून आपला सूर टिकवणाऱ्या अंजनीबाई, केसरबाई, मोगूबाई ह्या तपस्विनीच! एवढेच नव्हे तर एका अलौकिक दैवी संपत्तीच्या स्वामिनी.

माझ्या सुदैवाने ह्या ग्रंथांत ज्यांचे स्मरण केले आहे अशा थोर दिवंगत आणि सुदैवाने आज आपल्यात असलेल्या कलावंतांच्या कलेचा काही अपवाद वगळल्यास मला स्वतःला आस्वाद घेण्याचे भाग्य लाभले आहे. अंजनीबाईंचे गायन ऐकण्याचा योग आला नसला तरी त्यांची भेट झाली आहे. त्यांच्या व्युत्पन्नतेचा संभाषणातून प्रत्यय आला आहे. वझेबुवांचे गायन ऐकायला मिळाले आहे. त्यांच्या सुरांतल्या बुलंदपणाने आणि एखाद्या ग्रीक शिल्पासारख्या त्यांच्या गायनाकृतीच्या दर्शनाने श्रोते स्तंभित होऊन जात. बेळगावला असताना विठ्ठलराव कोरगावकरांची झुळझुळती पेटी मी कित्येक वेळा ऐकली आहे. पुण्यात रामकृष्णबुवा पर्वतकरांचा तबला तर ऐकलाच आहे. पण त्याबरोबरच त्यांची चित्रकलाही पाहिली आहे. लयीशी [आड-कुआडात नाचणाऱ्या त्यांच्या बोटांतून रेषाही किती लीलेने नाचू शकत असत तेही पाहिले आहे. मधु पेडणेकर हे तर मी नाट्य व्यवसायात जेव्हा शिरलो त्या वेळचे माझे म्यूझिक डायरेक्टर. नटवर्य चिन्तामणराव कोल्हटकरांनी ह्या गुणी माणसाला नेमके हेरून 'ललितकला कुंज' ह्या नाट्यसंस्थेत घेतले होते. मुंबईतील त्यांचे तानसेन संगीत विद्यालय—ही नुसती गायनशाळा नव्हती. ती संगीतविषयक प्रयोगशाळा होती. एवढेच नव्हे तर ते एक वर्कशॉपही होते. पेडणेकरांच्या बोटांत संगीत-कलाच नव्हे तर यंत्रतंत्रविज्ञानहि दडलेले होते. गोपाळ भोबे तर माझा मित्रच होता. भोबे गायक होता, नट होता, उत्तम चित्रकार होता, बहुश्रुत होता, आणि संगीताचा जाणकारीने आस्वाद घेता घेता त्या आस्वादाचे स्वरूप शब्दातून

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

उभे करणारा लेखकही होता. श्रीधर पार्सेकरांसारखा व्हायलिनमधून गाणारा वादक हजारांतुनी एखादा. पार्सेकरही नाट्यनिकेतनातील माझे संगीत-दिग्दर्शक. त्यांचाही स्नेह मला लाभला होता. ह्या सर्व कलावंतांचे गुणगायन वाचताना पुन्हा एकदा त्यांच्या सहवासातील दिवसांच्या स्मृती जाग्या झाल्या. ह्या थोर कलावंतांनी आपल्या कलागुणांनी ज्या असंख्य श्रोत्यांची आयुष्ये समृद्ध केली त्या सर्वांना ही संस्मरणे वाचताना त्या समृद्धीच्या क्षणांचे पुनर्दर्शन झाल्याशिवाय राहणार नाही.

गोमंतकातील आपल्या जन्मभूमीचे नाव धन्य करणारी ही माणसे. त्यांच्यावर प्रेमाचा पहिला अधिकार गोमंतकीयांचा यात संशय नाही. परंतु त्यांच्या कलेच्या आनंदाने उजळून निघालेल्या असंख्य श्रोत्यांची आपुलकीही तितकीच आहे. ज्यांचे ज्यांचे म्हणून सुरलयीवर प्रेम आहे त्या साऱ्यांचीच ही माणसे. गोमंतकात जन्मलेले मराठीतील ज्येष्ठ कवी बा. भ. बोरकर यांनी आपल्या कवितेत म्हटले आहे– 'माझ्या गोव्याच्या भूमीत येते चांदणे माहेरा.'– चांदणेच कशाला?– त्या गोव्याच्या भूमीत संगीतही असेच माहेरा येते. सुरांचे वैभव न कळणाऱ्या मूर्ख रूढिग्रस्त माणसांनी अपमानित केलेल्या गोमंतकाच्या कन्या ते सारे विसरून आपापल्या कुलदैवतांपुढे माहेरवासिनी होऊन गायला बसतात– गोमंतकाचे पुत्र मामाच्या गावाला जाणाऱ्या मुलाच्या भावनेने तिथे जातात. माहेरी किंवा मामाच्या गावी काट्यांचीही फुलेच होतात.

पुष्कळदा असे म्हटले जाते की आता गोव्यात पूर्वीसारखे गाणे उरले नाही. हे अर्धसत्य आहे. ते गाणे भारतातल्या चारी दिशांत आता पसरले आहे. एका लहानशा परीघाला ओलांडून ते गात गाव विस्तारून जनसागराला भेटायला गेले. दीनानाथ गोव्याचे होते ते सर्वांचे झाले. एका विद्युल्लतेसारख्या तानेने लक्षलक्ष अंतःकरणे उजळून टाकली. विद्या वाटल्यामुळे वाढते. कालान्तराने ती वाटणारे दाते कोण होते याचा समाजाला विसर पडतो. सदारंग अदारंग विसरले जातात त्यांचे गाणे मात्र अनेक तपःपूत गळ्यांतून खऱ्या अर्थाने जिवंत असते. अनेक वर्षानन्तर एखादा काफी-कानडा ऐकताना ह्या एके काळी केसरबाई केरकरांनी श्रोत्यांना वाटला होता, किंवा एखादा बसंती केदार ह्या मोगूबाईंनी भरभरून दिला होता हे विसरले जाईल. अनेक दात्यांची नावे विसरली गेली. पण ती दाने मात्र आजही माणसांची अंतःकरणे श्रीमंत करीत राहतात. तळे कोणी खोदले याची नोंद गाडली जाते. माणसांना त्या तळ्यातले जिवंत झऱ्याचे पाणी पिऊन लाभणारी तृप्ती चिरंजीव असते. मारुलकरांच्या ह्या लेखांमुळे दानाबरोबर त्या दात्यांचीही नावे आता साहित्यात नोंदली गेली आहेत. खूप रसिकतेने ही नोंद झाली आहे. स्थितप्रज्ञ दिसतो कसा, बोलतो-चालतो कसा हे जसे अर्जुनाला गूढ होते तसेच हे कलावंत कोण'होते, कुठले होते, त्यांचे बोलणेचालणे कसे, स्वभाव कसे, विद्यासंपादनासाठी त्यांनी काय केले याचेही रसिकांना गूढ असते. मारुलकरांच्या ह्या ग्रंथात ह्या कलावन्तांनी केलेल्या तपाची नोंद आहे. एक एक सूर

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

साधण्यासाठी ह्या श्रेष्ठ कलावंतांनी किती जीव ओतला त्याचे इथे दर्शन घडते. कलावंत जन्मावा लागतो हे तर खरेच. परंतु त्या उपजत प्रतिभेला प्रज्ञा आणि परिष्करणाची जोड हवी. गाता गळा आणि शिंपता मळा म्हटले आहे ते उगीच नाही. प्रसिद्धीचे मार्ग सुलभ झालेल्या ह्या काळात सिद्धीचे मार्ग काय होते हे सांगणे दिवसेंदिवस अधिक आवश्यक वाटते. ह्या कलावंतांना सुरलयीत ब्रह्म गवसले म्हणून तर क्षुद्र रूढींच्या पोटी होणाऱ्या तुच्छतेलाच त्यांनी तुच्छ मानले. एखाद्या मंत्रसाधकाने नव्या मंत्राकडे पाहावे तसे ह्या श्रेष्ठ गायकांनी नव्या चीजेकडे आणि नव्या रागाकडे पाहिले. त्या रागात आणि बंदिशीत दडलेली सौंदर्यस्थळे, विसाव्याच्या आणि विस्ताराच्या जागा नित्य न्याहाळल्या. गळ्यावर त्या त्या रागातील सुरांचा नेमका संस्कार होईपर्यंत त्यांच्या गुरूंनीही त्यांना त्या सुरांच्या धारेवर धरले. आणि त्यांनीही उत्तम शिष्याच्या ब्रीदाला जागून जिद्द सोडली नाही. कलेचा हा सारा प्रपंचच मुळी आनंदाने कष्ट उपसण्याचा आहे. रियाझही आनंद आणि मैफिलही आनंद! --- ह्या पुस्तकात ज्यांचा परिचय मारुलकरांनी करून दिला आहे ते असे हे आनंदक्षेत्रातले रहिवासी. त्यांचा सहवास ज्यांना लाभला, त्यांचे गायनवादन ज्यांनी ऐकले अशा रसिकांना त्या कलावंतांची मारुलकरांनी ग्रंथात करून ठेवलेली ही नोंद फार मोलाची वाटेल. पुढल्या पिढीतल्या रसिकांनाही त्याचा लाभ होईल. एखाद्या सुरेल संगीताच्या मैफिलीसारखेच हे पुस्तक जमलेले आहे. यासारखे अशाच श्रेष्ठ कलावंतांच्या संस्मरणाच्या आणखी अनेक ग्रंथरूप मैफिली मारुलकरांच्या हातून जमाव्यात असे माझ्याप्रमाणे ह्या ग्रंथाच्या वाचकांना वाटल्याशिवाय राहणार नाही याची मला खात्री आहे.

◘ ◘ ◘

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri



खाप्रूमाम पर्वतकर

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri



लयब्रह्माचे सर्वश्रेष्ठ उपासक
योगीराज कै. खाप्रूमामा पर्वतकर

सायंकाळची वेळ. माझ्या एका विद्यार्थिनीला मी मारव्याची संथा देत बसलो होतो. मारव्यातील ऋषभ-धैवताची अवस्था काय आहे, श्रुतितंत्राच्या दृष्टीने ते कसे लागले पाहिजेत, रागस्वरूप शुद्ध राखण्याच्या दृष्टीने स्वरांना श्रुतिप्रमाणेच लयीचीही अतिशय आवश्यकता असते. कोणता स्वर किती लांबवावयाचा यावरही आमची रागरूपे अवलंबून आहेत. एखाद्या रागातील विशिष्ट स्वर जर कमी-अधिक लांबविला गेला तरी त्याचा दुसराच एखादा राग तयार होतो. म्हणूनच आपल्या शास्त्रीय संगीतामध्ये स्वर आणि लय या दोन्हींनाही सारखेच महत्त्व आहे. इतकेच नव्हे तर गायकीतील एकूण रेखीवपणा व तिच्यातील परिमाणता ही अधिक प्रमाणात लयीवरच अवलंबून असतात... असा विषय मी माझ्या या विद्यार्थिनीला समजावून सांगत होतो. इतक्यात माझ्याकडे नेहमी येणारे माझे एक निकटचे मित्र श्री. रामकृष्णबुवा पर्वतकर हे माझेकडे आले. त्यांचे मागोमाग साठी ओलांडलेले अत्यंत साध्या आणि जुन्या वळणाचे एक वृद्ध गृहस्थ घरात आले. पर्शियन पद्धतीचा बंद गळयाचा लांब असा अगदी साधा

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

कोट, जुनाट अशी काळी टोपी आणि खाली पंचावजा धोतर अशा पेहरावातील त्या गृहस्थांनी अगदी शांतपणे घरात प्रवेश केला. जाडजूड भरदार मिशा आणि त्याही वयोमानानुसार त्यांतील पांढरेपणा नाहीसा होऊन त्यांना भोरा रंग येऊ लागलेला, दाढी वाढलेली, असे काहीसे करडे वाटणारे ते गृहस्थ असावेत तरी कोण, याचा तर्क मी क्षणभर करू लागलो. डोळे लालसर दिसले, परंतु ते पूर्ण समाधानी वाटत होते. हे गृहस्थ रामकृष्णबुवांचे कोणीतरी "गाववाले" किंवा दूरचे नातलग असावेत, इत्यादी विचार मी मनाशी करीत होतो. रामकृष्णबुवा माझ्याकडे रोजचेच येणारे, परंतु हे वृद्ध गृहस्थ मात्र माझ्या घरी प्रथमच आले असल्याने मी माझ्या बैठकीवरून उठून त्यांना व्यवहारोचित नमस्कार व स्वागत करून आसनस्थ केले. इतक्यात रामकृष्णबुवांनी "हे माझे वडील" म्हणून माझ्याशी त्यांची ओळख करून दिली... लयब्रह्माच्या ज्या सिद्धपुरुषाविषयी अल्लादिया खांसाहेबांसारख्या गान-सम्राटाकडून मी त्याच्या लयचमत्काराविषयी व त्याच्या सामर्थ्याविषयी माझ्या बालपणापासूनच अनेकदा नव्हे तर सतत ऐकत आलो होतो, तबलानवाज उ. थिरखवाखांसाहेबांसारख्यांनीही ज्यांच्या नामाचा उच्चार स्वतःच्या कानांची पाळी पकडून केलेला मी अनेकवार पहात आलो, तासगाव येथील कोणालाही सहसा न जुमानणारे मृदंगवादन-विद्येचे महापुरुष पं. बळवंतरावजी बाटवे यांच्यासारख्या सर्वश्रेष्ठ कलाकारांकडून ज्यांच्या लयसाधनेचा गौरव मी सतत ऐकत आलो होतो,–ते महान् योगीराज माझ्या घरी अनाहूतपणे येऊन माझ्या समोर बसले होते, मी धन्य झालो होतो! जीवनामध्ये असे काही महत्त्वाचे क्षण येऊन जातात की त्यांचे स्मरण आजन्म रहावे. लयभास्कर कै. खाप्रूमामा यांच्या प्रथमभेटीचे महत्त्व त्या वेळेपेक्षाही अनेक कारणांनी मला आज कितीतरी पटीने अधिक वाटते. या भेटीपूर्वी किंवा माझे घरी खाप्रूमामाना आणण्यापूर्वी रामकृष्णबुवांनी माझेबद्दलही त्यांना काही "बरे" सांगितले असावे. कारण त्यानंतर ते माझ्याकडे अगदी घरच्याप्रमाणे मोठ्या प्रेमाने सतत येऊ लागले. एक ऋषितुल्य वडिलधारे माणूस या रूपाने मला लाभले होते, या आनंदात मी सदैव होतो.

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

माझ्या लहानपणी मी सांगलीस असताना कै. गुरुवर्य मोरोबुवा मोहिते यांच्याकडे धृपदगायकीची तालीम घेतलेली होती. त्यामुळे लय व लयीच्या काही कामगतींची मला थोडीशी ओळख झालेली होती. माझ्या नंतरच्या आयुष्यात काही लयकार तवलिये स्नेही म्हणून मला लाभले. त्यांच्या सहवासाने मीही स्वत: लयीच्या अभ्यासात डोके घालू लागलो. रामकृष्णबुवा पर्वतकर यांच्या स्नेहसंबंधामुळे लयशास्त्र हे किती विकट आहे याचा हळूहळू साक्षात्कार घडू लागला. स्वत: रामकृष्णवुवाही लयीचे सूक्ष्मातिसूक्ष्म हिशेव अगदी हसतखेळत करीत आणि शेवटी म्हणत, " माझ्या वडलांच्या थोर ज्ञानातील माझे हे ज्ञान रुपयातील एक पैसुद्धा नाही ! "... लयकारीचे काही हिशेव करण्याचा प्रयत्न अभ्यास म्हणून मीही करीत होतो. संगीताचे शिक्षण देण्याच्या बावतीतही मला त्यांचा प्रत्यक्षात फार उपयोग होत होता. या अभ्यासामुळे माझ्या शिक्षण देण्याच्या कामात आवश्यक तो रेखीवपणाही अधिक प्रमाणात येऊ लागल्याचे स्पष्टपणे दिसत होते. आणि गायकीचा सखोल व्यासंग करू इच्छिणाऱ्यांनी लयशास्त्राचा सखोल अभ्यास केला पाहिजे, असे मला विश्वासपूर्वक वाटू लागलेले होते. आणि योगायोग असा विलक्षण की, माझ्या डोक्यात अनुभवानेच अशा विचारांनी गर्दी केली असतानाच माझे घरी " लयभास्कर " आपणहून आले. त्या वेळी " परब्रह्म आले घरा ! " अशीच माझी आनंदावस्था झाली हे सांगावयास नकोच !

गोमंतकाच्या सुफलाम् भूमीने आमच्या संगीत कलेला कमालीचा अभिमान वाटावा, असे महान् कलाकार मोठ्या संख्येने आजतागायत सतत पुरविले आहेत. या बहुप्रसवा भूमीने हातचे काहीही न राखता इतर पिकांप्रमाणेच कलावंतांचे पीकही आम्हाला अनंत हस्तांनी दिलेले आहे. गोमंतकाच्या सर्वच महालांनी हे कार्य आजतागायत केलेले आहे. गोमंतकातील " चंद्रेश्वर " पर्वतावरील " पर्वत " या वीस-पंचवीस घरे असलेल्या अगदी लहानशा खेड्यात लक्ष्मणराव ऊर्फ खाप्रूमाम यांचा जन्म १८८० साली झाला. त्या काळी गोमंतकातील प्रत्येक घराघरात संगीतसाधना चालत असे. लयवाद्यात "घुमट" या चर्मवाद्याला गोमंतकात अग्रपूजेचा मान द्यावा लागेल. गोमंतकातील प्रत्येक देवालयामध्ये या

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

वाद्याचे वादन एक अत्यावश्यक संस्कार म्हणून होत असे. या वाद्याची मनोभावे साधना केलेले कितीतरी कलाकार आजवर होऊन गेले आहेत. खाप्रूमाम्‌नीही आपल्या साधनेची सुरुवात याच वाद्याने केली. या साधनेत त्यांनी कालांतराने सर्वश्रेष्ठतेचा मान पटकाविला. नृत्यांतील "तत्‌कार" व तवल्यातील अगदी थोडी अक्षरे, केवळ इतक्याच सामुग्री-वर घुमटवादनकारांनी लयीचे विश्व सर्वांगांनी उजळले. कायदे, परण, लग्गया, आड, अतीत, अनागत अशा अनेक प्रकारांचे आश्चर्यकारक वादन त्यांनी तत्कालीन रसिकांना ऐकवून थक्क केले. खाप्रूमाम्‌ हे अशा सर्व कलाकारांचे "सम्राट" होते. समेटाच्या नगम्यावर एखाद्या कुशल नर्तिकेप्रमाणे खाप्रूमाम्‌चे घुमटवादन अतिशय डौलाने चाले. पुढे त्यांनी तवला, मृदंग आणि सारंगी यांचाही अभ्यास केला. त्यांचे रागज्ञानही चांगल्या प्रकारचे होते. अनेक रागांतून व अवघड नवीन ताला-तून त्यांनी अनेक तराण्यांची रचना केली. वाई मोघूबाई यांच्यासारख्या श्रेष्ठ गायिकेला त्यांनी हे तराणे शिकविले. साडेचौदा–साडेपंधरा अशा मात्रांच्या तालातील त्यांनी रचलेले अनेक तराणे स्वतःच्या चिरंजिवांनाही शिकविले होते. खाप्रूमामनी रचलेल्या या तराण्यांच्या मोघूवाईंनी ध्वनिमुद्रिकाही दिलेल्या आहेत. याशिवाय आपल्या पूर्वायुष्यात त्यांनी गोमंतकातील काही विद्यार्थ्यांना सारंगीही शिकविली आहे. मात्र हे सर्व करीत असताना त्यांची मनोवृत्ती तल्लीन होई ती मुख्यतः त्यातील लयीवरच! पुढे पुढे तर वाद्यतंत्र किंवा वादन या दोन्ही गोष्टी त्यांच्या वावतीत अगदी गौण ठरून लय आणि तिचे अनंत वारकावे यांचा शोध घेणे हाच एक ध्यास त्यांना लागला आणि त्यांच्या या ध्यासानेच जीवनभर त्यांची संगत केली. लयभास्करांच्या या ध्यासाने लयसृष्टी उजळून निघाली. लयब्रह्म साकारले! खाप्रूमाम्‌चे तवला-वादनाचे अध्ययन त्यांचे वडील कै. रघुवीरजी पर्वतकर यांचेकडेच झाले.

कै. खाप्रूमाम्‌ यांच्या जीवनाचा लय हा स्थायीभाव झालेला होता. मी त्यांना जेव्हा जेव्हा पहात असे त्या त्या वेळी ते लयतत्त्वाच्या अधिक अधिक शोधासाठी अंतर्मुख झालेलेच पाहिले. क्वचित् प्रसंगी काही इतर विषयांच्या गप्पा निघाल्याच तर ते एकदम मध्येच थांववून "आता ही लयीची गंमत वघा हं!" असे सांगून लयीची

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

बहुधा अनाकलनीय अशी "गंमत" सांगून ते मोकळे व्हायचे. असे प्रसंग मी पुणे मुक्कामी कितीतरी वेळा अनुभवले आहेत.

काही विद्वान व अभ्यासू लयकारांकडून सवाईकी, दीडकी, आड, कोआड असे दर्जे विशेष करामत म्हणून आजवर मी ऐकले आहेत. परंतु खाप्रूमाम्‌चेहिशेबी या दर्जांना स्थानच नव्हते. कारण याच्याही पुढचे गोआड, भरत आड आणि सुदर्शन आड असे तीन दर्जे त्यांनी स्वत: केले. लयीची कसलीही विकट फर्माईश ते लगेच त्याच ठिकाणी करून दाखवीत. एका तालात दुसरा कोणताही ताल वाजवून त्यांची सम एकच आणणे, एका हाताने एक ताल, दुसऱ्या हाताने दुसरा ताल, दोन्ही पायांनी दोन निरनिराळे ताल, तोंडाने पाचवा ताल आणि तवल्यावरील सहावा ताल—असे मोजून सर्वांची सम मात्र हमखासपणाने अचूक एकत्र आणणे, अशा गोष्टी केवळ खाप्रूमाम्‌च्यासाठीच होत्या. लयीचे अंश आणि या अंशांचे पुन्हा अंश ते समजावून सांगून करून दाखवीत. एखाद्या रँग्लरलाही अनाकलनीय असे गणित खाप्रूमाम यांच्यासारख्या वालबोध चार-दोन इयत्ता शिकलेल्या जेमतेम साक्षर असलेल्या कलाकाराने अगदी सहजावारी सोडवून दाखवावे ही एक अतिमानवी अशी ईश्वरी किमयाच होती! लयकारीचे वावतीत अवघड, विकट व अशक्य हे शब्दच खाप्रूमाम यांच्या कोशात नव्हते. लयकारी हा त्यांचा अंगभूत स्वभावच वनलेला होता, त्यांचे ते व्यसनच झालेले होते. सारे जीवनच लयीशी एकरूप झालेले होते. खऱ्या अर्थाने लय ही त्यांचा श्वासच झाली होती.

खाप्रूमामची थोर लयविद्या ही खास त्यांचीच कमाई होती. ती विद्या हे गोमंतकाचे खास भूषण आहे. पुढील काळात या विद्येचे कसून जतन झाले पाहिजे. "स्वरमंच" ही संस्था खाप्रूमामचे स्मरणार्थ सुरू करून संस्था या महान् कलाकाराची अंशत: तरी उतराई झालेली आहे, ही अतिशय आनंदाची गोष्ट आहे. परंतु हे काम एवढ्यानेच भागणारे नाही. स्वरमंच संस्था आणि गोमंतक सरकारची कला अकादमी या संस्थांनी या विषयाच्या अभ्यासाला कार्यवाहीत स्वतंत्र आणि महत्त्वाचे स्थान देऊन खाप्रूमामच्या अधिकारी शिष्यांमार्फत हा खास विषय

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

शिकविण्याची योजना तातडीने हाती घेतली पाहिजे. कारण अशा प्रकारची खास शिक्षण योजना अखिल भारतात अन्यत्र कोठेही नाही आणि ती सुरू करणेही तितकेसे सुलभ होणार नाही. मात्र गोमंतकाची ती अधिकृत मिरासदारी आहे आणि तिचे संरक्षण गोमंतकीयांनी जरूर केलेच पाहिजे !

लयभास्करांचे सारे जीवनच खऱ्या अर्थाने एक मोठे कोडेच आहे. केवळ व्यवहारी दृष्टीने पाहिले तर त्यांची ही विद्या अर्थसाधनाच्या दृष्टीने पूर्णतः निरूपयोगी होती. त्यांच्या या साधनेवर त्यांच्या जीवनात काहीही कमाई झालेली नव्हती, परंतु त्याची त्यांना मुळीच खंत नव्हती. कोणत्याही साधनेत " तिची साधना " हाच खरा आनंद असतो. तिची किंमत वा मोजमाप रुपये, आणे, पै यांनी केव्हाच करता येत नाही. साधनेतील सतत होणारी प्रगती हीच खऱ्या साधकाला धुंद करीत असते. त्याच दिव्यानंदात तो सदैव तल्लीन झालेला असतो. साधना हीच त्याचे दैवत वनलेले असते. त्यापासून तो वंचित होऊच शकत नाही. त्याचे आचार आणि सारे विचार साधनामय झालेले असतात. या उच्च ध्येयसंपन्न विचारसरणीच्या खाली उतरून व्यवहाराच्या मैदानात लौकिक दृष्टीने यशस्वी व्हावे, ही कल्पनाच त्याला अभद्र वाटते. ऋषि–मुनीप्रमाणे ध्यानमग्न अवस्थेतच स्वतःच्या जीवनाचे समर्पण व्हावे, याच एकमेव गोष्टीचा त्याला ध्यास जडलेला असतो. याच संदर्भातील एक हकीकत येथे देण्यासारखी आहे. खाप्रूमामचा-माझा ऋणानुबंध थोडावहुत वाढल्यानंतर अशाच एका प्रसंगी खाप्रूमामना मी हेतुपूर्वक एक प्रश्न विचारला–" आपल्या या विद्येवर पैसे मिळण्याची शक्यता वाटत नाही, मग आपला प्रपंच कसा चालतो ? " यावर त्यांनी दिलेले उत्तर लक्षात ठेवण्यासारखे आहे. ते म्हणाले– " तुमचा जसा प्रपंच चालतो तसाच देवाच्या कृपेनं माझाही चालतो. शिवाय तुम्ही पैसे मिळवता म्हणून जेवढे आनंदी आहात, त्याच्या लक्ष-पटीनं मी पैसे मिळवत नाही म्हणून आनंदी असतो ! " खाप्रूमामच्या या उद्गारातील मतितार्थ अधिक स्पष्ट करण्याची जरूरी नाही.

लयभास्करांचे वहुतेक सारे जीवन गोमंतकातच गेले. मध्यंतरी काही काळ त्यांचे वास्तव्य मुंवईत होते. परंतु पुन्हा ते आपल्या

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

गावीच परत येऊन राहिले. मध्यंतरीच्या काळात संगीतशास्त्रातील विद्वानांकडून मुंबई-पुणे अशा शहरांतून त्यांचे उत्स्फूर्त सत्कारही साजरे झाले. दि. २४ ऑगस्ट १९४८ रोजी पुणेकर रसिकांनी भव्य प्रमाणात त्यांचा सत्कार केला. त्या वेळी सुमारे एक तासपर्यंत लयकारीचे विविध प्रयोग दाखवून उपस्थित विद्वान् तवलियांनाही त्यांनी चकित केले. हे सर्वच प्रयोग तज्ज्ञांच्या डोक्यांवरून गेले. अशाच एका जाहीर सत्कार प्रसंगी त्यांना मानपत्र देऊन त्यांचा गौरव करण्यात आला. मडगाव येथे गोमंतकीय रसिकांतर्फे जाहीर सत्कार करून त्यांना "ताल कंठमणी" ही पदवी दिली. गानसम्राट अल्लादियाखांसाहेब यांच्यासारख्या अतुल श्रेष्ठ विद्वानाने खाप्रूमाम्ना "लयभास्कर" ही सार्थ पदवी वहाल करून सर्व सत्कारांवर कळस चढवला! खाप्रूमाम्च्या दहाव्या पुण्यतिथीच्या प्रसंगी त्यांचे स्मरणार्थ दि. ३ ऑक्टोबर १९६४ रोजी "स्वरमंच" या संस्थेची स्थापना मोठ्या समारंभपूर्वक करण्यात आलेली आहे. गायन-वादनाचे सशास्त्र शिक्षण देणे, संगीताचे नित्य कार्यक्रम सादर करणे, संगीतविषयाचे वाङ्मय प्रसिद्ध करणे, आणि संगीत कलेच्या व कलाकारांच्या उद्धारार्थ सातत्याने प्रयत्न करणे,—अशी विविध कार्ये ही संस्था मोठ्या तळमळीने करीत आहे. दिवसेंदिवस संस्थेच्या या कार्याची सर्वांगीण व्याप्ती सतत वाढत आहे. प्रतिवर्षी या संस्थेमार्फत खाप्रूमाम्च्या पुण्यतिथीचा महोत्सव अतिशय परिश्रमपूर्वक साजरा केला जातो. संस्थेचे हे भरीव कार्य नुसत्या गोमंतकाचेच नाही तर आमच्या अभिजात संगीतकलेचे एक श्रेष्ठ भूषणच समजावे लागेल!

खाप्रूमाम्नी पुष्कळांना कमी अधिक प्रमाणात ज्याच्या त्याच्या कुवतीनुसार विद्यादान केले. मात्र हे सारे गोमंतकातच! गोमंतकातील एक बडे जहागीरदार व संगीतकलेचे मर्मज्ञ व्यासंगी श्रीमंत मलवाराव सरदेसाई व श्री. विश्वंभरबुवा पर्वतकर यांना खाप्रूमाम्च्या विद्येतील अनेक विकट गोष्टींचा मोठ्या प्रमाणावर लाभ झालेला आहे.

खाप्रूमाम्च्या साऱ्या लयचमत्कारांनी इतरांप्रमाणेच मीही दिङ्मूढ होत असे, यात आश्चर्य वाटण्यासारखे काहीच नाही. या शास्त्रातील काही महत्त्वाची कोडी सोडविण्याचा आपणही अभ्यास

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

करावा, असे मला सतत वाटू लागले होते. खाप्रूमाम् अगदी हसत खेळत जे चमत्कार करीत ते सोपे आहेत असे त्यांची कला ऐकताना वाटे, परंतु ते आम्ही स्वतः करू लागताच हे काम आमच्या आटोक्या-बाहेरचे असल्याचा साक्षात्कार त्या क्षणीच घडे. काही काही वेळी असे एखादे लयीचे कोडे सोडवण्यासाठी आम्हा चार-दोन विद्वानांचे (?) मंडळ वसत असे. परंतु आमच्या अशा लोकशाहीला खाप्रूमाम्चे लयतत्त्व केव्हाच जुमानीत नसे, अशाच एका प्रसंगी खाप्रूमाम्ना मी प्रश्न केला की, आपण हे जे सारे लयीचे गणित सोडवता, असंख्य प्रयोग करता, आश्चर्यकारक प्रयोग करता ते आपल्याला कसे साध्य होते ? त्याच्या अभ्यासाचा काही निश्चित असा मार्ग आहे का ? माझ्या या प्रश्नाचे उत्तर खाप्रूमाम्नी लगेच दिले. "लयीचा विचार करताना मला आत स्वच्छ प्रकाश दिसू लागतो. त्या प्रकाशात मला सर्व काही स्पष्ट दिसू लागतं. त्यात विशेष असं काहीच नाही. तुम्ही-सुद्धा सतत अभ्यास कराल तर तुम्हालाही हे सर्व काही करता येईल !" साधनामार्गाची ज्यांना थोडीफार कल्पना असेल त्यांना आत्मतत्त्वाशी पूर्णतः निगडित असलेल्या लयतत्त्वाच्या या प्रकाशाची मनोमनी साक्ष पटावी !

खाँ. अल्लादियाखाँ नेहमी म्हणत की, खाप्रूजी हे एक संगीत सृष्टीतील महान् आश्चर्य आहे—महान् कोडे आहे ! एका अर्थाने लय विद्येचे ते एक प्रभावी आव्हानच होते. त्यांच्या सुदीर्घ आयुष्याचे लक्ष्य फक्त एकच होते आणि ते म्हणजे लयब्रह्माचा शोध ! सतत शोध ! ! या शोधासाठीच त्यांनी अवतार घेतला आणि शोध लागल्या-नंतरच त्यांनी दि. ३ सप्टेंबर १९५३ रोजी पर्वत या गावीच आपली अवतारसमाप्ती केली !

खाप्रूमाम्चा एकदा पुण्यास मुक्काम असताना मी त्यांना भेटण्या-साठी दुपारचे वेळी रामकृष्णबुवांकडे गेलो. खाप्रूमाम् एक पातळसे उपरणे पांघरून समोरच झोपले होते. आजोबा झोपले आहेत, असे रामकृष्णबुवांनी मला सांगितले. (खाप्रूमाम्ना मी आजोबा म्हणत असे.) थोडा वेळ निरीक्षण करून मी त्यांना सांगितले, "आजोबा

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

जागे आहेत." कशावरून? असा उलट प्रश्न रामकृष्णबुवांनी मला करताच मी म्हणालो, "ते पहा, आजोबांची बोटं व हात सारखे हालतायत." त्यावर रामकृष्णबुवा हसून म्हणाले, "अहो त्यांचं असं हे नेहमीच चालू असतं! झोपेतसुद्धा– परंतु ते झोपेतच असतात!" इतकं बोलून त्यांनी आजोबांना तीन–चार हाकासुद्धा मारल्या. परंतु आजोबांना अगदी गाढ निद्रा लागलेली होती... आणि हात व बोटे मात्र लयब्रह्माच्या बीजमंत्राची उपासना करण्यात गढलेली होती!

लयब्रह्माच्या या थोर उपासक–महात्म्याने आम्हाला स्वतःच्या जीवनाने एकच दिव्य संदेश दिला–उपासना सतत चालू ठेवा–सतत पुढे चला–कला मार्गाने ब्रह्मपदाप्रत तुम्ही निश्चितपणे पोहोचू शकता!!

▣ ▣ ▣

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri



विरागी : गानदेवता
कै. श्रीमती अंजनीबाई मालपेकर

ज्या ज्या गोमंतकीय कलाकारांची नावे मी फार वर्षे ऐकत होतो त्यांत अंजनीवाईंचेही नाव प्रामुख्याने आहे. अंजनीवाईंच्या श्रेष्ठ गुणवत्तेचा नावलौकीक अनेक विद्वान् कलाकारांकडून माझ्या कानांवर सतत येत असे. विशेषतः पुण्याचे वयोवृद्ध, बहुश्रुत आणि रसिकाग्रणी श्रीमंत कै. आबासाहेब मुजुमदार, कै. गायनाचार्य पं. रामकृष्णबुवा वझे, कै. गोविंदराव टेंबे आणि आजचे ख्यातनाम गायक श्री. कुमार गंधर्व या श्रेष्ठांच्या तोंडून अंजनीवाईंच्या गानतपश्चर्येवावत मी खूपच ऐकत होतो. अंजनीवाईंची भेट व्हावी. त्यांचे गाणे ऐकायला मिळावे ही मला तळमळ लागली होती; आणि असा योग सहजशक्य असूनही तो प्रत्यक्ष पदरात पडण्यास मात्र मध्यंतरी फार वर्षांचा काळ गेला.

सुमारे पंधरा वर्षांपूर्वी अंजनीवाईंचे पुण्यास शुभागमन झाले. अंजनीवाईंचे पुण्यातील एक शिष्योत्तम पं. जानोरीकरबुवा यांनी श्रीव्यासपूजेनिमित्त बाईंना खास निमंत्रण दिले होते. आणि त्यानुसार त्या पुण्यास मुद्दाम आलेल्या होत्या. अंजनीबाईंचे ते प्रथमदर्शन अगदी

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri



श्रीमती अंजनीबाई मालपेकर

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

अविस्मरणीय असेच होते. अतिशय सतेज अशी चर्या व पांढरेशुभ्र वस्त्र परिधान केलेल्या अंजनीवाई साक्षात् सरस्वती भासत होत्या! गाण्याचा व श्रीगुरुपूजनाचा कार्यक्रम संपल्यानंतर अनेक उपस्थितांशी वाईंचा परिचय करून देण्यात आला. त्या वेळी अंजनीवाईंचे संभाषण-चातुर्य, त्यांचे वाचन, पाठांतर, वहुश्रुतता, त्यांची असामान्य संगीत साधना आणि आध्यात्मिक साधना अशा कितीतरी समर्थ गुणांचे दर्शन त्या वेळी घडले. तेव्हा उपस्थित असलेल्या रसिकांच्या अंतःकरणांत कायमचे स्थान कोरून ठेवून अंजनीवाई मुंबईस निघून गेल्या.

यावेळी अंजनीवाईंचा व माझा जो परिचय झाला तो अगदी व्यावहारिक स्वरूपाचा होता. एवढया परिचयाच्या सामुग्रीवर त्यांच्या-कडे पुन्हा जाणे मला शक्य नव्हते. परंतु त्यांच्याकडे जाऊन त्यांचा परिचय वाढवावा, त्यांचे सांगीतिक विचार विस्तृत प्रमाणात समजून घ्यावेत आणि त्यांचे एकूण जीवन थोड्याफार प्रमाणात तरी जवळून पाहावे ही माझी इच्छा सतत वाढत होती....आणि असा भाग्ययोग दहा वर्षांपूर्वी घडून आला. श्री. कुमार गंधर्व यांचे एक गुरू पं. विनायकराव हर्षे यांचे बाईंच्याकडे नेहमी जाणे-येणे असे. त्यांच्याबरोबरच मी अंजनीबाईंच्या घरी प्रथम गेलो. बाईंनी आमचे आगतस्वागत अतिशय उत्तम केले. त्यानंतर मात्र मी त्यांच्या घरी वरचेवर जाऊ लागलो. त्यांच्या-माझ्यातील संकोचही नाहीसा झाला. मी त्यांचा एक कुटुंबीयच झालो. त्यांच्याशी झालेल्या प्रत्येक मुलाखतीतून संगीताचे काही मौलिक विचार, अध्यात्माचे काही अनुभूतिपूर्ण विचार किंवा एकूण जीवनानु-भवाचे अन्यथा दुर्मिळ असलेले विचार यांचा साठा घेऊनच मी बाहेर पडत असे. त्यांचा जीवनेतिहासही त्यांच्याच तोंडून कित्येक वेळा ऐका-वयास मिळाला. त्यांची प्रत्येक वेळची मुलाखत खऱ्या अर्थाने ज्ञान-सत्रच असे.

दि. २२ एप्रिल १८८३ रोजी गोमंतकातील मालपे या गावी अंजनीवाईंचा जन्म झाला. त्यांच्या घराण्यात पूर्वीच्या पाच पिढ्या संगीतविद्या चालत आलेली होती. अंजनीवाईंच्या पणजी गुजावाई या संगीत आणि संस्कृत विद्येत पारंगत होता. अंजनीवाईंच्या मातोश्री

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

नबुवाई यांनीही संगीत-साधना केलेली होती. बाईंचे वडील व्यवसायाने इंजिनीयर होते. अंजनीबाईंचे शालेय शिक्षण मुंबईच्या नबीवाडीतील मिशनरी शाळेत इंग्रजी चौथीपर्यंत झाले. सुप्रसिद्ध साहित्यिक कै. श्रीपाद कृष्ण कोल्हटकर यांच्या गोमंतक मराठा समाजातील अग्रशिष्या आणि पहिल्या थोर स्त्री-नाटककार कै. हिरावाई पेडणेकर या अंजनीबाईंच्या बालमैत्रीण व वर्गभगिनी होत्या. केवळ व्यसनापायी हिरावाईंसारख्या अत्यंत बुद्धिमान्, तेजस्वी आणि कर्तबगार मैत्रिणीच्या जीवनाची जी परवड झाली तिच्या नुसत्या स्मरणानेसुद्धा अंजनीबाई व्यथित होत असत.

मिया तानसेन यांच्या परंपरेतील उस्ताद नजीरखाँ, छज्जूखाँ आणि खादीम हुसेनखाँ हे तिघे मातब्बर गायकबंधू रामपूरहून येऊन मुंबईस 'भेंडीबझार' वस्तीत स्थायिक झालेले होते. म्हणून या गायकबंधूंना 'भेंडीबझारवाले' हेच नाव पडले. या बंधूंपैकी छज्जूखाँ धृपद-धमार गाणारे होते. नजीरखाँ आणि खादीमहुसेनखाँ हे ख्यालीये गायक होते. हे तिघेही बंधू जसे श्रेष्ठ कलाकार होते तसेच ते शास्त्र-चर्चेतही पारंगत होते. अंजनीबाईंना वयाच्या आठव्या वर्षी नजीरखां-साहेब यांचा मुंबई येथे समारंभपूर्वक गंडा बांधण्यात आला. उस्ताद बंदेअल्लीखांच्या पद्धतीनुसार मींड आणि स्वर यांच्यावर खाँसाहेबांच्या गायकीचा फार भर असे. अंजनीबाई सांगत, "एका आवर्तनाचा ख्याल भरण्यात नजीरखाँ अतिशय निष्णात होते. खटका, मींड, कण, सूद, मुरकी अशा अभ्यासासाठी खाँसाहेबांनी मला शेकडो चिजा त्यांतील बारकाव्यासह शिकवल्या. माझा 'दमसास' त्यांनी एक मिनिटापर्यंत तयार करून घेतला. अशा श्रेष्ठ उस्तादांची मला छत्तीस वर्षे तालीम मिळाली हे मीं भाग्य समजते."

खाँसाहेब अतिशय कडक शिस्तीचे गृहस्थ होते. अंजनीबाईंना तालीम देण्यासाठी ते पहाटे चार वाजता घरी यायचे. ही तालीम दहा वाजेपर्यंत चालायची. सुरुवातीस त्यांनी यमन रागाची तालीम दिली. त्याचबरोबर भैरवीचीही दिली. यमन या रागाची तालीम सुमारे तीन वर्षे चालू होती. प्रथमतः ख्याल बंदिस्तपणे बसवून घेणे,

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

रागाचे वादी-संवादी व अन्य स्वरांचे दर्जे, नेमकी स्वरस्थाने, आवाजाचा लगाव या सर्वच गोष्टी खांसाहेबांनी अगदी कटाक्षाने तयार करून घेतल्या. सर्व शुद्ध स्वर असलेला राग यमन आणि सर्व कोमल स्वर असलेला राग भैरवी अशी निवड करून खाँसाहेबांनी अंजनीबाईंचे बाराही स्वर पूर्णपणे तयार करून घेतले. दमसास तयार करून घेण्यावर खाँसाहेबांचा अधिक भर असे. भेंडीबझारवाल्या श्रेष्ठ गायकांनी 'खंडमेरपद्धती' ही शास्त्रीय संगीताला बहाल केलेली खास देणगी आहे. खंडमेर या पारिभाषिक शब्दाचा नेमका अर्थ असा आहे की, गणितीपद्धतीने तानपलटयांचे असंख्य प्रकार लयबद्धतेने करणे! अंजनीबाईंकडून नजीरखांनी असे पलटे तयार करून घेतले. त्यामुळे बाईंच्या गळयात स्वर आणि तानेत दाणेदारपणा निर्माण झाला. अंगभूत लयकारीही पक्की झाली. या मेहनतीमुळे बाईंचा दमसास तर विलक्षणच वाढला. त्याच्या गळयातील प्रत्येक स्वराला गोलाई व नजाकत पैदा झाली. इतक्या पूर्वतयारीनंतर खाँसाहेबांनी बाईंना शेकडो चिजा आणि रागरागिण्यांची तालीम दिली. उस्ताद नजीरखाँ यांचे १९२० साली निधन झाले. त्यानंतर खाँसाहेबांचे बंधू खादीमहुसेनखाँसाहेब यांचेजवळ बाईंनी तालीम घेतली.

भेंडीबझारवाले हे तीन उस्तादबंधू आणि पं. भातखंडे यांचे अगदी निकटचे संबंध होते. पं. भातखंडे हे या सुमारास त्यांच्या ग्रंथलेखनाच्या कामात गुंतलेले होते. उस्तादबंधू आणि पं. भातखंडे यांच्या संगीतशास्त्रावर सतत चर्चा होत. आपल्या व्यासंगाचाच एक महत्त्वपूर्ण व अत्यावश्यक भाग म्हणून अंजनीबाई स्वतः या चर्चा अगदी बारकाईने ऐकत. ही चर्चा सर्वांगांनी समजावी यासाठी अंजनीबाईंनी संस्कृत, अरबी, उर्दू या भाषांचा अभ्यास केला. पाऊणशे वर्षांपूर्वीच्या काळात एका गायिकेने केलेले हे प्रयत्न पाहून विलक्षण आश्चर्य वाटते, अन् बाईंच्याबाबत तितकाच आदरही वाटतो. संगीत ही फक्त कलाच आहे, तिला काही शास्त्र असले पाहिजे ही कल्पनाच घराणेदार गायकांना अमान्य होती, नव्हे तिला त्यांचा कडाडून विरोध होता. प्रत्येक गायकाला 'करके बताव' हा बुजुर्गांचा परवलीचा निर्णयात्मक हुकूम असे. संगीतावरील चर्चा त्यांना एकदम नामंजूर असे. खुद्द भातखंडे यांनाही या

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

विरोधापायी जीवनभर झगडावे लागले. अशा या काळात अंजनीबाई-सारख्या एका व्युत्पन्न गायिकेने या काटेरी शास्त्रमार्गात पदार्पण करावे ही एकच गोष्ट त्यांच्या मूलगामी व्यासंगी वृत्तीची साक्ष देण्यास पुरेशी आहे.

यावेळपर्यंत अंजनीबाई संगीतकला आणि शास्त्र या दोन्ही अंगांत अधिकारी झालेल्या होत्या. त्यांच्या वयाच्या अवघ्या सोळाव्या वर्षी मुझफराबाद हॉलमध्ये बाईंच्या गाण्याचा पहिला सार्वजनिक कार्यक्रम झाला. या पहिल्याच कार्यक्रमाचा सर्वतोमुखी विलक्षण बोलबाला झाला.

१८९९ साली अंजनीबाईंचा विवाह मुंबईचे उद्योगपती श्रीमान् वसनजी भगवानदास वेद यांच्याशी झाला. त्यांचे यजमान बाईंच्या गाण्यावर निहायत खूष असत, परंतु आपल्या पत्नीने पैसे घेऊन बाहेर जाहीर कार्यक्रम करावेत हे त्यांना पसंत नसे. १९२७ साली श्रीमान् वसनजी यांचे निधन झाले.

अंजनीबाईंच्या मुझफराबाद हॉलमध्ये झालेल्या पहिल्याच कार्यक्रमाने त्यांना कमालीची प्रसिद्धी मिळाली. मुंबईतील धनाढ्य वर्ग, राजेरजवाडे, उद्योगपती यांच्याकडे बाईंच्या मैफली होऊ लागल्या. भारतातील अनेक राजेरजवाड्यांकडून त्यांना वाढत्या अगत्याने मैफलींची निमंत्रणे येऊ लागली. अनेक संस्थानिकांनी बाईंना भरपूर बिदागी, शिवाय खूप जडजवाहीर दिले. बाईंनी लाखो रुपये मिळवले. इतके सर्व उत्तम चालले होते, परंतु १९०२ साली त्या एक मैफल करून घरी परतल्या. काय झाले कोणास काहीच कळेना! बाईंचा आवाज एकाएकी गेला. पुष्कळ उपचार झाले, परंतु आवाजात फरक नाही. अंजनीबाई स्वाभाविकपणेच निराश झाल्या, हताश झाल्या, बेचैन झाल्या. याच वेळी अंजनीबाईंचे काही थोर हितचिंतक मुद्दाम केडगावला गेले. तेथे थोर दत्तभक्त श्रीनारायणमहाराज यांना भेटून त्यांनी अंजनीबाईंची व्यथा त्यांना सांगितली. महाराजांनी तात्काळ सांगितले की, काही काळजीचे कारण नाही; तिचा आवाज परत येईल. पण तो परत आल्यावर तिनं गाऊन दाखवलं पाहिजे! महाराजांचे

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

वय त्या वेळी तेरा वर्षांचे होते. महाराजांनी अंजनीबाईंसाठी अंगारा, तीर्थप्रसाद, खडीसाखर आणि लवंग दिली. या प्रसादाने बाईंना विलक्षण गुण आला. त्यांचा आवाज पूर्ववत् झाला. पूर्वी ठरल्यानुसार बाईंनी केडगावला जाऊन महाराजांना मोठ्या भक्तिभावाने गाणे ऐकविले. अंजनीबाई या वस्तुतः एक बुद्धिवादी गायिका होत्या. गंडे-दोरे, महाराज, फकीर अशांवर त्यांची मूलतः मुळीच श्रद्धा नव्हती. परंतु नारायण महाराजांच्या या कृपाप्रसादाने बाईंची त्यांच्यावर विलक्षण श्रद्धा बसली. त्या महाराजांच्या एकनिष्ठ शिष्या बनल्या आणि त्या अखेर-पर्यंत एकनिष्ठच राहिल्या. महाराजांच्या या कृपापूर्ण साक्षात्कारामुळे अंजनीबाईंच्या अंतःप्रवृत्तीमध्ये साहजिकपणेच बदल होत चालला. संगीताबरोबरच त्यांची आता आध्यात्मिक साधनाही सुरू झाली. या साधनेत त्या अधिकाधिक रमू लागल्या.

अंजनीबाई या जन्मतःच अप्सरेचे स्वरूप घेऊन आलेल्या होत्या. त्यांच्या ऐन तारुण्यात तर त्या अतिशयच सुंदर दिसत. मोहक दिसत. भारतीय स्त्रीच्या लावण्याचा अप्रतिम नमुना म्हणून सुप्रसिद्ध चित्रकार राजा रविवर्मा यांनी त्यांची निरनिराळ्या वेषभूषेतील दोन तैलचित्रे मुद्दाम रंगविली. अंजनीबाईंच्या अप्रतिम लावण्याबाबत हा एकच समर्थ पुरावा पुरेसा आहे. गाणे सुंदर, तसेच रूपही सुंदर ! या सर्व देणगीमुळे त्यांच्या मैफली त्या काळच्या कित्येक हजारांच्या बिदागीने सतत होऊ लागल्या. परंतु अशा काही मैफलींतून त्यांच्या रूपसंपदेमुळे त्यांच्यावर काही अनवस्था प्रसंग ओढवू लागले. अशा काही प्रसंगांतून त्यांनी समयज्ञतेने आपली सुटका करून घेतली. परंतु या सुसंस्कृत बाई या अमानुष प्रकारांना व प्रवृत्तींना पूर्णपणे कंटाळल्या, आणि अमाप संपत्ती आणि तितकाच मोठा नावलौकिक यांचा मोह बाजूला सारून बाहेरच्या मैफली एकदम बंद करण्याचा त्यांनी निर्णय घेतला. १९२३ साली त्यांची शेवटची मैफल मुंबईच्या नगरभवनात झाली. या मैफलीत त्यांना पंचवीस हजार रुपयांहून अधिक बिदागी मिळाली. शील आणि सत्त्व रक्षणासाठी त्यांनी आपल्या सांगीतिक जीवनाचा होम केला. अंजनीबाईंच्या या संगीत-संन्यासाचा अन्वयार्थ अनेकांनी श्रीनारायणमहाराजांच्या अनुज्ञेशी जोडला. अंजनीबाईंसारख्या एका

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

अद्वितीय गायिकेचे गाणे महाराजांनी बंद केले या समजुतीने गोविंदराव टेंबे यांच्यासारख्या विद्वान् रसिकाने महाराजांना दोष दिला. पंडित वझेबुवांनी तर सात्त्विक संताप अनावर होऊन महाराजांना वाटेल तशा शिव्या दिल्या. अखिल संगीतक्षेत्रच हळहळले. एखाद्या सामान्य गायिकेने वा गायकाने असा संगीत–संन्यास घेतला असता तर वझेबुवांसारख्या एका तपस्व्याने तिकडे लक्षही दिले नसते. संगीत दुनियेनेही फारशी दखल घेतली नसती. या दृष्टीने अंजनीबाईंच्या संगीत–संन्यासाची आजवर झालेली ओरड ही त्यांच्या संगीतकलेतील सर्वसमर्थतेची स्पष्ट निशाणीच समजावी लागेल !

सुमारे तीस वर्षांपूर्वी पुण्यातील एका म्यूझिकल सर्कलमध्ये भारतीय कीर्तिच्या एका अद्वितीय गायिकेची गाण्याची मैफल झाली. ही मैफल अतिशयच गाजली. ही मैफल झाल्यानंतर चार-पाच दिवसांनी माझी व श्रीमंत आबासाहेब मुजुमदार यांची भेट झाली. या भेटीत स्वाभाविकपणेच नुकत्याच झालेल्या अपूर्व मैफलीचा विषय निघाला. त्या वेळी आबासाहेब म्हणाले, "अहो ! या बाई चांगल्याच गायल्या. पण तुम्ही एकदा अंजनीबाई मालपेकरांचं गाणं ऐका, म्हणजे तुम्हाला खरं गाणं कसं असतं ते कळेल. अजूनही त्यांचा प्रत्येक स्वर अगदी मोत्यासारखा स्वच्छ लागतो. तुम्ही एकदा माझ्यावरोबर मुंबईला चला. तुम्हाला त्यांचं गाणं मुद्दाम ऐकवतो !" अंजनीबाईंच्या गाण्याबाबत कै. बालगंधर्व यांनी आणि आजचे प्रज्ञावंत कलाकार श्री. कुमार गंधर्व यांनी नेमक्या याच आशयाचे उद्गार माझ्याजवळ अनेकदा काढले होते.

अलीकडे आठ-नऊ वर्षांत अंजनीबाईंचे घरी माझे जाणे-येणे नेहमी होत असे. त्यांनी चार तपांपूर्वीच मैफली करण्याचे सोडून दिले असल्याने मला त्यांची प्रत्यक्ष मैफल ऐकण्याचा कधीच योग आला नाही, परंतु त्या अनेक विद्यार्थी–विद्यार्थिनींना अखेरपर्यंत तालीम देत असत. या तालमी मी अनेकदा ऐकलेल्या आहेत. यावेळी त्यांचे वय ऐंशीच्या पुढे गेलेले होते. परंतु त्यांच्या स्वरांत कंप नाही, आवाज अगदी स्वच्छ-मोकळा व बुलंद आणि सुदीर्घ दमसास, या महत्त्वाच्या गुणांची साक्ष स्पष्टपणे पटत होती. त्यांच्याकडे त्यांच्यापुढे शिकणाऱ्या तरुण विद्यार्थ्यांचा दमसास अगदी तोकडा वाटत असे. नालंदा विद्यापीठ

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

निसर्गनियमानुसार जमीनदोस्त झालेले होते, परंतु त्याच्या एकूण क्षेत्र-फळावरून त्याच्या पूर्ववैभवाची आणि विस्ताराची पूर्ण साक्ष पटत होती. अस्ताई-अंतरा भरणे, रागस्वरूप अतिशय शुद्ध ठेवणे, लयींचे सूत्र सर्व गायकींमध्ये सहजसुंदरपणे गोवणे, आणि हे सर्व करीत असताना गायकी बीनवादनाप्रमाणे मींडयुक्त खेचकामाने विस्तारित जाणे, या सर्व गोष्टी स्वतः गाऊन दाखवून त्या शिकवीत असत. गाताना त्यांचे उच्चार मोहक वाटत. गातानाही सुध-मुद्रा आणि प्रसन्न-मुद्रा राखणारी अंजनीबाईसारखी गायिका मी क्वचित्‌च ऐकली असेल. कोणत्याही रागाची तालीम देताना, त्यात कोणत्या गोष्टी आवश्यक आहेत, कोणत्या गोष्टी टाळावयाच्या त्याची शास्त्रीय चिकित्साही त्या अतिशय मार्मिक-पणे करीत. कोणत्याही रागाचा विस्तार कसा करावा, त्याचे विशिष्ट तंत्र कोणते आहे त्याचे त्या इतक्या सुलभतेने मार्गदर्शन करीत की, त्यात त्यांच्या नुसत्या विद्यार्थ्यांचाच नव्हे तर माझ्यासारख्याचाही खूप फायदा होई. अशा मार्गदर्शनाच्या ओघात त्यांना त्यांच्या गुरुंनी-खाँसाहेबांनी—कशी तालीम दिली, यांचे कार्यकारणभावासह त्या अत्यंत बोधप्रद विवेचन प्रात्यक्षिकांसह करीत. स्वर, ताल आणि कायदा या त्रयींवर त्यांच्या शिक्षणाचा सारा भर असे. कितीही अवघड विषय असो, त्या तो अतिशय सुलभ करून सांगत. त्यांना शिकविण्याची मनस्वी आवड होती. त्यांचे विद्यार्थी तासन्‌तास त्यांच्यासमोरच रियाज करीत वसलेले असायचे, परंतु वाई वयोमानामुळे तरी कधी कंटाळल्या आहेत, थकलेल्या आहे असे दृश्य मी कधींच पाहिलेले नव्हते. त्या अत्यंत वहुश्रुत होत्या. अनेक वेळा त्या जुन्या श्रेष्ठ गायकांच्या गायकीची महत्त्वाची वैशिष्टये विद्यार्थ्यांना किंवा माझ्यासारख्या जिज्ञासूंना मार्मिकपणे समजावून सांगत. मी ऐकलेल्या किंवा न ऐकलेल्या अशा कितीतरी कलाकारांची कलात्मक चित्रे अंजनीबाईंनी माझ्यासमोर रेखीवपणे उभी केलेली आहेत. एखादा साधा विषयही विस्ताराने सांगण्यात त्या तरबेज होत्या. त्याचप्रमाणे एखादी कूट समस्या केवळ चार-दोन वाक्यांतच सोडविण्याची त्यांची विलक्षण हातोटी होती. कै. गायनाचार्य पं. भास्करबुवांच्या मैफलीचे वर्णन करताना त्यांनी पहिल्या एकाच वाक्यात बुवांच्या सामर्थ्याची कल्पना दिली. अंजनीबाई म्हणतात,

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

" भास्करबुवांनी मैफलीत नुसता अस्ताई-अंतरा पेश केला की, शंभर सूर्यांचा प्रकाश पडल्याचा भास होत असे ! " इतक्या मोजक्या शब्दांत महान् अर्थ प्रतीत करण्याचे सामर्थ्य अन्यत्र सापडणे मुष्किल !

अंजनीबाईंनी ' भेंडीबझार ' घराण्याची तालीम कसोशीने घेतली आणि ती प्रचंड परिश्रमाने पचविली. परंतु त्यांची अभिजात रसिकता इतक्यावरच थांबली नाही. अंजनीबाईंची शास्त्रीय गायकीची तालीम जोरात चालू होती. त्याचवेळी गोहरजान यांची कीर्ती भारतभर झाली होती. ठुमरी, गझल, कव्वाली, कजरी, दादरा या गानप्रकारांच्या त्या सर्वश्रेष्ठ गायिका समजल्या जात. अंजनीबाईंनी त्यांची अनेक गाणी ऐकली. त्या गोहरजानबाईंच्या गाण्याने अतिशय प्रभावित झाल्या. त्यांच्या गायकीतील अनेक गुण आपल्या स्वतःच्या कलेत सामील करून घेण्यासाठी त्यांनी खूप मेहनत घेतली. महत्प्रयासाने अंजनीबाईंनी हेही गुण आत्मसात केले. अंजनीबाईंनी स्वतःची संगीतसाधना अशा प्रकारे विलक्षण चतुरस्रपणे केली. वयाच्या आठव्या वर्षापासून अंजनीबाईंची तालीम सुरू झाली. अशी तालीम त्यांना छत्तीस वर्षे मिळाली. अल्लादियाखाँसाहेबांसारख्या गानसम्राटाशीही सामना देण्याचा ज्यांनी प्रयत्न केला असे श्रेष्ठ खाँसाहेब गुरु त्यांना लाभले. त्यांनी शेकडो मातब्बर संगीतकलाकार अभ्यासू वृत्तीने आणि चोखंदळपणे ऐकले. कोणत्याही विषयात मूलगामी संचार करू शकेल अशी तीव्र बुद्धिमत्ता ईश्वराने त्यांना जन्मतःच दिली होती. तशीच विलक्षण सौंदर्यदृष्टी त्यांना निसर्गानेच दिली. रोज दहा-बारा तासांचा त्यांचा रियाज कित्येक वर्षे होऊ शकला आणि जीवनाचे एकमेव ध्येय म्हणूनच त्यांनी ही साधना तळमळीने केली. संगीत साधनेची ज्यांना थोडीफार तरी कल्पना असेल, त्यांनाच अंजनीबाईंच्या सिद्धीची नुसत्या गणिती हिशेबानेसुद्धा कल्पना येण्यासारखी आहे !

नटसम्राट बालगंधर्व अंजनीबाईंचे घरी नेहमी येत असत. ते बाईंच्या चरणी मस्तक ठेवीत. बाईंना ते ' स्वरस्वती माई ' या नावाने संबोधीत; आणि बाईंचे मी स्वतः पाहिलेले जीवनही या नामाभिधानाला साजेसेच

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

होते. विद्यार्थी तानपुरा छेडताहेत, बाईंच्या हातांत सतत जपमाळ आहे, नामस्मरण सदैव चालू आहे—हेच दृश्य मी सतत पाहत आलो होतो. अंगात दोन-तीन डिग्री ताप असला तरीही त्यांचे स्नान व नंतरची दोन-तीन तासांची ध्यानधारणा कधीही चुकलेली नव्हती. मी स्वत: पुष्कळच विदुषी आजवर पाहिलेल्या आहेत; परंतु अंजनीबाई संगीतावर, अध्यात्म-विषयावर किंवा सामान्य व्यावहारिक जीवनावर बोलू लागल्या म्हणजे त्यांचे रसाळ वक्तृत्व ऐकणाऱ्याचे देहभान नाहीसे करी. त्यांचे पाठांतरही विविध प्रकारचे आणि विपुल होते. त्यांना अनेक उर्दू शायर मुखोद्गत होते. तुलसीदासांचे साहित्यही त्यांना उत्तम तऱ्हेने अवगत होते. संतकवी आणि पंतकवींचे आध्यात्मिक वाङ्मय त्या सहज बोलता बोलता उद्धृत करीत. त्यांच्या पाठांतराचा आणि त्यांच्या उतारवयातील स्मरणशक्ती-चाही अंदाज लागणे कठीण होत असे. त्यांच्याकडे गेलेला कोणीही जाडा व्यासंगी विद्वान् मनुष्य त्यांचा निरोप घेऊन बाहेर पडताना स्वत:च्या सर्वांगीण अपात्रतेची जाणीव घेऊनच बाहेर पडत असे. आणि म्हणूनच बालगंधर्वांनी त्यांना 'स्वरस्वती माई' हे दिलेले नाव किती समर्पक होते त्याची प्रचिती येते! मी एके दिवशी दुपारच्या वेळी अंजनीबाईंच्या घरी असाच सहज गेलो होतो. त्या वेळी त्यांच्याकडे तत्त्वज्ञानाचे एक अधिकारी गृहस्थ अगोदरच येऊन बसलेले होते. अंजनीबाई त्यांच्याशी अध्यात्म, तत्त्वज्ञान, निरीश्वरवाद अशा निरनिराळ्या विषयांवर अस्खलितपणे बोलत होत्या. शेवटी अध्यात्मज्ञान या विषयावर बोलताना 'जे दृष्टीला दिसते ते विज्ञान आणि दिसत नाही ते ज्ञान' या एकाच वाक्यात अंजनीबाईंनी अध्यात्माची ओळख करून दिली. इतक्या सोप्या आणि मोजक्या शब्दांत अध्यात्मासारख्या गूढगहन विषयाची ओळख करून घेण्यास मुख्यत: अनुभूतीचीच गरज असते.

श्री. कुमार गंधर्व, बेगम अख्तर यांच्यासारख्या थोर कलावंतांनी अंजनीबाईंच्याही चरणाशी बसून अभिजात संगीताची दिव्य दृष्टी संपादिली. त्याचप्रमाणे बडे गुलामअलीखाँसाहेबांसारख्या युगप्रवर्तक उस्तादाने बाईंच्या प्रेमळ आशीर्वादाची अपेक्षा करावी, यापेक्षा बाईंच्या गानतपस्येचे भव्य यश आणखी कोणत्या शब्दांनी व्यक्त करता येईल?

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

अंजनीबाईंनी स्वतःच्या गानकलेवर अगणित संपत्ती मिळवली. परंतु पतिनिधनानंतर पतीचे दहा लाखांचे कर्ज बाईंनी स्वतः फेडले. स्वतःच्या जीवनात आपल्या हाताने दानधर्मही तसाच केला आणि जीवनाच्या संध्याछायेत लक्ष्मी किती चंचल असते याची दुर्दैवी अनुभूती घेत त्या वावरल्या. त्या पूर्वी असामान्य रूपवती होत्या, परंतु रूपगर्विता नव्हत्या. ते रूपही अनित्य असल्याचा अध्यात्मबोध त्यांनी अनुभविला. त्यांनी अनेक विद्यार्थ्यांना तालीम दिली. ती केवळ ज्ञानदानाच्या निरपेक्ष प्रवृत्तीने ! यामुळे पुढेपुढे त्यांची सांपत्तिक परिस्थिती पुष्कळच खालावली. परंतु याही परिस्थितीत त्या 'ठेविले अनंते तैसेची रहावे। चित्ती असो द्यावे समाधान' याच आनंदात निमग्न असत. दुनियेच्या विपरीत कारभाराबद्दल त्यांच्या तोंडून कटुतेचा एकही शब्द मी कधी चुकूनही ऐकला नाही ! कारण त्यांची सर्व सात्त्विक-संपत्ती त्यांच्या अंतरामध्येच सुस्थिर झालेली होती.

अंजनीबाईंची ही सर्व परिस्थिती पाहून माझ्यासारख्या अनेकांना असे वाटे की, अंजनीबाई भारताखेरीज इतर देशांत जन्माला आल्या असत्या तर अंजनीबाईंसारख्या विरागी गानदेवतेचे त्या राष्ट्राने केवढे कोडकौतुक केले असते !

संगीत नाटक अकादमीतर्फे दि. १२ मार्च १९५८ रोजी दिल्ली राजधानीत राष्ट्रपती डॉ. राजेंद्रप्रसाद यांच्या हस्ते, महामंत्री पं. जवाहरलाल नेहरू यांच्या उपस्थितीत अंजनीबाईंना 'फेलो ऑफ दि संगीत नाटक अकादमी' ही बहुमानाची पदवी देऊन त्यांचा समारंभपूर्वक गौरव करण्यात आला. संगीत नाटक अकादमीच्या त्या पहिल्या फेलो होत.

दि. १ ऑक्टोबर १९६५ पासून अंजनीबाईंना सरकारकडून दरमहा तीनशे रुपयेप्रमाणे मानधन देण्यात येऊ लागले.

अंजनीबाई आता नव्वदीच्या घरात आलेल्या होत्या. या ना त्या कारणाने त्यांची प्रकृती वरचेवर बिघडू लागली. मधूनमधून त्या अत्यवस्थ होत, पुन्हा प्रकृती बरी होई असे एकसारखे चालू असे. यावेळी त्यांचे चिरंजीव बाबा आणि बाईंच्या अन्य कुटुंबियांनी बाईंची

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

जी सेवा-शुश्रुषा केली, ती अंजनीबाईंची अनेक जन्मींची थोर पुण्याईच होती !

दुनियेचा सर्व व्यवहार अनिश्चित आणि अशाश्वत आहे. परंतु याही अनिश्चततेत एक गोष्ट मात्र निश्चित आहे आणि ती गोष्ट म्हणजे मृत्यू ही होय. तो कोणालाच चुकत नाही, चुकवता येत नाही. या त्रिकालाबाधित कटू सत्याची पुन्हा एकवार प्रचिती आली. मुंबई येथे दि. ७ ऑगस्ट १९७४ रोजी अंजनीबाईंचे दुःखद निधन झाल्याचे अपेक्षित दुर्दैवी वृत्त वृत्तपत्रांत प्रसिद्ध झाले.

एका महान् तेजस्वी जीवनाचे भरतवाक्य पूर्ण झाले !

◘ ◘ ◘

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri



कोठीवाले गायक

कै. गायनाचार्य पं. रामकृष्णबुवा वझे !

संगीताच्या क्षेत्रातः गायकाने स्वतःची मैफल निर्णायक रीतीने गाजविणे ही एक अंतिम सिद्धी समजली जाते. ही सिद्धी प्राप्त करून घेण्यासाठीच प्रत्येक साधकाचा जीवनभर अट्टाहास चाललेला असतो. या सिद्धीसाठीच प्रत्येक साधक आपल्या जिवाचे अक्षरशः रान करतो. त्याचे कलाजीवन आणि त्याचे कलात्मक भवितव्य त्याच्या याच सिद्धीवर अवलंबून असते. आज आपण कितीतरी कलाकार पाहतो–ऐकतो, परंतु खऱ्या अर्थाचे ‘ सिद्ध ’ कलाकार अभावानेच दिसून येतात. आदत– जिगर आणि हिसाब ही त्रयी सिद्धीला अत्यावश्यक असते हे खरेच, परंतु इतक्यानेच ही सिद्धी प्राप्त होईलच असे नाही. ही सिद्धी प्राप्त करून घेणाऱ्या कलासाधकाच्या अंगी अनेक दुर्मिळ गुण एकत्र यावे लागतात. आदत– जिगर– हिसाब यांचबरोबर समयसूचकता, मैफलीची अनुभूती, निसर्गाची देन आणि संयमित वृत्ती हेही गुण असावे लागतात. इतके गुण असूनही ज्याला नेमके कोणतेच परिमाण लावता येत नाही असा ‘ प्रसाद ’ नावाचा गुण कलाकाराच्या अंगी असणे हे अतिशय जरुरीचे असते. सर्व गुण अंगी असूनही ‘ प्रसाद ’ या एकाच गुणाच्या

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri



रामकृष्णबुवा वझे

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

अभावी त्याच्या मैफलीचा बोजवारा उडतो असा अनुभव आहे. मात्र 'प्रसाद' हा गुण नेमक्या कोणत्या साधनेनें पैदा होईल याचा शोध संगीतविद्येबाबतच नव्हे तर अन्य कोणत्याच कलेत वा विद्येत आजवर तरी लागलेला नाही. केवळ प्रसाद या गुणाचेच सामर्थ्य किती प्रभावी आहे याची साक्ष पटवणारी बालगंधर्वांसारखी उदाहरणे अतिशयच बोलकी आहेत. मी स्वतः आजवर असंख्य मैफली ऐकल्या आहेत. त्यांतल्या कितीतरी मैफली गाजलेल्या होत्या. ते कलावंतही थोर होते. परंतु सुमारे पन्नास वर्षांपूर्वी मी अशी एक मैफल ऐकली आहे की, तिचे मला वारंवार स्मरण होते. त्या मैफलीचे माझे आजचे स्मरणही अगदी ताजेतवाने आहे. इतक्या वर्षांपूर्वीच्या या मैफलीची धुंदी अजूनही तशीच आहे. मैफल खऱ्या अर्थाने कशी गाजवावी याचा वस्तुपाठच देणाऱ्या या दिवंगत कलाकार गायनाचार्यांचे नाव– पं. रामकृष्णबुवा वझे !

रात्रीचा दहाचा सुमार ! कोल्हापूरच्या देवल क्लबमध्ये एका चुरशीच्या मैफलीचे आयोजन केलेले होते. मैफलीच्या पूर्वी पंधरा दिवस तरी त्या भावी मैफलीची सर्वत्र चर्चा चाललेली असे. ही चुरशीची खास मैफल हैदराबादचे गुडियानीवाले एक नामवंत खाँसाहेब आणि पं. रामकृष्णबुवा वझे यांची होती. या दोन्ही गवय्यांचे खास अभिमानी आणि भक्तगण कोल्हापुरात होतेच, त्यामुळे या चर्चेला विलक्षण धार चढत असे... या मैफलीसाठी करवीरचे समस्त खाँसाहेब लोक, गोविंद-राव टेंबे, गोविंदबुवा शाळिग्राम, भूर्जीखाँ, नथ्थनखाँ, पं. सदाशिवबुवा गोखले अशांसारखे थोर थोर गायक-वादक आवर्जून उपस्थित झाले होते. वझेबुवा आणि खाँसाहेब दोघेही देवल क्लबच्याच वास्तूत उतरले होते. दुपारच्या वेळी खाँसाहेबांनी बुवांच्याबाबत थोडे अनादराचे उद्-गार काढले, ते बुवांच्या कानी पडले. बुवा विलक्षण संतापलेले होते. प्रथम खाँसाहेब गायला बसले. भूप, बहार आणि बसंत हे राग खाँसाहेब अतिशय तडफेने गायले. खाँसाहेब मोठे अधिकारी गायक होते. त्यांची तडफ आणि त्यांच्या गायकीतील जोष विलक्षण होता, समेवर येताना ते गुडघ्यावर उभे राहत. खाँसाहेबांनी स्वतःची मैफल खूप जमवली होती ! आता खाँसाहेबाचे गाणे संपले. मध्यंतरात बुवांना खूप ऐकलेल्या बाबा देवल, गोविंदराव टेंबे यांच्यासारख्यांनाही 'आता खाँसाहेबांच्या

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

अशा जमलेल्या गाण्यावर बुवा कितपत जमतील ' याची जबरदस्त शंका वाटू लागली. काळजीही वाटू लागली... बुवा स्थानापन्न झाले. त्यांनी तीन स्वरांनी तंबोरे चढविले, भरदार षड्ज् लावला आणि मियामल्हारमधील ' करीम नाम तेरो ' ही विलंबित अस्ताई सुरू केली. अस्ताईच्या पहिल्याच आवर्तनात बुवांनी खांसाहेबांचे गाणे पार साफ करून टाकले. बुवा प्रत्येक स्वराला– प्रत्येक जागेला समस्त रसिकांची उत्स्फूर्त ' वाहवा ' घेऊ लागले. बुवांनी खाँसाहेबांच्या गाण्याचे अक्षरशः शिरकाण करून टाकले. बुवांचे गाणे वाढत्या रंगतीने जमू लागले. खाँसाहेबांच्या दुपारच्या प्रलापाला उद्देशून बुवांनी गातागाताच समोरच बसलेल्या खाँसाहेबांना सुनावले, " हम वम्मनलोग क्या गायेंगे ? खाली खायेंगे " इतके बोलून बुवांनी एक जोरदार पलटा मारून सम गाठली. खाँसाहेब खजील होऊन मैफलीतून निघून गेले. या मैफलीनंतर मी बुवांच्या खाजगी आणि जाहीर मैफली कितीतरी ऐकल्या, परंतु त्यांच्या देवल क्लबमधील या अविस्मरणीय मैफलीची स्मृती आजही तितकीच जागृत आहे.

पं. वझेबुवा यांचा मला स्वतःला पुणे येथे सुमारे दोन-अडीच वर्षे अगदी निकटचा सहवास घडला. त्या सहवासात त्यांचे कलाविषयक अनेक आचार-विचार मी बारकाईने पाहू शकलो. त्यांनी केलेल्या उग्र तपःश्चर्येचा काही इतिहासही मला त्यांच्याच तोंडून ऐकावयास मिळाला. बुवांच्या सर्व सांगीतिक प्रेरणा गोमंतकाच्या पुण्यभूमीतच अंकुरित झाल्या होत्या; याचेही दर्शन त्यांच्याशी केलेल्या चर्चेतून मला वेळोवेळी घडलेले आहे ! नागेशी येथे बुवांचे आजही काही स्थावर-जंगम असून श्री. नागोबा वझे हे बुवांचे बंधू नागेशीलाच असतात.

पं. रामकृष्णबुवा वझे यांच्या सांगीतिक कार्याचे समालोचन करण्याच्या दृष्टीने, गेल्या शे-दीडशे वर्षांतील सांगीतिक आणि सामाजिक परिस्थिती काय होती, तिचे थोडेफार आकलन करून घेणे जरुरीचे आहे. आमच्या देशावर गेली कित्येक शतके परकियांनी आपले अधिराज्य चालविले.कोणत्याही परकीय सत्तेचे राजकारणाप्रमाणेच सामाजिक,साहित्यिक आणि कलात्मक आघात वा परिणाम अटळ असतात. जितांचे खच्चीकरण

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

जेत्यांनी मनोभावे केलेच पाहिजे, हा कोणत्याही राजनीतीचा मान्य दंडक असतो. त्यानुसार मोगल अमदानी आणि नंतरची ब्रिटिश राजवट या राजसत्तांकडून आमच्या कला-वाङ्मयाचा तेजोभंग करण्याचे कार्य अगदी पद्धतशीरपणे केले गेले. अनेक इंग्रज लेखकांनी, 'भारताचे संगीत अगदी मागासलेले आहे. त्याला संगीत म्हणणे, हासुद्धा मूर्खपणा आहे. भारतीयांचे संगीत म्हणजे शुद्ध डोंबाऱ्याचा खेळ आहे.' अशा प्रकारची मते आपापल्या ग्रंथात नमूद करून ठेविली आहेत. कॅप्टन विलार्डसारखे काही सन्माननीय अपवाद वगळल्यास बहुतेक सर्व पाश्च्यात्य लेखकांनी वरील मताचीच री ओढिली आहे. जितांची सर्व प्रकारची संस्कृती नष्ट करण्याचे आटोकाट प्रयत्न राज्यकर्त्यांकडून हेतूपूर्वक सतत केले गेले. खुद्द गोमंतकात हे प्रयत्न अनेक बाजूंनी केले गेले. त्या कटू इतिहासाचे पुनश्च स्मरण निदान गोमंतकीयांना तरी करून देण्याचे काहीच कारण नाही. तो इतिहास फारसा जुना नाही.

मोगल अमदानीपासून आमची संगीतकला एका विशिष्ट वर्गाच्या — एका विशिष्ट जमातीच्या दिमतीत राहिली. संगीतकलेचे वास्तव्यही दिल्लीपतीच्या आजूबाजूस म्हणजे बहुतांशी उत्तरेतच राहिले. हीच परिस्थिती ब्रिटिश कालातही वंशसातत्यामुळे तशीच राहिली. त्या परिस्थितीत महाराष्ट्रात जे संगीत शिल्लक राहिले ते सामान्यतः पोवाडे आणि लावण्या यांचे ! शंभर वर्षांपूर्वीच्या महाराष्ट्रातील सांगीतिक परिस्थितीची सूक्ष्म चर्चा यावेळी तरी विस्ताराने करण्याचे काहीच कारण नाही. परंतु इतकी गोष्ट खरी की, संगीतसाधना करण्याची एखाद्याला तीव्र प्रेरणा चुकून झालीच तर त्याला थेट उत्तरेतच जावे लागे. माझ्या लहानपणी अखिल सातारा जिल्ह्यात फक्त एकच तंबोरा होता आणि तोही तेथील राजेसाहेबांकडे ! वाजाच्या पेटीचे केव्हा चुकून दर्शन घडलेच तर ते गावातील उत्सवासाठी आलेल्या कीर्तनकारांच्या कीर्तनाच्या वेळी ! अशा सर्व प्रकारच्या विपरीत परिस्थितीत संगीतसाधनेची प्रेरणा तरी कशी व्हावी ? आणि म्हणूनच अशा परिस्थितीत ज्या थोर कलाकारांनी संगीतकलेची अत्यंत चिकाटीने साधना करून दिगंत कीर्ती मिळविली, संगीतकलेची प्रतिष्ठा वाढविली आणि आम्हाला कायमचे ॠणी करून ठेविले, त्या पूज्य कलाकारांची महती

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

कोणत्या शब्दांनी वर्णावी ! गा. पं. रामकृष्णबुवा वझे यांचे नेमके स्थान याच थोर मालिकेत आहे.

सावंतवाडी संस्थानातील ओझरे या खेडेगावी दि. ४ ऑक्टोबर १८७४ रोजी रामकृष्णबुवांचा जन्म झाला. घरची मुळची गरीबी आणि त्यातही बुवा अवघे दहा महिन्यांचे असतानाच त्यांच्या वडिलांचे निधन झाले. त्यामुळे बुवांच्या पालनपोषणाचा सर्व भार त्यांच्या मातोश्रींवरच पडला. वयाच्या चौथ्या वर्षीच शिक्षणासाठी बुवांना मातोश्रींनी कागल येथे आणले. बुवा यथाक्रम शाळेत जाऊ लागले. मराठी चौथीपर्यंत त्यांचे शिक्षण कसेवसे झाले. परंतु शालेय अभ्यासात बुवांचे मन रमेना. हे सर्व पाहून मास्तरांनीच बुवांच्या मातोश्रींना सांगितले, ‘याला गाणं शिकवा– शाळेत याचा काहीही उपयोग नाही.’ बुवांना स्वतःलाही गाण्याची विलक्षण आवड होती. बुवांना गाणे शिकविण्याची मातोश्रींचीही इच्छा होतीच. मातोश्री मोलमजुरी– स्वयंपाकपाणी करून मुलाचे संगोपन करीत होत्या. त्या वेळी त्यांना तीन रुपये पगार मिळत होता. कागल संस्थानचे दरबार-गायक पं. बळवंतराव पोहरे हे होते. त्यांचेजवळ बुवांचे दोन वर्षेपर्यंत शिक्षण झाले. त्यानंतर बुवा मालवण येथे गेले. तेथे पं. विठोबाअण्णा हडप यांचेजवळ ते एक वर्षपर्यंत शिकले. विठोबाअण्णा हे पं. बाळकृष्णबुवा इचलकरंजीकर यांच्या अगोदर ख्यालगायकी शिकून दक्षिणेत आलेले होते. मातोश्रींच्या बोलावण्यावरून बुवा पुन्हा घरी आले. त्या वेळी वयाच्या बाराव्या वर्षी बुवांचे लग्न झाले. यानंतर मात्र बुवा अतिशय अस्वस्थ झाले. आपण लग्न करून बसलो. आपल्या आईने काबाडकष्ट करून आपले पालनपोषण करावे आणि आपण बसून खावे, याची बुवांना शरम वाटू लागली. गाव सोडून कोठे तरी पळून जावे, असे बुवांना एकसारखे वाटू लागले. परंतु जवळ पैसा नाही–अडका नाही, अशा स्थितीत जाणार तरी कोठे ? त्या काळी रेल्वेची सर्वत्र अशी सोय नव्हती... बुवांनी मनाशी एक दिवस निश्चय केला, ‘पैसा तरी मिळवीन नाही तर देह तरी पडेल ! होईल ते होईल !’ बुवांनी सर्वांचा त्याग करून घरदार-गाव सोडले. जवळ पैसा नाही, पायांत चपलाही नाहीत. अशा स्थितीत अंगावरील जेमतेम कपड्यांनिशी पायी प्रवास करीत ते पुण्यास गेले आणि पुण्याहून मुंबईस गेले. त्या वेळी माधवबागेत

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

एका धनिकाचे लग्न होते. काही तरी दक्षिणा मिळेल या आशेने ते माधवबागेत शिरले. तेथे सुप्रसिद्ध गायिका चुन्नाबाई यांचे गाणे व त्यांचे गुरु उस्ताद बंदेअल्लीखाँसाहेब यांचे बीनवादन ऐकण्याचा अविस्मरणीय योग त्यांना आला. मुंबईस स्वतःचे काही लहानसहान कार्यक्रम करून बुवांनी दहा-बारा रुपये गोळा केले. तेथून ते इंदूरला गेले. तेथे पखवाजवादनाचार्य पं. नानासाहेब पानसे यांचे घरी ते राहिले. नानासाहेबांच्या अनुज्ञेनुसार बुवांनी इंदूर सोडले. उज्जयिनीस नानासाहेब अष्टीवाले यांचे घरी ते राहिले. तेथून नानासाहेब यांच्या बरोबर ते बनारसला आले. बनारस येथे विष्णुपंत छत्रे यांच्या सर्कशीत ते उतरले. तानरसखाँ, भूगंधर्व रहिमतखाँ अशा किती तरी गुणी लोकांचे गाणे त्यांना ऐकावयास मिळाले. बुवांना त्यांचे भावी गुरु निसारहुसेनखाँसाहेब यांचे प्रथमदर्शनही याचवेळी घडले. बनारसहून रहिमतखाँ, विष्णुपंत छत्रे, निसारहुसेनखाँसाहेब यांच्यासमवेत बुवा ग्वाल्हेरीस आले. ग्वाल्हेर ही त्या काळी खऱ्या अर्थाने गंधर्वनगरी होती. जिकडे जावे तिकडे गाणे– बजावणे चालू असे. ग्वाल्हेरला थंडीही विलक्षण आणि उन्हाळाही तसाच. त्यांतून बुवांच्या अंगावर धड कपडा नाही. बुवांनी आता मधुकरी मागण्यास सुरवात केली. तीही धड पोटभर मिळत नसे. केव्हा केव्हा अन्नछत्रांत जेवत. अशा अर्धपोटी परिस्थितीत बुवांनी पाच-सहा वर्षे काढली. उस्ताद निसारहुसेनखाँ यांचेकडे बुवांची तालीम सुरू झाली. या मुसलमान गुरुची पडेल ती सेवा बुवा करू लागले. बुवा नुसती लंगोटी लावून गावात फिरत. ग्वाल्हेरकरांचा 'बुवा' हा एक चेष्टेचा आणि उपहासाचा विषय होता. त्यांतल्या अनेकांनी बुवांना 'तू इथं कशाला आलास, तुला गाणं येणार नाही, तू इथून निघून जा,' असा मनोभंग करणारा अनाहूत सल्ला अनेकदा दिला. बुवांना मात्र संगीत-साधना हा एकच ध्यास होता. ते सतत गाणी ऐकत, गुरुजींची तालीम होतीच, ते अनेकांकडून विद्या घेत, तिच्यावर रात्रंदिवस मेहनत करीत. नऊ वर्षांत त्यांना झोप मिळाली नाही, असे बुवा स्वतःच सांगत असत. चिकाटीने आणि तळमळीने मेहनत करून बुवांनी आवाज उत्तम तऱ्हेने काढला. गाणेही तयार केले. आजवर सतत नावे ठेवणारे ग्वाल्हेरकर आता बुवांची मनापासून तारीफ करू लागले. त्यांत बुवांचे काही अभिमानीही झाले.

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

बुवांनी वयाच्या अवघ्या तेराव्या–चौदाव्या वर्षी स्वतःचे घरदार सोडले. स्वतःच्या प्राणाचीही त्यांनी कधी पर्वा केली नाही. ' मी मोठा गवय्या होणार '–हे एकच ध्येय त्यांनी आपल्या उराशी सतत बाळगले. त्यासाठी अपार कष्ट उपसले, हालअपेष्टा सोसल्या ... आणि शेवटी प्रचंड परिश्रमाने, तीव्र महत्त्वाकांक्षेने आपले ध्येय गाठले. ज्या ग्वाल्हेरमध्ये बुवांना ' कोकण्या– कोकण्या ' या उपहासगर्भ संज्ञेने उपेक्षिले गेले, त्याच ग्वाल्हेरकरांना हे गायनाचार्य भूषणभूत ठरले. विद्येचा प्रचंड संग्रह असणाऱ्या कलाकारांना ' कोठीवाले ' ही पूर्वापारची संज्ञा आहे. बुवांना कोठीवाले– गायक ही उपाधी ग्वाल्हेरच्याच बुजुर्ग कलाकारांनीच बहाल केली.

बुवांनी स्वतःच्या गुरुखेरीज असंख्य कलाकारांकडून दुर्मिळ रागरागिण्या– उत्तमोत्तम चिजा मिळवल्या. त्याचप्रमाणे ठुमऱ्या–भजने यांचाही प्रचंड संग्रह केला. स्वतःच्या मोठेपणाच्या आहारीं न जाता त्यांनी अगदी सामान्य फकीरांकडूनसुद्धा उत्तमोत्तम दोहे मिळविले. ज्यांच्या नावाच्या उच्चाराबरोबर आजचे मातब्बर कलाकार स्वतःच्या कानांची पाळी अतीव आदराने पकडतात, अशा असंख्य ज्येष्ठ आणि श्रेष्ठ कलाकारांना सतत ऐकण्याचे भाग्य बुवांना लाभले. त्यांची सेवा करण्याचीही त्यांना संधी मिळाली.

पं. रामकृष्णबुवा वझे यांच्या उत्तर भारतातील मोठमोठ्या शहरांतून सतत मैफली होऊ लागल्या. त्यांचा नावलौकिक सर्वत्र वाढू लागला. संगीत क्षेत्रातील त्यांचे स्वतःचे असे वैशिष्ट्यपूर्ण स्थान विद्वन्मान्य होऊ लागले. आता ते काही दिग्विजय करावा या हेतूने ग्वाल्हेरचा – गुरूंचा आशीर्वाद– निरोप घेऊन ते बाहेर पडले. बुवांनी ग्वाल्हेर सोडले. ते बरेलीस आले. तेथे श्रीस्वामी विवेकानंद यांची भेट झाली. स्वामींच्या सहवासात बुवा पंधरा दिवस होते. स्वामी विवेकानंदांचा आवाज अतिशय उत्तम होता. आणि स्वामी विशेषतः ध्रुपदगायकी अप्रतिम गात. स्वामींच्या प्रासादिक सहवासातील हे पंधरा दिवस हा बुवांच्या संपूर्ण जीवनातील एक महत्त्वपूर्ण भाग्ययोगच होता. बुवांना स्वतःला या योगाची अतिशय धन्यता वाटत असे. बुवा या गोष्टीचा मोठ्या अभिमानाने नेहमी उल्लेख करीत ! यानंतर नेपाळचे दरबारगायक

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

म्हणून त्यांनी एक वर्षपर्यंत नोकरी केली. आता आपल्या मायदेशी जावे, अशी त्यांना तीव्र ओढ लागली. बुवा अशा तऱ्हेने मैफली करीत करीत आपल्या गावी परत आले. ते इकडे आल्यानंतर स्वतःच्या मैफलीबरोबरच त्यांनी ज्ञानदानाचे कार्य सुरू केले. हे दान त्यांनी फार मोठ्या प्रमाणावर केले. ही विद्या संपादिण्यासाठी मला जे कष्ट पडले ते इतरांना होऊ नयेत, ही त्यांची तळमळ होती. यासाठी त्यांनी मोबदल्याकडे न पाहता कित्येकांना तालीम दिली. यासाठी त्यांनी गोव्यात श्री. लामगावकर, कुडईकर जमीनदार आणि श्री. नानासाहेब देसाई यांचेकडे राहून स्वतः खूप रियाज केला. तसेच सूरश्री केसरबाई केरकर, तारा, देवी, तानूबाई साखळकर, तुंगासानी, पार्वती, दत्तीबाई यांना तालीम दिली. त्यानंतर केशवराव भोसले, मास्टर दीनानाथ, बापूराव पेंढारकर, गुरुराव देशपांडे, हरिभाऊ घांग्रेकर, कागलकरबुवा, दिनकरबुवा फाटक, पुण्याचे भास्करबुवा जोशी, गजाननबुवा जोशी भार्गवराम आचरेकर, भालचंद्र पेंढारकर अशा कितीतरी विद्यार्थ्यांना बुवांनी तालीम दिली गोमंतकातील आणखी कित्येक गायिकांना बुवांनी तालीम देऊन विद्यासंपन्न बनविले. बुवांच्या ज्ञानदानाबरोबरच बुवांनी आणखी एक महत्त्वाची कामगिरी केलेली आहे. ती म्हणजे त्यांनी दिलेल्या नाट्यसंगीताच्या चाली! तेजस्वी गायक-नट कै. केशवराव भोसले यांच्या आग्रहामुळे बुवांनी 'ललितकलादर्श' या कंपनीच्या नाटकांना चाली दिल्या. बुवांच्या चालींचे खास वैशिष्टय असे की, अप्रसिद्ध किंवा अनवट रागरागिण्यांतील संथ लयीतील ख्यालीवळणाच्या, गंभीर प्रकृतीच्या बहुतांशी चाली त्यांनी नाट्यसंगीतासाठी वापरल्या. आणि त्या काळी त्यांतील कितीतरी चाली लोकप्रिय झाल्या. कै. केशवराव भोसले हे सुदैवाने अधिक जगले असते तर बुवांच्या याही कार्याचे मूल्यमापन निराळ्या महत्त्वाने झाले असते. बुवांनी सुमारे दहा-बारा नाटकांना चाली दिल्या. संगीत नाटकांच्या दुनियेत बुवांनी दिलेल्या चालींचे स्थान आगळे आणि तितकेच महत्त्वपूर्ण असे आहे! बुवांनी बेळगाव येथे बरीच वर्षे वास्तव्य केले आणि त्यानंतर ते पुण्यास स्थायीक झाले ते त्यांच्या निधनापर्यंत. या दोन्ही शहरांत त्यांनी मैफलींबरोबरच अखेरपर्यंत विद्यादानाचे कार्य केले. पुण्यास आल्यानंतर साहित्यसम्राट कै. तात्यासाहेब केळकर यांच्या

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

आग्रहावरून बुवांनी 'सह्याद्रि'मासिकातून संगीत विषयावर स्फुट लेख लिहिले. १९३७–३८ च्या सुमाराम बुवांच्या संग्रहातील प्रसिद्ध आणि अप्रसिद्ध रागांतील उत्तमोत्तम चिजांचे 'संगीत कला प्रकाश' या पुस्तकाचे दोन भाग त्यांनी प्रसिद्ध केले.

पं. वझेबुवांनी इतक्या विविध प्रकारची कामगिरी बजावली असली तरी त्यांची सर्वांत महत्त्वाची कामगिरी म्हणजे त्यांच्या अविस्मरणीय– अद्वितीय मैफली हीच होय. त्यांना सर्वांत अधिक तालीम मिळाली ती ग्वाल्हेर घराण्याचे कोठीवाले गायक उस्ताद निसारहुसेनखाँ यांची. ग्वाल्हेर घराण्याचे आद्य गायक खां. हद्दू-हसूखां यांचे आतेभाऊ नथेखां ! या नथेखांचे सुपुत्र खां. निसारहुसेनखां, असे हे नाते आहे. आणि म्हणूनच पं. वझेबुवा हे ग्वाल्हेर घराण्याचे गायक समजले जातात. परंतु त्याशिवाय इयानतहुसेनखां, अलीहुसेनखां, दिलावरखां अशा अन्य घराण्यांच्या कितीतरी विद्वानांकडून त्यांनी ही विद्या मिळविली. प्रचंड मेहनतीने ती पचविली, परंतु या निरनिराळ्या गायकीचे परिणामकारक एकच रसायन करून ती विद्वान्– रसिकांसमोर अतिशय प्रभावीपणे मांडली. खास ग्वाल्हेर-गायकी ही मूलतः अगदी सरळ वळणाची आहे. परंतु बुवांनी स्वःतच्या प्रतिभेने आपली गायकी बलपेचयुक्त आणि अधिक सौंदर्यस्पर्शी बनविली. बुवांनी ग्वाल्हेर– गायकीचे पूर्वापारचे विधिनिषेध आणि संकेत पार झुगारून दिले. सौंदर्यबोध झालेल्या सिद्ध कलाकाराला घराण्याच्या रूढीबंधनांची मातब्बरी ती काय वाटणार ? त्यांनी तयार केलेली ही गायकी 'वझेबुवांची गायकी' म्हणून तिचा खास गौरव झाला. तिचा चाहता आणि भक्तवर्ग मोठ्या संख्येने निर्माण झाला. बुवांची ही कामगिरी म्हणजे शास्त्रीय संगीताच्या क्षेत्रातील खरेखुरे क्रांतिकार्यच आहे ! नुकतेच म्हणजे १९७५ साली महाराष्ट्रातील सर्व मोठ्या शहरांतून बुवांचे जन्मशताब्दि-समारंभ साजरे झाले.

बुवांचा आवाज अतिशय गाजदार होता. मुळचाच आवाज रुंद–मोकळा असून जबरदस्त मेहनतीने त्यात विलक्षण कस निर्माण झालेला होता. त्यामुळे त्यांनी नुसता अस्ताई– अंतरा म्हणताच सर्व मैफलच त्यांच्या ताब्यात येई. कितीही अवघड रागिणी असली तरी ते ती अगदी

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

सहजावारी पेश करीत. त्यांच्या तानेचा वेग अचाट असा नव्हता, परंतु त्यांच्या अतिवजनदार गमकामुळे अगदी लहानशी तानसुद्धा अंबारीसह आलेल्या गजराजांचे स्मरण करून देई. बुवांच्या लयकारीला अन्य उपमा नाही आणि तोडही नाही. त्यांची लयकारी हा लयीचा विलक्षण खेळ होता. बुवांच्या लयकारीचा सर्वांनाच मनस्वी आनंद होत असे, परंतु तिचा नेमका बोध मात्र मी–मी म्हणणाऱ्या तालीयांनाही होत नसे. हे दृश्य मी अनेकदा अनुभवले आहे. त्यांच्या अस्ताई– अंतरा म्हणण्यात आणि विशेषतः आलापअंगात लयीचे अतीत– अनागत हे प्रकार सतत येत. आणि तेही त्यांच्या एकूण गायकीचेच एक स्वाभाविक अंग म्हणून अगदी सहजावारी येत. यामुळे त्यांच्या गायकीचे आगळेपण जाहीर होत असे. तसेच मैफलीचा एकूण दर्जा उंचावणे आणि रंग भरणे हीही किमया घडत असे. त्यांच्या आवाजाचा कस आणि गायकीतील कमालीचा जोष यामुळे अन्य गवय्यांच्या शेकडो तान– पलटयांनी जे कार्य होणार नाही ते बुवांच्या तानेच्या अगदी लहानशा तुकडयानेही साधून जाई. याच कसवाने बुवा आपली मैफल कमालीची जमवीत. बुवांच्या मैफलीला हार्मोनियमच्या पट्टीचा प्रश्न केव्हाच उपस्थित होत नसे. दोन-तीन स्वर कमीजास्ती असले तरी त्यांच्या आवाजाच्या आणि तंत्राच्या जोरावर ते सहजावारी निभावून नेत असत. पुण्यातील एका संगीत– विद्यालयाच्या समारंभात बुवांच्या गाण्याचा कार्यक्रम होता. गाणे सुरू करण्यापूर्वी बुवांना विचारले, ‘ आपल्याला कोणत्या सुराचे तंबोरे हवेत ?’ त्यावर बुवांनी ‘ कोणतेही आणा ! ’ म्हणून सांगितले ! बुवांच्याजवळ रागरागिण्या आणि निरनिराळ्या अंगांच्या चिजा यांचा अपार संग्रह असल्याने निरनिराळ्या प्रसंगी ते अशा तंत्राचा वापर करीत. तालाचाही तोच प्रकार. पुण्यातील त्यांच्या एका अचानक ठरलेल्या मैफलीला जो तबलजी उपलब्ध झाला त्याला फक्त झपतालाशिवाय कोणताच ठेका येत नव्हता. बुवांनी त्याला संभाळून घेऊन सर्व मैफल झपतालावरच साजरी केली, तर उस्ताद थिरकवांच्या साथीत लय-तालाच्या बिकट करामती ते हजर करीत. बुवा हे एक खऱ्या अर्थाचे चतुरस्र गायक होते. ज्या प्रकारचे श्रोते असतील त्या प्रकारचे ते गाणे ऐकवीत. ख्यालापासून अगदी भजनापर्यंत सर्वच प्रकार ते उत्तम गात. गाणे हे श्रोत्यांसाठी–

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

रसिकांसाठी आहे, हे सूत्र ते कधीच विसरले नाहीत. त्यामुळे काहीही उपाय करून ते आपली मैफल हमखास जमवीत. अनेक गाणी असलेल्या मैफलींत बुवा गायला बसले तर ते इतर सर्व गाणी क्षणार्धांत नाहीशी करून टाकीत! गाण्याप्रमाणेच बुवा व्हायोलिन व सतार ही वाद्ये उत्तम वाजवीत. विशेषतः व्हायोलिन तर खूपच तयार वाजवीत.

बुवांचे ज्येष्ठ चिरंजीव पं. शिवरामबुवा हे एक अद्वितीय गायक होते. पं. रामकृष्णबुवा यांच्या गायकीचा आणि विद्वत्तेचा संपूर्ण वारसा सांगण्यासारखे हे एक अधिकारी गायक होते. परंतु दुर्दैवाने दि. १५ जानेवारी १९६३ मध्ये या अवलिया गायकाचे बेळगाव येथे निधन झाले. बुवांचे द्वितीय चिरंजीव श्री. लक्ष्मणराव हे पुणे -आकाशवाणी केंद्रावर सतारवादक म्हणून नोकरीस होते. त्यांचे वयाच्या ५९ व्या वर्षी १९७४ साली पुण्यातच देहावसान झाले. बुवांचा वारसा अधिकाराने सांगावा अशा तोलामोलाचे बुवांचे उल्लेखनीय शिष्य पेणचे पं. हरिभाऊ घांग्रेकर हे होत. पं. घांग्रेकर यांनी सुमारे दीड तप पर्यंत गुरुगृही राहून आदर्श गुरुसेवा करून हे विद्याधन मिळविले आहे. त्याचप्रमाणे पुण्याचे गायक पं. भास्करबुवा जोशी हेही वझेबुवांचे एक गुणी शिष्य आहेत. इचलकरंजीच्या एफ्. आय्. ई. फाऊंडेशनतर्फे शास्त्रीय संगीताचे मानकरी म्हणून दहा हजार रुपयांचे बहुमानाचे पारितोषिक १९७४ साली त्यांना देण्यात आले होते.

पं. रामकृष्णबुवा वझे हे एक अद्वितीय गायक होते. त्यांच्या जमान्यात त्यांची श्रेष्ठ गानविद्या आणि त्यांचे सुसंस्कृत व सुप्रतिष्ठित व्यक्तिमत्त्व यांचा संगीतजगतात विलक्षण दबदबा आणि दरारा होता. त्यांच्या श्रेष्ठ कलेप्रमाणेच ते एक थोर गृहस्थधर्मी होते. स्वतःच्या मुलाइतकेच त्यांनी विद्यार्थ्यांचेही कोडकौतुक केले. बुवा मूलतःच मजबूत आणि दणदणीत हाडापेराचे होते. गाणे आणि खाणे हे दोन मनस्वी षौक त्यांना अगदी अखेरपर्यंत होते. वार्धक्यामुळे बुवांना मधुमेह आणि रक्तदाब हे विकार जडले, परंतु बुवांनी त्यांचीही फारशी चिंता केली नाही!

१९४३ सालचा एप्रिल महिना असावा! सारंगीनवाज मरहूम उस्ताद बुंदूखां यांचे एक मुसलमान शिष्य पुण्यास आले होते. ते बुवांना भेटण्यासाठी मुद्दाम बुवांच्या घरी गेले. त्या वेळी बुवा

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

आसन्नमरण परिस्थितीत रुग्णशय्येवर पहुडलेले होते. नमस्कार-चमत्कार झाल्यानंतर खांसाहेबांनी बुवांना अगदी आर्जवपूर्वक विनंती केली– "आप वडे विद्वान् और बुजुर्ग हैं। आप इजाजत दे तो आज शाम को घंटा आधा घंटा आपकी सेवा करने की मेरी वहुत बडी तमन्ना है।"

यावर बुवांनी "जरूर–जरूर–आप जरूर आईये।" अशी मनापासून संमती दिली. त्यानुसार दुपारी चार वाजता खांसाहेबांनी सारंगीवादनास सुरुवात केली. बुवासाहेब अंथरुणावर पडूनच ऐकत होते. सुमारे तासभर वादन होऊन खांसाहेबांनी सारंगीखाली ठेवली. इतक्यात बुवा एकदम उठून वसले आणि त्यांनी आपल्या शिष्यांना "तंबोरे काढा" अशी आज्ञा केली. सर्वच मंडळी घावरली– खांसाहेवही घावरले. खांसाहेव म्हणाले, "अजी! आप यह क्या कर रहे हैं? आप बीमार है! आप तकलीफ़ मत उठाइये!" यावर बुवा म्हणाले, "आपके उस्ताद मेरे दोस्त हैं। अप मेरे लिये खास घर आये हैं और अपनी सरंगी सुनाने की तकलीफ उठायी है तो मेरा भी कर्तव्य है कि मैं अपना गाना आपको जरूर सुनाऊं!" इतके बोलून बुवांनी श्रीच्या ख्यालास सुरुवात केली. सुमारे तासभर गाऊन बुवा पुन्हा तावडतोव बिछान्यावर आडवे झाले... बुवा या रुग्णशय्येवरून पुन्हा कधीच उठले नाहीत...!

दि. ५ मे १९४३ रोजी पुणे येथेच या गानसिंहाचे दुःखद निधन झाले. असा विद्यासंपन्न गायनाचार्य पुन्हा होणार नाही!

▣ ▣ ▣

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri



हार्मोनियमवादनमहर्षी
कै. विठ्ठलराव कोरगावकर !

भारतात हार्मोनियम या वाद्याचे आगमन सुमारे शंभर वर्षापूर्वी झाले. चालू विसाव्या शतकाच्या सुरुवातीस म्हणजे १९०३-४ साली कै. झाववा यांनी हे वाद्य प्रथमतः मुंबईस आणले असे कै. गोविंदराव टेंबे लिहितात. शास्त्र आणि व्यवहार या दृष्टीने या वाद्यावर जितकी उलट-सुलट चर्चा सतत झाली आणि आजही चालू आहे तितकी चर्चा अन्य कोणत्याही वाद्याच्या वाट्यास आलेली नाही. हार्मोनियम या वाद्याच्या अमाप लोकप्रियतेचे आणि उपयुक्ततेचे हे एक प्रभावी गमकच होय ! संगीताच्या कोणत्याही लहानमोठ्या व्यवहारांत हार्मोनियम हे वाद्य उपयुक्त ठरलेले आहे. गवय्याच्या मैफलींपासून कीर्तन, भजन, नाटक, लोकनाट्य अशा सर्वच ठिकाणी सर्वांत अधिक गरजेचे वाद्य म्हणजे हार्मोनियम ! हार्मोनियमची इतकी लोकप्रियता वाढण्याचे कारण या वाद्यातील अनेक महत्त्वाच्या सोयी हेच आहे. साथीच्या दृष्टीने हे वाद्य तर स्वागतार्ह ठरलेले आहेच, परंतु या वाद्याच्या स्वतंत्र वादनकारांनी स्वतःच्या तपश्चर्येने या वाद्याची महती संगीततज्ज्ञांना पटविलेली आहे. गायनाचे म्हणजे

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri



विठ्ठलराव कोरगावकर

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

गायकीचे जास्तीत जास्त अनुकरण करणे हेच कोणत्याही स्वर-वाद्याचे मुख्य तंत्र आहे! कोणाही वादनकार–कलाकाराचा अट्टाहासही आपल्या वादनांतून अधिकाधिक प्रमाणात गायकी सादर करण्याचा असतो, गळयाच्या मानाने प्रत्येक वाद्यात जशी गुणवत्ता असते, तसेच कमी–अधिक प्रमाणात दोषही असतात. हार्मोनियम हे वाद्यही या नियमाला अपवाद असण्याचे कारण नाही. आपापल्या वाद्यांतील गुण, दोष आणि मर्यादा नेमक्या हेरून परिणामकारक वादन करणे हेच कोणत्याही कसवी वादनकाराचे खरे कौशल्य असते. त्याची तीच खरी सिद्धी असते! हार्मोनियमवादनाच्या सुरुवातीच्या काळात ग्वाल्हेरचे महाराज श्रीमंत जयाजीराव यांच्या कारकीर्दीतील गणपतभैय्या, हैद्रावाद संस्थानात निजाम सरकारच्या पदरी नोकरीत असलेले लक्ष्मणराव ऊर्फ नानासाहेव आणि मुंबईचे सुप्रसिद्ध पेटीवादनकार लक्ष्मीकांत सदानंद ऊर्फ भाचूभाई भांडारे हे तीन विद्वान् आणि कसबी कलावंत होऊन गेले. त्यांपैकी कै. भाचूभाई यांच्या सौंदर्य-स्पर्शी आणि रसपूर्ण वादनाचा आमच्याकडील विशेषत: महा-राष्ट्रातील पेटीवादन–अभ्यासूंवर विलक्षण परिणाम झाला. भाचूभाई हेच या सर्व अभ्यासूंचे आदर्श स्थान झाले. भाचूभाई यांच्या हाताची ठेवण व त्यांचे आकर्षक वादन यांच्या परिणामाने जे विलक्षण भारले गेले त्यांत गोविंदराव टेंबे आणि विठ्ठलराव कोरगावकर या दोघां कलाचार्यांचा प्रामुख्याने उल्लेख करावा लागेल! कै. गणपतराव-भैय्या व कै. लक्ष्मणरावजी यांचे काही शिष्य मी स्वत: थोडे फार ऐकलेले आहेत. सतारवादनातील आलाप आणि विशेषत: गत-तोडा-झाला या प्रकारचे वादन हे या वादनकारांचे प्रमुख अंग होते. चमत्कृती किंवा चमत्कार म्हणून या प्रकारचे वादन काही वेळ बरे वाटले तरी बऱ्याच वेळच्या वादनानंतर ते वरेच कलाविघातक आणि अतिशय कंटाळवाणे वाटते. तवलियाने आपल्या तबलावादनांत मींड-गमक यासारखे प्रकार वाजविण्याचा प्रयास करावयाचा व गवयाने किंवा स्वरवाद्य-वादकाने आपल्या कलाविष्कारात चक्रदार गती-तिहायी अशासारखे तालविद्येतील प्रकार सतत सादर करण्याचा उपद्व्याप करावयाचा यासारखे कलाविघातक कृत्य आणखीं कोणते असू शकेल?

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

अर्थात् या दोन्ही सौंदर्योपासकांनी भाचूभाई भांडारे यांचाच आदर्श समोर ठेऊन स्वतःचीं कलासाधना सुरू केली.

कै. गोविंदराव टेंबे आणि कै. विठ्ठलरावजी कोरगावकर हे दोघेही समकालीन कलाकार होते. दोघेही भाचूभाईंचे भक्त असल्याने कमालीचे सौंदर्योपासक होते. परंतु भावी कालात दोघांचेही गायकीचे आदर्श निरनिराळे झाल्याने दोघांचीही वादनकला निरनिराळ्या दिशेने बहरली !

गोमंतकातील कोरगाव हे विठ्ठलरावजींचे मूळ गाव. त्यांचा जन्म मुंबईंत १८८४ साली झाला. नंतर ते कोरगाव येथे रहावयास आले.

लहानपणीच आई-वडील वारल्याने एक भाऊ व दोन वहिणींच्या पालनपोषणाची जबाबदारी त्यांच्यावर पडली. कोरगावात मधूनमधून कीर्तने होत. ती ऐकून विठ्ठलरावांना संगीताची आवड निर्माण झाली. कुटुंबाच्या उदरनिर्वाहासाठी ते मुंबईस स्थायिक झाले. त्या वेळच्या पाटणकर संगीत मंडळीत ते वयाच्या दहाव्या वर्षी दाखल झाले. पाटणकर संगीत नाटक मंडळीतील भागवत यांचेजवळ त्यांनी पेटीचे प्रथम पाठ घेतले. बाल कलाकार म्हणून त्यांनी गायनाची मेहनत सुरू केली. त्याचबरोबर ते पेटीचीही मेहनत करू लागले. परंतु पुढे आवाज फुटल्याने त्यांनी पेटी वादनावरच संपूर्ण लक्ष केंद्रित केले. याच वेळी गिरगावातील गोऱ्या रामाच्या देवळात तरुण सुशिक्षित आणि श्रीमंत घराण्यातील पेटीवादक भाचूभाई भांडारे रहात असत त्यांचेजवळ विठ्ठलराव शिकू लागले. 'भाचूभाई मुलायम, गोड व अप्रतिम वाजवीत असत' असे विठ्ठलराव नेहमी सांगत. हे शिक्षण १९०५ पर्यंत चालू होते.

काही हितचिंतकांच्या सल्ल्यावरून १९०५ साली विठ्ठलरावांनी फ्रेंच बनावटीच्या हार्मोनियम, स्टोव्ह, सायकलदुरुस्ती-विक्री यांचे हुबळीस दुकान काढले. त्यांच्या दुकानाचा हा व्याप दिवसेंदिवस खूपच वाढत चालला, शेवरोलेट मोटरगाड्या, हिज मास्टर्स व्हॉईस रेकॉर्डस् आणि ग्रामोफोन यांची एजन्सी त्यांनी घेतली. बारा मोटरगाड्या स्वतःच्या ठेवून हुबळी–कारवार बस सर्व्हिस सुरू केली. विठ्ठलरावजी

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

हुवळी विभागाचे उद्योगपती ठरले.ते काही लाखांचे धनी झाले. त्यांचा उद्योगधंदा-व्यापार सतत वाढत होता. परंतु त्याचवरोबर त्यांची संगीत-साधनाही सतत चालू होती, तीही सतत वाढत होती. ते रोज सहा-सहा तास रियाज करीत. विठ्ठलराव आर्थिक दृष्या अगदी संपन्न होते. कलाकारांचे आगत-स्वागत ते अगदी भक्तिभावाने करीत. संगीत शौकापायी त्यांनी लाखो रुपये खर्च केले. गंधर्व नाटक मंडळीचा हुवळीस मुक्काम असला म्हणजे खुद्द वालगंधर्वांचे वास्तव्य विठ्ठलरावांचे घरीच असे. त्याचप्रमाणे अवदुल करीमखाँ, वझेबुवा, सवाईगंधर्व, सौ. हिरावाई, मास्तर कृष्णराव, असे किती तरी मान्यवर कलाकार मुक्कामाला विठ्ठलरावांकडेच असत. तेथे रात्रंदिवस गायन-वादनाच्या मैफली झडत असत. खाँसाहेव अवदुल करीमखाँ यांच्या गाण्यावर विठ्ठलराव अतिशय लुब्ध झाले. १९०६ सालापासून १९२८ सालापर्यंत त्यांना खाँसाहेवांची तालीम लाभली. शास्त्रीय संगीताची महत्त्वाची अंगे, शास्त्रविचार, स्वरविलास आणि सौंदर्यदर्शन या सर्वांचे महत्त्वपूर्ण मार्गदर्शन यांचा लाभ खाँसाहेवांपासून त्यांना सतत झाला. खाँसाहेवांच्या शेकडो मैफलींचे साथीदार विठ्ठलरावच होते. त्यामुळे किराणा घराण्याच्या सूक्ष्मातिसूक्ष्म ज्ञानाचा विठ्ठलरावांना बोध झाला. याशिवाय पं. रामकृष्णबुवा वझे यांच्याकडूनही त्यांना सतत मार्गदर्शन होत असे. याशिवाय अल्लादिया-खाँसाहेव, पं. वाळकृष्णबुवा इचलकरंजीकर, आग्रा घराण्याचे गायक, तसेच गोहरजान-मलकाजान अशांसारख्या श्रेष्ठ गायिका या सर्वांच्या कलात्मकतेचे परिणाम त्यांच्या एकूण संगीत साधनेवर होत होतेच. संगीत साधना, पैसा, लोकसंग्रह या सर्वच दृष्टीने विठ्ठलराव यांच्या जीवनाचा रथ अगदी दृष्ट लागण्याइतका सुरळीत चाललेला होता. विठ्ठलरावजी सर्वच दृष्टींनी वैभवाच्या शिखरावर होते ! परंतु विधि-घटना विपरीत होती. घडणारे भवितव्य मानवाला अज्ञात असते. भवि-तव्य अंधारातच वावरत असते, मानवाला त्याचा काहीही बोध होऊ नये, पुढील क्षणाचेही त्याला भान नसावे, हीच ईश्वरी सत्ता आहे. नियोजित राज्याभिषेकाच्या सुमुहूर्तावरच प्रभू रामचंद्रांना वल्कले परिधान करून वनवासास जावे लागले ! विठ्ठलरावांचीही नेमकी हीच परिस्थिती झाली. त्यांच्या व्यवसायात त्यांना जबरदस्त ठोकर बसली. व्यवसाया-

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

तील वारा उतारू-मोटरी गेल्या. व्यापार बुडाला. येणे संपले आणि देणे बाकी राहिले. विठ्ठलरावांचे सर्वच वैभव नाहीसे झाले. त्यांच्या-जवळ त्यांची श्रेष्ठ वादनकला आणि त्यांची श्रेष्ठ दानत या दोनच गोष्टी आता शिल्लक राहिल्या.

१९३५ साली त्यांना हुबळीचा सर्व व्यवसाय बंद करावा लागला. हुबळी सोडून ते मुंबई येथे रहावयास आले. त्यांनी तेथे 'रुक्मिणी संगीत विद्यालय' सुरू केले. हे विद्यालय चार वर्षे चालले. त्यानंतरच्या युद्धजन्य परिस्थितीमुळे अनेकांप्रमाणे विठ्ठलरावांनाही मुंबई सोडावी लागली. ते बेळगावला स्थायीक झाले. तेथे त्यांनी विद्यालय सुरू केले. जीवनातील आनंदासाठी कमावलेली संगीत विद्या आता त्यांना चरितार्थासाठी राबवावी लागली. परंतु या स्थितप्रज्ञ महर्षीने हेही कार्य अखेरपर्यंत तितक्याच मनोभावे व प्रसन्नपणे केले. दैववशात् आलेल्या परिस्थितीबाबत त्यांच्या तोंडून वैफल्याचा एक शब्दही मी कधीच ऐकला नाही. याचे मुख्य कारण हे होते की, त्यांची परमेश्वरावरील अढळ निष्ठा आणि त्यांची थोर चारित्र्यसंपन्नता हे होय. पूजा—अर्चा—श्रीगुरुचरित्र व ध्यानधारणा हा त्यांचा कधीही न चुकणारा दिनचर्येचा अत्यंत महत्त्वाचा भाग होता. हे सर्व आन्हिक ते मोठ्या निष्ठेने पार पाडीत. 'गॉड ईज ग्रेट' हे विठ्ठलरावजींच्या जीवनाचे सूत्र वाक्य होते. त्यांच्या एरव्हीच्या बोलण्यातून किंवा पत्रांतून हे वाक्य नाही असे सहसा कधीही घडले नाही. परमेश्वर आणि संगीत या दोन त्यांच्या जीवननिष्ठा होत्या. या निष्ठांमुळेच ते अशाही परिस्थितीत पूर्ण समाधानी होते.

विठ्ठलरावजींची सांगीतिक दैवते मुख्यत. दोन होती. गुरु खांसाहेब अबदुलकरीमखां हे एक दैवत आणि तितकेच किंवा त्याहूनही कदाचित् अधिक प्रभावी दैवत म्हणजे बालगंधर्व हे होय. बालगंधर्वांच्या नुसत्या स्मरणानेसुद्धा त्यांच्या अश्रूधारा सुरू होत. ही भक्ती नुसतीच व्यक्तिगत नव्हती. या दोन्ही युगप्रवर्तक कलाकारांच्या श्रेष्ठ कलेवरच तो भक्तिभाव मुख्यतः होता. विठ्ठलरावजींनी या दोन्ही कलाकारांची कला स्वतःच्या अप्रतिम हार्मोनियमवादनात आणण्याचा जास्तीत जास्त प्रयत्न जीवनभर केला. विठ्ठलरावजींच्या कलात्मक यशाचे हेच मुख्य सूत्र होते.

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

माझ्या लहानपणी मी कोल्हापुरास बरीच वर्षे रहात होतो. कै. गोविंदराव टेंबे यांचे अविस्मरणीय हार्मोनियम वादन मला सतत ऐकायला मिळत असे. माझ्या मनीमानसी गोविंदराव टेंबे आणि हार्मोनियम यांचे समीकरण पक्के झालेले होते. अशाच वेळी मी करवीरच्या राजरस्त्याने एकदा चाललो असताना एका घरातून वसंत रागाची हार्मोनियमची एक अप्रतिम ध्वनिमुद्रिका वाजत असलेली ऐकू आली. मी तसाच रस्त्यावर थबकलो. वसंतनंतर 'दिलरुबा हा या जिवाचा' ही ध्वनिमुद्रिका सुरू झाली. या ध्वनिमुद्रिका ऐकून मी बेभान झालो होतो. या ध्वनिमुद्रिका मी अशाच पद्धतीने सतत ऐकत होतो. या ध्वनिमुद्रिका टेंब्यांच्या नाहीत हे माझ्या लक्षात आलेले होते, परंतु कोणाच्या आहेत हे मात्र समजेना. अखेर चौकशीअंती मला या नावाचा पत्ता लागला. त्या ध्वनिमुद्रिका श्री. विठ्ठलराव कोरगावकर या नावाच्या एका वादनकाराच्या आहेत इतकेच समजले. 'हिज मास्टर्स व्हॉईस' या कंपनीने विठ्ठलरावजींच्या या नऊ रेकॉर्डस् घेतलेल्या होत्या. त्या सर्वच अतिशय लोकप्रिय झालेल्या होत्या. त्या रेकॉर्डस् ऐकून विठ्ठलरावजींच्या वादनावर माझी भक्ती बसली होती. विठ्ठलरावांना प्रत्यक्ष ऐकण्याची माझी इच्छा सतत वाढू लागली, परंतु ती पुरी होण्यास मध्यंतरी पाच-सहा वर्षे गेली. मी कोल्हापूर सोडून मुंबईस रहावयास आलो. मुंबईच्या सर कावसजी जहांगीर हॉलमध्ये तीन दिवसांची संगीत परिषद होती. अध्यक्ष होते धरमपूरचे महाराज आणि उपाध्यक्ष होते अल्लादिया खाँसाहेब! परिषदेच्या दुसऱ्या दिवशीच्या सकाळच्या कार्यक्रमात विठ्ठलरावजींच्या हार्मोनियमवादनाचा कार्यक्रम होता. विठ्ठलरावजींनी तोडीचा विलंबित ख्याल प्रथम वाजविला-अतिशय जमून वाजविला. ते पेटीवादन नव्हतेच. हार्मोनियमच्या माध्यमाने अबदुलकरीमखांसाहेबाचे त्यांनी ते गाणेच ऐकविले होते. तोडीनंतर 'सत्य वदे वचनाला नाथा' हे नाट्यगीत बालगंधर्वांच्या संपूर्ण ढंगानेच ऐकविले. रसिकांच्या आग्रहास्तव त्यांनी आणखी एक गंधर्वगीत वाजवून शेवटी भैरवीं वाजवून कार्यक्रम समाप्त केला. यानंतर मी विठ्ठलरावजींचे पेटीवादन कितीतरी वेळा ऐकले, परंतु त्यांच्या या पहिल्या कार्यक्रमाची विस्मृती केव्हाच होत नाहीं!

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

कोणत्याही कलेच्या प्रांतात कलासाधकाला काही मूलभूत देणग्या असाव्या लागतात. या देणगीवर आपल्या कठोर साधनेने त्याने यश मिळवावयाचे असते. विठ्ठलरावजींचा हार्मोनियमचा मूळचा हातच अतिशय उत्तम होता. मुलायम, गोड व स्वच्छ हाताच्या मूळच्या दैवी देणगीवर त्यांनी आपल्या अचाट मेहनतीने पैलू पाडण्याचे काम सातत्याने केले. कोणाही कलावंताची कला त्याच्या स्वभावानुसारच साकार होते असा कलाप्रांतांतील सर्वत्र अनुभव आहे. या नियमाला अनुसरूनच विठ्ठलरावांच्या कलेचे संपूर्ण स्वरूप होते. त्यांच्या वादनातील शिस्त, संयम आणि लालित्य या गोष्टी प्रामुख्याने नजरेत भरत. वादनांतील हीन अभिरुचीच्या वादनप्रकाराला त्यांनी सदैव दूर ठेवले. त्यांच्या वादनाचा म्हणून एक खास दर्जा होता. तो दर्जा त्यांनी सतत सांभाळला. त्यांचा स्वतःचा असा ढंग त्यांनी तयार केला. आलापअंगात किराणा गायकीचा सुरेलपणा, क्रम, संयम आणि स्वरविस्तारातील अतूटपणा यावर त्यांचा मुख्य कटाक्ष असे. विठ्ठलरावजी स्वतः अतिशय सुरीले होते, त्यामुळे त्यांना वाद्याचा बेसुरेपणा अथवा कणसुरेपणा मुळीच खपत नसे. ते स्वतः पेटीचे हवाफिटिंग आणि टच्यूनिंग ही कामे अप्रतिम करीत. त्यामुळे त्यांचे स्वतःचे वाद्यही अगदी सुरेल असे. त्यांना स्वतःला थोडीशी शंका आली तरी स्वतःचा कार्यक्रम चालू असतानासुद्धा ते ताबडतोब स्वर घासून टच्यूनिंग करण्याचे काम करीत. त्यामुळे त्यांच्या मैफलींत सुरेलपणाचे उत्कृष्ट वातावरण तयार होत असे. तान–पलटचांमध्ये जयपूर गायकीची स्वच्छता आणि वादनास शोभेल, रुचेल आणि पचेल इतकेच लयकारीचे काम, अशा कलात्मकतेने ते रागदारी पेश करीत. ठुमरी–नाटचगीत हे प्रकार वाजविताना त्या त्या प्रकारांना शोभून दिसतील अशाच खटक्या-मुरक्यांनी ते हे प्रकार नटवीत. विठ्ठलरावजींच्या वादनांतील नजरेत भरणारे आणखी एक वैशिष्टच असे होते की, त्यांचा नितांतरम्य कल्पनाविलास! रागदारी असो किंवा सुगमसंगीत असो कल्पनेचे एखादे सूत्र घेऊन त्या नमुन्याने ते अचाट कल्पनाविलासाने असंख्य उत्तमोत्तम स्वरगुच्छ सादर करीत आणि अशा तऱ्हेने ते आपल्या कलात्मकतेचा भव्य बगीचा तयार करीत, याचे मुख्य कारण असे की, त्यांचा मुळचा पिंडच अभिजात रसिकाचा होता.

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

त्याचप्रमाणे ते अत्यंत बहुश्रुत होते. संगीत-श्रवण हा त्यांचा अखेरपर्यंतचा नुसताच आवडीचा नव्हे तर त्यांच्या मार्मिक व्यासंगाच्या गरजेचा भाग होता. हे संगीत-श्रवण ते मोठ्या आस्थेवाईकपणे करीत. 'आमच्या वेळी असं होतं हो ! आता काय राह्यलंय ?' हा बुजुर्गपणाचा जन्मसिद्ध कळकट हक्क बजावून स्वतःचे आणि इतरांचे जीवन नीरस करून सोडावयाचे, असला उपद्व्याप विठ्ठलरावांनी कधी चुकूनही केला नाही. माझ्या नुकत्याच भेटीच्या अगोदर डॉ. वसंतराव देशपांडे यांच्या गाण्याचा बेळगाव येथे कार्यक्रम झालेला होता. डॉ. वसंतराव यांचे गाणे विठ्ठलरावांना फारच आवडले. ते त्या गाण्यावर निहायत खूष होते. बोलता बोलता क्षणापूर्वीच त्यांनी पाच तपांपूर्वी अल्लाघरी गेलेल्या, भूगंधर्व रहिमतखाँसाहेबांची जितकी दिलखुलास तारीफ केली, तितक्याच प्रेमभरे डॉ. वसंतरावांच्या गाण्याचीही त्यांनी वाखाणणी केली ! त्यांच्या थोर रसिकतेचीच ही सुस्पष्ट साक्ष आहे. रसिकतेप्रमाणेच तन्मयता, एकाग्रता हे दुर्मिळ गुण त्यांच्या अंगी मोठ्या प्रमाणावर होते. आपल्या कामाच्या पाट्या टाकणारे कलाकार-मजूर सर्वत्र दिसतात, परंतु आपल्या कलाविष्कारात खऱ्या अर्थाने एकाग्र होणारे कलाकार क्वचित्‌च दिसून येतील. कोणत्याही विषयात एकाग्र होऊ शकणारेच खरे यश मिळवू शकतात. पेटीवर हात ठेवताक्षणीच विठ्ठलराव कमालीचे एकाग्र होत. त्यांच्या हाताला मुरकी हा प्रकार अतिशयच उत्तम असा लागलेला होता. ललित प्रकारांत खटका-मुरकी यांचा वापर ते अतिशय कौशल्याने करीत. त्यांच्या सर्व कलात्मक दृष्टीमुळे त्यांचे सारे पेटी-वादन हा श्रेष्ठ आणि सुसंस्कृत कलेचा महान् आदर्शच ठरत असे. हार्मोनियम हे वाद्य वस्तुतः तुटक वाजणारे आहे, परंतु हवेचा कमीअधिक दाब ठेवणे आणि बोटांचा योग्य असा वापर करणे यांच्याद्वारे ते मींडचा उत्तम आभास निर्माण करीत. याच कौशल्याने ते गमकाचाही आभास निर्माण करीत. हार्मोनियम किंवा कोणत्याही स्वरवाद्य-वादनात 'उच्चारण' हा अत्यंत महत्त्वाचा भाग असतो. विशेषतः नाट्यगीते, ठुमरी अशा प्रकारांत 'उच्चारण' उत्कृष्ट असावे लागते. वाद्यांतून गीताचे शब्द स्वच्छ ऐकू येण्याइतका आभास निर्माण व्हावा लागतो. अर्थात् ही किमया फारच मोजक्या कलाकारांना साधते. विठ्ठलरावांच्या वादनात हा गुण

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

प्रकर्षाने दिसून येत असे. सामान्य हार्मोनियमवादनकाराचे पेटींवादन अर्धा-पाऊण तासाच्यापुढे कंटाळवाणे होऊ लागते, परंतु विठ्ठलरावजींच्या चारचार-पाचपाच तासांच्या मैफली मी स्वत: किती तरी वेळा ऐकलेल्या आहेत आणि त्याही अखेरपर्यंत वाढत्या रंगतीच्या! ते स्वत: संगीत कलेत रंगलेले आणि रमलेले होते. कर्माला लागले म्हणून काही तरी नाइलाजाने करीत सुटावयाचे ही त्यांची भूमिका नव्हती. आणि त्यांचे सारे सांगीतिक यश त्यांच्या याच धारणेत होते. त्यांच्या निधनापूर्वी केवळ सहाच महिने त्यांना भेटण्यासाठी मी बेळगावास गेलो होतो. त्याही परिस्थितीत त्यांनी पेटी ऐकविली. जीवनाच्या अखेरीपर्यंत रोजचा निदान दोन तासांचा त्यांचा रियाज कधीच चुकला नाही!

विठ्ठलरावजींच्या पेटीवादनाच्या असंख्य मैफली झाल्या. कै. सवाई गंधर्वांच्या एकसष्टीनिमित्त पुण्यास तीन दिवसांचा समारोह झाला. त्यात विठ्ठलरावजींच्या पेटीवादनाचा कार्यक्रम होता. विठ्ठलरावजी वाजवायला बसले. श्रोत्यांत समोरच बालगंधर्व बसले होते. विठ्ठल-रावजींनी 'सत्य वदे वचनाला' हे पद विलक्षण तरकीबीने वाजविले. असंख्य सुंदर-सुंदर जागांचा त्यांनी अगदी पाऊस पाडला. बालगंधर्व आणि विठ्ठलरावजी या दोघांच्याही डोळ्यांतून अश्रूधारा वाहू लागल्या. समारोहातील तज्ज्ञ व सामान्य श्रोते या दोघांच्याही दृष्टीने सर्वोत्तम ठरलेला कार्यक्रम हाच होता!

पेटीवादनावेळचे विठ्ठलरावांचे सुप्रतिष्ठित आणि सोज्वळ दर्शन हाही एक रम्य भाग होता. नाकी-डोळी सुंदर, गौरवर्ण, सुसंस्कृत पेहराव, शिष्टसंमत-सभ्य पेहराव, वादनाच्या वेळचे कलात्मक नाटयपूर्ण हावभाव या सर्वांचाच योग्य तो परिणाम त्यांच्या मैफलीमध्ये जरूर होत असे.

विठ्ठलरावजी स्वत: खाण्याचे फार षौकी होते. ते आपल्या विद्यार्थ्यांना नेहमी सांगत— थोडं खा परंतु उत्तम खा आणि थोडंच वाजवा परंतु उत्तम वाजवा!

विठ्ठलरावांची शिष्यशाखा फार मोठी आहे. त्यांचे अनेक शिष्य बेळगाव, मुंबई, पुणे अशा शहरांतून उत्तम गायक—वादक आणि शिक्षक

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

म्हणून संगीत क्षेत्रात आज उत्तम कार्य करीत आहेत. त्यांची संख्याही फार मोठी आहे.

विठ्ठलरावजी फार मोठे दत्तभक्त होते. त्यांचे सारे जीवनच ऋषिमुनीसारखे होते. ते सर्वांवर प्रेम करीत. कोणाचा राग नाही—द्वेष नाही, कोणाची निंदा-नालस्ती नाही. ग्राम्य विनोद-गप्पा असले संस्कार त्यांच्या गावीही नव्हते. आगत-स्वागत या गोष्टी मी त्यांच्याइतक्या निष्ठेने, दक्षतेने आणि अंतरीच्या प्रेमाने करणारी अन्य व्यक्ती क्वचित्‌च पाहिली असेल. त्यांच्याकडे जाणारी कोणीही व्यक्ती चहा-पाणी आणि खाणे झाल्याशिवाय बाहेर पडू शकत नसे. विशेष असे की, आजच्या महर्गतेच्या काळातसुद्धा त्यांच्या या व्रताचा केव्हाही भंग झालेला नव्हता ! साखरेचे खाणार त्याला देव देणार !

विठ्ठलरावजींच्या सुदीर्घ जीवनात त्यांच्या अंगच्या कला-सौजन्यादी गुणांमुळे त्यांनी शिष्यांप्रमाणेच समाजातील मोठमोठ्या सुप्रतिष्ठित, नामवंत अशा अनेक व्यक्तींचे प्रेम संपादिले होते. बृहन् मुंबई महापालिकेचे आयुक्त मान्यवर म. वा देसाई हे विठ्ठलरावांचे एक उत्तम शिष्य असून त्यांनी गुरुवर्यांना मोठ्या सेवाभावाने अगदी अखेरपर्यंत सर्वप्रकारचे सहाय्य केले. सुप्रसिद्ध डॉ. व्ही. एन. शिरोडकर, डॉ. गिंडे आणि डॉ. पाटकर या सर्वांनी विठ्ठलरावांना अखेरपर्यंत सदैव आपलेच मानले. स्वतः विठ्ठलरावजीही हा ऋणनिर्देश अतिशय कृतज्ञभावाने वरचेवर करीत.

विठ्ठलरावजींचे एकूण संपूर्ण जीवनच सुख-दुःखांच्या धाग्यांनी विणलेले होते. अभिमान वाटावा असे त्यांचे कित्येक गौरव झाले. अल्लादियाखांसाहेबांसारख्या गानसम्राटाने सुवर्णपदक देऊन विठ्ठलरावांच्या वादन कलेचा बहुमान केला. गानमहर्षी बाळकृष्णबुवा इचलकरंजीकर यांच्यासारख्या श्रेष्ठाने त्यांच्या वादन कलेचा गौरव केला. १९७० साली म्हैसूर अकादमीने अवॉर्ड देऊन त्यांचा बहुमान केला. १९५७ साली म. वा. देसाईसाहेब यांनी बेळगाव येथे गुरुदेवांचा भव्य सत्कार केला. गोमंतक-कला-अकादमीने १९७४ साली बेळगाव येथे मुद्दाम जाऊन सुमारे दोन तासांचे त्यांचे ध्वनिमुद्रण (टेप--रेकॉर्डिंग)

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

करून घेतलेले आहे. हा उभयतांचा गौरव आहे. कारण दुर्दैवाने विठ्ठलरावजींचे हेच अखेरचे रेकॉर्डिंग ठरले. म्हैसूर अकादमीने विठ्ठलरावजींना नुकतेच पेन्शन सुरू केले होते, परंतु त्यांतील पहिल्या महिन्याचे पेन्शन त्यांच्या निधनापूर्वी फक्त तीनच दिवस त्यांच्या हाती पडले.

विठ्ठलरावजींचे शेवटचे एक पदवीधर शिष्योत्तम श्री. वसंतराव शेवडे यांनी अखेरची काही वर्षे आदर्श अशी गुरुसेवा केली. या सेवेला तोड नाही. श्रीसमर्थ आणि कल्याणस्वामींची उपमा उणी समजावी अशी सेवा श्री. शेवडे यांनी केली. शेवडे कुटुंब गुरुवर्यांच्या सेवेत मग्न होते. गुरुवर्यांनी वसंतराव यांना हार्मोनियमची अतिउत्तम तालीम देऊन आपल्या वादनविद्येचा श्रेष्ठ वारसा मागे ठेवलेला आहे.

भारतीय कीर्तीच्या या हार्मोनियमवादनमहर्षींचे दि. ३१ डिसेंबर १९७४ रोजी बेळगाव येथे वयाच्या ९१ व्या वर्षी दुःखद निधन झाले. गुरुस्थानी आणि पितृस्थानी असलेला माझा स्वतःचा आधार नाहीसा झाला ! विठ्ठलरावजी अकाली गेले असे नाही. त्यांना सुदीर्घ आयुष्य लाभले. ते अखेरपर्यंत संगीतसेवेत राहू शकले. परंतु खरे दुःख होते ते 'असे अजोड पेटीवादन आता पुन्हा ऐकायला मिळणार नाही' या स्वार्थापोटी !

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri



रामकृष्ण पर्वतकर

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri



एक सुसंस्कृत तबलावादक आणि गायक
कै. रामकृष्ण पर्वतकर

मानवी जीवनाचे क्षणभंगुरत्व हे नियतीचे एक महान् उद्‌बोधन आहे. हे क्षणभंगुरत्व क्षणमात्र विसरून वर्तमान-कालचे सारे क्रियाकर्मांतर हातून घडत रहावे, हे त्या नियतीचे मानवाला लाभलेले थोर वरदानच आहे. आपण अमर आहोत, असे समजून चालणे, नित्याचे व्यवहार करीत रहाणे, हेच त्या यक्षप्रश्नाचे उत्तर आहे हा यक्ष प्रश्न अनादिकालापासून तसाच चालत आला आहे आणि जगाच्या अंतापर्यंत तो तसाच चालत रहाणार आहे. जीवनाचे हे कोडे सोडविलेले काही संत-महंत सोडल्यास सामान्य मनुष्य या कोडयातच सदैव अडकलेला असतो. जीवन जगून पहाण्यानेच जीवन समजू लागते, असे विचारवंत म्हणतात तेच शेवटी खरे ! जीवन हे काय आहे, त्यात मानवाची सत्ता किती, त्याची फलद्रुप होणारी योजकता किती आणि या योजनेला तडा जाण्याचे प्रसंग कोणते, अशा काही कूट प्रश्नांचा विचार डोक्यात जोराने थैमान घालू लागावा, असे काही प्रसंग माझ्याही जीवनात आले. त्यांतलीच ही एक शोकपूर्ण कहाणी !

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

लयभास्कर खाप्रूमाम पर्वतकर यांचे ज्येष्ठ चिरंजीव श्री. रामकृष्णबुवा पर्वतकर हे माझे पुण्यातील अगदी निकटचे स्नेही होते. १९४१ पासूनचा त्यांचा-माझा स्नेहसंबंध सुमारे दहा वर्षपर्यंत एकसारखा दृढ होत गेला. त्यांची–माझी भेट झाली नाही–मैफल झाली नाही, असा सहसा एकही दिवस जात नसे. आमची एकमेकांची सुखदु:खेही आम्ही एकमेकांना अगदी मोकळेपणाने सांगत असू. १९५१ च्या सुमारास सुप्रसिद्ध गायनाचार्य पं.ओंकारनाथजी ठाकूर यांच्या आग्रहाच्या निमंत्रणावरून पुणे सोडून ते बनारस येथील 'बनारस हिंदू युनिव्हर्सिटीत' संगीताचे प्राध्यापक म्हणून नोकरीस राहिले. रामकृष्णबुवांचे जीवन लौकिकदृष्टचा उंचावते आहे, त्यांची सतत प्रगती होत आहे आणि प्रापंचिक दृष्टीनेही त्यांना सर्वतोपरी स्थैर्य लाभते आहे, याचा मला आणि त्यांच्या अन्य सर्व चाहत्यांना मनस्वी आनंद वाटत असे ! अशाच एका प्रसंगी रामकृष्णबुवांचे मला एक पत्र आले––

"प्रिय श्री. मारुलकर यांसी––

श्रीदत्त महाराजांचे कृपेने इकडील सर्व उत्तम आहे. तुमची मला एकसारखी आठवण होते. कारण असे की, माझ्या पूज्य वडिलांनी लयकारीतील जी काही विशेष विकट अशी विद्या मला दिलेली आहे, तिचा प्रकाश माझ्या डोक्यात त्यांच्याच आशीर्वादाने दिवसेंदिवस अधिक प्रमाणात पडू लागला आहे. याचा आनंद मला किती होतो ते सांगता येणार नाही. गेल्या वर्षांत आणखी नवीन नवीन गोष्टी साध्य झालेल्या आहेत. त्या आपल्यासारख्या पुण्याच्या मार्मिक रसिकापुढे केव्हा मांडीन अशी एकसारखी तळमळ लागून राहिलेली आहे ... आपल्याला कळवायला मला फार आनंद वाटतो की, आमच्या युनिव्हर्सिटीने मला नुकतेच कायम केले आहे व माझे अधिकारी मला वरची अधिकाराची जागा मिळवून देण्याची खटपट करीत आहेत व हे काम लवकरच होईल असे दिसते ! ... सर्व परिस्थितीमुळे मला आजपर्यंत स्वास्थ्य लाभले नाही. येथून पुढे मला चांगले स्वास्थ्य लाभल्यास माझ्या हातून माझ्या विद्येची सेवा चांगल्या प्रकारे होत जाईल, याचाच मला फार आनंद होतो...येत्या मे महिन्याच्या सुट्टीत आपणा सर्वांना भेटण्यासाठी मुद्दाम येणार आहे, त्या वेळीं लयीच्या निरनिराळ्या

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

साध्य झालेल्या गोष्टी आपल्याला ऐकवीनच. आपल्यालाही त्याचा फार आनंद होईल!"...

आपला,
रामकृष्ण पर्वतकर (बनारस)

रामकृष्णबुवांच्या या पत्राचा मला त्रिविध कारणांनी मनस्वी आनंद झालेला होता. संगीत कलेची साधना करणाऱ्या माझ्या एका जिव्हाळ्याच्या स्नेह्याच्या प्रगतीचे निदर्शक असे ते पत्र होते, हे पहिले कारण. दुसरे कारण हे की, हे तळमळीचे पत्र मलाच पाठवावे अशी त्यांना जी प्रेरणा झाली ती त्यांची मजबद्दलची आपुलकी मला मनोमन सुखवीत होती. शिवाय, त्यांनी आपल्या पत्रात नकळत का होईना परंतु माझा पुण्यातील एक "मार्मिक रसिक" म्हणून अनपेक्षितपणे गौरव केला होता, हे तिसरे कारण. काही असो. मला मात्र फारच आनंद झालेला होता, ही गोष्ट अगदी खरी. या आनंदाच्या भरात मी त्यांना सविस्तर पत्र पाठवून बनारस हिंदू युनिव्हर्सिटीतील नोकरीत ते कायम झाल्याबद्दल त्यांचे मनःपूर्वक अभिनंदन केले आणि तेथे त्यांना वरची जागा लवकरच मिळावी, या इच्छेने शुभचिंतनही करण्यास विसरलो नाही!

...परंतु विधिघटना विलक्षण होती— अगम्य होती. जीविताची अशाश्वतता कशी असते याचे क्रूरदर्शन घडविणारी ती अखेर ठरली! रामकृष्णबुवांना माझे पत्र मिळण्याचा योग त्या विधिघटनेत नव्हता. रामकृष्णबुवांनी मला ज्या दिवशी पत्र लिहिले होते, त्यानंतर फक्त चारच दिवसांनी दि. १४ फेब्रुवारी १९५९ रोजी रात्री अकरा वाजता त्यांच्या ज्येष्ठ कन्येची "रामकृष्णबुवांचे दुःखद निधन झाल्याची" हृदय विदीर्ण करणारी तार मला आली! ...माझे डोके अक्षरशः सुन्न झाले. डोक्यात अनंत विचार थैमान घालू लागले. माझी ही परिस्थिती पुढे कितीतरी दिवस कायम होती. मात्र ज्या नियतीने हे सारे घडविले त्याच नियतीने मानवाला विस्मृतीची जी दिव्य देणगी दिलेली आहे, त्या देणगीमुळेच मी हळूहळू पूर्वपदावर येत चाललो!

रामकृष्णबुवांचे सारे जीवनच एक प्रकारच्या धकाधकीत गेले. जीवनातील सर्व प्रकारची अस्थिरता हा त्यांच्या एकूण

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

जीवनाचा स्थायीभावच झालेला होता. त्यामुळे त्यांच्या उण्यापुऱ्या एक्कावन वर्षांच्या इहलोकच्या प्रवासात त्यांना स्वास्थ्य असे केव्हाच लाभले नाही. परंतु अशाही बिकट जीवनात या स्थितप्रज्ञ पुरुषाने कलात्मक यश मोठ्या प्रमाणात मिळविले आणि तेही सदैव प्रसन्न वदनाने. परिस्थितीच्या कडवटपणाचा राग अन्य कुठे काढून स्वतःचे समाधान करून घ्यावे ही असुरी वृत्ती त्यांना कधीही स्पर्श करू शकली नाही. हा मनुष्य जीवनात कलाकार झाला नसता तर मोठा संत झाला असता !

संगीत कलेच्या दिव्य साधनेसाठी अनेक गोमंतकीय साधकांनी मुंबईचा आश्रय आजपर्यंत घेतलेला आहे. त्याप्रमाणे रामकृष्णबुवाही आपली मायभूमी सोडून बालवयातच मुंबईस गेले. त्यांची मुख्यतः तालविद्या ही त्यांच्या घरचीच– रक्तातील विद्या होती. मुंबईस त्यांनी गायनाचाही अभ्यास सुरू केला. ते रंगाने कृष्णवर्णच, परंतु नाका-डोळयाने तरतरीत आणि उंची वरीच कमी, अशी त्यांची शारीरिक ठेवण होती. त्या काळाला आणि परिस्थितीला अनुसरून ते गंधर्व नाटक मंडळीत दाखल झाले. त्यांच्यावर नटसम्राटांचे अतिशय प्रेम होते. बालगंधर्वांच्या गानाभिनयादी दिव्यगुणसंपदेवर रामकृष्णबुवा निहायत खूष झाले. बालगंधर्वांची श्रेष्ठ कला रामकृष्णबुवांचे भक्तिस्थान ठरले. बालगंधर्वांच्या कलेतील अनेक स्थळे मधुकरवृत्तीचा हा बाल कलाकार अभ्यासू लागला. शारदेसारख्या भूमिका तो चांगल्या तऱ्हेने वठवू लागला. कालांतराने आवाज फुटल्यानंतर त्यांनीं गंधर्व कंपनीस रामराम ठोकला. हा त्यांचा काळ अतिशय ओढाताणीचा गेला. हैदराबादचे विद्वान् आणि जिद्दीचे गायक मरहूम उस्ताद बशीरखाँ यांच्याजवळ त्यांनी काही काळ गाण्याची तालीम घेतली. श्री. रत्नकांतजी रामनाथकर यांचेकडूनही त्यांनी अनेक रागा-चिजांची तालीम घेतली. तबल्यातील बोलभरणाही अनेक विद्वान् तबलियांकडून त्यांनी आत्मसात् केला.

अशाच काही प्रसंगाने योगायोगाने ते पुण्यास आले. त्यांच्या विद्या-व्यासंगाच्या वृत्तीने त्यांना स्वस्थ बसू दिलें नाही. तेथे त्यांनी " शिवाजी मराठा हायस्कूल "मध्ये नाव दाखल केले. याच हायस्कूलमध्ये

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

ते मॅट्रिक पास झाले आणि तेथे संगीत शिक्षक म्हणून त्यांची नेमणूक झाली. पुण्यात त्यांचे बस्तान उत्तम बसले. त्यांचा चाहता वर्ग पुण्यात मोठ्या संख्येने तयार होऊ लागला. १९३८ मध्ये त्यांनी "शारदा-संगीत विद्यालय" या नावाची स्वतःची संस्था सुरू केली. या संस्थेने अगदी अल्पावधीतच उत्तम नावलौकिक मिळविला. त्यांचे अनेक विद्यार्थी गायन-वादन कलेत तयार होऊ लागले. रामकृष्णबुवा बनारस येथे स्थायिक होईपर्यंत या विद्यालयाने संगीताचे भरीव कार्य केले. पुण्यातील कै. मधुकर तिसगावकर या त्यांच्या शिष्याने रामकृष्णबुवांच्या नाव-लौकिकात मोठीच भर घातली. शिवाय गायिका श्रीमती मेनकाबाई शेलडेकर, केशवराव नावेलकर, केळकर वकील, बारामतीचे निलाखे, दौंडचे विनायकराव थोरात इत्यादी तबलावादक शिष्य आज संगीत क्षेत्रात उत्तम कार्य करीत आहेत. अनंतराव फाटक हे व्हायोलिनवादनपटू रामकृष्णबुवांचेच शिष्य असून या क्षेत्रात अधिकारी व्यक्ती म्हणून ते उत्तम कार्य करीत आहेत. रामकृष्णबुवांचे धाकटे बंधू श्री. सूर्यकांत पर्वतकर हेही एक चांगले तबलावादनकार असून मुंबईच्या "भारतीय विद्या भवन" या नामांकित संस्थेमध्ये ते नोकरीस आहेत. रामकृष्णबुवा ह्यांच्या कन्या श्रीमती वनमाला पर्वतकर ह्या पदवीधर असून 'बनारस हिंदू युनिव्हर्सिटीत' संगीताच्या प्राध्यापिका आहेत. त्या संगीताचे कार्य उत्तम तऱ्हेने करीत आहेत. बुवांच्या कन्या सौ. शोभा अब्दगिरी ह्या सतार वाजवितात. चि. रवी हा महाविद्या-लयीन शिक्षण घेत आहे.

रामकृष्णबुवांच्या मी असंख्य मैफली ऐकल्या. या कलावंताच्या अंगी अनेक दुर्मिळ कलागुणांचे एकत्रीकरण झालेले होते. त्यांचे वादन व गायन या दोन्ही कला तितक्याच समर्थ होत्या. त्यांचा तबल्याचा हात जात्याच अतिशय हलका होता. वादनाच्या अगदी सुरवातीलासुद्धा अगदी भर तयारीचा तुकडा– मुखडा– परण वाजविण्याचा प्रसंग आलाच तर, तो अगदी कोठेही न अडता सफाईने सहजपणे वाजला जाई. ते अनेक ताल स्वतंत्रपणे वाजवीत. लयकारीचा खेळ हा तर त्यांच्या घरचाच विषय होता, परंतु इतर काही वादन प्रकार, कायदे व मुख्यतः वादनांतील

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

रसवत्ता आणि सौंदर्यदृष्टी असे गुणविशेष उस्ताद थिरकवा यांच्यासारख्यांच्या सहवासाने त्यांच्या वादनात उतरलेले होते. त्यांच्या वादनातील रंगतही अगदी उल्लेखनीय अशीच होती. त्यांची कित्येक अवघड कामे आपल्या रसिक श्रोत्यांना ते सुलभतेने समजावून सांगत. त्रिताल, झपताल, आडचा चौताल, सवारी असे ताल तर ते वाजवीतच, परंतु कित्येक अप्रसिद्ध, विषम आणि अवघड असे ताल ते मोठ्या रंगतीने वाजवीत. कऱ्हाडच्या एका मैफलीमध्ये त्रितालात पावणेसोळा मात्रांच्या एकसारख्या हिशेबाने पाऊण तासपर्यंत वादन त्यांनी केले. अगदी ठाय लयीपासून अतिद्रुत लयीपर्यंत त्यांचे वादन सारख्याच आत्मविश्वासाने होई. त्यांची बोटे बरीच आखूड होती, परंतु त्यांच्यात चापल्य मात्र विलक्षण होते.

मी स्वत: रामकृष्णबुवांच्या गायनावरही फार खूष होतो. त्यांचा आवाज जात्याच नाजुक प्रकृतीचा, गळी आणि थोडा बारीक असा होता. त्यांच्या गाण्याचा स्वरही बराच उंच म्हणजे पांढरी पाच असा असे. आवाज अतिशय निकोप व तितकाच पल्लेदार आणि लवचिक होता. अडीच-तीन सप्तकांचा संचार त्यांचा गळा सहज करी. गाण्यात रंगत असली पाहिजे आणि ती सतत राहिली पाहिजे, याकडे त्यांचे अगदी जागरुकतेने लक्ष असे. ख्याल, नाटयसंगीत, ठुमरी व वेळप्रसंगी भावगीत–भजन हे सर्व प्रकार ते प्रसन्नपणाने गात. त्यांनी संगीताचे शास्त्र परिश्रमाने मिळविले होते. त्यामुळे बांधेसूद अस्ताई-अंतरा, रागनियमांचे पालन अशा गोष्टी तर त्यांच्या गायकीत होत्याच, परंतु या मूलत: रसिक कलाकाराची वृत्ती अधिक तल्लीन होई ती सौंदर्यनिर्मितीवरचे ! त्यामुळे त्यांची सारी मैफलच शेवटी रसिकांच्या आदरास पात्र होई. रसिकांचा सूड घेण्याचे पाप त्यांच्या रसमयी कलेने केव्हाच केले नाही. त्यांच्या गायन कलेने वनारस विभागातील अनेक संगीत परिषदांमधून त्यांच्या तबलावादनापेक्षाही अधिक स्वागताचे स्थान पटकावले !

रामकृष्णबुवांच्या अंगातील आणखी एक महत्त्वाची कला म्हणजे त्यांची चित्रकला ही होय. ते सांगीतिक कलाकार झाले नसते तर उत्तम चित्रकार म्हणून त्यांचा नावलौकिक झाला असता. त्यांची अनेक चित्रे

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

मी पाहिलेलीं आहेत. ख्यातनाम चित्रकार श्री. हळदणकर यांनी मुंबई येथे भरविलेल्या चित्रकला-प्रदर्शनात रामकृष्णबुवांनी काढलेल्या अृषीच्या चित्राचा प्रथम क्रमांक आलेला होता. ही एकच गोष्ट त्यांच्या चित्रकलानैपुण्याची साक्ष पटविण्यास पुरेशी आहे.

रामकृष्णबुवा हे अतिशय सत्प्रवृत्त, पापभीरू आणि आचार-विचारांनी अंतर्बाह्य सुसंस्कृत असे होते. त्यांची दैवते तीन होती. श्रीदत्त महाराज, संगीत विद्या व गुरुजन—हीच ती दैवते होती. त्यांची भक्ती एकनिष्ठ होती. या भक्तिभावामुळे—श्रद्धेमुळे त्यांनी आपल्या जीवनात समाधान प्राप्त करून घेतले होते. त्यांच्या जीवनातील यशाचे प्रमाण वाढू लागलेले होते. त्यांच्या संगीतसेवेचा वृक्ष यापुढेच फुलेल—फळेल,. आणि माझ्यासारख्या त्यांच्या चाहत्यांना, मित्रांना क्षणभर आसरा मिळेल, अशा व्यवहारोचित वेडया आशेमध्ये आम्ही गुंग होतो. इतक्यातच यक्ष प्रश्नाचे निर्घृण उत्तर "मृत्यू न म्हणे हा कलाकार" या समर्थोक्ति आशयाच्या तारेने आम्हाला मिळाले...आणि मानवी जीवनाच्या न सुटणाऱ्या या कोडयाचे क्षणभंगुरतेचे आम्ही साश्रू नयनांनी पुनःश्च चिंतन सुरू केले!!!

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri



किमयागार व्हायोलिन वादनकार

कै. श्रीधर पार्सेकर

कै. वापूमामा दिंडे ही कोल्हापुरच्या दरवारी कलाकारांपैकी एक नमुनेदार असामी ! वयाच्या दृष्टीने गोविंदराव टेंबे आणि अल्लादियाखांसाहेब यांच्या मधोमध त्यांचे स्थान होते. ते मूळचे पट्टीचे चौघडा वादनकार. पुढें तवलावादनातही त्यांनी तसेच प्राविण्य मिळविले. मूळचे अतिशय लयकार असल्याने अल्लादियाखां, हैदरखां यांचे ते अत्यंत आवडते तवलासाथीदार झाले. एकोणीसाव्या शतकाच्या उत्तरार्धातील सर्व मोठे कलाकार त्यांनी पाहिले आणि ऐकले. सर्वांची साथसंगतही केली. अल्लादियाखांसाहेवांची कोल्हापूर येथील गाण्याची मेहनत त्यानी सतत ऐकली. गोखले घराण्याच्या मातवर कलाकारांच्या त्यांनी साथी केल्या. वालगंधर्व नुसतेच ' राजहंस ' होते. तेव्हापासून वापूमामा त्यांना जवळून पहात होते. गोविंदराव टेंबे हार्मोनियमवर ' सारेगम ' वाजविण्याचा प्रयत्न करीत असताना त्यांनी पाहिले. किर्लोस्करमधील निकामी होऊन वाहेर पडणारे भास्करबुवा वखले त्यांनी पाहिले. संगीताचा असा सारा इतिहास त्यांच्या नजरेसमोर घडताना त्यांनीं जवळून पाहिला. ते स्वतः जसे उत्तम लयकार तवलिये

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri



श्रीधर पार्सेकर

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

होते तसेच ते हार्मोनियम, दिलरूवा ही वाद्येही वाजवीत असत आणि या सर्वांपेक्षाही एक मर्मज्ञ, चोखंदळ आणि अभ्यासू रसिक म्हणून त्यांचे स्थान फारच श्रेष्ठ दर्जाचे होते. संगीतकलेचा विविधांगांनी त्यांनी विचार केलेला असल्याने मोठमोठ्या गायकांना वापूमामांचा विलक्षण वचक वाटे. कोणाही गायकाचे पाणी अगदी पहिल्या पाचच मिनिटांत ते पूर्णतः जोखीत. तसे पाहिले तर ते कोणालाही नावे ठेवीत नसत. कोल्हापुरात होणारी प्रत्येक लहान मोठी मैफल ते कधीही चुकवत नसत. मैफलीत त्यांची मान हालणे ही एक विशेष आश्चर्याची गोष्ट होती. कलावंताची कला जर काही विशेष तोलामोलाची असली तरच वापूमामांची मान हाले. एखाद्या कलाकाराच्या कलेने त्यांची नेहमीची ताठ मान जर हालवलीच तर मात्र ती " समस्तांची लज्जा त्यजुनि " त्या कलाकाराच्या चरणांवर जाऊन पडे. कारणपरत्वे वापूमामा एखादे वेळी चिडलेच तर भर मैफलीत त्या कलाकाराचे वारा वाजवीत! त्यालाही ते मुळीच भीत नसत. अशा वापूमामांचे समाधान करणे हे सामान्य कलाकाराच्या आटोक्यावाहेरचेच होई. कलाकारांवर भक्ती करावी वापूमामांनीच आणि विरोधही करावा वापूमामांनीच. दोन्हीही कार्ये अगदी मनापासून !

माझ्यावर वापूमामांचे विलक्षण प्रेम. संगीताच्या प्रत्येक कार्यक्रमास ते मला हाताला धरून घेऊन जात. त्या त्या कलाकाराच्या कलेतील वारकावे मला समजावून सांगत. वालगंधर्वांच्या गायकीतील मर्म त्यांनी त्या वेळी मला अनेकवार समजावून दिले. गोविंदरावजी टेंबे यांच्याही महान कलात्मकतेतील सौंदर्य स्थळे त्यांनी मला सतत समजाविली. माझ्या स्मरणाप्रमाणे अल्लादियाखांसाहेव, भास्करवुवा, वालगंधर्व आणि थिरकवाखांसाहेव इतकीच त्यांची मनोमय कला-दैवते होती.

मी कोल्हापूर सोडून मुंवई-पुणे येथील रहिवाशी झाल्यानंतर वापूमामांच्या सहवासास अंतरलो. अधूनमधून कोल्हापुरास गेल्यानंतर मात्र देवीच्या दर्शनाइतकाच अग्रहक्क वापूमामांच्या दर्शनास असे. अशाच एका वेळी मी बापूमामांच्या दर्शनास गेलो होतो. वापूमामा कमालीचे

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

खुषीत होते. त्यांनी मला पाहताच आपल्या जिव्हाळ्याच्या विषयावर बोलण्यास सुरुवात केली.

कोल्हापूरच्या सुप्रसिद्ध देवलक्लबमध्ये सुमारे महिन्यापूर्वीच श्रीधर पार्सेकर यांच्या व्हायोलिनवादनाचा कार्यक्रम झालेला होता. या अतिशय रंगलेल्या कार्यक्रमाने कोल्हापुरचे समस्त लहानथोर रसिक अक्षरशः वेडावले होते. ज्याच्या त्याच्या तोंडी चर्चेचा एकच विषय. आणि तो म्हणजे पार्सेकराचे असामान्य व्हायोलिनवादन हाच ! वापूमामा नेमका हाच विषय काढणार याची मला खात्री होतीच. शिवाय पार्सेकरांच्या वादनावावत त्यांचे काय मत आहे, हे जाणून घेण्याची मलाही उत्कंठा होतीच. इतक्यात वापूमामा बोलू लागले, "काय मारुलकर, तुम्ही महिन्यापूर्वी यायला पाहिजे होतं. काय सांगू तुम्हाला, पार्सेकरानं फिडल असं दावलंय ! मी आजपर्यंत उत्तम फिडल वाजवणारे पुष्कळ ऐकले आहेत, पण पार्सेकराची सर नाही. क्लवात त्यानं सहा तास वाजवलं पण वेळ कसा गेला हे समजलं नाही. त्यानं मल्हार तर असा दावलाय– आजपर्यंत मी पुष्कळ मोठमोठ्या गवय्यांचे मल्हार ऐकले, पण परवाचा पार्सेकरचा मल्हार म्हणजे काही औरच. असा मल्हार त्यानं दावलाय ... !"

पार्सेकरांच्या असामान्य कलात्मकतेने रसरसलेल्या व्हायोलिन वादनाचे कार्यक्रम मी या वेळेपर्यंत खूप ऐकले होते. त्यामुळे त्यांच्या वादनाविषयी माझे स्वतःचे असे मत केव्हाच पक्के झालेले होते. परंतु वापूमामा यांच्यासारख्या संगीताच्या खास सुवर्णयुगात भराऱ्या मारलेल्या एका थोर चिकित्सक कलाकाराचेही नेमके हेच मत व्हावे, हे पार्सेकरांच्या कलासिद्धीला लाभलेले सर्वांत महत्त्वाचे प्रशस्तिपत्र होते. वापूमामा हयात असेपर्यंत पार्सेकरांनी मल्हार कसा दावला, याचे ते रसपूर्ण विवेचन करीत. वादनकाराच्या वादनश्रेष्ठतेचे वर्णन वापूमामा "दावणे" या क्रियापदाने करीत. थिरकवांनी तवला दावला– गोविंदरावांनी पेटी दावली असा त्यांचा खास शब्दप्रयोग असे !

फार वर्षांपूर्वीची हकीकत आहे. मुंवई नभोवाणीवर सुप्रसिद्ध गायक पं. कागलकरबुवा हे पूरियाकल्याण गात होते. त्या काळी बुवा

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

ऐन तारुण्यात असल्याने भरतयारीने गात. त्यांचा पूरियाकल्याण खूप जमलेला होता. बुवांचे तान पलटे अतिशय द्रुत गतीने, जोरकस व तितकेच विकट असे येत. साथीस व्हायोलिन होते. हा वादनकार साथ अप्रतिम करीत होता. तानेतील एकही स्वर त्याच्या हातून सुटत नव्हता. इतकेच नव्हे तर बुवा मध्यंतरी जरा थांवले की, त्याच जातीचे आणखी चार सुंदर पलटे ऐकवून समेवर मोठ्या विश्वासाने तो येई. ती साथसंगत ऐकून मी थक्क झालो. त्या काळी मी स्वतःही व्हायोलिनची मेहनत करीत होतो. पूरियाकल्याणसारखा राग या वाद्यावर वाजविणे हे किती मुष्कील आहे याची मला पूर्ण कल्पना होती. त्यामुळे या वादनकाराचा दर्जा काय आहे याची मला मनोमनी साक्ष पटली. हा वादनकार कोण असावा, त्याचे नाव काय ? याची माहिती घेण्याचा मी कसून प्रयत्न करू लागलो. तेव्हा समजले की, पार्सेकर या नावाचे ते वादनकार असून ते मुंबई रेडिओकडे नुकतेच नोकरीला राहिले आहेत. यावेळी साथसंगत व रेडिओवरील त्यांच्या स्वतंत्र वादनाचे कार्यक्रम मात्र मी न चुकता सतत ऐकत असे. यानंतर जवळजवळ तीन वर्षांनी पार्सेकरांना प्रत्यक्ष पाहाण्याचा योग मुंबई रेडिओवरील ऑर्केस्ट्रयाच्या तालमीच्या निमित्ताने आला.

श्रीधर पार्सेकर यांचे संगीताचे शिक्षण त्यांचे मामा कै. परशुरामबुवा पार्सेकर यांचेकडे सुरुवातीस बरीच वर्षे झाले. परशुरामबुवांनी त्यांना हार्मोनियम, गायन, जलतरंग, व्हायोलिन, तवला, इत्यादींची तालीम व्यवस्थितपणे दिली आणि ही सर्वच वाद्ये श्रीधर पार्सेकर तयारीने वाजवीत. ते चांगले गातही असत. पुढील काळात त्यांनी व्हायोलिनवादनपटू व गायक पं. गजाननबुवा जोशी यांचेकडे व्हायोलिनचे शिक्षण घेतले. मरहूम खाँ. नथ्थनखाँ– (अत्रोली) यांचेकडे गाण्याची तालीम घेतली. रत्नकांतजी रामनाथकर यांचेकडूनही अनेक रागरागिण्यांची त्यांनी माहिती करून घेतली. मुंबई नभोवाणीवर पार्सेकरना रत्नकांतजींनीच नोकरीस ठेऊन घेतले होते.

श्रीधर पार्सेकर हे पिंडाचेच कलाकार होते. त्यांचा हा पिंडच इतका प्रखर होता की, त्याला ज्ञानज्योत लागणे हे निमित्तमात्रच

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

आवश्यक होते. या ज्योतीचा स्पर्श होताच त्यांची कला तेजोमय बनली. पार्सेकर हे मूलतः अतिशय मेहनती कलाकार. उत्तम व्हायोलिन वादनकार म्हणून त्यांचा सर्वत्र नावलौकिक झाल्यानंतरसुद्धा ते मुंबईच्या चमत्कारिक हवामानातही आठआठ-दहादहा तास मेहनत करीत वसत. त्यांना हाताची देणगीही उत्तम प्रकारची होती. त्यांच्याइतका कसदार व नखरेल हात मी आजवर ऐकलेला नाही. कल्पकता आणि रसिकता या दोन्ही गोष्टी निसर्गाने त्यांना अनंतहस्ते दिलेल्या होत्या. एकाग्रता आणि तन्मयता या दोन्ही गोष्टींचे त्यांना वरदान लाभलेले होते. कोणत्याही विषयात आणि विशेषतः कलेच्या प्रांतात एकाग्रता या गुणाचे अनन्यसाधारण असे स्थान असते. ही एकाग्रता साधणे हे मोजक्याच भाग्यवंतांच्या नशिबी असते. पार्सेकरांची व्हायोलिनची मैफल ऐकावयास मिळणे हा एक मोठाच भाग्ययोग होता. पार्सेकरांची काळी-सावळीच परंतु अतिशय आकर्षक मूर्ती सतत पहात रहावीशी वाटे. चेहऱ्यावर वालसदृश निरागस हास्य सदैव विलसत असे. त्यांना दुर्मुख-लेले किंवा एखाद्या शास्त्रज्ञासारखे गंभीर असे मी केव्हाच पाहिले नाही. त्यांचा सुप्रसन्न आणि हसतमुख चेहरा हे त्यांच्या मैफलीचे एक फारच मोठे सामर्थ्य होते. मैफलीत दोन तंबोऱ्यांमध्ये वसून त्यांनी व्हायोलिन-वर नुसत्या षड्जाच्या खेचीनेच मैफल वांधून ठेवावी अशी सिद्धी त्यांना प्राप्त झाली होती. त्यांच्या कसदार वादनाने हजारोंचे सभागृह नादब्रह्माने भरून जाई. रागांचा कायदा– नियम या सर्व आवश्यक गोष्टी त्यांच्या वादनामध्ये होत्याच, परंतु त्याहीपेक्षा पार्सेकरांचे चित्त अधिक प्रमाणात गुंतले जाई ते मुख्यतः सौंदर्यनिर्मितीकडे. वाजवता–वाजवता एखादी उत्तम जागा आली की, तिच्यातून अनेक नव–नवीन–उत्तमोत्तम कल्पनांचा ते पाऊस पाडीत. अशा वेळी वादनाचा कायदा झुगारून द्यावा लागला तरी ते त्याची चिंता करीत नसत. ख्याल–अस्ताई, ठुमरी, नाट्यगीते हे सर्व प्रकार त्यांच्या मैफलीत असत. नाट्य संगीतात तर त्यांची प्रतिभा सर्वांगांनी संचारे. पदांच्या साध्या साध्या ओळींतूनही त्यांची प्रतिभा एखाद्या कुशल जादूगाराप्रमाणे उत्तमोत्तम–सुंदर असे प्रकार निर्माण करी, त्याचे मोठे आश्चर्य वाटे. नवनवोन्मेषी कल्पनांचा ते फुलोरा फुलवीत. त्यांच्या सहा-सात तासांच्या

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

अशा कितीतरी मैफली मी ऐकलेल्या आहेत. आपल्या सर्वांगीण कला-सिद्धीने ते आपल्या सर्व प्रकारांच्या श्रोत्यांना अगदी बांधून ठेवीत असत. सुस्ती किंवा बेरंग हे शब्दच त्यांच्या मैफलीला ठाऊक नव्हते. कल्पनाविलासाप्रमाणे त्यांचा हातही मींड, गमक, खटका, मुरकी, विकट आणि तयारींचा तानपलटा या सर्व अलंकारांचा वापर अतिशय आत्मविश्वासाने व विनासायास करी. ते बहुधा प्रचारातील राग व नेहमी वाजवीत. शास्त्राचे अवडंबर त्यांच्या वादनात कधीच दिसले नाही. आपल्या श्रोत्यांना आणखी ऐकावयाचे आहे अशाच परिस्थितीत ते आपली मैफल बंद करीत. पाच-पाच, सहा-सहा तासांच्या नुसत्या वादनाच्या मैफली सतत यशस्वी करणे हे कला-प्रांतातील एक महान दिव्य आहे. असे कलाकार फारच क्वचित दिसून येतात. अशा अगदी थोड्या कलाकारांत माझ्या दृष्टीने पार्सेकरांचे स्थान फारच वरच्या श्रेणीचे आहे. मैफल यशस्वी करण्यास कलाकारास शिक्षण—मेहनत—प्रतिभा या गोष्टींची तर जरूरी असतेच, परंतु याशिवाय त्याच्या कलेस ईश्वरी प्रसाद लाभावा लागतो. असा प्रसाद लाभणे ही गोष्ट त्यांच्या हातातली नसून नशीबातच असावी लागते !

उस्ताद खाँ. बिसमिल्ला आणि उस्ताद बडे गुलामअलीखां ही त्यांची खास कलादैवते होती. खां. बिसमिल्ला हे तर पार्सेकरांचे पूजा-स्थानच होते. त्यांच्या सनईवादनावर पार्सेकरांची अपार भक्ती होती. स्वतःच्या व्हायोलिनवादनामध्ये बिसमिल्लाखांच्या असामान्य सनई-वादनाची किती तरी खास वैशिष्ट्ये पार्सेकरांनी मोठ्या रसिकतेने आणि कल्पकतेने सामील केलेली होती. पार्सेकरांच्या मैफलीचे ते एक खास वैशिष्ट्यच होते.

पार्सेकरांच्या कलात्मकतेचा थोडा बारकाईने विचार करता आणखी एक गोष्ट अगदी स्पष्टपणे दिसून येते ती अशी की, उस्ताद बिसमिल्लाखाँ यांच्या अतुल सनईवादनाने सनई या वाद्याला व वादन-कारांनाही मोठी प्रतिष्ठा लाभली. त्यांच्या वादनाच्या आदर्शाने आमचे पूर्वापारचे सनईवादनकार बहुसंख्येने सुधारले. नवीन वादनकार तयार होऊ लागले. त्यांच्या कलेने संगीत रसिकांच्या संख्येत प्रचंड भर घातली.

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

आजच्या परिभाषेत बोलावयाचे झाल्यास त्यांनी संगीत प्रचाराची–प्रसाराची महनीय कामगिरी केली. पार्सेकरांच्या हातूनही नेमके हेच कार्य घडलेले आहे. त्यांच्या मैफलीने अनेक सामान्यांना संगीताभिमुख केले. त्यांच्या वादनशैलीचे अनुकरण करणारे अनेक व्हायोलिन वादनकार त्यांनी अनाहूतपणे तयार केले, नवे वादनकार निर्माण केले. पार्सेकर सुदैवाने जगते–वाचते तर त्यांनी व्हायोलिन या वाद्यावर भारतीय शास्त्रीय संगीताचे रसपूर्ण व प्रभावी प्रात्यक्षिक करून दाखवून परदेशांमधूनही आमच्या संगीताचा थोर प्रचार केला असता ... परंतु आमचे आणि आमच्या संगीतकलेचे दुर्दैव !

पार्सेकरांची वादनकला संगीत क्षेत्रातील एक एक प्रांत आपल्या तेजस्वी पराक्रमाने काबीज करीत चालली होती. पं. रामकृष्णबुवा वझे हे तर पार्सेकरांचे कमालीचे चाहते. "पार्सेकर फिडल फारच उत्तम वाजवतो !" हे त्यांच्या तोंडचे वाक्य मी कितीतरी वेळा ऐकले. "पार्सेकर साथीला असला म्हणजे मला खूप गावसं वाटतं–माझी तब्येत जमते !" असे ते अनेकदा म्हणत. पार्सेकरांच्या साथीत बुवांचे तसे खूप जमलेले गाणे ऐकण्याचा मला सुयोग आला होता. त्या दिव्य कलाविष्काराचे वर्णन करणे हे लेखणीच्या कक्षेतील काम नाही.

पार्सेकर व त्यांची कला यशोमंदिराची एक एक पायरी चढू लागली होती. मुंबई नभोवाणीच्या सेवेतून ते मुक्त झाले. नाट्य, बोलपट यांचे ते संगीत-दिग्दर्शक बनले. त्यातही ते अत्यंत यशस्वी झाले. सुरवातीची पाच-सहा वर्षे त्यांनी आकाशवाणीत नोकरी केली. त्यानंतर नाट्यनिकेतनच्या काही नाटकांना त्यांनी चाली दिल्या. "कन्यादान", "माझे घर", "वहिनी", "रंभा" या नाटकांना त्यांनी चाली दिल्या. त्या ढंगदार चाली त्या वेळी विशेष लोकप्रिय झालेल्या होत्या. त्याचप्रमाणे "कुबेर" व "मर्दमराठा" या बोलपटांचे संगीत-दिग्‌दर्शनही पार्सेकरांनी केलेले होते. त्या वेळच्या त्यांच्या अनेक चाली गाजल्या. स्वतःच्या मैफलीतूनही त्या चाली ते वाजवीत. रसिकांनी त्यांचे आदरपूर्वक स्वागत केले. पार्सेकरांची आर्थिक बाजूही स्वतःच्या मालकीची मोटारगाडी ठेवण्या-

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

इतकी संपन्न झाली. त्यांच्या मैफलीही शहरोशहरी बहुसंख्येने होऊं लागल्या. संगीत महोत्सवांतून पार्सेकरांचे व्हायोलिनवादन हा एक आवश्यक कार्यक्रम ठरू लागला. हे सारे योग्य असेच चालले होते, परंतु नियतीची घटना काही निराळी होती, ती तितकीच क्रूर होती, डोळचांत आसवे उभी करणारी होती ! !

पार्सेकरांचा वाढता नावलौकिक व वाढते यश मी ऐकत होतो–पाहत होतो. मला अपूर्व आनंद होत होता. परंतु मधूनमधून त्यांची व्यसनासक्ती वाढत चालल्याने त्यांचे व्हायोलिनवादनही आजकाल काहीसे विघडू लागले आहे, असेही मला समजू लागले. एका श्रेष्ठ कलाकाराची ही अवनती ऐकून मला मनस्वी दुःख होई. अशाच एका वेळी नाटकाचे किंवा बोलपटाचे संगीत देण्यासाठी पार्सेकर यांचा पुण्यात टिळक रोडवरील " देसाई लॉज "मध्ये मुक्काम होता. त्यांची-माझी अधूनमधून भेट होई. पार्सेकरांचे वादन ऐकण्याचा योग अलीकडे वरेच दिवसांत आलेला नव्हता. ऐकण्याची इच्छा मात्र फारच होती. तेवढचात पुण्यातील एका श्रीमंत गृहस्थाकडे एका प्रसंगाने तो कार्यक्रम करण्याचे मी निश्चित केले आणि त्यानुसार मी पार्सेकरांना भेटण्यासाठी देसाई लॉजमध्ये गेलो. पार्सेकरांनी पैशाची काहीही अट न घालता कार्यक्रम एकदम मान्य केला. मला अतिशय आनंद झाला. त्या वेळी मी त्यांना मुद्दाम सांगितले, "हे पहा पार्सेकरजी, मला तुमचं व्हायोलिन ऐकण्याची तीव्र इच्छा झाली म्हणूनच मी हा कार्यक्रम ठरवला आहे. ऐकायला लोकही मोठमोठे बोलावले आहेत. पुण्यात अलीकडे तुमचा कार्यक्रम झालेला नाही. याचा विचार करून तुमचा कार्यक्रम फारच उत्तम झाला पाहिजे. तुमच्या नावाचा प्रश्न आहे !" पार्सेकर यावर हसून म्हणाले, "तुम्ही त्याची मुळीच काळजी करू नका, कार्यक्रम उत्तम होणारच !" इतके संभाषण झाल्यानंतर मी त्यांचा निरोप घेऊन जाता जाता त्यांना सांगितले, "कार्यक्रमाला बरोबर एक महिना अवकाश आहे, स्मरण देण्यासाठी मी मध्यंतरी एकदा येऊन जाईन." त्यावर पार्सेकर म्हणाले, "तुम्ही मुद्दाम येण्याची जरूरी नाही. माझ्या लक्षात राहील." असे सांगून आपल्या शिष्यास त्यांनी कार्यक्रमाची तारीख टिपून ठेवण्यास सांगितले आणि मी बाहेर पडलो.

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

पार्सेकरांचा कार्यक्रम ऐकावयास मिळणार या आनंदात मी होतो. त्याचबरोबर माझ्या कानांवर ज्या काही रोज नवीन नवीन बातम्या येत होत्या त्यामुळे कार्यक्रम कसा काय होईल, या विवंचनेत मी होतोच. अशा परिस्थितीत सुमारे पंधरा दिवस गेले. मी सहज टिळक रोडने चाललो होतो. पार्सेकर देसाई लॉजमधून खाली उतरले होते. डोक्यावरील लांब केसांचा भांग चापून चोपून व्यवस्थित पाडलेला, पांढरास्वच्छ कॉलरचा शर्ट, त्यावर सनप्रूफचा कोट, जरीच्या धोतराचा ऐटबाज काचा मारलेला,– अशा ऐटीत नेहमीच्या निर्व्याज, प्रसन्न हसतमुखाने रस्ता ओलांडून स्वतःच्या हिरव्या देखण्या मोटारीत वसून ते निघून गेले. माझ्या एका अत्यंत आवडत्या अशा सौजन्यमूर्ती कलाकाराचे ते वैभव पाहून माझ्या डोळ्यांत अभिमानाने आनंदाश्रू उभे राहिले ! "दृष्ट न लागो या वैभवाला" ही काव्यपंक्ती अनाहूतपणे मनाला स्पर्शून गेली.

पार्सेकरांच्या कार्यक्रमाचा दिवस एकदाचा उजाडला. त्यांना वाहनयोजनेची कल्पना देण्यासाठी सकाळी दहा वाजता मी देसाई लॉजमध्ये गेलो. माझा नमस्कार स्वीकारीत पार्सेकरांनी माझ्याकडे प्रश्नार्थक मुद्रेने पाहिले. मी त्यांना तावडतोव सांगितले, "आज रात्री नऊ वाजता मोटार घेऊन मी येतो. आपण सगळे मिळूनच जाऊ !" यावर त्यांनी एकदम चकित होऊन मला विचारले, "कार्यक्रम आजच आहे काय हो ?" मी "होय" म्हणताच त्यांनी आपल्या शिष्यवराला फर्मावले, "अरे, माझं फिडल कुठं आहे वघ !"... माळ्यावर पडलेले ते व्हायोलिन शिष्याने काढले. त्यावरची धूळ केरसुणीने झटकली आणि केसचे झाकण उघडले... ते दृश्य पाहून माझ्या काळजात चर्र झाले. या व्हायोलिनच्या तीन खुंटया, ब्रिज व बो कोठे नाहीशीच झालेली होती. शोधाशोध करूनही ती सापडेनात. हा सारा प्रकार पहात असतानाच माझ्या डोक्यात अनंत अशुभ कल्पनांनी थैमान घातले ! वाटले, शनिवारवाड्याचे सारे वैभवच जळून खाक झाले आहे, नुसत्या भिंतीच शिल्लक राहिल्या आहेत, नियतीने कुबेराच्या साऱ्या संपत्तीचे हरण करून त्याला फक्त आडनावाचाच कुबेर बनवला आहे, शत्रूला कंठस्नान घालणारी भवानी तलवार कांदे कापण्याच्या कामावर रुजू झाली ! ... एक ना

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

दोन... अनंत कल्पनांनी माझे डोके भणभणून गेले. नंतर त्यांनी कोणाचे तरी व्हायोलिन मागून आणले आणि त्या दिवशीचा कार्यक्रम कसावसा साजरा झाला.

पार्सेकर मुंबईत होते. त्यांच्याविषयी रोज नवीन नवीन घटना ऐकू येत होत्या त्या ऐकून मी मनस्वी बेचैन होत होतो. माझ्या डोळ्यांसमोरून "कलासंपन्न—वैभवसंपन्न पार्सेकर" केव्हाही जाऊ शकत नव्हते. त्यामुळे मी मुंबईस ज्या ज्या वेळी जाई त्या त्या वेळी त्यांना भेटण्याची इच्छा अनावर होई. त्यांना भेटण्याचा मी अनेकवार प्रयत्न केला. माहितगारांनी मला सांगितले की, पार्सेकर तुम्हाला सापडणार नाहीत. ते कुठंही जेवतात, कुठंही झोपतात आणि...!

आणि मी पुण्यास असताना एके दिवशी सकाळी दिनांक ११ सप्टेंबर १९६४ च्या वृत्तपत्रांतून "व्हायोलिनवादनपटू श्रीधर पार्सेकर यांचे शोचनीय निधन" हे अति शोकदायी वृत्त माझ्या वाचण्यात आले. "पार्सेकर तुम्हाला कुठंही सापडणार नाहीत" हे वाक्य माझ्या डोक्यात सुदर्शनचक्रासारखे फिरू लागले. कोणीही शोधावयास जाणार नाही व ते कोणालाही सापडणार नाहीत अशाच ठिकाणी वयाच्या अवघ्या ४५ व्या वर्षी गंधर्वलोकी ते निघून गेले! पार्सेकर गेले—कायमचे निघून गेले. व्हायोलिनवादनकलेचे कधीही नुकसान भरून येणारे नाही. त्यांचे स्थान कायमचे रिकामेच राहणारे आहे. "झाले बहु, होतील बहु, परंतु यासम हा" असे कार्य करून ते गेले. आता कोणाचे व्हायोलिन आवर्जून ऐकावेसे वाटत नाही. बहुधा यापुढेही वाटणार नाही!

पार्सेकरांच्या निधनानंतर त्यांच्या जीवनविषयक अशा अनेक उलटसुलट चर्चा ऐकून मला त्यांच्या निधनापेक्षाही अधिक दुःख झाले. स्वतःच्या कर्माने पार्सेकर यशोमंदिराच्या उच्च शिखरावरून खाली कसे गडगडत आले, ते स्वतः कसे पूर्णतः दोषी होते, याची वारेमाप चर्चा माझ्या कानांवर येत होती. काही वेळा याही प्रसंगी मला हसू येई. मनुष्य स्वभावाची अशी ठेवण आहे की, स्वतःची मुले का विघडली याची कारणे त्याला समजू शकत नाहीत,' आपल्या स्वतःच्या प्रपंचाचे 'असे का झाले' याचाही त्याला बोध होऊ शकत नाही, इतकेच काय,

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

स्वतःच्या मनाची– विचारांची गुंतागुंतही त्याला आयुष्यभर सुटत नाही. परंतु तो स्वयंपाक घरात वसून "मंडळी"शी गप्पा मारता मारता सर्वसाक्षी होऊन पेशवाईच्या ऱ्हासाची कारणे मात्र अधिकारपूर्वक हुडकून काढीत असतो. नेपोलियनचे नेमके काय चुकले, याचेही वर्णन तो अंतर्ज्ञानाने करीत असतो! मला पार्सेकरांच्या एकूण जीवनाबावत ज्या ज्या हकिगती समजल्या, त्यांवरून माझी स्वतःची अशी खात्री झाली की, पार्सेकरांच्या जीवनात जी परिस्थिती निर्माण झालेली होती, त्या परिस्थितीत दुसरा कोणीही सापडला असता तरी त्याच्या हातून कमी–अधिक प्रमाणात अगदी असेच घडले असते. पार्सेकर फार मोठे दोषी होते असे मला स्वतःला मुळीच वाटत नाही. संगीत कलेची मात्र अपरिमित हानी झाली आहे, ही गोष्ट सूर्यप्रकाशाइतकी सत्य आहे.

श्रीधर पार्सेकर हे एक अजातशत्रू कलाकार होते. त्यांनी कोणालाही नावे ठेवल्याचे माझ्या पहाण्यात नाही. ऐकण्यातही नाही. काही चर्चा निघालीच तर ते अनेकांची तारीफच करीत. उग्रता व कुत्सित वृत्तीचे असंस्कृत संस्कार त्यांच्या कलात्मक पिंडाला केव्हाच मानवण्यासारखे नव्हते. त्यांच्या– माझ्या अनेक भेटींमध्ये हा कलाकार अतिशय सुसंस्कृत आहे. याचाच वाढता साक्षात्कार मला पदोपदी आला.

पार्सेकरांनी अनेक विद्यार्थ्यांना व्हायोलिनवादनाची तालीम दिलेली आहे. त्यांचे धाकटे बंधू सहदेव यांनाही त्यांनी उत्तम तालीम दिलेली असून बोलपट सृष्टीत त्यांनी उत्तम नावलौकिक मिळविलेला आहे. याशिवाय त्यांनी अनेक छात्रांना उत्तम तालीम दिलेली आहे. पार्सेकरांच्या जीवनातील उत्तर कालखंडाचे मला केव्हाच विस्मरण झालेले आहे. मला आजही पार्सेकर अगदी स्पष्टपणे दिसतात ते असे– पुण्याच्या रास्तेवाड्यातील एक भव्य दिवाणखाना. पार्सेकरांच्या वादनावर जीव ओवाळून टाकणाऱ्या असंख्य रसिकांनी सभागृह खच्चून भरलेले आहे. पुढील बाजूस साहित्यसम्राट तात्यासाहेब केळकर, गायनाचार्य पं. वझेबुवा, संगीत कलानिधी मास्तर कृष्णराव अशी थोर मंडळी बसली आहेत. दोन तंबोऱ्यांच्या अत्यंत सुरेल अशा झंकारामध्ये पार्सेकरांनी मल्हारमधील एकतालाचा ख्याल सुरू केला आहे. ख्याल

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

सर्वांगानी भरून नंतर त्यातीलच द्रुत वाजवून सुमारे एक तासाने त्यांनी मल्हार संपवून लगेच खमाजमधील ठुमरी सुरू केली आहे. तीं अनेक अंगांनी नटवून नंतर त्यांनी दोन नाटचगीते वाजविली. आता मध्यंतर ! मध्यंतरानंतर त्यांनी चंद्रकंसचा ख्याल द्रुत वाजवून नाटच आणि बोलपटांसाठी त्यांनी स्वतः दिलेल्या चाली ते वाजवीत आहेत. वझेबुवांच्या खास फर्माईशीवरून त्यांनी आता दरबारी सुरू केला आहे. प्रत्येक कामगतीला प्रत्येक जागेला, प्रत्येक समेला वझेबुवा उत्स्फूर्त दाद देताहेत ! पहाटेचे आता तीन वाजले आहेत. पार्सेकरनी भैरवी आळवण्यास सुरुवात केली. भैरवी संपली ! रसिक श्रोत्यांच्या टाळ्यांचा कडकडाट दीर्घकाल चालू आहे. पार्सेकर सुहास्य वदनाने विनम्रभावे नमस्कार करून उपस्थित रसिकांचा निरोप घेताहेत ! ! !

▣ ▣ ▣

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri



अजब हार्मोनियमवादनपटू
कै. मधुकर पेडणेकर

सातारा जिल्ह्यातील कऱ्हाडच्या म्यूझिक सर्कलमध्ये कै. गायनाचार्य पं. गणपतबुवा बेहरे यांच्या सत्काराचा समारंभ कै. गोविंदराव टेंबे यांच्या अध्यक्षतेखाली साजरा करण्याचे निश्चित झाले. समारंभाचे कार्यक्रमही भरीव आणि भरगच्च असे होते. या समारंभाच्या संयोजकांपैकी मीही एक वारीकसा संयोजक होतो. पं. बेहरेबुवा हे याच सुमारास रत्नागिरीहून मुंबईस मुद्दाम आलेले होते. मुंबई आणि पुणे येथे त्यांचे चार-दोन प्रकट-सत्कारही झालेले होते. या शुभ प्रसंगाचा कऱ्हाडच्या म्यूझिक सर्कलने अवश्य फायदा घ्यावा, असे मला वाटल्याने सर्कलच्या चालकांना तसे पत्र पाठवून माझा हेतू मी त्यांना कळविला. त्यांचे संमतीदर्शक पत्र उलटटपालीच आले. श्री. गोविंदरावजी टेंबे यांचे अध्यक्षपदाचे काम मी त्यांना समक्ष भेटून मीच पक्के करावे, असेही त्यांनी त्यांच्या पत्रात आग्रहपूर्वक नमूद केले. गुरुवर्य गोविंदराव टेंबे यांचा त्या वेळी पुण्यातच मुक्काम असल्याने मी त्यांना भेटून त्यांच्या अध्यक्षपदाबाबत त्यांची मान्यता घेऊन समारंभाचे पक्के केले. यथाक्रम कार्यक्रमाची निमंत्रणपत्रिका माझ्याकडे आली. त्यात

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri



मधुकर पेडणेकर

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

हार्मोनियमवादनपटू श्री. मधुकरराव पेडणेकर यांचे सुश्राव्य हार्मोनियम-वादन आणि गा. पं. बेहरेबुवा यांचे सुश्राव्य गायन ही नोंद होती. या समारंभाला उपस्थित राहण्याची मला मनस्वी इच्छा असूनही पुण्यातील माझ्या काही महत्त्वाच्या कामाच्या अडचणीमुळे मी कऱ्हाडला जाऊ शकलो नाही. मात्र माझे सारे लक्ष या कार्यक्रमाकडे लागलेले होते. हा कार्यक्रम उत्तम यशस्वी होणार याची मला खात्री होतीच ! योजने-प्रमाणे कार्यक्रम व्यवस्थितपणे पार पडला आणि गोविंदराव टेंबे परत पुण्यास आले. कार्यक्रमाचा एकंदर अहवाल विचारण्यासाठी मी त्यांच्या बिऱ्हाडी गेलो. एकूण सर्वच समारंभ अतिशय उत्तम आणि व्यवस्थित झाल्याचे सांगून गोविंदरावजी मला म्हणाले, तुम्ही' पेडणे-करांची पेटी कधी ऐकलीत की नाही? अगदी "अजब" आहे. परवा त्यांनी खूप तयार वाजविलं. अशी तयारी मी आजपर्यंत कधी पाहिली नव्हती. तुम्ही एकदा जरूर जरूर ऐका. अजब आहे! अगदी अजब आहे !!

गोविंदराव टेंबे कोणालाही नावे ठेवीत नसत. परंतु व्यवहारा-दाखल उगीचच कोणाची औपचारिक स्तुतीही करीत नसत. त्यांनी स्वतः वयोमानामुळे हार्मोनियमवादन सोडूनही कित्येक वर्षे लोटलेली होती. त्यामुळे त्यांना खोट्या स्तुतीची व्यावहारिक कसरत करण्याचे काहीच कारण नव्हते. शिवाय त्यांच्या मूळ स्वभावातही ही गोष्ट केव्हाच नव्हती, हे मला पूर्णतः ठाऊक होते. अशी परिस्थिती असताना गोविंदरावजींसारख्या अतुल हार्मोनियम वादनाचार्याने, बहुश्रुत अशा थोर रसिकाने मधुकर पेडणेकर यांच्या पेटीवादनाबाबत इतक्या उत्स्फूर्त गौरवाचे उद्‌गार काढावेत, ही गोष्ट माझ्या दृष्टीने अतिशय महत्त्वाची होती. मधुकररावांच्या पेटीवादनाबाबत गोविंदराव टेंब्यांनी "अजब" या विशेषणाचा एकदा नव्हे तर अनेकदा वापर करावा, हे मधुकररावांच्या दृष्टीने "नोबेल प्राईज" ठरावे ! असा कार्यक्रम मी ऐकू शकलो नाही याची मला विलक्षण चुटपुट लागून राहिली. मधुकररावजींचे पेटीवादन आपल्याला केव्हा ऐकावयास मिळेल, असे मला होऊन गेले... आणि मी त्या प्रयत्नास लागलो !

५

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

यावेळपर्यंत माझा व मधुकरराव यांच्या प्रत्यक्ष परिचयाचा योग केव्हाच आलेला नव्हता. त्यांच्या व माझ्या परिचयाचा असा एखादा मध्यस्थ मित्र मिळवण्याच्या मी प्रयत्नात राहिलो. शेवटी असा योग सुमारे दहा वर्षांपूर्वी जमून आला. माझे एक ज्येष्ठ स्नेही श्री. सीतारामजी फातर्फेकर यांनी हा सुंदर योग घडवून आणला. आमची ही अगदी घरगुती मैफल मधुकररावांच्या फणसवाडीतील रहात्या घरातच झाली. या प्रसंगाच्या निमित्ताने आम्ही पाच-सहा तास तरी एकत्र आलो होतो, अगदी खेळीमेळीने ! माझ्या जीवनातील ही एक अविस्मरणीय अशी मैफल !

मधुकरराव यांना मी प्रथम पाहिले "हिज मास्टर्स व्हॉईस कंपनी" मध्ये. साल बहुतेक असावे १९३४. त्या वेळी ते या कंपनीत नोकरीस होते. मी काही कामानिमित्त असाच एके दिवशी कंपनीत गेलो असताना मला एक चमत्कारिक दृश्य दिसले. कंपनीतील एका अधिकाऱ्याशी मधुकररावांचे काहीतरी बिनसले होते. ते प्रकरण पुष्कळ विकोपास जाऊन मधुकरराव यांनी उग्र रूप धारण केले—बराच सवाल-जबाब समारंभ साजरा करून ते स्टुडिओच्याबाहेर चालते झाले. या प्रकरणाच्या पार्श्वभूमीची मला काहीच कल्पना नव्हती, परंतु ते एकंदर दृश्य पाहून माझी मात्र मधुकरराव हे एक अत्यंत "काटेरी" गृहस्थ असावेत अशी खात्री झाली !

मी पाहिलेल्या वरील दृश्यामुळे मधुकरराव यांचा प्रत्यक्ष परिचय व्हावा असे मला कधीच वाटले नाही व मी तसा प्रयत्नही केला नाही. मात्र अनेक लहान-मोठ्या कलाकारांबरोबर त्यांनी केलेल्या उत्कृष्ट साथी मी अनेकदा ऐकत होतो. मधुकररावांची साथसंगत ऐकणे हा एक मला मोठा उद्‌बोधक आनंद वाटे. गायक किंवा गायिका कोणत्याही घराण्याची असो, मधुकररावांची साथ त्या अंगाने होई. अलाप, उपज-अंग, गमक-अंग, तान, बोलतान ही सर्वच अंगे त्यांच्या अंगुलीतून विलक्षण साफसफाईने आणि तितक्याच विश्वासाने वाजत असत. नेपोलियनच्या कोशात अशक्य हा शब्द नव्हता असे म्हणतात. मधुकररावजींच्या बोटांनाही अशक्य असे काहीही नव्हते. कित्येक वेळी त्यांच्या साथीतील

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

विलक्षण–मुष्कील तानपलटे ऐकून मी स्वतः स्तिमित झालो आहे. त्यांचे असे तालपलटे ऐकून हार्मोनियम वादनाच्या माझ्या आजवरच्या कक्षा आणखी कितीतरी रुंदावल्या. हार्मोनियममध्ये कितीतरी अशक्य वाटणाऱ्या गोष्टी मधुकररावांच्या हातातून अगदी सहज वाजताना मी ऐकलेल्या आहेत. कोणत्याही घराण्याचा कलाकार असो, राग कोणताही असो, ताल कोणताही असो, लय कोणतीही असो, गायनातील कोणताही प्रकार असो किंवा पट्टी कोणचीही असो, त्यांना त्याची पर्वा मुळीच नसे. हा "अभिमन्यू" आपल्या अतुल पराक्रमाने सारे चक्रव्यूह मोडून काढीत असे. साथ-संगत करताना मधूनमधून ते स्वतःचे असे आणखी शिवाय ऐकवीत. अशा वेळी या कलाकाराच्या सर्वसमर्थतेची प्रभावी साक्ष त्या खुद्द कलाकाराला– तशीच मर्मज्ञ श्रोत्यांना पटे. हे अनुभव मी कितीतरी वेळा घेतले, तरीही या "काटेरी" कलाकाराच्याजवळ जाण्याचे धाडस मी करू शकलो नव्हतो !

मधुकर गंगाधर पेडणेकर यांचा जन्म दि. २७ फेब्रुवारी १९१६ या दिवशी मुंबईत झाला. संगीत विद्या ही त्यांच्या घराण्यातील पूर्वापारची विद्या होती. त्यांचे मामा श्री. शंकरराव राजापूरकर (गुणीजन) यांनी मधुकरराव यांना वयाच्या आठव्या वर्षीच पेटीवादनाची दीक्षा दिली. मधुकरराव खूप मेहनत करू लागले. दोन–तीन वर्षांच्या अल्पावधीतच त्यांनी इतकी प्रगती केली की त्या वेळी त्यांनी सवाई गंधर्व यांच्यासारख्या श्रेष्ठ गायकाची साथ करून त्यांच्याकडून वाहवा आणि सुवर्णपदकही पटकाविलें. मुंबईचे त्या वेळचे नामवंत हार्मोनियमपटू श्री. वहुलकर यांचेकडे मधुकररावांनी काही शिक्षण घेतले. पुढे ते सांगलीचे सुप्रसिद्ध हार्मोनियमवादनकार व उत्कृष्ट संगीत दिग्दर्शक कै. अण्णासाहेब माईणकर यांचे शिष्य झाले आणि खऱ्या अर्थाने मधुकररावजींच्या सर्वांगीण प्रगतीस व जीवनकार्यास येथूनच सुरवात झाली. संगीतकलेतील ही एक पराक्रमी "कृष्णार्जुन जोडी" ठरली. अण्णासाहेबांनी त्या काळी बोलपट सृष्टीची फारच मोठी सेवा बजावली. त्यांच्या या कार्यात मधुकरावांनी 'असिस्टंट' या नात्याने चांगला हातभार लावला. धर्मवीर, प्रेमवीर, छाया, लपंडाव, भक्त प्रल्हाद, इत्यादी बोलपटांचे संगीत दिग्दर्शन अण्णासाहेबांनी केले. हे सर्व

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

बोलपट त्या काळी गाजले. त्यानंतर मधुकररावांनी चोखा मेळा, चाळीतील शेजारी, वकील साहेब, धर्मपत्नी, सावित्री अशा मराठी हिंदी, तेलगू बोलपटांचे स्वतंत्ररीत्या संगीत दिग्दर्शन केले. नाटकांचे दिग्दर्शनही त्यांनी केले.

कै. अण्णासाहेब माईणकर हे सांगलीच्या संपन्न घराण्यातील एक गृहस्थ होते. संगीताच्या व्यासंगासाठी त्यांनी अमाप संपत्ती खर्च केली. बालगंधर्व, थिरकवा खांसाहेब, खां. कादरबक्षखां (सारंगिये) अशा अतिरथी–महारथी कलाचार्यांचा मुक्काम अण्णासाहेबांचेकडे सदैव असे. या सर्वांचे आदरातिथ्य करावे अण्णासाहेबांनीच! अण्णासाहेब स्वतः पुरोगामी वृत्तीचे असून ते प्रयोगशीलतेचे महान रसिक भक्त होते. पेटीवादनातील नेहमीची चाकोरी सोडून त्यांनी त्यात अनेक नवीन वादनप्रकार सामील केलेले होते. त्यांची कल्पकताही श्रेष्ठ प्रतीची होती. अण्णासाहेबांच्या या गुणसंपदेची, त्यांच्या व्यक्तित्वाची व त्यांच्या सर्व प्रकारच्या आचारविचारांची छाप मधुकररावांच्यावर स्पष्टपणे पडलेली होती. याची प्रचीती मला पुढे आलीच. अण्णासाहेबांच्यामुळे मधुकर-रावजींचा अतिशय फायदा झाला. अण्णासाहेबांचेकडे मोठमोठे कलाकार सतत येत–महिना-महिना मुक्काम करीत.त्या सर्वांच्या मैफली रात्रंदिवस सतत झडत. हे सर्व संस्कार मधुकररावांवर प्रभावाने होत. याच सर्व प्रकारच्या संस्कारांतून त्यांची स्वतःची वादनकला साकारली– समृद्ध झाली. अण्णासाहेबांच्या या अर्जुनाने आपल्या भावी जीवनात जे लौकिक स्थान प्राप्त करून घेतले, त्याची काही पूर्वपीठिका वरीलप्रमाणे आहे.

गोविंदराव टेंबे यांनी तारीफ सांगितल्यानंतर मधुकररावजींच्या स्वतंत्र पेटीवादनाची मला आतुरता लागलेली होती. अखेर मी उत्कंठेने वाट पहात असलेला सुदिन एकदाचा उजाडला. श्री. सीतारामबुवा फातर्फेकर यांचेबरोबर मी व माझे व्हायोलिनवादनपटू मित्र श्री. रघुवीररावजी जोशी असे मिळून मधुकररावजींच्या विऱ्हाडी आलो. एका दृष्टीने अतिशय कठिण प्रसंग सीतारामबुवांचे मागे लागून मी माझ्यावर ओढवून घेतला होता. कारण मी तीस वर्षांपूर्वी मधुकररावांचे जे "नरसिंहरूप" पाहिलेले होते, त्याचे विस्मरण कदापि होण्यासारखे

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

नव्हते. या "काटेरी" माणसाशी चार-दोन हात करण्याची वेळ आलीच तर ते मी करू शकेन, अशी माझी प्रवृत्ती नव्हती– हिंमत तर मुळीच नव्हती! इत्यादी विचार माझ्या डोक्यात थैमान घालीत होते... इतक्यात दार ठोठावताच ते उघडले गेले आणि आश्चर्यकारक अनुभव आला. सामोरे आले ते खुद्द मधुकररावच. त्यांनी अत्यंत प्रसन्न वदनाने आम्हा सर्वांचे मनापासून स्वागत करून माझा हात धरून मला मोठ्या प्रेमाने स्थानापन्न केले. आम्ही आल्याचा त्यांना मनापासून आनंद झालेला होता. त्यांच्या स्वभावानुसार औपचारिक काहीही न बोलता त्यांनी एकदम खडा सवाल केला, क्यों सीतारामजी, पहले क्या लेंगे? चाय, सोडा, शरवत! कुछ भी लेवो! अच्छा, पहले तो चायही लीजिए, फिर देखेंगे...। मधुकररावजींच्या या सौहार्दपूर्ण आगत-स्वागताने त्या मुंबईच्या ऐन उकाड्याच्या हवेतही मी अगदी थंड झालो. वनराजाच्या गुहेत एखाद्या सर्वोदयी नेत्याचे अहिंसा–मानवता यावर प्रवचन चालू असल्याचा मला साक्षात्कार होऊ लागला! ...मधुकररावांनी समोरची पेटी ओढून घेतली. तवला सुरात लागला आणि मधुवंतीचा विलंबित ख्याल त्यांनी सुरू केला. सर्वांगांनी ख्याल भरून त्यांनी द्रुत गत वाजविली. त्यानंतर अति द्रुत गत आणि शेवटी अति-अति द्रुत वाजवून पहिला राग त्यांनी पुरा केला. यानंतर आता सोडापान– त्यानंतर मँगोला पान! पुन्हा चहा, पुन्हा सोडा व नंतर विस्किटे आणि ती पचण्यासाठी "शरवत!" आमची खाद्य-पेयांची ही आवर्तनेसुद्धा मधुकररावांच्या अतिद्रुत वादनाप्रमाणेच पुनः पुनः एकसारखी येत होती! आमचा हा अविस्मरणीय कार्यक्रम सुमारे पाच तासांनी संपला!

आमच्या या मैफलीत मधुकररावांनी ख्याल, ठुमरी, नाट्यसंगीत असे प्रकार ऐकवले. त्यांचे सर्वच पेटीवादन मला अतिशय आवडले. त्यांच्या पेटीवादनातील वेग व आक्रमकता हे दोन गुण असामान्य स्वरूपाचे होते. त्यांची हार्मोनियमवर हात ठेवण्याची पद्धती अगदी नैसर्गिक अशी होती. कोणत्याही वाद्यावर हात जेवढा नैसर्गिक राहील त्या प्रमाणात वादनातील वेग व सहजता वाढते. गळ्याचाही हाच धर्म आहे. गळा जितका नैसर्गिकपणे वापरावा तितकी गुणवत्ता त्यात निर्माण होते. वस्तुतः हे एक अगदी साधे तत्त्व आहे, परंतु ते प्रत्यक्ष व्यवहारात मात्र

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

क्वचित एखाद्यालाच साधते. मधुकररावांना हे पूर्णतः साधले होते. तानपलटा एक सप्तकाचा असो की तीन सप्तकांचा असो तो अत्यंत वेगाने व तितक्याच सफाईने त्यांच्या हातून वाजत असे आणि कोणत्याही विकट-वक्र-सरळ-पलटयांना त्यांचा हात कोठेही अडत नसे आणि हे सर्व काम ते एखाद्या कुशल जादूगाराप्रमाणे हसत-खेळत-विनासायास करीत. त्यांचा हात मूळचाच अतिशय हलका आणि त्यात त्यांनी विचारपूर्वक घेतलेले प्रचंड परिश्रम, यामुळेच त्यांना ही असामान्य सिद्धी प्राप्त झालेली होती. हात–तयारीसाठी काही खास पलटयांवर त्यांनी मेहनत घेतली होती. काही खास गती तालात बांधून त्या निरनिराळया लयीत त्यांनी घटविल्या होत्या. त्यांतील काही गती त्यांनी आपल्या घरच्या कार्यक्रमांत आम्हाला मुद्दाम ऐकविल्या. ते त्या गती कशा वाजवितात, याचे मला स्वतःला काही वेळा आकलन होऊ शकले नाही. हार्मोनियम हा त्यांचा एक खेळ झालेला होता. हात कसाही उलटा-सुलटा फेकला तरी उत्तम वादन ऐकू येई. सतारवादनातील "दिरदिर" किंवा वीन-मधील "द्राऽन्" ही अक्षरे ते हार्मोनियममध्ये अतिशय तयारीने व साफ वाजवीत. सतारीतील अनेक उलटसुलट व सम-विषम लयीचे झाले ते फारच उत्तम वाजवीत. त्यांचे लय अंगही तितकेच पक्के होते. थिरकवांसारख्या अनेक थोर तबलियांबरोबर ते अनेकवार खेळलेले होते. विकट आणि तयारीची कामगत करून ते समे-वर आले म्हणजे आकाशातील बहिरीससाण्याने जमिनीवरील आपल्या सावजावर प्रचंड वेगाने येऊन अचानक झडप घातल्यासारखे वाटे! गायकी, रागनियम, श्रुतिविचार अशा अनेक आवश्यक अंगांचा त्यांनी मार्मिक अभ्यास केलेला होता. मधुकरराव हे मूळ किराणा गायकीचे भक्त. त्यामुळे स्वर व त्यांचे सूक्ष्म दर्जे यांचा त्यांनी अभ्यास केलेला होताच. त्यांनी जवळजवळ सर्व मोठ्या गायक-गायिकांच्या साथीकरून त्यांतील महत्त्वाचे वारकावे टिपलेले होते. आचार्य बृहस्पती यांना ते शास्त्राच्या अभ्यासाच्या दृष्टीने गुरुस्थानी मानीत. कै. पं. गणपतबुवा बेहरे यांनाही ते गुरुस्थानी मानीत.

मधुकरराव पेडणेकर हे एक असामान्य बुद्धीचे, कल्पक आणि परिश्रमी असे कलाकार होते. त्यांचे हार्मोनियम या वाद्यावरील

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

असामान्य प्रभुत्व हा त्यांचा एक मुख्य उल्लेखनीय भाग. ते स्वतः एक उत्कृष्ट संशोधक होते. निरनिराळ्या वाद्यावर विजेच्या योजनेचे अनेक प्रयोग करून त्यांनी त्यात आश्चर्यकारक यश मिळविले. प्रत्यक्ष हार्मोनियम या वाद्यावरही त्यांनी कितीतरी प्रयोग केले. हार्मोनियम वाजविताना त्यांचे नोटेशन त्याच हार्मोनियमवर बसविलेल्या एका स्वतंत्र पट्टीवर विजेच्या योजनेने दिसावे अशी योजना त्यांनी केली. त्यांचे ते प्रात्यक्षिक पाहून मी थक्क झालो. त्यांनी हे सर्व प्रयोग आम्हाला प्रत्यक्ष करून दाखवून समजावून दिले. सनई, शिंग, बांसरी, तबला अशा वाद्यांच्या लाकडी आकृती मधुकररावजींनी स्वतः कोरून त्याची "तानसेन संगीत विद्यालय" अशी भली मोठी पाटी तयार करून घराबाहेर लावली. ही एकच पाटी पाहिली तरी त्यांच्या कल्पकतेची साक्ष पटते. ते स्वतः अनेक वाद्ये वाजवीत. ते हार्मोनियमचे ट्यूनिंग फार उत्तम करीत. हार्मोनियम या वाद्यात मींड काढता आल्यास या वाद्याचा दर्जा व उपयुक्तता यात फारच मोठी भर पडेल हे ओळखून त्यांनी पेटीत आतील बाजूस निरनिराळ्या स्वरांच्या तारा टाकून त्यातून मींड काढण्याचा प्रयोग केला. त्यात त्यांना यश मिळू लागले होते. परंतु या क्रांतिकारक संशोधनाच्या दिव्य यशाची माला त्यांच्या गळ्यात पडावी, असा ईश्वरी संकेत नव्हता !

मधुकरराव यांचे चिरंजीव श्री. रवींद्र पेडणेकर हे व्हायोलिन चांगले वाजवू लागले असून वाद्य संशोधनकार्याचीही त्यांना आवड आहे. त्यात त्यांची चांगली गती आहे. आपल्या वडिलांचे अपुरे कार्य आणि त्यांच्या अपुऱ्या इच्छा ते पूर्ण करू शकतील, अशी आशा बाळगण्यासारखी परिस्थिती आहे ही एक आनंदाची गोष्ट आहे. वाद्यांच्या शौकापायी मधुकररावजींनी हजारो रुपये खर्च केले. अनेक वाद्यांचा स्वतंत्ररीत्या उत्कृष्टपरिणाम देणारे "क्ले–व्हायोलिन" हे सहा हजार रुपयांचे पाश्चिमात्य वाद्य त्यांनी खरेदी केले. भारतात हे वाद्य प्रथमतः त्यांनीच आणले असे म्हणतात. या वाद्याच्या वादनाचे त्यांचे कार्यक्रम रसिकांना अतिशयच आवडले. त्यानंतर या वाद्याचा प्रवेश सिनेसृष्टीत झाला आणि आज हे वाद्य सिनेसृष्टीत आपले उत्तम बस्तान बसवून आहे. त्याचप्रमाणे मधुकररावांची आणखी एक महत्त्वाची कामगिरी अशी

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

की, मुंबईत आणि अखिल महाराष्ट्रात राज्य सरकारचे जे संगीत महोत्सव होतात, त्यांची वाद्यव्यवस्था व साथीदारांची सर्व योजना ही जवाबदारी मधुकररावांकडेच सोपविलेली असे. त्याचप्रमाणे "सूरसिंगार" सारख्या अनेक संस्थांच्या कार्यक्रमांची अशी जबाबदारी बहुधा त्यांच्यावरच असे. ही सर्व कामगिरी असामान्य योजनाचातुर्याने ते पार पाडीत.

नभोवाणीवरील हार्मोनियमबंदी उठविण्याबाबत नभोवाणी खात्याने संगीतज्ज्ञांची एक समिती नेमली. या कामी प्रत्यक्ष प्रयोगा-साठी हार्मोनियमचे टेपरेकॉर्डिंग आवर्जून घेतले गेले ते मधुकररावजींचे. हा त्यांचा यथोचित बहुमान होता. परंतु तो उपभोगण्यापूर्वीच वीणेची ...हृदयवीणेची तार अकाली तुटली आणि सारी मैफलच विसकटली !

मधुकररावजींनी अनेक विद्यार्थ्यांना तालीम दिली. त्यांत पुण्याचे हार्मोनियमपटू श्री. केमकर यांचा अवश्य उल्लेख करावासा वाटतो. साथ-संगत आणि स्वतंत्र हार्मोनियमवादन या दोन्ही अंगांत ते निष्णात आहेत. मधुकररावजींच्या वादनातील फार मोठी याद केमकरांच्या वादनात मोठ्या प्रकर्षाने मिळते. ते गुरुजींच्या नाव-लौकिकात योग्य अशी भर घालतील अशी खात्री वाटते !

मधुकररावजींच्या घरातील आमच्या पाच तासांच्या मैफलीत त्यांचे असामान्य वादन मला जसे ऐकावयास मिळाले, तसेच एक व्यक्ती म्हणूनही मी त्यांना अगदी जवळून पाहू शकलो. 'मोडेन पण वाकणार नाही' अशा वृत्तीचा हा कलाकार होता. जीवन जगावे ते स्वाभिमानानेच, या मनोवृत्तीचा तो श्रेष्ठ आदर्श होता. वागणे-बोलणे हे सारे अगदी स्वच्छ आणि तितकेच स्पष्ट. त्यात व्यावहारिक नाट्य कोठेही नाही. सज्जनाला "कासेची लंगोटी" सोडून देतील, परंतु "नाठाळाचे माथी" एका क्षणात सोटा हाणून मोकळे होतील. मैत्रीत जिवाला जीव देण्याची वृत्ती. वृत्तीने अतिशय उदार परंतु कोठेही अनवधानाने फसले जाणार नाहीत. जितके उग्र तितकेच कमालीचे सौम्य. मी प्रथमतः पाहिलेले त्यांचे 'काटेरी' उग्र स्वरूप हे त्यांचे केवळ बाह्य दर्शन होते. परंतु या गोमंतकीय फणसाच्या आतील

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

मधुर गऱ्यांचा खरा स्वाद मला यावेळी मनसोक्त मिळाला. तो फारच उशीरा मिळाला. याची मात्र आता रुखरुख वाटते !

मधुकररावजींच्या घरातील सर्वांगीण मैफल संपवून आम्ही त्यांचा आभारपूर्वक निरोप घेऊन निघू लागलो. तुम्ही पुन्हा एकदा असेच शांतपणे या– आपण पुन्हा बसू, असे मधुकररावनी आम्हाला आग्रहाने सांगितले. त्यानंतर माझे मुंबईस अनेकदा जाणे होऊनही मी त्यांचेकडे जाऊ शकलो नाही.

श्री. कुमार गंधर्वांचे " हिज मास्टर्स व्हॉईस "मध्ये रेकार्डिंग होते. हार्मोनियमच्या साथीस होते मधुकरराव. सर्व रेकॉर्डिंग अगदी व्यवस्थित पार पडले–– आणि त्यानंतर केवळ काही तासांनीच हृदयक्रिया बंद पडून दि. २० जुलै १९६७ रोजी मधुकररावांचे शोचनीय निधन झाले !

कै. गोविंदराव टेंबे यांनी म्हटल्याप्रमाणे कै. मधुकररावांचे पेटी-वादन " अजब ! " त्यांचे व्यक्तिमत्वही अजब आणि त्यांचे महा-निर्याणही अजब ! सारेच अजब ! !

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri



कर्तबगार आणि रसिकप्रिय सांगीतिक
कै. गोपालकृष्ण भोबे !

१९६२ साली माझे "संगीतांतील घराणी" हे पुस्तक प्रसिद्ध झाले. त्यानंतर निरनिराळ्या वृत्तपत्रांच्या संपादकांकडे माझे पुस्तक अभिप्रायाच्या अत्यावश्यक संस्कारासाठी पाठविण्याचा क्रम सुरू झाला. त्यानुसार मुंबईच्या "महाराष्ट्र टाइम्स"कडेही हे पुस्तक पाठविले. पुस्तक वाचकांच्या हातांत पडेपर्यंत ज्या ज्या महत्त्वाच्या गोष्टी सुसूत्रपणे पार पडणे अवश्य असते त्यांत वृत्तपत्रांचे अभिप्राय ही एक असाधारण अशी महत्त्वाची गोष्ट असते. पुस्तकाचे काही बरे-वाईट होणे हेही अभिप्रायावर मोठ्या प्रमाणावर अवलंबून असते. याचा विचार करता "महाराष्ट्र टाइम्स"सारख्या एका दर्जेदार वृत्तपत्राच्या अभिप्रायाचे मला वाटणारे महत्त्व अतिशयच होते. महाराष्ट्र टाइम्सच्या सुरवातीपासूनच श्री. गोपालकृष्ण भोबे हे त्यांतील संगीत– चित्रादी कलाविभागाच्या लेखनाचे काम पाहत होते. समीक्षण, परीक्षण, कलावृत्त, काही स्वतंत्र लेख; असे लेखन ते सतत करीत. त्यांचे हे लेख मी मोठ्या रुचीने वाचत असे. त्यांच्या सर्व लेखनाचा गाभा त्यांची रसिकता व सहृदयता हा असल्याचे मी अनुभवीत होतो. माझ्या पुस्तकावरील

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri



गोपालकृष्ण भोबे

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

परामर्श बहुधा भोवेच लिहिणार अशी खात्री मला वाटत होती. आणि काही मतभेद असले तरी एकूण अभिप्राय येईल तो अगदी योग्यच येईल असा मला विश्वास वाटत होता. परंतु दुसरे मन असेही सांगे की, माझ्या पुस्तकाबाबतचा माझा विश्वास आणि भोवे यांचा अभिप्राय यांचे गणित व्यस्त झाल्यास काय करणार ? त्यांच्या मतावर त्यांचीच पूर्ण सत्ता होती. त्यांचे मत मला अनुकूल असलेच पाहिजे असे म्हणण्याचा मला अधिकार काय ?.... अशा अस्वस्थ विचारांच्या कल्लोळात मी महाराष्ट्र टाइम्स्च्या अभिप्रायाची रोज वाट पहात स्वस्थ बसलो होतो. माझ्या पुस्तकाचे भवितव्य काही प्रमाणात तरी भोव्यांच्या हाती होते. न जाणो, या नवजात बालकाच्या नरडीला नख लावण्याचे काम भोवे करणार नाहीत ना ? " मन चिंती ते वैरी न चिंती " अशी माझी परिस्थिती झालेली होती. भोवे हे कोण, कोठले, काय करतात याची मला काहीही माहिती नव्हती. त्यांचा पत्ता मिळवून त्यांच्याशी काही वशिल्याचे सूत जमवावे हीही कल्पना मला मुळातच अमान्य असल्याने हरीवर हवाला ठेवून मी टाइम्सच्या अभिप्रायाची अगदी चातकासारखी वाट पहात बसलो ! योग्यवेळी टाइम्समधील अभिप्राय प्रसिद्ध झाला. त्याचे लेखक होते श्री. गोपालकृष्ण भोवे हेच. मी अत्यंत उत्सुकतेने सर्व अभिप्राय वाचून काढला. माझ्या डोळ्यांवर माझा विश्वास बसेना. " आंधळा मागतो एक डोळा आणि देव देतो दोन " अशी माझी स्थिती झाली. भोवे यांचा अभिप्राय माझ्या स्वतःच्या अपेक्षेपेक्षा उत्तम आलेला होता. प्रत्यक्ष भेटीच्या अभावीसुद्धा भोवे यांचा मी ॠणाईत झालेला होतो. त्यांचा मुंबईचा पत्ता मिळवून त्यांना एक कृतज्ञतेचे आभारपत्र पाठवावे असे मी मनात ठरविले, तोच दुसऱ्याच दिवशीच्या टपालाने भोवे यांचे मलाच एक विस्तृत पत्र आले. त्यात त्यांनी माझ्या पुस्तकातील आणखी काही गुणविशेषांचे व त्याचा लेखक म्हणून माझे अगदी मनापासून व मोकळेपणाने कौतुक केलेले होते. त्या आनंदाच्या भरात मी त्यांना लगेच आभारपत्र पाठवून " आपण पुण्यास केव्हा याल त्यावेळी माझ्याकडे जरूर यावे " असे कळविले.

मध्यंतरी चार-पाच महिने तसेच गेले. एके दिवशी सायंकाळी एक गृहस्थ नेहमीच्या सराईताप्रमाणे कडी वगैरे न वाजविता माझ्या

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

घरात एकदम प्रवेश करते झाले. डोक्यावरील कथ्थकी थाटाचे कुरळे केस, दाढीचा सावरकरी पद्धतीचा लांब कट, नेहरू झब्बा आणि त्यावर टेरेलिनचे एक जाकीट, पायांत अतिरुंद पांढरा स्वच्छ लेहंगा अशा थाटातील ती दुहेरी मजबूत हाडापेराची, पुऱ्या उंचीची, गौरवर्णीय, धिप्पाड आणि अतिशय सुप्रसन्न– हसतमुख मूर्ती पाहून मला आनंद वाटला. ही कोणीतरी उत्तर हिंदुस्थानी कलाकार व्यक्ती असावी, असे मला क्षणभर वाटले. इतक्यात त्या व्यक्तीने स्वतःच खुलासा केला "मी भोबे!"...आमच्या गेल्या अनेक जन्मांतील ऋणानुबंधाच्या गप्पा-गोष्टी त्या तीन तासांच्या मैफलीत अगदी हसत-खेळत झाल्या. संगीत या मुख्य विषयाच्या अनुषंगाने अनेक विषयांवर आमची चर्चा झाली. आणि प्रथमभेटीची ही प्रेमपूर्ण स्मृती माझ्या अंतःकरणावर कायमची कोरून ठेवून भोबे प्रसन्न हास्य करीत निघून गेले!

या प्रथम भेटीनंतर श्री. भोबे यांच्या भेटीचा योग मुंबई व पुणे या ठिकाणी अधूनमधून वऱ्याच वेळा येई. त्यांचे लेखनकार्य जोरात चाललेले होते. त्यांचा नावलौकिक, दर्जा, लोकप्रियता आणि त्यांचा स्वतःचा कलात्मक व्यासंग ही सतत वाढत होती मुंबईतील कलाप्रांतात त्यांचे एक आवश्यक असे स्थान तयार होऊ लागले. भोबे यांची आर्थिक बाजूही मजबूत होऊ लागली. त्यांच्या "महाराष्ट्र टाइम्स"मधील लेखावरोबरच त्यांचे स्वतःचे ग्रंथही जन्म घेऊ लागले. ते रसिकांची मने मोठ्या प्रमाणावर रिझवू लागले. भोबे सर्वच दृष्टीने मोठे–मोठे होत होते.

गोपालकृष्ण भोबे यांचे संपूर्ण नाव गोपाल अनंत भोबे. गोमंतकातील 'नेरुल' या गावी दि. ६ ऑगस्ट १९२१ रोजी जन्माष्टमीचे शुभदिनी त्यांचा जन्म झाला. त्यांचे सर्व शिक्षण गोमंतकांतच पोर्तुगीज-मधून झाले. घरात पूर्णतः धार्मिक वातावरण असल्याने कुलधर्म-कुलाचार या गोष्टी नेहमी चालत. रोज काही स्तोत्रे–संतकाव्ये म्हणणे, पाठ करणे हे आवश्यक कार्य असे. भोबे हे अगदी तीव्र बुद्धीचे, एकपाठी असल्याने संतकाव्याचे त्यांचे पुष्कळच पाठांतर झाले. तसेच अमृतराय, मोरोपंत, वामन पंडित अशा जुन्या कवींच्या प्रासादिक काव्यांचा फार

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

मोठा संग्रह त्यांचेजवळ लहान वयातच झाला. शिवाय त्या काळी गोमंतकांत कीर्तने–पुराणे यांचे प्रमाण खूपच असे. भोबे यांना त्याचीही आवड होती, आणि अशा आवडीपायी त्यांनी श्रवणही भरपूर केले. हळूहळू ते घरच्या लहानशा व्यापारातही लक्ष घालू लागले. उत्सवातील नाटकातून काही भूमिकाही ते करू लागले. नाटकाचे पडदे रंगविणे, देखावे तयार करणे हीही कामे ते करू लागले. यातून त्यांची कलासक्ती जागृत होऊ लागली. आपल्या जीवनात आपण काही विशेष कार्य करावे, अशी त्यांना तळमळ वाटू लागली. आपल्या ध्येयाच्या दृष्टीने गोमंतक सोडून आपण बाहेर पडले पाहिजे, असे ठरवून १९४३ साली ते मुंबईला आले. सुप्रसिद्ध नाटककार श्री. मो. ग. रांगणेकर यांचेकडे ते राहिले. कालांतराने ते रांगणेकरांचे भाचीजावई झाले. नाटक कंपन्यांचे बोर्ड रंगविणे, नाटकांत कामे करणे अशी कामे ते करू लागले. त्यांनी चित्रकलेतील अनेक अंगांचा अभ्यास केला. या महत्त्वाकांक्षी माणसाचे लक्ष हळूहळू लेखन विषयाकडे वळले. १९५८ पासून मौज साप्ताहिक व क्वचित अन्य ठिकाणी त्यांनी संगीत व चित्र या कलांवरील समीक्षण लिहिण्यास सुरवात केली. महाराष्ट्र टाइम्स सुरू झाल्यानंतर या दोन्ही विषयांवरील समीक्षालेख व स्वतंत्र लेखही लिहिण्यास त्यांनी सुरवात केली. अनेक साप्ताहिके व मासिके यांतील चित्रे व एकूण अंकाची सजावट हीही कामे ते मोठ्या प्रमाणावर करू लागले होते. मुंबई नभोवाणीवर त्यांच्या गाण्याचे कार्यक्रम होऊ लागले. नभोवाणीवरील श्रुतिका, संगीतिका, नाटके यात ते स्वतः भूमिका करीत आणि सर्व प्रकारचे दिग्दर्शक म्हणूनही काम करीत.

श्री. भोबे यांचे लेखन तज्ज्ञ व सामान्य रसिकांत प्रिय होऊ लागले. त्यांच्या लेखांची वाचक उत्कंठेने वाट पाहू लागले. वाचकांच्या दृष्टीने भोबे यांचे मर्मग्राही लेख ही ज्ञानबोध व सौंदर्यशोध यांची एक मौलिक देणगीच ठरू लागली. ते विपुल लेखन करू लागले.. त्यासाठी मुंबईतील प्रत्येक महत्त्वाच्या मैफलीस आवर्जून उपस्थित राहणे, त्यावर टीका–टिप्पणी तयार करणे, निरनिराळ्या कलाकारांच्या सतत मुलाखती घेणे, त्यांचे मुख्यतः संगीतविषयक आचारविचार समजून घेणे, त्यांच्याशी महत्त्वाची चर्चा करणे आणि त्यावरून स्वतःचे विचार

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

तावून-सुलाखून घेणे व अशा मार्गांनी आपण स्वतः हाती घेतलेल्या लेखनकार्याचा सर्वांगीण दर्जा वाढविणे, हे काम ते सतत करीत राहिले. या कामी त्यांनी स्वतःच्या जिवाचीही तमा न बाळगता जे घोर परिश्रम केले, त्याला निदान संगीताच्या दुनियेत तरी तोड नाही. बसल्या बैठकीला सोळा सोळा तास ते काम करीत. विशेष गोष्ट अशी की, यातील एकही गोष्ट त्यांनी केवळ मौज म्हणून केलेली नव्हती. आपले विचार महत्त्वाचे ठरले पाहिजेत, त्यांतून वाचकांना संगीतकलेचे थोडे-फार ज्ञान झाले पाहिजे, संगीतकलेबाबत त्यांच्यात आस्था निर्माण झाली पाहिजे, मूळची असलेली आस्था वाढली पाहिजे आणि अशा प्रयत्नांतून संगीतकलेच्या प्रचार-प्रसार या कार्यास आपला काही महत्त्वाचा हात-भार लागला पाहिजे, या आंतरिक हेतूनेच त्यांना इतके कार्यप्रवण बनविले होते. इतकेच करून ते स्वतः थांबले नाहीत. जे कोणी होतकरू कलाकार असतील त्यांना मुद्दाम हेरून त्यांच्या प्रगती-साठी आपल्याजवळ मुळीच नसलेल्या वेळांतून सवड काढून ते नेहमी झटत. त्यांच्यासाठी ते तासन्‌तास खर्च करीत. त्यांनी मेहनत कशी करावी, कशी करू नये, त्यांनी आपले कोणकोणते दोष नाहीसे केले पाहिजेत, कोणती गुणवत्ता वाढविली पाहिजे, या सर्व गोष्टी प्रात्यक्षिकांसह करून दाखवून ते त्यांची आश्चर्यकारक प्रगती करून दाखवीत. संगीताचा अंतिम हेतू कोणता हे त्या कलाकारांना आपल्या सोप्या, रसपूर्ण व प्रत्ययकारी चर्चेतून ते वारंवार समजावून देत-पटवून देत. या सर्व गोष्टी होतकरूंना ते स्वतः करून दाखवीत आणि त्यानुसार त्यांच्याकडून त्या सर्व करवून घेत. मुंबईतील अशा किती तरी होतकरू कलाकारांनी भोबे यांच्या थोर मार्गदर्शनाने स्वतःमध्ये आश्चर्यकारक प्रगती घडवून घेतली असून आज ते लोकमान्य-तेच्या शिखरावर भक्कमपणे आरूढ झाल्याचे मी पाहतो आहे. आणि मोठे आश्चर्य असे की, हा सारा खटाटोप त्यांनी अगदी निरपेक्ष रीतीने केलेला होता. आर्थिक फायदा किंवा व्यावहारिक मोठेपणाचा लाभ, अशा स्वार्थाचा लवलेशही त्यांत नव्हता. संगीतकला व कलाकार यांच्याबाबत भोबे यांना जी विलक्षण आत्मीयता होती, जी तळमळ होती, त्यांच्याचपोटी त्यांनी हे कार्य केलेले होते.

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

श्री. भोबे यांनी पूर्वी मरहूम इनायतखाँ या विद्वान् घराणेदार उस्तादाकडून गाण्याची प्रत्यक्ष तालीम घेतलेली होती. त्यानंतर मुंबईच्या व मुंबई बाहेरच्याही अनेक विद्वान् कलाकारांकडून त्यांनी अनेक राग व असंख्य चिजांचा विपुल संग्रह केला. निरनिराळ्या ढंगांच्या, निरनिराळ्या घराण्यांच्या व उत्कृष्ट बंदेष असलेल्या कितीतरी चिजा त्यांनी मला अनेकदा ऐकविल्या होत्या. परंपरेच्या प्रथितयश कलावंताकडे नसेल इतका प्रचंड संग्रह भोबे यांनी केलेला होता. चीज एकदा किंवा दोनदा ऐकली की, त्यांना ती मुखोद्गत होत असे. प्रज्ञा, प्रतिभा आणि परिश्रम यांचा प्रभावी संगम भोबे यांच्या जीवनात झालेला होता. त्यामुळे त्यांची प्रगतीही सर्वांगांनी आणि तितक्याच झपाट्याने होत राहिली.

वृत्तपत्रांतील किंवा मासिकातील नुसत्या स्फुट लेखनाने भोबे यांचे आता समाधान होईनासे झाले. त्यांना आपल्या मर्मज्ञ वाचकांना काही महत्त्वाच्या खास गोष्टी सांगाव्या असें वाटू लागले. त्यांचे संपूर्ण विचार, त्यांचे काही मूलग्राही विचार विस्ताराने येण्यास वृत्तपत्राचे स्तंभ अपुरे पडू लागले. शिवाय वृत्तपत्रीय लेखन हे बहुतेक वेळी प्रासंगिक स्वरूपाचे आणि क्षणजीवी असते. आपले स्वतःचे विचार हव्या तेवढ्या विस्ताराने यावे व ते दीर्घकालपर्यंत वाचकांपुढे रहावेत, या विचाराने त्यांनी ग्रंथलेखनाच्या विस्तृत क्षेत्रात पदार्पण केले. त्यांनी आपला स्वतःचा असा वाचकवर्ग– भक्तवर्ग आजपर्यंत प्रचंड प्रमाणात तयार केलेला होताच. त्यामुळे त्यांनी लिहिलेल्या सर्वच ग्रंथांचे रसिक वाचकांनी उत्स्फूर्त स्वागत सक्रीयपणे केले. श्री. भोबे यांनी चतुरंग रेखा, नाद, आलाप, सात स्वरश्री, माझा गोमंतक, भारताचे भाग्यविधाते, मासे आणि मी–इत्यादी पुस्तके लिहिली. त्यांच्या या ग्रंथांनी राष्ट्रपती पदक, सुवर्ण पदक व इतर अनेक पारितोषिके पटकाविली गायन, वादन, नृत्य, चित्र, शिल्प आणि अध्यात्मिक तत्त्वचिंतनपर असे विविधांगी विषयांवरील त्यांचे हे ग्रंथ म्हणजे लेखनशास्त्रातीलही महान आश्चर्यच समजावे लागेल. या सर्व ग्रंथांतील विविध विषयांवरील त्यांचे लेखन त्यांच्या मार्मिक व्यासंगाची आणि प्रचंड परिश्रमाची साक्ष पटविणारे आहे. आश्चर्य एकाच गोष्टीचे वाटते ते असे की, या मनु-

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

ष्याने इतक्या निरनिराळ्या विषयांचा मार्मिक अभ्यास केला तरी केव्हा व कसा ! त्यांच्या दुर्दम्य महत्त्वाकांक्षेस आता हेही क्षेत्र त्यांना अपुरे वाटू लागले. त्यांनी नाट्यलेखन क्षेत्रात पाऊल टाकून संगीतसम्राट तानसेन यांच्या जीवनावर आधारित "धन्य ते गायनी कळा" हे संगीतप्रधान नाटक लिहिले ! त्यांचे हे नाटक चांगल्या आणि वाईट अर्थाने त्यांच्या आजवरच्या कार्यांचा मुकुटमणी ठरले ! भोबे यांची धारणाशक्ती असामान्यस्वरूपाचीच होती. जुनी अनेक नाटके त्यांना मुखोद्गत होती. खासगी बैठकीत या नाटकांचे गद्य-पद्यांसह साभिनय असे तीन-चार तासांचे ते प्रात्यक्षिक करून दाखवीत. ती त्यांची मैफल अविस्मरणीय होत असे.

भोबे यांचे कोणत्याही विषयावरील ललित लेखन हे मुख्यतः अतिशय प्रसादपूर्ण असे. त्यांनी लिहिलेले एखादे समीक्षण असो, व्यक्ति-चित्र असो, एखादी लघुकथा असो किंवा एखाद्या संत-महंतावरील त्यांनी केलेले लेखन असो, त्यांत मुख्यतः त्यांना दैवाने लाभलेला प्रसाद हा गुण प्रामुख्याने दिसून येत असे. त्या त्या विषयाचा सखोल व्यासंग, कमालीची सहृदयता, सत्प्रवृत्ती, सद्धेतू, भाषेतील ओघ व सोपेपणा, स्वतःच्या विचारांवरील पूर्ण श्रद्धा—विश्वास आणि लेखनांतील सुटसुटीत-पणा इत्यादी गुणसमुच्चयांमुळे त्यांचे सारेच लेखन वाचकांच्या अंतः-करणाची समर्थपणे पकड घेई. त्यांचे पूर्वापारचे लेखन आणि त्यांचे नंतर नंतरचे लेखन यांचे थोडे सूक्ष्मपणे अवलोकन करणाऱ्यांना स्पष्टपणे दिसून येते की, विपुल लेखन करीत राहिल्याने त्यांच्या भाषेमधील गुणवत्ताही सतत वाढत राहिली होती. त्यांनी आपल्या वाचकांना सतत काहीना काही नवे व मौलिक असे विचारधन दिले. संगीतकलांदी कलांचा व्यासंग करणाऱ्यांना सदैव मार्गदर्शन केले. थोरामोठ्या कलाकारांना त्यांनी आणखी उंचावले. जरूर तेथे त्यांनी कान उघाडणीचाही कार्यक्रम न चुकता केलेला आहे. परंतु आपले लेखनास्त्र चालवताना कोणी जखमी होणार नाही, कोणाच्याही वर्मावर घाव बसणार नाही, याची सावधानता त्यांची एकूण सहृदयता नेहमीच वाळगीत असे ! परंतु नंतर काय झाले कोणास ठाऊक ! कोण्या अहंमन्य कलाकारांनी भोबे याना काही धडे दिले असावेत. त्यामुळे भोबे यांच्या मनात काही निराळ्याच

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

कल्पना येऊ लागलेल्या होत्या. त्या प्रकाराने ते बरेच चिडून गेले होते. त्या कलाकारांनी भोवे यांच्या स्वाभिमानास कोठेतरी डिवचले असावे– त्यांच्या अभिजात शालीनतेस जबरदस्त धक्का दिलेला असावा, असा मी तर्क केला.

सुमारे आठ वर्षांपूर्वी असेच एके दिवशी भोवे माझ्याकडे आले. इकडचे–तिकडचे काही बोलणे झाल्यानंतर ते मला म्हणाले, मारुलकर, आता यापुढचे माझे समीक्षण लेख जरूर वाचा. कलाकार हल्ली स्वतःला भलतेच समजू लागलेले आहेत. ते वाटेल ते प्रकार करू लागलेले आहेत. त्यांना वाटते आम्ही × × ×च आहोत. त्यांचे असले प्रकार यापुढे मुळीच चालू द्यावयाचे नाहीत, असे मी पक्के ठरविले आहे. अशा कलाकारांना याचवेळी झोडपून काढल्याशिवाय ते ठिकाणावर येणार नाहीत. मी आता हे काम हातात घेतलेच आहे. टाइम्स्कडे कालच मी तीन-चार लेख देऊन आलो आहे. ते तुम्ही अवश्य वाचाच ! श्री. भोवे यांचा मुद्दा मला तत्त्व म्हणून मान्य होता, परंतु तपशिलात तो अमान्य होता. त्याची कारणे अशी की, भोवे यांचे आजवर जे लेखन इतके लोकप्रिय झाले, त्याच्याशी ही विचारसरणी मुळांतच विसंगत असल्याने त्यांनी आपल्या आजपर्यंतच्या भूमिकेशी प्रतारणा करू नये असे माझे मत होते. दुसरे कारण असे की, अचाट मेहनत करून कलाकाराने आपली मैफल उभी करावयाची व एखाद्या समीक्षकाने वृत्तपत्रांतील आपल्या पाच-दहा ओळींच्या लेखणीच्या फटकाऱ्याने ती मैफल जमीनदोस्त करावयाची, हे एक अतिशय निर्घृण कृत्य आहे, यामुळे समीक्षकाने असले प्रकार कटाक्षाने टाळावे असे माझे मत आहे. दोन तंबोऱ्यांमध्ये बसून नुसता स्वरेल षड्ज् लावणे किंवा नुसता अस्ताई– अंतरा व्यवस्थित म्हणणे हीही गोष्ट सोपी नाही याची पूर्ण कल्पना माझ्याप्रमाणे भोवे यांनाही होतीच. अशी वास्तव परिस्थिती असताना कलाकार जखमी होईल किंवा जायबंदी होईल अशी समीक्षा लेखकाने का करावी? तसे करण्याचा त्याला अधिकार तरी कोणता ? आणखी एक कारण असे की, ज्यांना स्वतःच्या कलेत काही सुधारणा व्हावी असे तीव्रतेने वाटत

६

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

असते, त्यांच्या बाबतीत एखाद्या सूचक शब्दानेसुद्धा काम भागण्यासारखे असते. आणि जे "वनचुके" कलाकार असतात त्यांना कोणत्याही शब्दांत– कितीही सांगितले तरी त्याचा काहीही उपयोग होत नाही. एखाद्याला तू "काळाकुट्ट" आहेस असे कुणी म्हटल्यास त्याला राग येईल, परंतु तू "सावळा" आहेस असे म्हटले तर त्याला गुदगुल्या होतात. "तू ही चूक केलीस" असे न म्हणता "तसं न करता असं केलं असतंस तर ते उत्तम झालं असतं" असं सांगणं हे ऐकणाऱ्याला सुखावह होतं. वस्तुतः दोन्ही पद्धतींचे कार्य एकच आहे. शहाणा मनुष्य त्यातून बरोबर अर्थ काढू शकतो. शिवाय ज्याच्या अंगी शहाणपण नसेल त्याला कोणत्याही शब्दांत कितीही सांगितले तरी ते व्यर्थच जाते. आणि शेवटी अशा समीक्षकाबाबत द्वेष–तिरस्कार यांचीच फक्त निर्मिती होते. आणि शेवटचे एक कारण असे की, आपल्याकडे निदान संगीतकलेच्या प्रांतातील समीक्षाशास्त्र अजून तरी फारसे प्रगल्भ झालेले नाही. आपल्या स्वतःच्या कलात्मकतेविरुद्ध असलेली समीक्षा खेळाडूवृत्तीने स्वीकारून तिच्या योग्यायोग्यतेचा प्रामाणिकपणे काही विचार करावा, ही सवय आमच्या कलावंतांत अद्यापतरी निर्माण झालेली नाही. इतकेच नव्हे तर, अशा समीक्षेवर त्या स्वतः कलाकारापेक्षाही त्याचा भक्तगण अस्तन्या सारून मोठ्या त्वेषाने उभा रहातो. अशा काही मान्यवर समीक्षकांना धमकीची पत्रेही आल्याची उदाहरणे घडलेली आहेत… …माझे हे सर्व विचार भोबे यांना मी विस्ताराने ऐकविले, परंतु त्यांचा हट्ट कायमच होता !

आमच्या या चर्चासत्रात अनेक विषय चर्चिले गेले. भोबे हे मुख्यतः उस्ताद बडे गुलामअल्लीखाँसाहेब यांच्या रसील्या गायकीचे एकनिष्ठ भक्त होते, आणि ते योग्यही होते. त्यांच्या गाण्याचा विषय निघाल्यानंतर गायकीमध्ये शब्दार्थ व त्यांच्या अनुषंगाने भावपूर्ण गायकी कशी झाली पाहिजे, यांचे ते फारच मार्मिकतेने विवेचन करीत. भोबे यांच्या मताशी या बाबतीत मी सहमत नव्हतो. हे त्यांनाही माहीत होते. मी त्यांना सांगितले, आमच्या अभिजात ख्यालगायकीमध्ये स्वर हाच सर्वसमर्थ आहे व तो तसाच राहिला पाहिजे. ख्यालगायकीतील भावनिर्मितीचे सर्व कार्य मुख्यत्वेकरून स्वरांमार्फतच झाले

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

तरच ती गायकी समर्थ आहे असे म्हणता येईल. नुसत्या स्वरांमध्ये हे सामर्थ्य निश्चितपणे आहे, हे फैय्याजखाँच्या निःशब्द नोम्तोम्ने सिद्ध करून दाखविलेले आहे. बंदेअल्लीखाँच्या स्वरास्वराने वझेबुवांसारख्या गायनाचार्यांना वेड लावले होते. ख्यालगायकीने स्वतःचे सामर्थ्य विसरून शब्दांच्या साहित्यिक कुबड्या वापरणे हे तिच्या असमर्थतेचे मोठे लक्षण आहे. शिवाय ख्यालाच्या विलंबित अवस्थेत शब्द जसेच्या-तसे नीट राहू शकतात का ? कोणत्याही गायकीत तिचा शास्त्रीय दर्जा ज्या प्रमाणात कमी कमी होत जाईल त्या प्रमाणात ती शब्दार्थाकडे स्वाभाविकपणेच झुकते. आणि म्हणूनच ठुमरीसारख्या प्रकारात स्वर हे त्या प्रमाणांत शब्दाश्रित बनतात. मात्र याचा अर्थ असा मुळीच नव्हे की, चिजा अशुद्ध गाव्यात, शब्दांचे उच्चार वेडेवाकडे करावेत किंवा शब्दांची मोडतोड कशीही करावी ! कारण हे सर्व कृत्य कलेच्या सौंदर्याला पूर्णतः विघातक असेच आहे. दुसरा एक मुद्दा असा की, ख्यालगायकीसाठी ज्या चिजांची रचना झाली त्यांच्यात काव्यगुण असे कोणते असतात ? काव्य—वाङ्मयकल्पना कोणत्या असतात ? वर्ण्यविषय तरी कितीसे असतात ? केवळ पाच-चार वर्ण्य विषयांनीच आमच्या ख्यालीसंगीताचा सारा प्रपंच समृद्ध झालेला आहे. त्यात काव्यविषयाला काही मानाचे स्थान असते तर अशा रचना पूर्वीच झाल्या असत्या. आणि आश्चर्य असे की, आजही नवीन नवीन रचना होत असूनसुद्धा विषय मात्र पूर्वीपारचेच आणि त्यातील शब्दभांडारही पूर्वीपारचेच ! याचाच सुस्पष्ट अर्थ असा की, ख्यालीसंगीत हे मुख्यतः स्वराश्रितच आहे ! ...भोव्यांच्याशी झालेल्या या चर्चेत आणखी एक विषय निघाला तो, "संगीतातील घराणी" हा. या बाबतीतील भोवे यांची नेमकी मते काय आहेत, याची मला पूर्ण कल्पना नव्हती. परंतु माझी स्वतःची मात्र या बाबतीत काही मते अगदी पक्की होती. संगीतात घराणी ही असलीच पहिजेत, हे माझे कायमचे मत होते. अमुक एक घराणेच फक्त चांगले आणि बाकीची वाईट आहेत, हीही कल्पना मला कधीच शिवलेली नाही. प्रत्येक घराणे आपापल्या गुणवैशिष्ट्यांनी समृद्ध आहे, तितकेच ते परिपूर्ण आहे. घराणी ही एक जुनी संस्था आहे आणि या एकाच कारणास्तव "जुने ते सोने" या न्यायाने ती

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

टिकली पाहिजेत, अशीही बावाशाही कल्पना माझ्या वरील मताच्या मुळाशी मुळीच नाही. घराण्याची गायकी म्हणजे काही नेमकी रीत, काही नेमकी शिस्त यांचा पक्का आराखडा होय. प्रत्येक घराण्याच्या गायकीत काही विधी व काही निषेध अत्यावश्यक असतात. अमुक गोष्ट आवर्जून करावी व अमुक गोष्ट आवर्जून टाळावी हे संकेत हे प्रत्येक घराण्याचे मूलभूत वैशिष्टच आहे. अशा विधि-निषेधांनीच प्रत्येक गायकी समृद्ध झालेली आहे व तिच्यात आवश्यक तो दर्जा निर्माण झालेला आहे. सर्वांगीण समृद्धी ही परंपरेनेच निर्माण होते. घराण्यांमुळे श्रद्धास्थान निर्माण होते आणि श्रद्धा कोठे तरी असणे हे कोणत्याही ज्ञानसाधनेस अतिशय आवश्यक आहे. घराणेदार गायक व अन्य गायक यांची कलात्मकता सूक्ष्मतेने पाहूनच ही माझी मते वनलेली आहेत. अर्थात घराण्याच्या नावाखाली काही व्यक्तिगत चुका पूर्वी झाल्या असतील– आज होत असतील, तर त्या चुकांचे खापर घराण्याच्या माथी मारण्याचेही कारण नाही ! ... माझे हे विचार भोबे यांना अगदी नवीन असे मुळीच नव्हते, त्यामुळे त्यांची प्रतिक्रिया काय झाली हे समजणे कठीण होते. अशा तऱ्हेची आमची चर्चा झाल्यानंतर भोबे उठले. निरोप घेऊन जाता जाता " माझे लेख जरूर वाचा हं ! " असे मला पुन्हा बजावून सांगून ते निघून गेले.

'महाराष्ट्र टाइम्स' मधून येणारे त्यांचे समीक्षा लेख मी अगदी बारकाईने वाचू लागलो होतो. त्यांनी कलाकारांवर अगदी दुधारी शस्त्र उचलले होते. त्यांची टीका आमच्या कलाकारांना व विशेषतः त्यांच्या भक्तांना मुळीच पचण्यासारखी नव्हती. हळूहळू त्यांच्या टीकेचे कडवट आणि जहरी पडसाद माझ्या कानांवर सतत येऊ लागले. मला मनातून अतिशय वाईट वाटे. परंतु त्याचवरोवर एक रास्त आशा माझ्या मनात ठाण मांडू लागली. भोबे यांच्या मनाचा आणि लेखनाचा हा मूळ धर्म नाही. त्यामुळे या प्रकारापासून आज ना उद्या ते स्वतःच परावृत्त होतील. कारण भोबे स्वतः अतिशय हळूवार मनाचे व कमालीचे भावप्रधान गृहस्थ होते. आनंदाच्या किंवा किंचित् दुःखाच्या प्रसंगानेसुद्धा त्यांच्या डोळ्यांतून गंगा-जमुना वाहू लागत. अशा कोमल अंतःकरणाचा व दयार्द्र बुद्धीचा मनुष्य हे टीकास्त्र फार काळ हाती पेलू

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

शकणार नाही, अशी मला खात्रीं वाटत होती. परंतु या खात्रीचा पडताळा पाहण्याची संधीच दुर्दैवाने मिळाली नाही !

श्री. गोपालकृष्ण भोवे यांचे सारेच जीवनचरित्र एका दृष्टीने अद्‌भुत आहे. जीवनातील एकूण कर्तबगारीचे ते एक ज्वलंत प्रतीक आहे. त्यांच्या एकूण लेखनकार्याचा विचार करता त्यांना उणीपुरी दहा वर्षेसुद्धा मिळाली नाहीत. इतक्या अल्प काळात त्यांनी आठ-नऊ पुस्तके लिहिली. आणि तीही निरनिराळ्या विषयांवरची. त्यांनी एकूण जे स्फुट लेखन केले तेही हजारो पृष्ठांचे केले. संगीतावर भोव्यांच्या-इतके ललित लेखन करणारा अन्य लेखक माझ्या पाहण्यात नाही.

जांवावली येथील श्रीदामोदर हे भोवे यांचे कुलदैवत. या दैवता-वर आणि गोमंतकावर त्यांचा अपार भक्तिभाव—पूर्ण श्रद्धा होती. त्यांनी याच देवालयात मुद्दाम येऊन नवीन नाटक लिहिण्याचा संकल्प केलेला होता. त्यानुसार त्यांचे नाटचलेखन मुंबईस जोरात सुरू झाले—यथाकाल ते पूर्णही झाले !

एका नृत्य कार्यक्रमाच्या समारंभासाठी श्री. भोवे हे खास निमंत्रित म्हणून मुंबईहून पुण्यास मुद्दाम आले होते. तेथे त्यांची-माझी भेट झाली. त्यापूर्वी जवळ जवळ आठ दिवस तरी रोज कार्यक्रम, रोज जागरण, दिवसा प्रवास आणि अशा भाऊगर्दीतून ते टाइम्समध्ये देण्या-साठी सतत लिहित असलेले कार्यक्रमवृत्त—समीक्षा लेख,—असा त्यांचा अविश्रांत कार्यक्रम चालू होता. आणि या कार्यक्रमानंतर लगेच मुंबईला होणाऱ्या दोन कार्यक्रमांच्या त्यांनी सुपाऱ्या घेतलेल्या होत्याच. भोवे मला यावेळी थोडेसे थकल्यासारखे, पांढरे फटक आणि थोडे निस्तेज वाटले. मी त्यांना सहज विचारले, काय भोवेसाहेब, नवीन काय चालले आहे ? भोवे म्हणाले, " अहो काय चाललं आहे म्हणजे काय, माणसानं सतत चालत राहिलंच पाहिजे ! " इतके सांगून " थांवला तो संपला " हीही माधव ज्यूलियनांची काव्यपंक्ती त्यांनी ऐकविली.

त्यांच्या-माझ्या या भेटीनंतर मध्यंतरी फक्त सहाच दिवस गेले. त्यांचे नवे नाटक लिहून पूर्ण झाले होते. ते नाटक आपल्या कुलस्वामींच्या

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

चरणी वाहण्यासाठी आणि नाटकाचा मुहूर्त करण्यासाठी मडगावच्या नाट्यसंमेलनाच्या शुभप्रसंगी "गोवा हिंदू असोसिएशन"सह ते मडगावी आले. तेथून ते रात्रौ जांवावलीच्या श्रीदामोदर मंदिरात येऊन भजनाच्या ताफ्यात बसून भजन करू लागले. काही वेळाने त्यांच्या हाताला मुंग्या येऊ लागून त्यांना अतिशय त्रास होऊ लागल्याने त्यांना मडगाव येथील हॉस्पिटलमध्ये पोचते केले.... आणि काही वेळानेच दि. १३ फेब्रुवारी १९६८ या दिवशी ते कुलस्वामींच्याचरणी अंतर्धान पावले. ही सर्व दुःखद बातमी मी दुसरे दिवशी वृत्तपत्रांतून वाचली. कपाळाला हात लावून बसलो ! मनात कल्पना आली– कै. गोपालकृष्ण भोबे यांनी 'तानसेन' नाटक श्रीचरणी वाहिले...गड आला पण सिंह गेला ! सारा महाराष्ट्र हळहळला. घरच्या माणसाच्या मृत्यूचे दुःख करायला फुरसत नाही, अशा आजच्या जगात भोब्यांच्या निधनाच्या वार्तेने असंख्य डोळे ओले झाले. साऱ्या वृत्तपत्रांच्या अग्रलेखांनी भोबे यांना अखेरची मानवंदना दिली. अनेक शोकसभा झाल्या. या थोर संगीतज्ज्ञाला संगीताचे कार्यक्रमाने श्रद्धांजली वाहण्यात आली. जनमानसातील भोबे यांचे स्थान कोणते होते हे त्यांच्या जीवनापेक्षाही त्यांच्या मृत्यूने अधिक प्रकट केले. "मरावे परी कीर्तिरूपे उरावे" हाच दिव्य संदेश आम्हांला देऊन ते आमच्यांतून निघून गेले !

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

श्रीमती केसरबाई केरकर

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri



सूरश्री केसरबाई केरकर !

सुमारे पन्नास-साठ वर्षांपूर्वी दक्षिण महाराष्ट्रातील सांगली ही नगरी खऱ्या अर्थाने गंधर्वनगरी होती. सांगली संस्थानचे राजवैद्य श्री. आबासाहेब सांभारे यांच्याकडील श्रीगणेशोत्सवाच्या निमित्ताने रहिमानखाँ, अल्लादियाखाँ आणि पं. बाळकृष्णबुवा इचलकरंजीकर हे तिन्ही गायनाचार्य श्री. आबासाहेब यांचेकडे आवर्जून येत असत. आणि आल्यानंतर ते चार-दोन महिने तरी रहात. त्या वेळी या सर्वांचे रात्रंदिवस गाणे चालू असे. मी मध्यंतरी काही वर्षे सांगलीस राहत असे. एका वर्षी सांगलीस प्लेगची जोराची साथ आल्याने गावाबाहेरच्या एका शेतात मोठा मंडप टाकून तेथे श्रीगणेशोत्सव साजरा करण्यात आला. अशाच एका सकाळच्या वेळी अल्लादियाखाँसाहेबांची सकाळची मैफल साजरी झाली. गोविंदराव टेंब्यांच्यासारखे अनेक रसिक समोर बसले होते. गाणे खूपच रंगले होते. खाँसाहेबांच्या मागे तंबोऱ्याच्या साथीस त्यांच्याच दोन शिष्या बसलेल्या होत्या. त्यांपैकी एक केसरबाई या होत्या. आम्हा विद्यार्थ्यांना ही माहिती आमच्या गुरुजींनी दिली. माझे वय त्या वेळी नऊ वर्षांचे

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

असेल! यानंतर केसरबाई यांच्या गाण्याचा योग १९३४ साली मुंबई येथे आला.

सौ. हिराबाई बडोदेकर यांचेसमवेत शमसुद्दीनखाँ, बाबूरावजी कुमठेकर आणि मी भावनगर येथे राजघराण्यातल्या एका लग्न-समारंभासाठी गेलो होतो. तेथून परत येताना हिराबाईंनी सर्वांना विचारले, 'परवा दिवशी लक्ष्मीबाग सर्कलमध्ये केसरबाईंचं गाणं आहे, तुम्ही येणार आहात का?' सर्वांनी तिकीटे आधीच काढली होती आणि ते कार्यक्रमाला जाणारही होतेच. फक्त मलाच माहिती नसल्याने मी त्यांना 'मला यायचं आहे' असे सांगून त्यांच्यात सामील झालो. त्यानुसार ठरलेल्या दिवशी नियोजित वेळेवर मी कार्यक्रमाचे स्थळी उपस्थित झालो. सभागृह अगदी भरगच्च झालेले होते कोणत्याही कलेत तिचे स्वागत करणाऱ्या रसिकांच्या सांस्कृतिक दर्जावरच त्या त्या कलात्मकतेचे स्थान निश्चित होत असते. सुसंस्कृत रसिक हेच उच्च कलाकृतीचे निश्चित परिमाण असते. गंधर्व नाटक मंडळीच्या नाटकांचे प्रेक्षक आणि आजकाल साजऱ्या होणाऱ्या 'फार्सिकल' नाटकांचे किंवा 'अतिग्रामीण' बोलपटांचे प्रेक्षक क्षणभर नजरेसमोर आणल्यास वरील विधानाचा निश्चित असा बोध होण्यासारखा आहे! या गाण्याचे श्रोते म्हणून नटसम्राट बालगंधर्व, गोविंदराव टेंबे, सौ. हिराबाई बडोदेकर, विलायत हुसेनखाँ अशांसारखे मुंबईतील सर्व मातब्बर कलाकार, मुंबापुरीतील उच्चपदस्थ अधिकारी आणि धनाढ्य अशा निवडक रसिक श्रोत्यांनी भरगच्च झालेले ते सभागृहसुद्धा नुसते पहात बसावे अशा दर्जाचे वाटत होते. बाई केसरबाई सस्मित वदनाने नमस्कार करून मध्यंतरी तंबोरा घेऊन बसल्या. समोरच्या सर्व श्रोत्यांवर अत्यंत विश्वासपूर्वक एकवार दृष्टिक्षेप टाकून बाईंनी सुदीर्घ मोकळा आणि दमदार षड्ज लावून विलंबित आडचा चौतालातील ख्यालास सुरवात केली. मैफल एकसारखी सतत रंगतच गेली. सुमारे तीन तास गाऊन त्यांनी आपली मैफल बंद केली. या मैफलीतील 'छायानट' हा एकच राग सोडल्यास अन्य कोणत्याच रागाचा कोणालाही पत्ता लागला नाही. त्या काळी रागांची चर्चा करणे, राग-रागिण्यांची वंशावळ भर मैफलीतच शोधीत बसणे, असले प्रकार करण्याचा रसिकांना सराव नव्हता. नाद-

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

ब्रह्माच्या अंतिम साक्षात्कारात वाणी थिटी पडावी आणि भावनेला पंख फुटावेत हेच खरे ! या मैफलीत सर्व रसिक श्रोत्यांच्या अंतरीचा सूर एकच होता–"अशी गायिका पुन्हा होणार नाही आणि असं गाणं पुन्हा ऐकायला मिळाणार नाही !" या संगीत शारदेला मनोमनी प्रणिपात करून मैफलीच्या धुंद-बेहोषीत सर्व श्रोते सभागृहाबाहेर पडले !

'कलाकार जन्माला यावा लागतो' अशा अर्थाची एक इंग्रजी म्हण आहे. याचा नेमका अर्थ काय ? आजपर्यंत असा एकही कलाकार झालेला नाही की, स्वतःच्या जीवनात कोणत्याही प्रकारचे काहीही प्रयत्न न करता त्याने कलेच्या प्रांतात अद्वितीय यश मिळविलेले आहे ! वरील म्हणीचा खरा अर्थ असा आहे की, निसर्गाने ज्या काही गोष्टी दिल्या असतील, त्यांचा प्रयत्नपूर्वक आणि चिंतनपूर्वक जास्तीतजास्त उपयोग करून घेणाराच शेवटी कलाकार या पदवीला पोचतो. सामान्य मनुष्याला आपला नेमका निसर्ग कोणता आहे, कसा आहे याचा बोध होत नाही. चिंतन म्हणजे नेमके काय आणि ते कसे करावे याचे आकलन होत नाही आणि म्हणूनच साधना करणारी सर्वच माणसे खऱ्या अर्थाने कलाकार या पदवीला पोहोचू शकत नाहीत. शिवाय कोणताही विषय साध्य करून घेण्यासाठी जी तळमळ आणि व्याकुळता असावी लागते, तिचा तर सामान्यतः अभावच असतो. आणि म्हणूनच या सर्वांचा निष्कर्ष 'कलाकार जन्माला यावा लागतो' या एका वाक्यातच काढला जातो आणि तो अगदी योग्यही आहे. केसरबाई यांच्या अंगी हे सर्व गुण अगदी प्रकर्षाने वास करीत होते म्हणूनच त्या संगीतकलेच्या अंतिम अवस्थेप्रत पोचल्या. केसरबाईंनी स्वतःची संगीतसाधना किती कष्टाने पार पाडली आणि त्यांचे कलात्मक विचार वाचकांपर्यंत विस्तृतपणे व शक्य तो त्यांच्याच शब्दांत पोचते व्हावेत या हेतूने खुद्द केसरबाईंच्याच कथनाची अवतरणे प्रस्तुतच्या लेखात देण्याचा प्रयत्न केलेला आहे.

गोमंतकातील केरी ह्या खेड्यात दि. १३ जुलै १८९३ या दिवशी केसरबाईंचा जन्म झाला. त्यांच्या घरातील सर्वांनाच संगीताची थोडी फार जाणकारी होती. या घराण्याच्या उपजीविकेचे संगीत हेच मुख्य साधन होते. त्यामुळे संगीत शिक्षणाची त्यांना अतिशयच आवश्यकता होती. या बाबतीत बाई स्वतः म्हणतात, 'माझ्या संगीताच्या बाबतीत

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

मान, व्यवहार आणि निसर्ग यांचा समसमा संयोग झाला. या संयोगा-तच आणखी एका गोष्टीची भर पडली. ती गोष्ट म्हणजे संगीतातील माझे गम्य– आकलनशक्ती! मला हे स्पष्टपणे लिहिलेच पाहिजे की, संगीताच्या वावतीत केवळ आवड असून भागणार नाही, तिच्या जोडीला तीक्ष्ण बुद्धिमत्ता आणि ग्रहणशक्तिपण हवी.'

केसरवाईंची गाण्यातील गती आणि नैसर्गिक आवड पाहून त्यांच्या घरच्या वडील मंडळींनी त्यांना गाण्याचे शास्त्रशुद्ध शिक्षण देण्याचे ठरविले. परंतु ही सोय केरीमध्ये नव्हती. त्यामुळे कोणाकडे शिकवायचें, हा मोठाच प्रश्न होता. यावावत वाई म्हणतात, 'कोणत्याही गोष्टीची आवड आणि तळमळ असली व मेहनत करण्याची ईर्ष्या असली तर प्रतिकूल परिस्थितीतही कोणत्याही अडचणींवर मात करता येते. या मार्गाने कोणालाही आपले ध्येय साध्य करून घेता येण्याची शक्यता आहे.' केसरवाईंच्या या श्रद्धेमुळेच त्यांच्या संगीत शिक्षणाचा प्रश्न यावेळी सुटला. यावेळी वाईंचे वय दहा-अकरा वर्षांचे होते. केरीपासून चार-पाच कोसांवर असलेल्या डिचोलीनजीक लामगाव या गावात स्वर्गीय रामकृष्णबुवा वझे हे श्रीमान लामगावकर यांचेकडे रहात असत. भेटीअंती बुवांनी केसर-वाईंना शिकविण्याचे मान्य केले. त्यानुसार ही तालीम सुरू झाली. ही तालीम दोन वर्षेपर्यंत नियमित चालली. परंतु व्यवसायामुळे बुवांना फिरतीवर जावे लागत असल्याने तालमीला हळूहळू अनिय-मितपणा येऊ लागला. नाइलाजाने तालीम बंद झाली. याचवेळी वाईंनी निराश व्हावे अशा काही घरगुतीही घटना घडल्या. त्यांची गाण्यात प्रगतीही वरीच झाली होती. आता दुसरा गुरु शोधणे प्राप्त झाले. परंतु तो मिळणार कसा? वाई अगदी बेचैन झाल्या. वाई म्हणतात, 'मनात शिक्षणाची जवरदस्त इच्छा होती पण मार्ग मात्र दिसत नव्हता. मी बेचैन झाले होते!'............समस्त केरकर कुटुंवाने गाण्याच्या शिक्षणासाठी गाव सोडून १९०८ साली मुंवईस प्रयाण केले. मुंवईस आल्यानंतर सुप्रसिद्ध सतारिये उस्ताद बर्कतुल्लाखाँ-साहेव यांचेजवळ केसरवाईंची तालीम सुरू झाली. ही तालीम अखंड-पणे पाच वर्षे चालू होती. सर्व काही उत्तम चालले होते, परंतु 'अगम्य

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

असे विधिघटना ' या न्यायाने वर्कतुलाखाँसाहेबांना पतियाळा संस्थानच्या नोकरीचे खास निमंत्रण आल्यामुळे ते तिकडे जाऊन स्थायीक झाले. त्यामुळे योग्य गुरु शोधण्याचा पुन्हा एकदा प्रयत्न सुरू झाला. पं. भास्कर-बुवा बखले यांच्यासारखा योग्य थोर गुरु त्यांना लाभला. तालीम सुरू झाली, परंतु याचवेळी पुण्याला एक गायन समाज काढण्याच्या उद्योगात ते असल्याने त्यांचे पुण्याला वरचेवर जाणे-येणे होई. याशिवाय मैफलीं-साठीही त्यांचे बाहेरगावी सतत जाणे होई. अखेर ही तालीमही वर्ष-भरातच बंद पडली. परंतु बाईंना आता ही सवयच झाली होती. त्यांचा धीर खचला नाही. संगीतावरील त्यांची श्रद्धा अणूमात्रहीं कमी झाली नाही. आता त्यांची जिद्द शतपटीने वाढली होती. त्या पुन्हा योग्य गुरु शोधू लागल्या ! पुनःश्च हरि ओम् ! उ. वर्कतुल्लाखाँ व अल्लादियाखाँसाहेब यांचे पूर्वापारचे स्नेहसंबंध होते. शिवाय अल्लादियाखाँ हे भास्करबुवांचे गुरूही असल्याने केसरबाईंचे घरी खाँसाहेबांचे जाणे–येणेही होतेच. योग्य वेळ पाहून बाईंनी खांसाहेबांना आपल्याला तालीम द्यावी, अशी नम्रतेने विनंती केली. परंतु खांसाहेबांनी ' चालले आहे ते उत्तम आहे ' असे सांगून वेळ मारून नेली. बाईंनी मात्र ' खाँसाहेबांकडेच शिकायचं ' असा निर्धार केला होता. करवीरचे छत्रपती शाहू महाराज, कलकत्त्याचे संगीताचे कमालीचे षौकीन आणि धनाढ्य शेठ लाला दुनीचंद आणि मुंबईचे श्रीमान शेठ विठ्ठलदास द्वारकादास या तिघांनी या कामी खूप प्रयत्न केले. परमेश्वरकृपेने अखेर यश आले ! खांसाहेबांनी पाच कडक अटी घालून तालीम सुरू करण्याचे मान्य केले. मात्र या सर्व अटींचा साकल्याने विचार केल्यास असेच स्पष्टपणे दिसून येते की, केसरबाईंच्या हातून या घराण्याच्या गायकीची सेवा उत्तम तऱ्हेने पार पडावी, त्यांची प्रगती आदर्शस्वरूपाची व्हावी, तालमीमध्ये दीर्घकालपर्यंत-दहा वर्षे-सातत्य राहावे, गुरु आणि शिष्य या दोघांनाही भव्य यश प्राप्त व्हावे, दोघांपैकी कोणाचेही (आणि पर्यायाने जयपूर घराण्याचे) नाव खराब होऊ नये; हाच हेतू या अटी घालण्यामागे स्पष्टपणे होता. यावेळी खांसाहेबांचे वय सहासष्ट वर्षांचे होते. या वयात अर्थार्जिनासाठी वणवण करण्याचा प्रसंग आल्यास केसरबाईंना तालीम देण्याचे काम निर्वेधपणे आणि निश्चितपणे होऊ शकणार नाही.

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

म्हणून या पाच अटींपैकी एक अट आर्थिक बाबतींतील होती. या सर्व अटी खाँसाहेबांनी सन्मान्य धोरणाने आणि विलक्षण द्रष्टेपणानेच घातलेल्या होत्या. या सर्व घटनेतून जी एक असामान्य कलाकृती निर्माण झाली आणि जी कलाकृती संगीताच्या क्षेत्रात अद्वितीय ठरली, त्याच दृष्टिकोनातून विचार करता या सर्वच अटी नुसत्या योग्यच नव्हेत तर अत्यावश्यक स्वरूपांच्या होत्या! दि. १ जानेवारी १९२१ या शुभ-दिनी मुंबई येथे केसरबाईंचा गंडा-समारंभ झाला. मुंबईतील अनेक ख्यातनाम कलाकार आणि थोरा-मोठ्या मान्यवर व्यक्तींच्या साक्षी-पुराव्याने गुरु-शिष्यांनी कलासेवेची जबाबदारी स्वीकारली. या 'सोनिया'च्या दिवसाची नोंद, गोमंतकाच्याच नव्हे तर शास्त्रीय संगीताच्या भारतीय इतिहासातील महत्त्वपूर्ण घटना म्हणून सुवर्णा-क्षरांनीच झालेली आहे.

हा समारंभ साजरा झाल्यानंतर ज्ञानार्जन आणि ज्ञानदान ही कामे कशी सुरू झाली हे खुद्द केसरबाईंच्याच शब्दांत सांगितलेले बरे. बाई म्हणतात, 'एकदा शिकवण्याचं कबूल केल्यानंतर खाँसाहेबानी शिकव-ण्याचे बाबतीत केव्हाही आळस केला नाही. शिक्षण सकाळी ८ वाजता सुरू होई ते दुपारी १ वाजेपर्यंत चाले. त्यानंतर दुपारी ४ वाजता पुन्हा सुरू होई ते ८ वाजेपर्यंत चाले. त्याशिवाय पहाटे ५।। वाजता उठून ७।। पर्यंत मीं मंद्रसाधन करीत असे ते निराळेच.' केसरबाई पुढे म्हणतात— "आधी मुष्किलीनं खाँसाहेब शिकवण्यास तयार झाले, तेव्हा आपल्याकडून काही चूक झाल्यास— आळस झाल्यास त्यांची मर्जी केव्हा फिरेल याचा नेम नसल्यामुळे ते सांगतील त्याप्रमाणं मी शिकण्यास प्रारंभ केला. पहिल्या पहिल्यानं इतका वेळ एके जागी बसणं कठीण गेलं पण पुढं सवय झाली. त्यातच पहिल्या पंधरा दिवसांत माझा आवाज बसला. कधी कधी तर बोलणंही कठीण होई. फारच त्रास होऊ लागला तर दोन-तीन दिवस विश्रांती मिळे पण पुन्हा तालीम सुरू होई. खाँसाहेब म्हणत, 'बेटा, तुझा आवाज जाणार नाही, काळजी करू नकोस. जेवढा आवाज काढणं शक्य आहे तेवढाच काढ, पण मेहनतीत खंड पडता उपयोगी नाही. यातूनच तुझा आवाज बनणार आहे.' खाँसाहेबांनी सांगितलं

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

तसंच झालं. बरोबर सहा महिन्यानंतर माझा आवाज थोडा थोडा सुटू लागला. आणि पुढं दोन महिन्यांत पूर्ण मोकळा झाला. यानंतर माझी मलाच गंमत वाटू लागली. आवाज केव्हाही लागू लागला. त्यात एक तऱ्हेचा जोर उत्पन्न झाला, झार आली व मनात असेल तसा तो फिरवता येऊ लागला." याच संदर्भात केसरबाई पुढे म्हणतात, 'खाँसाहेबांनी प्रथम तोडीची तालीम सुरू केली. याच रागात त्यांनी माझ्याकडून सर्व तऱ्हेची मेहनत करून घेतली. एक साधा आरोहा-वरोहाचा सरळ पलटा ते सांगत व मी तो घोटणे सुरू करी. त्यात काही चूक झाली की ते दुरुस्त करीत. तो एकच पलटा मी तासन्तास गात असे व खाँसाहेब समोर बसून तो ऐकत. एक पलटा झाला की ते दुसरा सांगत. तो दहा-पंधरा दिवस चाले, मग तिसरा सांगत. एक-एक पलटा मी लाखो वेळा घोटला असेल. हे सर्व पलटे अत्यंत सावकाश लयीत घोटण्यावर त्यांचा फार कटाक्ष असे.' केसरबाईंच्या साधनेचा मार्ग वाचकांना काही प्रमाणात तरी समजावा आणि मुख्यतः संगीताची साधना करणाऱ्या आजच्या व उद्याच्या कलासाधकांना या भव्य कलाकृतीच्या पायाभरणीची काही स्थूल कल्पना यावी याच एका उद्देशाने वरील अवतरणे देण्याचा प्रयास केलेला आहे !

जयपूर घराणे हे मूलतः धृपदियांचे ! त्यामुळे या गायकीत धृपद व होरी या अंगाचे मुख्यतः दर्शन होते. दोन्ही अंगे कमालीच्या रसवत्तेने मुरवूनच ही ख्यालगायकी तयार झालेली आहे. त्यामुळे या घराण्याच्या ख्यालगायकीत होरी–धृपदाचे गांभीर्य आणि कलात्मक भव्यता यांचे सतत दर्शन होते. आलापींतील प्रत्येक स्वरच मागच्या किंवा पुढच्या कणाने आला पाहिजे ही या गायकीची प्रणाली आहे. मात्र हे कणस्वर ठुमरी किंवा गझल या ललित प्रकारांतील कणांप्रमाणे तुटक आणि खटक्याने न येता मींड-घसीटनेच यावेत व अशा कामगतीत बीन अंगाचे जास्तीतजास्त दर्शन घडले पाहिजे ही या गायकीची मूळ गरज असते. गायकीमध्ये दमसास उत्तम रहावी, कोठेही तुटकपणा येऊ नये याची दक्षता अगदी प्रथमपासूनच घेतली जाते. यासाठीच काही खास अभ्यास आहेत, आणि हे अभ्यास सुरुवातीपासूनच अगदी कटाक्षाने करून घेतले जातात. आवाजाचा लगाव स्वच्छ 'आ'कारयुक्त असावा, तो वेडा-

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

वाकडा किंवा ओंगळ असू नये. तो तिन्ही सप्तकांत एकसारख्या उच्चाराने आणि एकसारख्या कसानेच वापरला गेला पाहिजे ही सावधानता सदैव राखली जाते. गायकीतील प्रत्येक स्वर– प्रत्येक कण लयीच्या सूत्रातच गुंफलेला असला पाहिजे. गायकीचे निरनिराळे आकृतिबंध स्वरांगाप्रमाणेच तालांगानेही व्हावेत हीच तालीम या गायकीत असते. स्वच्छ आकारयुक्त तानेत दाणेदारपणा, गमक आणि सूर रहाणे ही जयपूर गायकीची खास निशाणी आहे. आकृतिबंध निर्माण करणारे लयीचे सौंदर्यदर्शी आघात, या गायकीमध्ये सौंदर्याची विलक्षण भर टाकतात. धृपदीगायकीची मूळ बैठक असलेल्या या गायकींत बोल–उपज अंग अतिशय रेखीवपणे येतें आणि ते अगदी अपेक्षितच आहे. समेवर अतिशय रेखीवपणे आणि अचूकपणे येता येणे हे कोणत्याही गायकीच्या अंतिम आनंदाला विशेष अपेक्षित असे कलात्मक कार्य असतें. जयपूर गायकीत या अंगाचा कमालीचा परि-पोष झालेला आहे. प्रसिद्ध आणि विशेषत: अप्रसिद्ध राग या घराण्याचे गायक मोठ्या अधिकारपूर्वक गातात. आडा चौताल आणि विलंबित त्रिताल या दोन तालातील ख्याल जयपूर गायकीत प्रामुख्याने दिसून येतात.

या घराण्याच्या गायकीत ख्यालाची सुरुवातीस जी लय ठेवली असेल त्या लयीतच तो ख्याल अगदी सर्वांगांनी गाऊन पुरा केला पाहिजे हा या गायकीतील अगदी कडक नियम आहे. ख्यालाच्या मूळच्या एकाच लयीत सवाईदिडी किंवा अन्य कोणत्याही पटीत रेखीव आणि अचूक तान-पलटे करण्याचे अजब कसब हे या गायकीचे महत्त्वाचे व प्रमुख अंग आहे. त्याचप्रमाणे या गायकीत ‘ तिहाई ’सारखे प्रकार कलाविघातक आणि म्हणूनच निषिद्ध समजतात. याच वेळी जाता जाता एक खुलासा करणे अगत्याचे वाटते. कोणत्याही घराण्याच्या गायकीच्या प्रकट स्वरूपात गायकाच्या आवाजाच्या किंवा गळ्याच्या गुणधर्मानुसार गायकीत नव्हे परंतु परिणामात फरक पडतो. एकच पाणी निरनिराळ्या रंगांच्या काच-पात्रांतघातले असता त्या पाण्याचे निरनिराळे रंग दिसू लागतात. इतकेच नव्हे तर वैज्ञानिकदृष्ट्या या पाण्याचे गुणधर्मही भिन्न होऊ लागतात. कोणत्याही घराण्याच्या गायकीमध्येसुद्धा हाच अनुभव स्पष्टपणे येतो.

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

जयपूर गायकीच्या सौंदर्याचा साकल्याने विचार केल्यास असे दिसून येईल की, या गायकीतील सौंदर्य मळमळीत नाही किंवा वटवटीत नाही. मात्र ते कमालीचे ठसठशीत आहे. ' येनकेन प्रकारेण ' वाहवा मिळविण्याची तरतूद या गायकीत नाही. ताजमहालच्या सुरम्य परिसरात झोपडपट्टयांची उभारणी कोणत्या अभिजात कलेला मानवेल ?

पुनरुक्तीचा दोष पत्करूनसुद्धा ही विस्तृत चर्चा करण्याचे कारण असे की, केसरबाईंची संपन्न कलाकृती कोणकोणत्या गुणांनी समृद्ध आहे याचे स्थूलदर्शन वाचकांना घडावे. त्याचप्रमाणे संगीतकलेच्या साधकांना या चर्चेतून काही मार्गदर्शन घडविता आल्यास पहावे, इतक्याच हेतूने ही चर्चा केलेली आहे. मात्र जयपूर गायकीचा किंवा केसरबाईंच्या गायकीचा हा समग्र बोधपाठ आहे, अशी वाचकांनी कृपा करून कल्पना करून घेऊ नये. माझा स्वतःचाही तो अभिनिवेश नाही !

केसरबाईंना १९२० पासून अल्लादियाखाँसाहेबांच्या निधनापर्यंत म्हणजे १९४६ पर्यंत सुमारे २६ वर्षे तालीम मिळाली हे त्यांचे महत्-भाग्य आणि अशी तालीम इतकी वर्षे निभावणे आणि पचवणे ही त्यांची थोर कर्तबगारी !

केसरबाईंचा मूळचाच आवाज रुंद, ढाला आणि गंभीर असा आहे. त्यांच्या या खडतर साधनेमुळे या आवाजात विलक्षण तेज निर्माण झाले.

केसरबाईंच्या तीन तपांच्या संगीतसाधनेला आता फळे येऊ लागली. त्यांची पहिलीच जाहीर मैफल मुंबईतच झाली. आणि तीही मुंबईतील समस्त ख्यातनाम-विद्वान गायक-गायिकांच्याच उपस्थितीत. या एकाच गाजलेल्या मैफलीने केसरबाईंचे नाव मुंबापुरीत सर्वतोमुखी झाले. त्यांच्या मुंबईबाहेरही मैफली होऊ लागल्या. सर्व भारतभर मोठमोठ्या शहरांतून त्यांच्या मैफली खास दर्जाने होऊ लागल्या. संगीतातील मोठमोठे कलाकार आणि समाजातील अन्य विषयातील

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

विद्वान, अधिकारी व उच्च अभिरुचिसंपन्न व्यक्ती हाच त्यांचा प्रामुख्याने श्रोतृवर्ग असे.

अल्लादियाखाँसाहेब यांनी हातचे काहीही राखून न ठेवता आणि कोणत्याही प्रकारच्या आर्थिक हिशेबाकडे न पाहता अविश्रांतपणे दोन तपापर्यंत बाईंना तालीम दिली. केसरबाईंनीही आपल्या या सांगीतिक 'पार्थिव' व्रताने खाँसाहेबांच्या पदरी भरपूर यश ओतले. केसरबाईंच्या गाण्याने खाँसाहेबांच्या नावात चांगल्याप्रकाची भरच पडली. बाईंनी गुरुऋण आदर्शपणे फेडले. केसरबाई किंवा मोगूबाई यांनी स्वतःच्या मैफली गणिताच्या दृष्टीने असंख्य अशा केल्या नाहीत, परंतु त्यांची प्रत्येक मैफल गुणवत्तेच्या दृष्टीने सोन्याच्या मोलाची असे. या बाबतींतही त्यांनी आपल्या पूज्य गुरुवर्यांचाच आदर्श नजरेसमोर ठेवलेला होता. या मैफलींतील भरीव गुणवत्तेमुळे आणि स्वतंत्र व खास दर्जामुळे त्या अविस्मरणीय होत असत. कोणत्याही श्रेष्ठ कलात्मतेमध्ये अविस्मरणीयता हा गुण अनुस्यूत असतो. माझ्या माहितीप्रमाणे दि. १४ फेब्रुवारी १९६५ या दिवशी मुंबईस विलेपार्ले सर्कलमध्ये त्यांची जाहीर अशी मैफल झाली. या मैफलीनंतर त्यांनी तंबोरा कायमचाच खाली ठेवला. या वेळी त्यांचं वय ७२ वर्षांचे झालेले होते. त्यांना जडलेल्या शारीरिक व्याधींमुळे मन—बुद्धी काम देत असली तरी शरीर काम देत नव्हतें. हा सर्वच विचार करून त्यांनी आपल्या मैफली अगदी योग्य वेळीं बंद केल्या. त्यांनी मैफली बंद केल्या परंतु त्यांच्या आजवरच्या अविस्मरणीय मैफलींच्या तेजोमय स्मृती कशा नाहीशा होणार?

सुमारे पंचवीस वर्षांपूर्वी पुण्याला केसरबाईंची सकाळची मैफल झाली. तबल्याच्या साथीला कै. विष्णुपंत शिरोडकर आणि सारंगीच्या साथीस मजीदखां होते. या मैफलींत बाई खटमधील 'विद्याधर गुनियन' ही चीज अतिशय जमून गायल्या. या चिजेतील बोलताना त्यांनी इतक्या उत्कृष्ट केल्या की, त्यांचे आजन्म स्मरण रहावे. त्या बोलताना कसल्या? मुरारबाजीचे अचूक— हमखास बसणारे ते पट्ट्याचे वारच होते! कोणत्याही उपमेने कलेचे समग्र आकलन होत नाही, परंतु उपमेशिवाय तिचे स्थूल स्वरूपही समजत नाही!

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

वरील मैफलीनंतर तीनच वर्षांनी पुण्यातच केसरबाईंच्या गाण्याची रात्रीची मैफल झाली. या मैफलीत त्या 'वसंती-केदार'मधील 'अतर सुगंध' हा ख्याल गायल्या. या जोड-रागाचे पलटे त्यांनी विलक्षण तयारीने आणि तितक्याच कौशल्याने केले. दोन्ही रागांचे जोड अगदी स्पष्टपणे दिसत होते, परंतु ते कसे केले हे मात्र जाणत्यांनाही समजत नव्हते. त्यांनी विणलेल्या या गोफाचे दोन्ही पदर स्वच्छपणे दिसत होते. मात्र त्या विणीचा बोध तिळमात्रही होत नव्हता. समोरच बसलेले बहुश्रुत रसिकाग्रणी श्रीमंत सरदार आबासाहेब मुजुमदार अकल्पितपणे उद्‌गारले, 'जोड-राग केसरबाईंनीच गावेत!'

बारा-चौदा वर्षांपूर्वी मुंबईस बाईंचे दुपारचे एक गाणे झाले त्या वेळी त्यांनी भीमपलासमधील एक ख्याल गायला. या जमलेल्या ख्यालाचे वर्णन संगीताचे गाढे पंडित 'गोमंतक कला अकादमी'चे संगीत विभागाचे प्रमुख पं. रत्नकांतजी रामनाथकर हे अतिशय आदराने वारंवार सांगतात. पंडितजी म्हणतात, 'केसरबाईंची दमसास विलक्षण. आवर्तन सुरू होताच त्यांचे पलटे मोठ्या कसाने सुरू व्हायचे. आवर्तन संपत आल्यानंतर असं वाटायचं, बाईंचाही दमसास आता संपलेला आहे; परंतु त्याच दमसासात बाई पुन्हा अधिक जोरदार पलट्यांनीं सुरू होत आणि अचूक समेवर येत. आणि हे सगळं अगदी हसत-खेळत सहजपणानं! ही हकीकत पं. रत्नकांतजींनी मला आजपर्यंत पाच-सात वेळा तरी सांगितली आहे आणि तीही केसरबाईंच्याविषयी वाटणाऱ्या अतीव आदरामुळे पाणावलेल्या डोळ्यांनी!

केसरबाईंचे पहिले गुरु कै. गा. पं. रामकृष्णबुवा वझे नेहमी म्हणत, निरनिराळ्या उत्कृष्ट–सुवासिक फुलांचा भरदार गुच्छ असावा आणि त्याला उंची अत्तर लावलेलं असावं–अगदी तसंच केसरबाईंचं गाणं आहे!

बाई केसरबाई यांच्या जीवनात–त्यांना स्वतःलाही धन्यता वाटावी असे कित्येक योग आले. १९३८ च्या एप्रिल महिन्यात कलकत्ता
७

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

येथील नागरिकांतर्फे बाईंना 'सूरश्री' ही उपाधी वहाल करण्यात आली. १९५२ साली त्या वेळचे भारताचे राष्ट्रपती डॉ. राजेंद्रप्रसाद यांच्या हस्ते दिल्ली संगीत नाटक अकादमीची त्यांना 'सनद' मिळाली. परंतु केसरबाईंना स्वतःला ज्या गौरवाची सर्वांत अधिक महती वाटते ती या घटनेची :– विश्वकवी गुरुदेव रविंद्रनाथ टागोर यांच्या वरी कलकत्त्यास बाईंची तीन-चार तासांची अविस्मरणीय मैफल झाली. गुरुदेवांनी त्या मैफलीची अगदी मुक्तकंठाने प्रशंसा केली. गुरुदेवांचे येवढ्यावरच समाधान झाले नाही. गुरुदेवांनी दि. २३ एप्रिल १९३८ रोजी बाईंना स्वदस्तुरचे गौरवपत्र पाठविले. रवींद्र संगीताचे निर्माते गुरुदेव, थोर तत्त्वचिंतक गुरुदेव, रसिकाग्रणी गुरुदेव यांनी केसरबाईंना पुढील मजकुराचे मोठ्या अगत्याने आणि आस्थेने पत्र लिहिले. विश्व-कवी गुरुदेव आपल्या या पत्रात म्हणतात :–"केसरबाईंचे स्वर्गीय गायन ऐकण्याचा योग मला आला, ही मी खरोखरच मोठ्या भाग्याची गोष्ट समजतो. सौंदर्याने परिपूर्ण असलेले त्यांचे गायन म्हणजे कलाक्षेत्रातला एक चमत्कारच मानावा लागेल. श्रोत्यांना धुंद करणारा आवाज आणि गुंग करणारी सूक्ष्म लयकारी यांचे इतके मनोज्ञ मिश्रण त्यांच्या गायनात झालेले आहे की, त्यामुळे संगीत शास्त्रातील रूक्ष आणि रसहीन बारका-व्यांचे पुस्तकी प्रदर्शन न होता संगीतातल्या मनोहारी अंतरंगाचाच आविष्कार व्हावा! खरोखरच जन्मसिद्ध प्रतिभावंतालाच हे शक्य आहे. आज संध्याकाळी झालेल्या मैफलीत ज्या एका अलौकिक आनंदाची अनुभूती मला लाभली त्या निमित्ताने मी श्रीमती केसर-बाईंचे आभार मानतो. त्यांना माझे आशीर्वाद आहेत." 'मानवाच्या आत्म्याचा अंतिम, उच्चतम विकास संगीतानेच होतो. संगीता-शिवाय आत्म्याचा विकास होऊच शकत नाही.' अशी श्रद्धा अस-णाऱ्या जागतिक कीर्तीच्या या ज्येष्ठ आणि श्रेष्ठ तत्त्वचिंतकाचे हे आशीर्वाद केसरबाईंना शिरोधार्य वाटावेत यात नवल नाही. भारत सरकारनेही केसरबाईंना 'पद्मभूषण' हा किताब देऊन त्यांचा यथोचित गौरव केलेला आहे.

केसरबाईंना हे जे असामान्य स्वरूपाचे यश प्राप्त झाले आहे, ती एक केवळ विधिघटना आहे असे मुळीच नाही. याबाबत त्या स्वतःच

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

म्हणतात, "कोणत्याही कलेची अविश्रांत सेवा केव्हा ना केव्हा जन-मानसात रुजू होतेच होते. मला जे काही यश प्राप्त झालं आहे त्यांत योगायोगाला बिलकूल स्थान नाही. माझ्या यशाचा वाटा प्रामुख्याने तीन गोष्टींकडे जातो. एक म्हणजे, मुंबईतील एका संगीत-प्रेमी–धनाढ्य गृहस्थाचा पाठिंबा, सहकार्य आणि सहानुभूती ! दुसरी म्हणजे, पोटच्या मुलीप्रमाणे मानून खांसाहेबांनी कळकळीने दिलेले शिक्षण–की जे देताना त्यांनी फार फार तसदी घेतली. आणि तिसरी गोष्ट म्हणजे, त्यांच्यावरील माझी भक्ती आणि मी केलेली मेहनत ! याव्यतिरिक्त कुठल्या गोष्टीचा वाटा माझ्या यशात असल्यास मला ठाऊक नाही." संगीत कलेवर असलेल्या असीम तळमळीच्या पोटी त्या म्हणतात, 'आज जेव्हा मी अर्ध्या हळकुंडानं पिवळ्या झालेल्या आणि येत आहे त्यांतच समाधान मानणाऱ्या गायकांचं गाणं ऐकते, तेव्हा माझ्या पुरातन आणि श्रेष्ठ गायन कलेचं या देशात काय होणार, हा विचार माझ्या मनाला अस्वस्थ करतो.'

केसरबाई या विलक्षण आत्मकेंद्रित वृत्तीच्या आहेत असा त्यांच्या-बाबत पुष्कळच गैरसमज आहे. याबर योग्य प्रकाश टाकणारी एक सत्य घटना येथे उद्धृत करतो. चार वर्षांपूर्वीच मी त्यांना मुंबईस त्यांच्या घरी भेटावयास गेलो होतो. त्या वेळी रक्तदाबामुळे त्यांना बराच त्रास होत होता. थोड्या विश्रांतिनंतर त्या बऱ्याच बोलू लागल्या. त्यांच्या आजाराच्या परिस्थितीत त्यांचा वेळ बऱ्यापैकी जावा म्हणून मी त्यांना सहज सुचवले की, 'आपल्याला बालगंधर्वांच्या रेकॉर्डस् आवडत अस-ल्यास त्या आपण ऐकाव्यात !' माझ्या या बोलण्यावर त्यांनी दिलेले उत्तर त्यांच्या प्रामाणिक रसिकत्वाची साक्ष देण्याइतके बोलके आहे. त्या म्हणाल्या, 'अहो, बालगंधर्वांचं गाणं आवडत नाही असा कोणी असू शकेल का ?' बाईंच्या या उत्तराचे मी आजही सतत चिंतन करतो आहे !

केसरबाई यांचे आज वय ८३ वर्षांचे आहे. निसर्ग हा कोणालाच सुटलेला नाही. माझ्यासारख्या संगीतभक्ताच्या मनात अनेक प्रश्न

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

येतात ! वाईंच्या प्रचंड संगीत साधनेतून आम्ही काही बोध घेणार आहोत का ? त्यांच्या अविस्मरणीय मैफलींतून आम्ही काही शिकणार आहोत का ? त्यांनी योग्य वेळी घेतलेल्या गान-संन्यासातून त्यांनी संगीत जगताला काही संदेश दिला आहे की नाही ?

या गानसम्राज्ञीचे उर्वरित जीवन विनासायास आणि सौख्य-समाधानाचे जावो, अशी ईश्वरचरणी विनम्र प्रार्थना माझ्यासारखे असंख्य– अनंत भक्त सदैव करतील !

▣ ▣ ▣

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

रघुवीरमामा रामनाथकर

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri



गोमंतकाचे भूषण

कलामहर्षी रघुवीरमामा रामनाथकर

मला लहानपणापासून नाटके पहाण्याचा अतिशय नाद. त्यांतून विशेषतः संगीत नाटके तर माझ्या नजरेतून सहसा केव्हाच सुटत नसत. माझा हा नाद मी कोणत्याही मार्गाने अगदी विना-संकोच पुरा करीत असे. नाटक कंपनीतील नटांप्रमाणेच कंपनीतील अन्य मंडळी– इतकेच काय कंपनीची प्रत्येक चीज-वस्तू ही माझ्या मोठ्या आदराचाच विषय असे. नाट्यगृहात प्रवेश केल्यानंतर समोरच मांडलेला ऑर्गन (किंवा पेटी), उजव्या बाजूचे तबले व डाव्या बाजूच्या सारंग्या– ही सारी मला दैवतेच वाटत असत. दुनियेतील भाग्यवान पुरुषांत अग्रहक्काचे मानकरी माझ्या दृष्टीने हे सर्व साथीदारच असत. हे सर्व साथीदार आपापल्या जागी येऊन स्थानापन्न होऊ लागलेले पाहिले म्हणजे जगज्जेत्या शिकंदरची ही सारी भावंडेच आहेत असा मला भास होई ! गंधर्व नाटक मंडळीचे हे दृश्य तर त्यांच्या नंतरच्या नाट्यप्रयोगांइतकेच मला लोभसवाणे वाटे. केशवराव कांबळे, दत्तोबा जंगम, आमचे हरिभाऊ देशपांडे, खाँ. कादरबक्षखाँ, उ. थिरकवा, राजण्णा या साथीदार मंडळींचे आगमन होऊ लागले म्हणजे ते दृश्य

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

मी अगदी आसुसलेल्या नयनांनी पाहत राही. हे सर्व साथीदार आलटून पालटून येत असत, परंतु एक नाव मात्र प्रेक्षकांसमोर सततच कायम होते, ते कधीच दृष्टिआड होत नसे. प्रत्येक खेळाला, प्रत्येक अंकाला प्रत्येक प्रवेशाला हे नाव सदैव डोळयांपुढे असे. त्यामुळे त्या नावाबाबत माझ्या मनात कमालीचे प्रेम व आपुलकी निर्माण झालेली होती. हे नाव म्हणजे "रघुवीर पेंटर" हे होय! मात्र रघुवीर पेंटर हे कोण आहेत याचा शोध मला फार वर्षांनी लागला.

माझे गुरुजी पं. रत्नकांतजी यांचा-माझा ऋणानुबंध दिवसेंदिवस सतत वाढू लागला. त्यामुळे त्यांच्या घरच्या सर्व मंडळींबाबतही मला विशेष आपुलकी वाटू लागली. त्यांचे परमपूज्य पिताजी रघुवीरमामा यांचे नाव उत्कृष्ट हार्मोनियमवादनकार म्हणून मी पूर्वी कित्येक वर्षांपासून ऐकत होतोच. त्यांचे एकवार दर्शन व्हावे या हेतूने मी रत्नकांतजींसमवेत रघुवीरमामांचे बिन्हाडी गेलो. त्या नुसत्या दर्शनानेच मी अगदी प्रसन्न झालो. त्यांचे इतक्या उतार वयातही अतिशय तेजस्वी दिसणारे व्यक्तिमत्व पाहून विधात्याच्या सर्वसमर्थ कृतीबाबत आदर वाटू लागला. गोरी-पान–लालबुंद अंगकांती, चेहऱ्यावरील प्रसन्न व समाधानी हास्य, राहणी-तील अतिशय नेटकेपणा, त्यांच्या रसिक व तीव्र बुद्धिमत्तेची साक्ष देणारी त्यांची नजर,–या सर्व गोष्टी माझ्या मनात रघुवीरमामांविषयीचा आदर वाढवीत होत्या. थोडचा वेळाने संगीतावर क्रमप्राप्त चर्चा निघाली. गंधर्व नाटक मंडळीचा सारा इतिहास विस्ताराने त्यांनी सांगितला. मला काही शंका वाटली म्हणून मी त्यांना मध्येच विचारले, 'गंधर्व नाटक मंडळीच्या पडद्यावर "रघुवीर पेंटर" असे नाव असे, हे रघुवीर पेंटर कोण?' यावर रघुवीरमामांनी "तो मीच!" असे हसून उत्तर दिले. एखाद्या रहस्यकथेतले कोडे अगदी अकल्पितरीतीने सुटावे असा मला आनंद झाला. मी लहानपणापासून ज्या व्यक्तीबाबत मनोभावे आदर बाळगीत होतो, त्या थोर व्यक्तीचा मला अगदी घरच्यानात्याने लाभ घडलेला होता, हे माझे मोठेच भाग्य होते. मुंबईस गेल्यानंतर रघुवीरमामांच्या भेटीस मी अनेकवार जात असे! त्यांचे-माझे ऋणानुबंध सतत वाढत आहेत. माझ्या लहानमोठचा प्रत्येक कार्यात मला रघुवीरमामांचा आशीर्वाद सतत लाभत आहे, ही एक मोठीच ईश्वरीकृपा आहे.

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

प्रस्तुतच्या पुस्तकाच्या माहितीसाठी मुंबईस प्रत्यक्ष जाऊन अनेक कलाकारांना भेटणे, त्यांच्या मुलाखती घेणे व त्यांची माहिती मिळवणे हे काम सुमारे वर्षभर तरी मला करावे लागले. सुदैवाने आज हयात असलेल्या कलाकारांची माहिती कमी-अधिक परिश्रमाने मिळू शकत होती, परंतु जुन्या–दिवंगत कलाकारांच्या विश्वसनीय माहितीची वाट काय ? याबाबतीत बहुतेकांनी खात्रीची अशी दोनच नावे मला सांगितली. रघुवीरमामा आणि श्रीमती अंजनीबाई मालपेकर हीच ती दोन नावे ! या दोघांही महानुभावांकडे मी सतत जात होतो. महत्त्वाची माहिती त्यांच्याकडून मिळवीत होतो. रघुवीरमामा साठ-सत्तर-ऐंशी वर्षांपूर्वीच्या बारीकसारीक हकीकतीसुद्धा अगदी आजच्या घटने-च्याच अपूर्व स्मरणाने सांगत. तीच तीच हकीकत दोन दोन-चार चार वेळा त्यांनी सांगितली तरी रेसमात्र फरक होत नसे. त्यांच्या असामान्य स्मरणशक्तीच्या व रसिकतेच्या दर्शनाने मी अनेकदा थक्क झालो आहे. त्यांच्या ऐन तारुण्यात त्यांचे कलासामर्थ्य किती अचाट असेल, याची साक्ष आजही प्रभावीपणे मिळते. आणि म्हणूनच रघुवीरमामा हे गोमंतकाचे फारच मोठे भूषण आहे, तसाच तो आमच्या एकूण कला-सृष्टीचाच एक स्वाभिमानी गौरव आहे, असे म्हणावेसे वाटते !

रघुवीरमामा यांचा जन्म गोमंतकातील रामनाथी या गावी दि १२-२-१८७७ या दिवशी झाला. गोमंतकातील त्या वेळचे आजू-बाजूचे सर्वच वातावरण संगीतादी कलांना पोषक असे होते. बहुधा प्रत्येक घरातून संगीताची साधना कर्तव्यनिष्ठेने चाले. रघुवीरमामांना प्रथमतः त्यांच्या मातोश्रींनीच संगीताची आणि तीही धृपद-धमाराची तालीम दिली. त्यानंतर श्री. नारायणराव कवळेकर यांचेजवळ तीन वर्षे सारंगीचे शिक्षण त्यांनी घेतले. घुमटवादनाचाही त्यांनी रियाज केला. वयाचे आठवे वर्षी त्यांचे शालेय शिक्षण सुरू झाले. रघुवीरमामांच्या कला-सक्त वृत्तीला चित्रकलेचीही आवड अगदी लहानपणापासूनच निर्माण झाली. गोमंतकाला संगीताप्रमाणेच नाटयाचीही विलक्षण आवड. निर-निराळ्या उत्सवांच्या निमित्ताने गोमंतकांत नाटके नित्य होत. अशा हरदासी काल्यांतील नाटकांतून रघुवीरमामांनी भूमिकाही केल्या. १८९४ साली त्यांच्या गावातील एका हरिदासबोवांनी वाजाची पेटी प्रथमच

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

आणली. तिला 'पॅरिसची पेटी' म्हणत. ही पेटी पाहताच रघुवीरमामांचे चित्त त्या आकर्षक वाद्याकडे खेचले गेले. हे वाद्य वाजवण्याचीही साधना त्यांनी लगेच सुरू केली. त्याच सुमारास ग्वाल्हेर दरबारचे आद्य हार्मोनियम वादनाचार्य गणपतभैय्या यांचे आगमन मुंबईस झाले होते. कोण्या गोमंतकीय रसिकाने "गणपतभैय्या हे पेटी अप्रतिम वाजवतात–तू त्यांची पेटी मुद्दाम ऐकून ये!" असा आदेश दिला. रघुवीरमामा अगदी बेचैन झाले. पेटी ऐकण्यासाठी मुंबईस जायचेच असा मनोमनी निश्चय करून घरी न सांगता वयाच्या १७व्या वर्षी ते मुंबईस येऊन दाखल झाले. श्रीमान गोकुळदास तेजपाळ यांचेकडील गणपतभैय्यांचे पेटीवादन ऐकून ते मुग्ध झाले. ते परत गोव्यास आपल्या गावी आले आणि हार्मोनियमची साधना मोठ्या उमेदीने करू लागले. चित्रकलेच्या शिक्षणासाठी वयाच्या २० व्या वर्षी ते बेळगावला आले. त्यापूर्वी फक्त पंधरा दिवसच खां. अबदुलकरीमखां हेही कायमचे स्थायिक होण्यासाठी बेळगावास येऊन राहिले होते. त्यांचा रघुवीरमामांचा परिचय एका मोठ्या मजेदार योगायोगाने आला. खांसाहेबांचा व रघुवीरमामांचा स्नेहसंबंध उत्तरोत्तर दृढ होत चालला. खांसाहेबांकडे दत्तूबाई कोलवाळकर यांची तालीम रघुवीरमामांनीच सुरू करून दिली. मध्यंतरी चित्रकलेच्या काही महत्त्वाच्या कामाच्या निमित्ताने कोल्हापूरचे कलाप्रेमी जहागीरदार श्रीमंत बाळासाहेब गायकवाड यांचे बंगल्यात रघुवीरमामा आणि खांसाहेब ही सर्व मंडळी कोल्हापुरात राहू लागली. याचवेळी आजच्या ख्यातनाम गायिका केसरबाई केरकर या त्यांच्या वयाच्या बाराव्या वर्षी अबदुलकरीम खांसाहेबांकडे गाणे शिकण्यासाठी आल्या होत्या. रघुवीरमामांची संगीत व चित्रकला यांची साधना अहर्निश चालू होती. याचबरोबर नाट्य, कला आणि तंत्र यांचाही त्यांनी सूक्ष्म अभ्यास केलेला होता–करीतही होते. त्यांचा विवाह वयाच्या २१व्या वर्षी याच सुमारास झाला आणि कलेच्या साधनेबरोबरच ते गृहस्थधर्मीही झाले. १८८५ मध्ये अण्णासाहेब किर्लोस्करांनी किर्लोस्कर नाटक मंडळीची स्थापना "शाकुंतल" नाटकाच्या सुरवातीने केली. गोमंतकात रामनाथीचे काही उत्साही व कलाप्रेमी तरुण जमवून रघुवीरमामांनी स्वतःची नाटक मंडळी सुरू केली. संगीत, नाट्य,

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

अभिनय, नेपथ्य, सीनसिनरी या सर्व गोष्टी रघुवीरमामांकडेच असत. शिवाय हार्मोनियमसाथीचे कामही त्यांचेकडेच असे. १९०२–३ च्या सुमारास सतत चार महिने खपून त्यांनी रामनाथ देवस्थानचे रंगकाम, भिंतीवरील चित्रे व खांबांवरील कोरीव नक्षीकाम पार पाडले. रघुवीरमामांच्या असामान्य कलासिद्धीचे हे अप्रतिम काम त्यांचे चिरंतनचे प्रभावी स्मारक आहे. आपल्या आयुष्यात सतत समाधान देणारे हे कार्य झाले आहे, याची त्यांना स्वतःलाही मनःपूर्वक धन्यता वाटते !

व्यवसायाचे निमित्ताने कर्नाटकात बल्लारीस त्यांचा मुक्काम असताना १९१२ च्या सुमारास त्यांच्या पत्नींना कॉलऱ्याने पछाडले व दुर्दैवाने त्यांतच त्यांचा अंत झाला. त्या वेळी त्यांचेबरोबर त्यांची चार मुले व एक बंधू असा परिवार होता. म्हैसूर-दरबारी नोकरीस रहाण्या-बाबत त्यांना याच वेळी दरबारकडून निमंत्रण आले होते, परंतु कौटुंबिक अडचणीमुळे त्यांना या नोकरीचा स्वीकार करता आला नाही. गंधर्व नाटक मंडळीचे पडदे रंगविण्याचे काम १९१३ साली रघुवीरमामांकडे आले. त्यानिमित्ताने गंधर्व मंडळी व स्वतः बालगंधर्व यांच्याशी त्यांचे संबंध अधिक घनिष्ठ झाले. गंधर्व कंपनीत या वेळपर्यंत इतर कंपन्यांप्रमाणे साथीस पायपेटीच असे. "ही पायपेटी कमी करून तिच्याऐवजी ऑर्गन ठेवा– तुमच्या आवाजधर्माला ऑर्गनची साथच योग्य ठरेल" असे त्यांनी बालगंधर्वांना सांगून ते त्यांना सप्रयोग-सप्रमाण पटवून दिले. रघुवीर-मामांची ही योजना किती समर्पक होती, किती रसिकतेची होती हे नंतर सिद्ध झाले आहेच. याच सुमाराची रघुवीरमामांची आणखी एक अविस्मरणीय कामगिरी म्हणजे, त्या वेळी १४-१५ वर्षे वयाच्या दीनानाथ या मुलास रघुवीरमामांनी किर्लोस्कर नाटक मंडळीत गोवा मुक्कामी आणले. एक युगप्रवर्तक गायकनट आमच्या रंगभूमीला त्यांच्यामुळे लाभला. सुप्रसिद्ध गायकनट श्री. रघुवीर सावकार यांनाही याच वेळी त्यांनी गंधर्व नाटक मंडळीत आणले.

मुलांच्या संगोपनाच्या दृष्टीने त्यांनी याच सुमारास द्वितीय विवाह केला. मुलांच्या शिक्षणाचाही प्रश्न पुढे उभा राहिल्याने १९१७

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

साली पत्नी-मुलांसह ते मुंबईस कायमचे स्थायीक झाले. यानंतर त्यांनी अनेक मराठी, हिंदी, गुजराथी नाटक कंपन्यांचे पडदे रंगविणे, सीन-सिनरी तयार करून देणे, त्यातील संगीत बसविणे, हार्मोनियमची साथ करणे—अशा प्रकारची अनेक कामे केली. याच वेळी सिनेमाचे युग सुरू झाल्याने सिनेकंपन्यांची मोठमोठी पोस्टर्स तयार करून देण्याचे काम ते करू लागले. १९३० च्या सुमारास बोलपटांचे युग सुरू झाले. रघुवीर-मामांनी दोन-तीन बोलपट कंपन्यांमधून संगीत दिग्दर्शक म्हणून काम केले. त्यांपैकी श्री. नारायणराव देव्हारे यांची दिग्वी सिनेटोन ही एक प्रमुख कंपनी होती. याच वेळी १९२७ मध्ये भारतात रेडिओने प्रवेश केला. "बाँबे रेडिओ कंपनी" या नावाने एक खाजगी कंपनी निघाली. संगीताचे सर्व कार्यक्रम ठरविण्याची जबावदारी या कंपनीने रघुवीर-मामांवर सोपविली.

ही "इंडियन ब्रॉडकास्टिंग कंपनी" श्री. फाझलभाई चिनॉय यांनी सुरू केली. ही सुरू करण्यापूर्वी रघुवीरमामांना भेटून त्यांनी सर्व परि-स्थिती समजावून सांगितली. सुरुवातीस आपण कलाकारांना पैसे देऊ शकत नाही, तेव्हा सहा महिनेपर्यंत आपण सर्व प्रोग्रॅम मोफत करावे, नंतर पुढे पैशाचा विचार केला जाईल. रघुवीरमामांनी त्यांचे म्हणणे मान्य करून सहा महिनेपर्यंत त्या वेळच्या नामांकित कलाकारांचे कार्यक्रम कंपनीला मोफत करून दिले. उस्ताद फैय्याजखाँनंतर सरस्वती-वाई फातर्फेकर, इंदिरावाई वाडकर, इंदोर दरवारचे नामांकित गवैय्ये नासिरुद्दीनखां धृपदिये अशा कितीतरी कलाकारांचे कार्यक्रम रघुवीर-मामांनी कंपनीला करून दिले. खुद्द रघुवीरमामांनीही हे काम विना-वेतन केले. रघुवीरमामांचे हे फार मोठे कार्य होय!

या कंपनीचा पहिला कार्यक्रम (आजच्या परिभाषेत उद्‌घाटन) दि. २३जुलै १९२७ या दिवशी फोर्ट विभागातील कंपनीच्या स्टुडिओत मरहूम उ. फैय्याजखाँ यांच्या गाण्याचा झाला. गायक-गायिका, प्रथम-प्रथम श्रोते नसलेल्या त्या खोलीत नुसत्याच मायक्रोफोनपुढे बसून गाण्यास अगदी नाराज असत, परंतु त्यांची समजूत घालून, त्यांना पटवून देऊन त्यांचे कार्यक्रम साजरे करण्याचे अग्निदिव्य रघुवीरमामांनी

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

जवळजवळ अडीच वर्षे केले. १९३० च्या मार्चमध्ये ही कंपनी सरकारने ताब्यात घेऊन रेडिओ हे सरकारी खाते केले आणि रघुवीर-मामा या कार्यातून मुक्त झाले. या कामात त्यांचे व्युत्पन्न चिरंजीव श्री. रत्नकांतजी यांचे त्यांना मोठेच सहाय्य झाले.

चित्रकलेच्या शास्त्रोक्त शिक्षणासाठी सुप्रसिद्ध चित्रकार हळदण-कर यांचेकडे त्यांनी दोन-तीन वर्षे पुन्हा पाठ घेतले.

रघुवीरमामांच्या चतुरस्र कलासाधनेचे थोडेफार सिंहावलोकन केले तर या कलाकाराची महान कलासाधना हे एक असिधाराव्रत होते आणि या व्रताची सांगता त्यांनी अपूर्व जिद्दीने पार पाडल्याचे दिसून येते. त्यांना जन्मजात लाभलेली अमाप बुद्धिमत्ता "हे तो देणे ईश्वराचे" आणि रघुवीरमामांनी आपल्या दीर्घ परिश्रमाने जे करून दाखविले ते "सामर्थ्य आहे चळवळीचे !"

रघुवीरमामांचे असामान्य हार्मोनियमवादन ऐकण्याचा मला योग आला नाही हे एक माझे मोठेच दुर्दैव होय. परंतु त्यांचे चिरंजीव आणि शिष्य श्री. रत्नकांतजी यांच्या वादनावरून रघुवीर-मामांच्या वादनाची मी थोडीफार कल्पना करू शकतो. वयोमाना-नुसार त्यांनी आज हार्मोनियमवादन सोडले आहे. वादनांतील जोड, आलाप, तयार व बिकट तानपलटा या सर्वांगांनी त्यांचे वादन परिपूर्ण होते. भास्करबुवा बखले, अबदुल करीमखां, वझेबुवा अशां-सारख्यांच्या साथी त्यांनी मैत्रीच्या भूमिकेतून केल्याने गायकीच्या विविधांगांनी त्यांचे वादन नटलेले असे. अवघड रागरागिण्या व चिजा यांचा फार प्रचंड संग्रह त्यांचेजवळ आहे. मूळचे अतिशय उत्तम पट्टीचे लयकार, अतिशय बहुश्रुत. घरातील मूळचे अनेक पिढ्यांचे संगीत-संस्कार आणि त्यात गेल्या नव्वद वर्षांतील ऐकलेल्या लहानथोर कलावंतांच्या कलेचे दिव्य संस्कार यांची महत्त्वाची भर,—यामुळे त्यांची कला सर्वांगांनी पोसली गेली. रघुवीरमामा संगीतावर बोलू लागले म्हणजे या कलामहर्षींच्या तपश्चर्येची साक्ष त्यांच्या शब्दाशब्दांतून पटू लागते.

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

चित्रकलेच्या शिक्षणाच्या निमित्ताने रघुवीरमामा बेळगावला राहू लागल्यानंतर त्यांचा व अवदुलकरीमखांच्या परिचयाचा जो योग आला त्या परिचयाचे रूपांतर त्या दोघांत घरोवा निर्माण होण्यात झाले. खांसाहेबांच्या सहवासात स्वरांचे वारकावे, श्रुतिस्थाने, स्वरांचे रागपरत्वे भिन्न भिन्न दर्जे यांचा अभ्यास ते करू लागले. परिणामत: १९०७ साली एका प्रसंगाच्या निमित्ताने हुवळी येथे स्वत: संशोधन करून त्यांनी नेहमीची हार्मोनियम वावीस श्रुतींची तयार करून दाखवली. दुर्दैवाने हे काम त्या वेळी मागे पडले, त्याला कै. गोविंदराव टेंबे यांच्यामुळे सुमारे १९३२ साली पुन्हा वाचा फुटली. त्या वेळचे रघुवीरमामांचे हार्मोनियम-श्रुतींवरील वृत्तपत्रीय लेख मी वाचलेले होते. एका जुन्या पिढीतील एका थोर कलाकाराचे हे सप्रमाण कार्य पाहून आजही आश्चर्य वाटते. आमच्या नभोवाणी केंद्रावर हार्मोनियम पुनश्च सुरू करण्याचे निश्चित झाले आहे. अशा वेळी रघुवीरमामांच्या या मौलिक संशोधनाचे चीज होईलच असा विश्वास वाटतो !

रघुवीरमामांनी आजपर्यंत स्वत: तर दीर्घकालपर्यंत कलासाधना केलीच, परंतु या कलेचे दान करून त्यांनी समाजसेवाही वजावली आहे. त्यांनी अनेकांना प्रत्यक्ष शिकवले, कित्येकांना मार्गदर्शन केले, कित्येकांना स्वत:चा खर्च करून पोटापाण्याला लावले. अनेकांना त्यांचे आशीर्वाद लाभले. व्यवहारी जगाच्या हिशोवाने पहाता 'घरचे खाऊन लष्करच्या भाकरी भाजण्याचे' काम त्यांनी आपल्या जीवनात फार मोठ्या प्रमाणावर केले.

रघुवीरमामांचे ज्येष्ठ चिरंजीव मोहनलाल हे हार्मोनियम अतिशय उत्तम वाजवीत. स्वर लावण्याचे त्यांच्या हातांतील सौंदर्य श्रोत्यांच्या अंत:करणांवर आसर करीत असे. हातामध्ये मुरकी अतिसुंदर होती. तानपलटाही तितकाच सफाईदार असे. अतिशय उत्तम लयकार. स्वत: तवलाही वाजवीत. त्यांनाही रघुवीरमामांनीच तालीम दिली होती. आलाप व जोड ही अंगे जशी सतारीवर वाजवितात तशीच ती मोहनलाल हार्मोनियममध्ये अप्रतिम वाजवीत असत. ठुमरी आणि नाट्यसंगीत हा तर त्यांचा खास राखीव प्रांत होता. अशा या

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

कलासंपन्न कलाकाराचे— पुत्राचे— अकाली निधन हा रघुवीरमामांवरील दुहेरी आघात होता. संगीत कलेचे तर ते नुकसान होतेच !

१९५३ साली मुंबईच्या "गोमंतक मराठा समाज" या संस्थेच्या रौप्य महोत्सवाच्या शुभप्रसंगी मान्यवर गोमंतकीय कलाकारांचे सत्कार केले, त्यांत रघुवीरमामांच्या जाहीर सेवेचीही आदरपूर्वक नोंद घेतली गेली. त्याचप्रमाणे दि. २१ डिसेंबर १९५७ रोजी मुंबईकर रसिकांनी रघुवीरमामांचा जाहीर सत्कार करून त्यांना थैली आणि मानपत्र अर्पण केले. या समारंभाचे अध्यक्षपद मुंबईचे त्या वेळचे महापौर आचार्य मो. वा. दोंदे हे होते. रसिक कलाभक्तांनी दिलेली रघुवीर-मामांच्या सेवेच्या कृतज्ञतेची ही रोकडी पावतीच आहे. रघुवीरमामांना ती खचित समाधानाची वाटावी.

आचार्यांनी आपल्या अध्यक्षीय भाषणात रघुवीरमामांच्या कला-साधनेचा यथोचित गौरव करून चित्र, शिल्प, नाट्य, वादन व गायन या कलांत एकसमयावच्छेदेकरून पारंगतता मिळवून आदर्श झालेल्या या वृद्ध कलावंतांचे कार्य चालू व भावी पिढीने चालविणे किती अवश्य आहे, याचे मार्मिक विवेचन करून ते पुढे म्हणाले, "कला हे समाज-जीवनात उत्साह व आनंद निर्माण करणारे एक महत्त्वाचे साधन आहे. सुसंस्कृतीचे ते एक अंग आहे. गोमंतकीयांनी अनेक कलांची जोपासना व वाढ करून महाराष्ट्राच्या जीवनात आनंद निर्माण केला आहे आणि म्हणून गोमंतक हा महाराष्ट्रास भूषणभूत होऊन राहिला आहे. गोमंतकीय, हे कलावंत आहेत, तसेच रसिक व गुणग्राहक आहेत, हे आजच्या या भव्य समारंभावरून दिसून येत आहे." इतके सांगून रघुवीरमामांना दीर्घकाल आयुरारोग्य लाभून तरुण पिढीस त्यांचे मार्ग-दर्शन लाभावे, अशी सभेच्या व आपल्यावतीने सदिच्छा व्यक्त करून त्यांनी आपले भाषण संपवले. गोमंतकातील थोर साहित्यिक श्रीमान् वा. द. सातोस्कर हे या समारंभातील एक प्रमुख कार्यवाह होते.

रघुवीरमामा आज कृतकृत्य झाल्याच्या समाधानात आहेत. जुन्या अनेक दिव्य आठवणींनी त्यांना श्रेष्ठ कलात्मकतेचा दिव्यानंद आजही लाभतो आहे. नवीन नवीन तोलामोलाचे कलाकार निर्माण होत नाहीत

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

याचे त्याना दु:ख होते. ते स्वत: आज वयोमानामुळे 'गोष्टी सांगेन युक्तीच्या चार' या अवस्थेत आहेत. त्यांना अशाही परिस्थितीत कोणी "धनुर्धारी पार्थ" भेटल्यास त्याच्याकरवी ते कलाप्रांतात भीम-पराक्रम करवू शकतील. आमच्या होतकरू कलाकारांनी स्वत:च्या निश्चित प्रगतीसाठी रघुवीरमामांचे मार्गदर्शन सतत घ्यावे असे आग्रहाचे सांगणे आहे. जुने ते सर्वच सोने आहे, असे मानणे न मानणे हा विषय निराळा. परंतु जुने ते सर्वच त्याज्य, असे ठरविण्याच्या मागे निदान बुद्धिवंतांनी तरी लागू नये. मागच्या भक्कम शिदोरीवरच पुढचा प्रवास सुकर होत असतो, हे किमान व्यावहारिक सत्य तरी आम्ही विसरता कामा नये.

कलामहर्षी रघुवीरमामांना आणखीही पूर्णायुष्य लाभावे आणि तेही उत्कृष्ट आरोग्य–समाधानासह ! अशी ईश्वरचरणी नम्र प्रार्थना आहे. त्याचप्रमाणे कलासाधनेसाठी आमच्या मेहनती व महत्त्वाकांक्षी कलासाधकांना त्यांचे मौलिक आणि यशस्वी मार्गदर्शन दीर्घकाळपर्यंत सतत लाभावे ही एकच मनोमय इच्छा ! ! !

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri



श्रीमती मोगूबाई कुर्डीकर

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri



गानपंडिता
श्रीमती मोगूबाई कुर्डीकर

मोगूबाई कुर्डीकर यांचे प्रथमदर्शन मला एका नाटचपूर्ण प्रसंगाने बेचाळीस वर्षांपूर्वी घडले. प्रभात फिल्म कंपनीच्या 'संत तुकाराम' या बोलपटातील तुकारामाच्या अविस्मरणीय भूमिकेने विशेष प्रसिद्धीस आलेले कै. विष्णुपंत पागनीस, कोल्हापूरचे सुप्रसिद्ध गायक पं. वामनरावजी सडोलीकर आणि मी, मुंबईतील एका सिनेटोनमध्ये नोकरीस होतो. गिरगावात श्री. पागनीस यांचे 'पागनीस पेठकर आणि मंडळी' या नावाचे सराफी दुकान होते. एके दिवशी दुपारी चारच्या सुमारास मी दुकानात बसलो असताना दुकानात दोन-तीन स्त्रिया आल्या. त्या कारवारी किंवा गोमंतकीय सारस्वत असाव्यात आणि काही खरेदीसाठी त्या गिऱ्हाईक म्हणून आल्या असाव्यास असा मी तर्क केला. इतक्यात त्यांतल्या एका बाईंनी विष्णु-पंतांना साक्षात तुकाराम समजून अत्यंत विनम्रभावाने नमस्कार केला. विष्णुपंतांनीहीं प्रतिनमस्कार करून त्यांचे स्वागत केले. काही औपचारिक बोलणे झाल्यानंतर बाईंनी विष्णुपंतांना विचारले, 'आपण माझ्या झोपडीला पाय केव्हा लावणार ?' विष्णुपंतांनी उत्तर दिले 'तुम्ही गाणं

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

ऐकवणार असाल त्या वेळी मी तुमच्या घरी येतो !' दोघांच्या सवाल-जवावांतून दिवस आणि वेळही मुक्रर झाली. विष्णुपंतांना 'जरूर जरूर या हं, मी वाट पहाते,' असे सांगून नमस्कार करून त्या वाई निघून गेल्या. त्या वाई गोऱ्यापान, नाकीडोळी नीटस व अंगाने सडपातळ होत्या. त्या निघून गेल्यानंतर मी विष्णुपंतांना सहज विचारले, 'या वाई कोण ?' विष्णुपंतांनी आश्चर्याने विचारले, 'या वाई तुम्हाला माहीत नाहीत ? या मुगूवाई कुर्डीकर! ' त्या वेळी मोगूवाईंचे नाव सर्वतोमुखी झालेले नव्हते, परंतु मुंवईतींल संगीताच्या जाणकार वर्गात त्यांचे नाव झालेले होते. लौकिक वाढत होता ! ठरलेल्या दिवशी जयपूर घराण्याच्या विद्वान् गायिका लक्ष्मीवाई जाधव, विष्णुपंत पागनीस, पं. वामनराव सडोलीकर आणि मी असे मोगूवाईंच्या घरी उपस्थित झालो. वेळ सायंकाळची पाचची होती. मोगूवाईंनी तंबोरा जमविला. तवलजीने तवला मिळविला. मोगूबाईंनी गौरी, खंवावती आणि काफीकानडा गाऊन तंबोरा खाली ठेवला. मोगूवाईंनी आपल्या तेजस्वी भव्य-दिव्य कलेचा अविस्मरणीय असा साक्षात्कार घडविला होता. त्या विलक्षण तडफेने गाऊन गेल्या होत्या. सर्व वातावरण धुंद झाले होते. इतक्यात मोगूवाईंनी लक्ष्मीवाईंना– गुरुभगिनींना 'आता तुम्ही थोडं ऐकवा' अशी विनंती केली, परंतु लक्ष्मीवाईंनी अगदी दिलसाफ वृत्तीने 'तुम्ही आता इतकं उत्तम गाऊन गेलेल्या आहात, यावर आत्ता माझं गाणं जमणं शक्य नाही. मी पुन्हा केव्हातरी जरूर ऐकवीन !' लक्ष्मीवाईंसारख्या एका व्युत्पन्न कलाकाराच्या प्रामाणिक वृत्तीचं मला घडलेलं हे एक अविस्मरणीय दर्शन होय !

मोगूवाईंनी संगीत कलेत जे अपार यश मिळवले आहे ते इतके तेजस्वी आहे की, सामान्यांना त्याची कल्पनाही येणार नाही. मोगूवाईंच्या गानसाधनेचा संपूर्ण इतिहास हा महान् क्रांतिकारकांच्या असीम हाल-अपेष्टांच्या तुलनेत यत्किंचितही उणा ठरणारा नाही! शरीरकष्ट आणि मानसिक यातना यांनीच ओतप्रोत भरलेला हा इतिहास समग्र ग्रंथाच्या रूपाने जनतेसमोर यावा, इतका तो महत्त्वपूर्ण, स्फूर्तिप्रद आणि महान् आदर्श अशा स्वरूपाचा आहे !

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

मोगूबाई या गोमंतकातील कुर्डी या गावच्या मूळ रहाणाऱ्या. त्यांच्या अनेक पिढ्यांतून गायन-वादनाचा व्यासंग चाललेला होता. त्यांच्या मातोश्री जयश्रीबाई यांना नेहमी वाटे, 'आपल्या मुलीनं गाणं शिकावं— तिनं मोठी गायिका व्हावं!' परंतु हे जमावे कसे? घरची अत्यंत गरीबी. कोणत्याही प्रकारचे स्वास्थ्य नाही. आपण कधीकाळी मोठ्या गायिका होऊ, अशी त्यांना स्वप्नांतही कधी कल्पना नव्हती! मुलीला नाटक कंपनीत पाठवले तर तिला तेथे गाणेही शिकावयास मिळेल आणि प्रपंचाचा काही आर्थिक प्रश्नही सुटण्यास मदत होईल, या कल्पनेने मोगूबाईच्या वयाच्या सातव्या वर्षी त्यांच्या मातोश्रींनी 'चंद्रेश्वर भूतनाथ कंपनी'त त्यांना नेले. कंपनीला ही उत्तम बालनटी मिळाल्याने नाटके श्रोत्यांच्या प्रचंड संख्येने साजरी होऊ लागली. हे सर्व परिश्रम बाईंना झेपत नसत. माय-लेकी दोघीही नाटकांतून भूमिका करीत असत. प्रल्हाद-ध्रुव अशी लहान मुलांची कामे मोगूबाई करीत. मोगूबाईंचे हे सारे कष्ट पाहून मातोश्रींना मनस्वी दुःख होत असे. या सर्व तापामुळे आणि मनःस्तापामुळे जयश्रीबाईंनी अंथरूण धरले ते कायमचेच! याच आजारपणामध्ये त्याचे देहावसान झाले. निधनापूर्वी जयश्रीबाईंनी मोगूबाईंना बाळकृष्णमाम् पर्वतकर यांच्या स्वाधीन करून 'मुलीनं उत्तम गायिका व्हावं आणि यासाठी तुम्ही मदत करावी' ही अखेरची इच्छा व्यक्त केली होती. मोगूबाई निराधार झाल्या. काही दिवसांनी 'चंद्रेश्वर भूतनाथ' हीही कंपनी बंद पडली. पोटापाण्याचा प्रश्न पुन्हा उभा राहिला. काही दिवसांनी त्या 'सातारकर स्त्री-संगीत मंडळी'च्या निमंत्रणावरून या कंपनीत दाखल झाल्या. या कंपनीत त्या महत्त्वाच्या भूमिका करू लागल्या. याच कंपनीत असताना चितूबुवा गुरव यांच्याकडून त्यांना नाट्यसंगीताचे खास शिक्षण मिळाले. त्याचप्रमाणे त्यांना विद्वान उस्तादांकडून नृत्याचीही तालीम यावेळी मिळाली. नाटक कंपन्यांच्या त्या काळातील प्रथेनुसार 'सातारकर मंडळी'तही राजकारण सुरू झाले. ते हळूहळू विकोपास जाऊ लागले. परिणामतः मोगूबाईंना हीही कंपनी सोडावी लागली. आता त्या सांगलीस राहू लागल्या. गाणे उत्तम तयार करावे, ही त्यांची इच्छा दिवसेंदिवस

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

अधिक तीव्र होऊ लागली. त्या खूप मेहनत करीत होत्या, परंतु उत्तम तालीम मिळाल्याशिवाय खरे गाणे येणे अशक्य आहे याची त्यांना पूर्ण कल्पना होती. त्यांची गाण्याची मेहनत जशी वाढत होती तशी गाण्याची तालीम मिळावी ही तळमळही सतत वाढत होती. त्यांच्या या तळमळीला नियतीचे सहाय्य मिळण्याचा सुयोग जमून आला !

सांगलीचे राजवैद्य कै. आबासाहेब सांभारे यांचेकडे श्रीगणेशोत्सव फारच मोठ्या प्रमाणात साजरा होत असे. या उत्सवाच्या निमित्ताने खां. अल्लादियाखां, भूगंधर्व रहिमतखां आणि पं. बाळकृष्णबुवा इचलकरंजीकर ही मंडळी प्रतिवर्षी नियमाने येत आणि आल्यानंतर दोन–दोन– चार चार महिने त्यांचे वास्तव्य आबासाहेबांकडेच होत असे. अशाच एका वेळी मोगूबाईंची चाललेली मेहनत ऐकून अल्लादियाखांसाहेब आपणहून मोगूबाईंच्या घरी आले. मोगूबाईंच्या संगीत शिक्षणाच्या व्याकुळतेमुळे खांसाहेबांच्या रूपाने परब्रम्हच समोर उभे ठाकले होते ! घडते ते काय घडते आहे याची त्या बालमोगूबाईंना सुतराम् कल्पना नव्हती, मोगूबाईंच्या कलाजीवनातला तो एक महान परमेश्वरी साक्षात्कार होता. खांसाहेबांची तालीम सुरू झाली. खांसाहेब अगदी मनोभावे शिकवीत होते. मोगूबाईही नव्या उमेदीने आणि अधिक शिस्तबारपणाने खांसाहेबांच्या संपूर्ण देखरेखीखाली रियाज करीत होत्या. खांसाहेबांनी चार-पाच रागांची तालीम दिली. सुमारे दीडवर्षपर्यंत ही तालीम चाललेली होती. सर्व गोष्टी मोगूबाईंच्या इच्छेनुसार चाललेल्या होत्या. मोगूबाईंच्या ध्यानीमनी नव्हता असा गुरु त्यांना लाभलेला होता, परंतु गुरु आणि शिष्य यांच्यापुढे एक अकल्पित असे संकट अचानकपणे उभे राहिले !

कोल्हापूरचे छत्रपती राजर्षी शाहूमहाराज हे एक अत्यंत रसिक असे संस्थानिक होते. त्यांच्या खास आग्रहामुळेच खांसाहेब राजगायक म्हणून त्यांच्या आश्रयाला राहिले. संगीतकलेतील खांसाहेबांच्या अद्वितीय स्थानाची शाहूमहाराजांना विलक्षण अभिमानपूर्वक जाणीव होती. त्यामुळे कोणत्याही अडीअडचणीच्या प्रसंगी खांसाहेबांच्या पाठीशी हे राजछत्र सदैव असे. १९२२ साली शाहूमहाराजांचे निधन झाले.

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

आपला थोर रसिक आश्रयदाता नाहीसा झाल्याने खांसाहेब अतिशयच उद्विग्न झाले. खांसाहेबांचा प्रपंच मोठा. त्यांतून वय सत्तरीच्या आसपास आलेले. काही तरी उद्योग–व्यवसाय केल्याशिवाय चरितार्थ व्यवस्थित-पणे चालणे अशक्य होते. अशाच वेळी मुंबईस राहून काही तालमी करण्याचे त्यांनी निश्चित केले आणि ते मुंबईस निघून गेले. मोगूबाईंची तालीम अशा कारणाने या वेळी बंद झाली. मात्र खांसाहेबांनी जातेवेळी 'मुंबईस आलीस तर तुला मी अवश्य तालीम देईन.' असे आश्वासन दिले. मोगूबाईंची जिद्द विलक्षण होती. त्यांनी सांगली सोडून मुंबईस जाण्याचे निश्चित केले आणि त्यानुसार त्या मुंबईच्या रहिवासी झाल्या. मोगूबाईंचा आवाज, तीव्र बुद्धिमत्ता, असीम महत्त्वाकांक्षा, जिद्द, कमालीची मेहनती वृत्ती, वृत्तीतील विनयशीलता, नम्रता इत्यादी गुणसंपदेवर खांसाहेब निहायत खूष होते. परंतु या वेळी मोगूबाईंचे काही ग्रहमान आडवे आल्याने त्यांची खांसाहेबांची तालीम सुरू होऊ शकली नाही, परंतु खांसाहेबांचे कनिष्ठ बंधू हैदरखांसाहेब यांची त्यांना तालीम सुरू झाली होती. हैदरखांसाहेबांनी मोगूबाईंना अगदी मनापासून तालीम दिली. जयपूर घराण्याच्या किती तरीं प्रसिद्ध-अप्रसिद्ध रागरागिण्या, उत्तमोत्तम चिजा आणि या गायकीची अंगोपांगे यांची सूक्ष्म तालीम देऊन मोगूबाईंची 'नजर' खोलण्याचे विकट काम खांसाहेबांनी केले. मोगुबाईंची संगीतसाधना फारच उत्तम तऱ्हेने चाललेली होती. मध्यंतरीच्या काळात काही कारणाने अल्लादिया-खांसाहेबांचे मोगूबाईंकडे येणे-जाणे अगदी बंद होते. अशाच एके दिवशी लहानग्या किशोरीला मांडीवर घेऊन मोगूबाई गाण्याचा रियाज करीत बसल्या होत्या. त्या संगीतसाधनेत मग्न झालेल्या होत्या. अशाच समाधी-अवस्थेत बराच काळ गेल्यानंतर मोगूबाईंनी डोळे उघडले. समोर दिसलेले दृश्य पाहून बाई थक्क झाल्या! खांसाहेब आपल्या घरी आता कधीच येणार नाहीत ही खात्री बाळगून असलेल्या मोगूबाई आपल्या-समोर साक्षात खांसाहेब उभे आहेत हे दृश्य पाहत होत्या. बाईंच्या डोळ्यांतून अश्रू वाहू लागले. स्वतःच्या नजरेवर बाईंचा विश्वास बसत नव्हता. परंतु ती घटना पूर्ण सत्य होती. बाईंची कायीक, वाचीक व मानसिक तपःश्चर्या पूर्णपणे फळास आली होती.

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

खांसाहेबांची तालीम पुनःश्च सुरू झाली. ही तालीम दीड तपपर्यंत चालली. मध्यंतरी जो खंड पडला होता, त्याचीही भरपाई व्हावी अशा जोमाने ही तालीम सुरू झाली. मोगूबाईंची थोरवी ही की, ही सर्व कठीण तपस्या खांसाहेबांच्या कडक शिस्तीखाली त्या पार पाडीत होत्या. मी कोल्हापूर येथे असताना जयपूर घराण्याच्या कडक शिस्तीच्या तालमीचा अनुभव दीर्घकाल घेतलेला आहे. वस्तुतः कोणत्याही घरंदाज-गायकीची पथ्ये कडक असतातच. परंतु काही घराण्यांतून काहीं काही बंधने थोडी फार शिथिल झाली तरी ती खपून जाण्याइतपत सवलतीही असतात. काही घराण्यांतून ही शिस्त थोडीफार गोळाबेरीजस्वरूपाची चालू शकते. काही घराण्यांतून एखादी गोष्टच महत्त्वाची समजतात तर अन्य बाबी गौण समजतात. याचे एखादे सुस्पष्ट उदाहरण वानगीदाखल द्यावयाचे झाल्यास किराणा घराण्याचे देता येईल. 'सूर गया तो सीर गया, और ताल गया तो बाल गया' हे किराणागायकीचे सामान्यतः सुप्रसिद्ध सूत्रवाक्य आहे. या एका सूत्रवचनातून कितीतरी बोध घेता येण्यासारखा आहे. मात्र ही चर्चा घराण्याच्या संपूर्णस्वरूपाची आहे अशी कल्पना कोणी करून घेतल्यास ती चुकीची ठरेल. याचा अर्थ इतकाच घ्यावयाचा आहे की, किराणागायकाने स्वर आणि स्वराचे सौंदर्य या गोष्टी अत्यंत कटाक्षाने पाळल्या पाहिजेत-जपल्या पाहिजेत. त्या मानाने अन्य गोष्टी दुय्यमस्वरूपाच्या समजल्या जातात. मात्र जयपूरपद्धतीत तंबोरा छेडण्याच्या पद्धतीपासून प्रत्येक गोष्टीला नेमकी शिस्त आहे. त्या शिस्तीला नेमके स्थान आहे. ही चर्चा येथे करण्याचे कारण असे की, मोगूबाईंची सारी गानसंपदा त्यांनी कोणत्या दिव्यांतून प्राप्त करून घेतली आहे याचा थोडाफार तरी बोध व्हावा हेच आहे. घराण्याच्या शिस्तीप्रमाणेच खांसाहेबांची स्वतःची म्हणून एक शिस्त होतीच आणि तीही अतिशय कडक होती. आजकालचे गुरु-शिष्यसंबंध बऱ्हंशी मजूर-मालक संबंधाइतकेच 'पवित्र' राहिलेले आहेत. गुरुजवळ काही विद्या चुकून असलीच तर ती विद्यार्थ्याला देण्याची आच नाही आणि विद्यार्थ्याला ती विद्या घेऊन पचविण्याची इच्छा नाही- सवड नाही. सर्वच मामला पोषाखी आणि प्रतिष्ठितपणाचा! अर्थात गुरु-शिष्यांच्या अशा

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

उपद्‌व्यापांतून काय निर्मिती होते हे आज पहावयास मिळतेच आहे !

मोगूबाईंनी त्यांच्या मातोश्रींच्या अंतकाली 'मी तुझ्या इच्छे-प्रमाणं गाणं शिकेन आणि फार मोठी गायिका होईन' असे वचन दिले होते. सामान्य माणसाची वचने आणि प्रतिज्ञा या मोडण्यासाठीच असतात. द्विजांचे 'सावधान' हे शब्द ऐकताच पळून जाऊन प्रतिज्ञापूर्ती करणारा एखादाच 'समर्थ' पदवीला पोहोचतो. किर्लोस्कर मंडळीतून अपमानाने घालवून देताना 'मी मोठा गवई होईन आणि मगच तुम्हांला तोंड दाखवीन!' ही प्रतिज्ञा करून ती पुरी करून दाखवणारा एखादा भास्करच भास्करबुवा ठरतो. मोगूबाईंची गणनाही याच श्रेष्ठ मालिकेत करावी लागेल. त्यांनी केलेली प्रतिज्ञा जीवनभर प्रचंड परिश्रम करून पुरी करून दाखवली, हीच त्यांची थोरवी !

जयपूरगायकीला बंधने अतिशय. साफ-मोकळा आवाज लावणे, गाताना आकार नेमका लावणे, उच्चार अगदी व्यवस्थित करणे, तिन्ही सप्तकांत आवाजाचा वापर एकसारखा करणे, आवाज लावण्यात अनुनासिकता नाही– तो गळी नाही अशा प्रकारचे नुसता आवाज लावण्याचे प्राथमिक दंडक जयपूरगायकीत आहेत. अस्ताई-अंतरा म्हणताना त्याची प्रत्येक वेळी ठरलेली नेमकी लयच असली पाहिजे. चीज म्हणताना, बढंत करताना किंवा तान– पलटा करताना श्वास कोठे आणि कसा घ्यावयाचा व कोठे सोडावयाचा याचे सारे संकेत सांभाळावे लागतात. तालीम न घेताच मनसोक्त आणि सपाटून गाणे हा प्रकार कोणत्याही गायकीत– विशेषत: या गायकीत कटाक्षाने वर्ज्य असतो आणि म्हणूनच या गायकीच्या कठोर यम-नियमांमुळे ही गायकी शिकण्याचा फारसा प्रयास कोणी करीत नाहीत. असा प्रयास करण्याचा थोडाबहुत प्रयत्न कोणी केल्यास ते शेवटपर्यंत जाऊ शकत नाहीत ! आणि काही विशिष्ट अधिकार प्राप्त झाल्याखेरीज या गायकीचा प्रभाव पडत नाही.

मी लहानपणी सांगलीस असताना मोगूबाईंच्या नाटकांतील भूमिका पाहिल्याचे मला स्मरते. त्या केवळ याच नाट्य व्यवसायात गुंतून

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

राहिल्या असत्या तरी त्यांना आर्थिक–प्रापंचिक स्वास्थ्य लाभू शकले असते, परंतु त्यांना 'मी मोठी गायिका होणार' या एकाच कल्पतेने विलक्षण झपाटलेले होते आणि त्यासाठी–या असिधाराव्रताच्या सिद्धी-सांगतेसाठी स्वतःच्या सर्व सौख्यांचा व स्वस्थतेचा त्यांनी आजन्म होम केला. आज सर्वतोमुखी मानमान्यता व सरकारदरबारी महत्त्वाचे मान-सन्मान मिळूनही त्यांच्या या व्रतात यत्‌किंचित्‌ही खंड नाही. आज या वयातही कोठे बाहेर मैफल असल्यास त्यासाठी त्यांची महिना दोन महिने तरी खास तालीम चालू असते. आपल्या विद्येबाबत अशी दक्षता बाळगणारे आज किती गायक मिळतील ?

मोगूबाईंनी संगीतसाधनेपायी जीवनभर प्रयत्नाचे पहाड फोडले ! त्यांच्या या परिश्रमाचे चीजही उत्तम तऱ्हेने झाले. संगीतातील विद्वान गायक आणि संगीतज्ज्ञ रसिक यांच्या अंतःकरणांत मोगूबाईंनी अत्या-दराचे स्थान पूर्वीच मिळविले आहे. त्यांच्या महान्‌ संगीतसेवेची दाद सरकार-दरबारीही बहुमानाने घेतली गेली आहे. दिल्लीच्या संगीत नाटक अकादमीने 'फेलोशिप देऊन त्यांचा बहुमान केला. भारत सर-कारने 'पद्‌मभूषण' हा महत्त्वाचा किताब देऊन बाईंचा खास गौरव केला. या शुभ प्रसंगाच्या निमित्ताने मुंबई–पुणे अशा शहरांतून त्यांच्या प्रचंड सत्काराचे उत्स्फूर्त समारंभ साजरे झाले. खुद्द गोमंतकात त्या वेळचे रसिकाग्रणी मुख्यमंत्री कै. भाऊसाहेब बांदोडकर यांच्या शुभहस्ते प्रचंड सत्कार करण्यात आला ! आपण केलेल्या सेवेचे सर्वप्रकारे सार्थक होत आहे हे अनुभवण्याचे सौभाग्य प्राप्त व्हावे हेच कला-जीवनातील खऱ्या समाधानाचे स्थान आहे !

मोगूबाईंच्या गायनाची मैफल ही संगीत रसिकांच्या विलक्षण समाधानाची 'ज्ञानेश्वरी' आहे. मोगूबाईंनी किंवा जयपूर घराण्याच्या कोणत्याही गायकाने किंवा गायिकेने स्वतःच्या मैफली संख्येने थोड्याच केलेल्या आहेत. आपल्या घराण्याच्या गायकीची बूज निश्चितपणे राखली जाईल अशाच ठिकाणी त्यांनी आपल्या मैफली सादर केल्या. यासाठीं या गायकांनी अर्थाचा लोभही कधी धरला नाही. काहीही त्रास झाला तरी 'अरसिकेषु कवित्व' निवेदन करीत बसण्याचा मोह त्यांनी सदैव

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

कटाक्षाने टाळला. मोगूबाईही याला अपवाद नाहीत. आपली मैफल आपल्या विद्येच्या आणि घराण्याच्या तोलामोलानेच झाली पाहिजे याबाबत त्या अतिशय जागरूक असतात. त्यांची पूर्वतयारीही याच दक्षतेने चालते. मोगूबाईंचा आवाज काहीसा बारीक परंतु रेशमी धाग्यासारखा अत्यंत चिवट आणि पल्लेदार असा आहे. बंदेषयुक्त अस्ताई–अंतरा अतिशय शिस्तीने म्हटल्यानंतर क्रमप्राप्त संथ आलापी सुरू होते. ही आलापी बीन अंगाने म्हणजे मींड, घसीट आणि गमक या अंगानेच आली पाहिजे, त्यात कोठेही तुटकपणा येता कामा नये ही जयपूर गायकीची एक अत्यावश्यक प्रणाली आहे, त्यानुसारच बाई हे विलंपद करतात. बाईंचे बोलअंग अतिशय प्रभावी आहे. धृपदी अंगाने लयीच्या सवाई-दिडीच्या अंगाने चिजेचे बोल बांधून अगदी ताळेबंद हिशेबाने त्या समेवर येतात, त्या वेळी जाणकार रसिकालाही त्या बोलबंदेषीचे आनंदाइतकेच आश्चर्यही वाटते. मूळच्या जयपूरगायकीत अनेक धृपदी-अंगांचे सौंदर्यपूर्ण कलात्मक मिश्रण आहेच. त्यातही लयभास्कर कै. खाप्रूमाम् यांच्या सहवासातून आणि मार्गदर्शनातून मोगूबाईंना सूक्ष्म लयकारीचा फायदा झाला. याही गोष्टी मोगूबाईंनी स्वतःच्या गायकीत मोठ्या कौशल्याने मुरविल्या. मोगूबाईंच्या तानेचा वेग आणि झपाटा विलक्षण आहे. त्या गमकयुक्त, द्रुतगती, बलपेचयुक्त आणि निरनिराळ्या आकृतिबंधाची तानक्रिया करू लागल्या म्हणजे जाणकार श्रोत्यांचे श्वासही रोखले जातात. सर्व कामगत भरीवपणे करून त्या अचूकपणे समेवर आल्या म्हणजे रसिकांना कलेचा दिव्य साक्षात्कार घडतो ! कोणत्याही कलात्मकतेतील दिव्य अनुभूतीचे सार्थ वर्णन करणे हे शब्द-शक्तीच्या आटोक्यातील काम नव्हे ! मोगूबाईंच्या या सर्वांगीण समर्थतेमुळे त्यांची प्रत्येक मैफलच अविस्मरणीय अशी ठरते. मोगूबाईंनी आपल्या गाण्याच्या ध्वनिमुद्रिकाही दिलेल्या आहेत. त्याही नवीन–नवीन तालांतील असून मोगूबाईंच्या प्रदीर्घ आणि मार्मिक व्यासंगाची प्रभावी साक्ष देण्याइतक्या समर्थ आहेत.

मोगूबाईंच्या थोर कर्तबगारीची सांगता इतक्यावरच थांबलेली नाही. मोगूबाईंची संगीत जगतावर महान ऋण करून ठेवणारी आणखी एक महत्त्वपूर्ण कामगिरी म्हणजे त्यांचे आदर्श ज्ञानसत्र ! स्वतःच्या

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

संगीत साधनेबरोबरच गेली कित्येक वर्षे त्या ज्ञानदानाचे थोर कार्य अत्यंत निष्ठेने करीत आहेत. सौ. हिराबाई बडोदेकर यांचा सन्माननीय अपवाद वगळल्यास इतक्या अधिकारी स्त्री-कलाकाराने उघडलेले आदर्श ज्ञानसत्र अन्यत्र नाही. त्यांच्या कन्या सुप्रसिद्ध चिंतनशील गायिका सौ. किशोरीबाई आमोणकर यांना तर त्यांनी बालपणापासूनच तालीम देऊन अधिकारी गायिका बनविले. सौ. किशोरीबाई या आजच्या तरुण गायिकांचे प्रभावी श्रद्धास्थान आहे. किशोरीबाईंनी घरची तालीम तर पचविली आहेच, परंतु त्यात त्यांनी स्वतःच्या असामान्य प्रज्ञेने अनेक उत्तमोत्तम कलाप्रकार सामील केलेले आहेत. मातोश्रींच्याप्रमाणे किशोरीबाईही अनेक बुद्धिमान विद्यार्थिनींना गाण्याची तालीम देत असतात. त्यांच्या संपूर्ण कामगिरीबाबत स्वतंत्र लेखच लिहावा लागेल.

मुंबईतील एक ख्यातनाम आणि सुविद्य सांगीतिक, 'घरंदाज गायकी' या अधिकृत ग्रंथाचे विद्वान लेखक, संगीताचे थोर व्यासंगी टीकाकार आणि एक चिंतनशील गायक श्री. वामनराव देशपांडे हे मोगूबाईंचे बहुधा पहिलेच शिष्योत्तम आहेत. वामनरावांनी मोगूबाईंची गायकी अभ्यासपूर्वक आत्मसात केली आहे.

श्रीमती कमल तांबे ह्या मोगूबाईंच्या बऱ्याच जुन्या शिष्या आहेत. तांबेबाई यांना मोगूबाईंची खास तालीम बरीच वर्षे मिळालेली असून बाईंची खास गायकी त्या अधिकारपूर्वक गातात. तांबेबाई या मुंबई-आकाशवाणीवरून नेहमी गातात. त्यांच्या मैफलीही चालू असतात. कमल तांबे यांची आणखी एक महत्त्वाची कामगिरी म्हणजे गेल्या अनेक वर्षांत त्यांनी कित्येक विद्यार्थ्यांना गाण्याची– जयपूर गायकीची– तालीम देण्याचे कार्य अविश्रांतपणे केले आहे. त्यांचे हे कार्य आजही उत्तम रीतीने चालू आहे. मुंबईतील विद्वान गायिकांत तांबेबाईंचे नाव मोठ्या आदराने घेतले जाते मोगूबाईंची खास गायकी गाणाऱ्या एक उत्तम शिष्या म्हणून त्यांचा सर्वत्र लौकिक आहे. तांबेबाईंप्रमाणे संगीतविद्येसाठी निष्ठापूर्वक देहदंड सोसणाऱ्या गायिका आजतरी क्वचितच दिसतील. तांबेबाई यांची मुंबईत फार मोठी शिष्य-शाखा आहे. श्रीमती कौसल्या मंजेश्वर आणि मोगूबाईंच्या अगदी

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

अलीकडच्या उदयोन्मुख शिष्या पुण्याच्या सौ. पद्‌मा तळवलकर यांचाही उल्लेख आवश्यक आहे. कौसल्याबाईंना पुष्कळ वर्षे तालीम मिळाली असून मोगूबाईंची गायकी त्या अभ्यासपूर्वक गातात. सौ. जोगळेकर या मोगूबाईंच्या गायकीचे उद्याचे प्रभावी आशास्थान ठरावे !

मोगूबाईंनी स्वतःच्या जीवनात जे भव्य यश संपादिले आहे ते मोगूबाईंच्या अंगच्या अनेक दुर्मिळ गुणसमुच्चयाचे स्पष्ट प्रसादचिन्ह आहे. दुर्दम्य महत्त्वाकांक्षा, प्रयत्नांचे सातत्य, प्रखर गुरुनिष्ठा, तीव्रतम ध्येयनिष्ठा इत्यादी गुणांप्रमाणेच अत्यंत स्वाभिमानी परंतु तितक्याच विनम्र, सौजन्य, शालीनता, आतिथ्य शीलता, कृतज्ञता, सुसंस्कृतता, या गुणांचा एक उत्कृष्ट आदर्श,—अशा अनेक गुणांचा मनोज्ञ संगम मोगूबाईंच्या ठिकाणी झालेला आहे. त्यांचे संपूर्ण जीवन हा एक रण-संग्रामच होता, परंतु पराक्रमाने आणि हिंमतीने त्यांनी या संग्रामात भरघोस यश मिळवले.

विचार आणि अंतःकरणाची श्रेष्ठता या गोष्टी मोगूबाईंच्या अंगी किती उत्कटत्वाने वास करतात, याचे एकच लहानसे उदाहरण येथे देणे उचित होईल! लयभास्कर कै. खाप्रूमाम् पर्वतकर यांचे सुपुत्र पं रामकृष्णबुवा यांचे बनारस येथे अकल्पित निधन झाले. त्यांना श्रद्धांजली वाहण्याचा एक कार्यक्रम पुणेकरांनी आयोजित केला. हा कार्यक्रम मोगूबाईंच्या कार्यक्रमानेच साजरा व्हावा ही आम्हा पुणेकरांची फार इच्छा होती. त्यानुसार सारंगीनवाज कै. दत्तारामजी पर्वतकर यांच्या-मार्फत विचारणा केली. काहीही आढेवेढे न घेता बाईंनी एकदम मान्यता दिली. त्यानुसार कार्यक्रमासाठी त्या आपल्या विद्यार्थिनींसह पुण्यास आल्या. कार्यक्रम अप्रतिम झाला. मोगूबाईंनी प्रवास-खर्च स्वीकारला नाही. इतकेच नव्हे तर त्या प्रसंगी हार-गुच्छांसाठी पैसे खर्च केले म्हणून त्या संचालकांवर रागावल्या! मोगूबाईंची श्रेष्ठ गानविद्या आमच्या सर्वस्वी आटोक्याबाहेरची आहे, परंतु त्यांच्या-तील थोर मानवी मूल्यांचे थोडे फार तरी अनुकरण आम्ही करू शकू का ?

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

मोगूबाईंच्या सांगीतिक जीवनाचा काही परामर्श घ्यावयाचा झाल्यास एक गोष्ट प्रामुख्याने दिसून येते ती अशी की, मोगूबाई या एक थोर भाग्याच्या गायिका आहेत. त्यांना निसर्गाने आवाजाची देणगी वहाल केली. इतरांनी हेवा करावा असे थोर गुरु त्यांना दीर्घकालपर्यंत लाभले. त्या आजही तडफेने गाऊ शकतात. असे उत्कृष्ट आरोग्य त्यांना लाभले आणि म्हणूनच त्यांच्या हातून या गायकीची मेहनत पार पडू शकली ! अनेकांच्या जीवनांचा विचार केला तर मोगूबाईंचे हे भाग्य कोणालाही पटावे ! मोगूबाईंच्या हातून अद्याप पुष्कळच कार्य व्हावयाचे आहे. स्वतःच्या मैफलींच्याद्वारे गुरुंचे आणि जयपूर घराण्याचे ॠण दीर्घकालपर्यंत त्यांना फेडावयाचे आहे. त्यांच्या कन्येचे भावी कालातील भव्य यश पाहावयाचे आहे. या घराण्याची गायकी समर्थपणे गाऊ शकतील असे कितीतरी छात्र त्यांच्या हातून अजून तयार व्हावयाचे आहेत आणि याहूनही अधिक मानसन्मानाचे गौरव त्यांना उपभोगावयाचे आहेत. श्रीखळनाथाच्या कृपेने हे सर्व घडणार आहेच !

▣ ▣ ▣

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri



रत्नकांत रामनाथकर

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri



एक व्युत्पन्न– चतुरस्त्र कलाकार
पं. रत्नकांत रामनाथकर

१९३१ साल असावे. रेकॉर्डिंगच्या काही कामासाठी मी मुंबईला "हिज मास्टर्स व्हॉइस" कंपनीमध्ये गेलो होतो. त्या वेळी कोण्या एका गायिकेचे रेकॉर्डिंग सुरू होते. माझे थोडेसे पूर्वपरिचित तबला वादनकार श्री. विष्णुपंत शिरोडकर हे तबल्याच्या साथीस होते. हार्मोनियमच्या साथीस बसलेले कलाकार माझ्या माहितीचे नव्हते. गायिका खूपच तयार होत्या– उत्तम गात होत्या. परंतु माझे विशेष लक्ष वेधून घेतले ते त्या तरुण आणि कलासंपन्न हार्मोनियम-साथीदाराने ! त्याच्या हाताची तयारी, सफाई, गायकीची उत्कृष्ट जाणकारी आणि साथीचा अचूक अंदाज व धोरण यांनी माझ्या मनावर विलक्षण परिणाम केला. त्या कलाकाराचे बाह्य दर्शनही तितकेच आकर्षक होते. कुरळे सुंदर केस, नाक–डोळे तरतरीत, पेहराव अतिशय नीटनेटका आणि तितकाच आकर्षक ! त्याचे एकूण दर्शनच त्या कलाकाराच्या सौंदर्यदृष्टीची प्रभावी साक्ष देत होते ! हा कलाकार कोण असावा, हे जाणून घेण्याची मला उत्कंठा लागली होती. काही वेळाने रेकॉर्डिंग संपले. हार्मोनियम वादनकाराने हार्मोनियम बंद केली. लगेच सिगरेट

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

पेटविली आणि मोठ्या ऐटीत ओढीत ओढीत तो बाहेर निघून गेला! इतक्यात विष्णुपंत शिरोडकर माझ्याजवळ आले. त्यांचे-माझे क्षेम-कुशलसंबंधाचे थोडे बोलणे होताच, माझ्या मनात इतका वेळ घोळत असलेला प्रश्न मी त्यांना विचारला, "आत्ताचे हे पेटीवाले कोण?" विष्णुपंतांना थोडे आश्चर्य वाटले. ते म्हणाले, तुम्ही त्यांना ओळखत नाही? ते रत्नकांत रामनाथकर!! मी एकदम चकित झालो. रत्न-कांत यांचे नाव मी तोपर्यंत खूपच ऐकले होते. विशेषतः मास्टर दीना-नाथ यांचे साथीदार हार्मोनियमवादनपटू श्री. बाबी बोरकर यांचे तोंडून हार्मोनियमवादन आणि रत्नकांत यांचे समीकरण मी अनेकदा ऐकलेले होते. या श्रेष्ठ कलाकाराच्या वादनपटुत्वाची साक्ष मला त्या पहिल्या साथीनेच पटली होती. यानंतरच्या काळात नभोवाणी व खासगी मैफलींतून त्यांचे विद्वत्तापूर्ण हार्मोनियमवादन ऐकण्याचा मला पुष्कळदा योग आला! या कलाकाराचा प्रत्यक्ष परिचय व्हावा याचीही मला विलक्षण ओढ लागलेली होती. कालांतराने त्यांचा-माझा चार वेळा परिचय झाला व रत्नकांतजींना त्याचे विस्मरण पाच वेळा झाले! अशा परिस्थितीत जवळ जवळ एक तप निघून गेले.

मुंबई नभोवाणीचे एक "स्टाफ आर्टिस्ट" श्री. आर्. जी. जोशी हे माझे बालमित्र. त्यांच्या घरी मुंबईस त्या काळी प्रतिवर्षी श्रीसत्यनारायणाची पूजा साजरी होत असे. पूजेनिमित्त रात्रभर गाण्या-बजावण्याचे कार्यक्रम होत. यावेळी पुण्याहून मीही जात असे. संगीताच्या या सर्व कार्यक्रमाचे संचालक रत्नकांतजी हेच असत. त्यांच्या स्वतःच्या गाण्याचा लाभही या प्रसंगी नित्य घडत असे. क्वचित त्यांचे हार्मोनियमवादन ऐकण्याचाही सुयोग येई. या पूजेच्या निमित्ताने माझा मात्र दुहेरी फायदा होत होता. रत्नकांतजींच्या श्रेष्ठ कलात्मकतेचे सूक्ष्मदर्शन मला होत राहिले, हा एक फायदा आणि दुसरा महत्त्वाचा फायदा असा की, रत्नकांतजींच्या खऱ्या परिचयाचा योग येथेच आला. तो परिचय सतत वाढत चालला आणि कालांतराने या परिचयाचे रूपांतर त्यांच्या—माझ्यात बंधुतुल्य घरोवा निर्माण होण्यात झाले.

"रत्नकांतचे पेटीवादन म्हणजे बंदा सुरती रुपया!" अशी तारीफ बाबी बोरकर यांचेकडून मी सतत ऐकत होतो. त्यांच्या या

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

उक्तीची प्रचीती मला पदोपदी येत होती. अनेक नामांतिक वादनकारांचे पेटीवादन मी यावेळेपर्यंत खूपच ऐकले होते. या सर्वांपेक्षां रत्नकांतजींचे पेटीवादन मला आगळचा स्वरूपाचे वाटले. त्यांची वादनपद्धती व त्यांच्या या कलेचा दर्जा ही वहुतांशी भिन्न स्वरूपाची होती. त्यांच्या या वादनकलेचे स्थानही ध्रुवताऱ्याप्रमाणेच अढळ असे होते.

रत्नकांतजींचे हार्मोनियमवादनाचे सारे शिक्षण त्यांचे परमपूज्य पिताजी श्री. रघुवीरमामा यांचेकडेच झाले. हार्मोनियममध्ये आलाप आणि जोड वाजवणे ही स्वतंत्र कलात्मकता रत्नकांतजींच्या वादनातील एक खास गोष्ट आहे. रागरागिणी अतिशय शुद्ध स्वरूपात वाजवणे, लय-ताल-गायकी या सर्व दृष्टीने मोठचा बंदेषीने वादन करणे आणि हे सर्व विलक्षण सौंदर्याने सादर करणे हे त्यांच्या वादनाचे अपूर्व वैशिष्टच होते. अत्यंत क्लिष्ट व मुष्कील रागिण्या अति विकट पलटचांच्या विलक्षण तयारीने आणि तितक्याच निर्मळतेने– रेखीवपणे ते सादर करू लागले म्हणजे या थोर कलाकाराच्या प्रज्ञा–प्रतिभेचे दर्शन होई. हार्मोनियमची उत्कृष्ट आणि तितकीच आदर्श साथ–संगत हाही त्यांच्या वादनकलेचा उल्लेखनीय असा गुणविशेष होता. धृपद, धमार, टप्पा. ख्याल–अस्ताई, ठुमरी, गझल गाणाऱ्या अशा सर्वच प्रकारांच्या घरंदाज गायक–गायिकांच्या साथ– संगती त्यांनी केल्या. या सर्वांची गुणविशेषता या तैलबुद्धीच्या कलाकाराने टिपून घेतली आणि स्वतःची कला संपन्न वनवली. मी ऐकलेल्या थोर हार्मोनियमवादनपटूंत रत्नकांतजींचे स्थान स्वतंत्र आणि अद्वितीयस्वरूपाचे आहे!

उस्ताद खां. फैय्याजखां आणि आग्रा घराण्याचे अधिकृत गायक विलायत हुसेन खांसाहेव या दोघांच्या जाहीर व खासगीस्वरूपाच्या कित्येक मैफली ऐकण्याचे मला सौभाग्य लाभले. त्या काळी या दोघांचीही गाणी ठिकठिकाणी होत. या दोघांच्याही गाण्याने मी बेभान– बेचैन होत असे. रंगीले व आग्रा घराण्याच्या अशा दोन्ही गायकींचे दर्शन मला घडू लागले होते. त्यांतील वेगळेपणा व मौलिक गुणविशेष स्थूलमानाने उमजू लागले होते. भातखंडे यांच्यासारख्या एका महा-पंडिताने या गायकीची इतकी तारीफ का केली त्याची कारणेही

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

मला पटू लागलेली होती. यामुळे या गायकीची मूलभूत मूल्ये, तिची तात्त्विक बैठक आणि तिच्यातील थोर सौंदर्यवत्ता ही आपल्याला समजलीच पाहिजेत, अशी उत्कंठा मला लागून राहिली. ती दिवसें-दिवस मला बेचैन करू लागली, आणि याच परिस्थितीत वरील श्री. जोशीबुवांकडील वार्षिक सत्यनारायणपूजा मला पावू लागली. फैयाजखां व विलायतहुसेनखां यांच्या गायकीचा मी पुरा भक्त झालो होतो. त्यांच्या गायकीचे मर्म समजावे हीच माझी यावेळची एकमेव तळमळ होती आणि नेमक्या अशाच वेळी रत्नकांतजींची ही गाणी ऐकण्याचा मला सुयोग येत गेला. रत्नकांतजींच्या गायकीमध्ये या दोन्ही महापुरुषांच्या गायकीचे मनोज्ञ आणि प्रभावी दर्शन मला अगदी स्पष्टपणे घडत होते. ती नुसती वरवरची नक्कल नव्हती, तर प्रयासाने, परिश्रमाने व तपश्चर्येने साध्य करून घेतलेले ते विद्याधन होते. रत्नकांतजींकडे मी जो विशेष आकर्षिला गेलो ते त्यांच्या असामान्य हार्मोनियमवादनापेक्षाही त्यांच्या आग्रा घराण्याच्या शंभर टक्के चोख व निर्भेळ अशा विद्वत्तापूर्ण गायकीमुळेच ! माझ्या या भावपूर्ण भक्तीला—तप:श्चर्येला फळ येऊ लागले. रत्नकांतजींचे व माझे संबंध दिवसेंदिवस अधिक दृढ होऊ लागले. कालांतराने घरोब्यात रूपांतर झाले. पुढे मी त्यांचा एकनिष्ठ छात्र बनलो. विद्येच्या दृष्टीने एक उत्कृष्ट—तपस्वी गुरु आणि माझ्या व्यावहारिक जीवनाच्या दृष्टीने एक वडिल-धारे मनुष्य, अशा प्रकारचा मला दुहेरी लाभ घडला, हे माझे थोर भाग्य !

वयाच्या केवळ पंधराव्या वर्षीच उत्तम हार्मोनियम वादनकार म्हणून रत्नकांतजी यांचा नावलौकिक होऊ लागला. १९२७ साली मुंबई नभोवाणीवर हार्मोनियमवादक म्हणून त्यांची नेमणूक झाली. खां. नन्नेखां यांचेकडे त्यांनी गाण्याची तालीम घेतली पुढे खां. विलायत हुसेनखां यांची तालीम कित्येक वर्षे—म्हणजे खांसाहेबांच्या निधनापर्यंत त्यांना लाभली. उ. फैय्याजखां यांचीही त्यांना तालीम मिळाली. लयभास्कर खाप्रूमामा यांच्याकडूनही लयकारीच्या काही प्रकारांची त्यांना तालीम मिळाली. याशिवाय अनेक विद्वान् कलाकारांच्या सह-वासाचा त्यांना बहुमोल लाभ घडला. नभोवाणी, मैफली या निमित्ताने

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

त्यांनी जे संगीत श्रवण केले तेही भाग्य इतरांच्या क्वचितच वाटचाला आले असेल !

कलेच्या दृष्टिकोनातून पाहाता रत्नकांतजी हे एक थोर भाग्याचे कलावंत आहेत असे मला दिसून आले. रघुवीरमामा यांच्यासारख्या श्रेष्ठ कलामहर्षींच्या पोटी जन्म घेणे, त्यांचेच मार्गदर्शन पिता आणि गुरु या उभय नात्यांनी मिळणे, पुढील काळात उत्कृष्ट गुरु लाभणे आणि कलात्मता सतत वाढणे असेच योग सर्व जीवनभर यावेत, यापेक्षा आणखी निराळे भाग्य ते कोणते असावे ? उपजत कुशाग्र बुद्धिमत्ता, कोणत्याही विषयाच्या मुळाशी जाऊन त्याचे मर्म शोधण्याची असामान्य शक्ती ही रत्नकांतजींना मूलतः अनुवंशिकतेनेच मिळाली आहेत. उत्तम स्मरणशक्ती, सूक्ष्म-निरीक्षणसामर्थ्य, कलासाधनेतील अत्यावश्यक अशा विद्याप्रियता, महत्त्वाकांक्षा, जिज्ञासा, प्रयत्नांतील सातत्य या साऱ्या गोष्टी त्यांना पित्याच्या वारसा हक्कानेच प्राप्त झाल्या आहेत. उत्तम आरोग्य व चिकाटी याही गोष्टींचा त्यांना असाच लाभ झालेला आहे. अनुवंशिकतेने लाभलेल्या या सर्व दैवी गुणांचे विलक्षण चीज रत्न-कांतजींनी आजन्म केलेल्या थोर तपश्चर्येने झाले, हा रत्नकांतजींचा मोठेपणा ! चिंतनशीलता हा गुण रत्नकांतजींच्या अंगी मोठ्या प्रकर्षाने जाणवतो. संगीतकलेच्या विविधांगांवर त्यांनी केलेले चिंतन अत्यंत मार्मिकतेचे आहे. अभिजात गायकी, वाद्यवादन, सुगम संगीत, नाट्य-संगीत, ठुमरी, गझल अशा सर्वच अंगांवर त्यांनी केलेले विचार अनुभूतीं-पूर्ण व चिंतनीय आहेत. अमुक एक गोष्ट का करावी आणि का करू नये, याबाबत त्यांचे विचार अगदी पक्के व तितकेच सप्रमाण आहेत. त्यांच्या श्रेष्ठ संगीतविद्येचा माझ्यावर जो प्रभाव पडला त्याचे मुख्य कारण हेच की, त्यांच्या या विद्येतील सच्चाई व निर्भेळता यांचेच दर्शन मला सदैव घडत आले आहे. मी स्वतः अनेक थोरामोठ्या कलाकारांचा सहवास केलेला आहे. विद्येतील बनवाबनवीचे अनंत प्रकार आमच्या कलाकारांनी अत्यंत परिश्रमाने साध्य करून घेतले आहेत. स्वतःच्या विद्येतील असमर्थता व अपात्रता झाकून टाकण्यासाठी बनवाबनवीचे पांघरूण त्यांनी तयार केलेले असते. यांत त्या कलाकारांचा फार मोठा दोष आहे असे मी म्हणत नाही. कारण सामा-

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

न्यतः मनुष्यस्वभावच असा आहे की, स्वतःचे नाणे जितके गुळगुळीत–खोटे असेल तेवढे ते खरे असल्याचे पटवण्याच्या युक्त्याप्रयुक्त्या तो हुडकून काढीत असतो. अर्थात रत्नकांतजींना अशा मार्गाचा अवलंव करण्याचे कधीच कारण पडले नाही. एक तर फार मोठ्या गुरुंकडे त्यांना वर्षांनुवर्षे तालीम मिळाली. त्या विद्येचे त्यांनी प्राणपणाने जतन केले. अन्य किती तरी विद्वानांशी त्यांचे संबंध आले. त्यांच्याशी विनम्र-भावाने राहून स्वतःचे विचार तावून–सुलाखून–पारखून नंतरच त्यांनी ते पक्के केले. दुसरी गोष्ट अशी की, आपण आहोत त्यापेक्षा मोठे भासवावे, या एका इच्छेपायीच हे सारे प्रयत्न सामान्यतः होत असतात. रत्नकांतजींना स्वाभाविकपणेच या मार्गाचा अवलंव करण्याचे कधीच कारण पडले नाही. त्यांनी आजवर तपःश्चर्या केली ती आपण स्वतः मोठे व्हावे, या प्रामाणिक जाणिवेपायी केली. लोकांनी आपल्याला मोठे म्हणावे, असे त्यांना केव्हाच वाटले नाही व त्यासाठी त्यांनी काही खटाटोपही केले नाहीत. गर्भ-श्रीमंताला श्रीमंतीचे नाटक करण्याची हौस कशी असणार ?

रत्नकांतजींची श्रेष्ठ कलोपासना हे आमच्या अभिजात संगीत-कलेचे एक मोठेच भूषण आहे. आग्रा घराण्याची शुद्ध गायकी हे त्यांच्या गायकीतील सर्वांत महत्त्वाचे अंग आहे. या गायकीतील चिजांची खास बंदेश, रागशुद्धता, गायकीची शिस्त, लयअंग, बोलअंग अशा सर्वांगानी रत्नकांतजींची गायकी परिपूर्ण आणि समृद्ध आहे. गायकीतील "नोम्‌तोम्" हे एक कलात्मक अंग अतिशय महत्त्वाचे आहे. परंतु प्रत्यक्ष तालीम मिळाल्याशिवाय नोम्‌तोम् चांगल्याप्रकारे करता येत नाही. रत्नकांतजींचे नोम्‌तोम् प्रत्येकाने आवर्जून ऐकलेच पाहिजे, इतके ते सौंदर्यपूर्णतेने गातात. त्याचप्रमाणे आमच्या गायकीतील धमारगायकी ही आजकाल नामशेष होऊ लागलेली आहे. रत्नकांतजींची धमार-गायकीवरही पूर्ण सिद्धी आहे. त्यांची धमारगायकी हे सौंदर्याने रसरसलेले एक मौलिक कलाचित्र आहे. धृपद व धमार ही आमची मूळची अभिजात गायकी आहे. या गायकीतूनच ख्यालगायकीचा जन्म झाला आहे. ख्यालगायकीच्या मजबुतीसाठी धृपद-धमार गायकीच्या मूल्यांची वस्तुतः अतिशय आवश्यकता असते. परंतु आमच्या अभिजात शास्त्रीय संगीत कलेचे दुर्दैव असे की, धृपद–धमारगायकी गाणारेच

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

जवळजवळ नाहीसे झालेले आहेत. अशा परिस्थितीत रत्नकांतजींकडील धमार गायकीचे पालन–पोषण–रक्षण आम्ही किती सावधपणे केले पाहिजे हे निराळे सांगण्याचे कारण नाही.

रत्नकांतजींची आग्रा घराण्याची शुद्ध गायकी हे त्यांच्या कलात्मकतेतील सर्वांत महत्त्वाचे आणि प्रभावी असे अंग आहे. हार्मोनियम या वाद्यावर त्यांनी जे प्रभुत्व मिळविले ते असामान्य स्वरूपाचे आहे: ते उत्तमपैकी जलतरंग वादनकार आहेत त्यांनी काही काळ सतारीवरही रियाज केलेला होता. तबला या विषयाचाही त्यांनी उत्तम व्यासंग केलेला आहे. तबलाशास्त्राची त्यांची जाणकारीही फारच श्रेष्ठ स्वरूपाची आहे. प्रत्येक गोष्ट शिस्तवार व शास्त्रसंमत असली पाहिजे हा त्यांच्या एकूण कलात्मक आचार-विचारांचा स्थायीभाव आहे. अर्थात त्यातील सौंदर्यदर्शन हे अभिप्रेत आहेच !

रत्नकांतजींचा आणखी एक गुणविशेष मुद्दाम नमूद करण्यासारखा आहे. तंबोऱ्याची जोडी उत्तम मिळविणे ही मैफलीतील एक अत्यंत महत्त्वाची आवश्यक गोष्ट असते. मी आजपर्यंत असंख्य कलाकार पाहिले आहेत, मैफली ऐकल्या आहेत, परंतु स्वरसम्राट अबदुलकरीमखांसाहेब आणि श्री. कुमार गंधर्व हे सन्माननीय अपवाद सोडल्यास रत्नकांतजीं-प्रमाणे अत्यंत जलद व तितकीच सुरेल तंबोराजोडी जमविणारा अन्य सिद्धहस्त कलाकार माझ्या पाहण्यात नाही. रत्नकांतजींच्या हातात कसलाही तंबोरा द्या, क्षणार्धात त्याचे दिव्य अनुरणन रसिकाने अनुभवावे ! आमच्या परशुराम माळचांच्या सर्कशीत कसल्याही पट्टीच्या खोडसाळ सिंहाला हातातल्या चाबकाच्या एकाच फटकाऱ्याबरोबर माळी अगदी कुत्र्याप्रमाणे रिंगण घालायला लावीत, तीच आठवण होते !

मुंबई नभोवाणीच्या आजवरच्या वाटचालीत रत्नकांतजी यांच्या कार्याची मोठीच भर पडलेली आहे. त्यांनी तेथील वृंदवादनासाठी हजारो उत्तमोत्तम गतींची रचना केली. त्यांतील कित्येक गती आजही वाजतात. त्यांच्या स्वतःच्या गाण्याचे कार्यक्रम नित्य होत असतात. नभोवाणीच्या कायम कलाकार नोकरांना रत्नकांतजींचे मौलिक

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

मार्गदर्शन सतत होत होतेच. बाहेरून कार्यक्रमासाठी येणाऱ्या कित्येक कलाकारांना रत्नकांतजींचा पुष्कळच फायदा झालेला आहे. कित्येक नामवंत गायकगायिकांनी रत्नकांतजींकडून काही राग व उत्तमोत्तम चिजा शिकून घेतलेल्या आहेत. रत्नकांतजी यांचा मुंबईस काही शिष्यवर्गही आहे. त्यांना त्यांनी अतिशय उत्तम तालीम दिलेली आहे. रत्नकांतजी हे स्वतः जसे एक व्युत्पन्न आणि सौंदर्यलक्ष्यी कलाकार आहेत, तसेच ते एक समर्थ आचार्य आहेत. प्रचारातील आणि अनवट राग-रागिण्या व उत्कृष्ट चिजा यांचा त्यांच्याकडे प्रचंड संग्रह आहे आणि हे सर्व सत्पात्री देण्याबाबत ते कर्णाइतकेच दानशूर आहेत. ते स्वतः एक उत्कृष्ट रचनाकार आहेत. त्यांनी प्रचलित व अप्रचलित रागांतून "प्रेमरंग" या नावाने चिजा बांधलेल्या असून, त्या सर्व चिजा उत्कृष्ट वाग्गेयकाराच्या रचना म्हणून नमुनेदार आहेत. त्यांनी कित्येक तराणेही बांधले आहेत. बंदेश व काव्यरचना या दृष्टींनी त्यांच्या या सर्व रचना जुन्या चिजांच्या दर्जाच्या झालेल्या आहेत. गोमंतक कला-अकादमीने या चिजांचे लिपीबद्ध पुस्तकही प्रकाशित केले असून, संगीताचा अभ्यास करणाऱ्यांना ते अतिशयच उपयुक्त आहे.

काही राग-रागिण्या व अनेक दुर्मीळ चिजा यांची तालीम मला रत्नकांतजींकडून अतिशय प्रेमाने व आपुलकीने मिळाली. संगीतातील विविध विषयांवर त्यांच्याशी वेळोवेळी चर्चा करण्याचे भाग्यही मला लाभले. संगीतातील त्यांच्या सखोल व मार्मिक मूलगामी विचारांचा माझ्या कुवतीनुसार मला स्पर्श घडला. केवळ त्या स्पर्शानेसुद्धा माझे वैचारिक क्षेत्र विस्तीर्ण झाले. रत्नकांतजींच्या विद्येचे सामर्थ्यही मला सहजावारी अनुभवावयास मिळाले. मुंबईचे विद्वान संगीताचार्य– स्कूल ऑफ इंडियन म्यूझिक या संस्थेचे प्राचार्य बी. आर. देवधर यांच्याशी एक राग व त्यातील चीज यांवर मी काही चर्चा करत होतो. मी त्यांना "ही चीज मी रत्नकांतजींकडे शिकलो." असे सांगताच ते तत्काळ उत्तरले, "रत्नकांतजींकडून घेतली आहे ना ? मग ती अगदी बरोबर आहेच. त्यात विचार करण्याचं काहीही कारण नाही !" रत्नकांतजींच्या श्रेष्ठ विद्येची अशी रोकडी साक्ष कितीतरी विद्वानांकडून मला आजवर मिळाली आहे.

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

माझ्या संगीत शिक्षणाच्या निमित्ताने रत्नकांतजींशी निरनिराळ्या विषयांवर चर्चा करण्याचा मला नेहमीच योग येतो. आग्रा घराण्यातील अधिकारी थोर गुरुजनांकडून कित्येक वर्षांची तालीम मिळालेल्या या विद्वान पंडिताची मते मला अतिशय चिंतनीय अशी वाटतात. त्यांच्या या विचारांनी माझा स्वतःचा आणि माझ्या शिष्य मंडळींचा बहुमोल फायदा झालेला आहे. म्हणूनच सामान्य रसिक वाचकांसाठी नव्हे तर संगीताचा व्यवसाय करणारे गुरुजन आणि होतकरू विद्यार्थी यांच्यासाठी रत्नकांतजींचे काही मौलिक विचार येथे मुद्दाम देत आहे. आमच्या होतकरू संगिताभ्यासूंनी या विचारांचे सक्रीय चिंतन करावे, असे त्यांना आवर्जून सांगणे आहे. त्यांचे हे विचार शक्यतो त्यांच्याच शब्दांत देत आहे. विद्यार्थ्यांनी आपला अभ्यास कसा करावा, अभ्यास करताना कोणकोणती दक्षता घ्यावी याबाबतचे त्यांचे विचार असे आहेत —

(१) मूळ सूर म्हणजे मध्यसप्तकातील 'षड्ज्' हा गाण्याचा पाया असल्याने तो पक्का करणे फार जरूर आहे. तसेच खर्जातील सूर सहज–स्वच्छ लागेपर्यंत ते भरावे म्हणजे तार सप्तकातील सूरही थोड्या मेहनतीने उत्तम लागतात व गळ्यात वजन पैदा होते आणि गळा जोरकस बनतो. हे विषय आकारातच करावे.

(२) मेहनतीकरता राग साधा म्हणजे ज्या रागाचे आरोह–अवरोह सरळ असतील असा असावा.

(३) मंद्र सप्तकातील 'पंचम', तसाच तार सप्तकातील 'षड्ज्' स्वच्छ आकाराने जमवणे.

(४) रागाच्या आरोह–अवरोहाची तान मध्यगतीने काही वेळ गावी, म्हणजे गळ्यातील काही दोष असल्यास ते नजरेस येतील व गळ्यात एक "लेव्हल्" पैदा होईल, म्हणजे सपाटी पैदा होईल आणि कोठेही अडणार नाही. तसेच ती तान एक सुराची असावी. डबल सूर लागू नयेत. उदाहरणार्थं, सा रे ग म प ध नी सां नी ध प म ग रे सा.

(५) आपला आवाज तार सप्तकातील पंचमापर्यंत जाऊ शकेल असा सूर कायम करावा. तसाच खर्जातील पंचमही स्वच्छ लागावा.

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

(६) पुरा दम (श्वास) घेऊन तान सुरू करावी म्हणजे दम वाढेल व मध्य लयीने ती गायल्यामुळे त्यात "गमक" पैदा होऊन तानेचा दाणा स्वच्छ होईल आणि तान जोरकस होईल. मग हळूहळू गती वाढवावी.

(७) मध्य सप्तकातील पंचमपर्यंत म्हणजे -- सा रे ग म प म ग रे सा- या सुरांची तान काही वेळ गाणे. तसेच प़ ध़ नी़ सा नी़ ध़ प़ हाही मंद्र सप्तकातील प्रकार खूप जमवणे. नंतर तार सप्तकातील गळा जाईल त्या सुरापर्यंत तान घेऊन मध्य सप्तकातील षड्जापर्यंत येणे. हाही प्रकार खूप जमवावा.

(८) तानेचे अनेक "बल" (प्रकार) लयीत बांधून ते सतत गात राहावेत.

(९) अस्ताई–अंतरा खूप वेळा गावा म्हणजे चिजेचे बोल स्वच्छ गाता येतील. ती चीज मनन करीत राहावी. ती इतकी की, अस्ताई–अंतऱ्याचे बोल न गाता (गद्यात) सांगता येतील. यामुळे गाताना पुढचे शब्द आपोआप म्हणता येतील, विचार करावा लागणार नाही व ती चीज विसरली जाणार नाही.

(१०) चिजेच्या बोलांची बढत कानांला खटकू नये अशा तऱ्हेने करावी आणि तेच बोल तानेत गावे म्हणजे आकार, उकार, इकार हे सर्व गळ्यात उत्तम जमतील. त्याकरता निराळी मेहनत करावी -लागणार नाही. तरीही हे सर्व प्रकार गुरूसमोर व्हावे. म्हणजे आपले गुण-दोष गुरूच सांगू शकेल. संगीत ही श्रवण-विद्या आहे, तशीच ती गहनविद्या आहे आणि ती गाऊनच शिकण्याची आहे. व्याख्याने व लेखणीने कुणासही गाणे आले नाही व येऊच शकत नाही म्हणूनच गुरूकडूनच शिकणे योग्य आहे. (या संदर्भात " गुरु असावा व्युत्पन्न । " हे समर्थवचन लक्षात ठेवण्यासारखे आहे.) बैजुबावरे आपल्या एका धृपदात म्हणतात की, जो कछु आवे सो गावे सुनावे।। नहिं तो गुनियनके चरण परिये ।। धृ. ।।

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

जो कलाकार संगीताची सेवा मनापासून करील त्याचा कुठलाही कार्यभाग अडून राहणार नाही, असाच आजपर्यंतचा इतिहास आहे. कारण ही विद्येची सेवा आहे.

आवाजाच्या पद्धतशीर लगावाच्या दृष्टीने रत्नकांतजींचे पुढील विचार वाचकांनी जरूर वाचण्यासारखे आहेत. ते असे– मनुष्याच्या गळ्यात अनेक तऱ्हेचे आवाज असतात. बोलणे, हसणे, रडणे, ओरडणे, किंचाळणे, कुंथणे इत्यादी आवाज आणि त्याचप्रमाणे पशू व पक्षी यांचेही आवाज गळ्यात असतात. त्यात गाण्याचा आवाज कोणता हे ओळखून त्यानुसार आवाज तयार करणे ही फार महत्त्वाची गोष्ट आहे. एखाद्याचा आवाज सनईसारखा असणे हा दोषच आहे. तसेच पुरुष गायकाचा आवाज स्त्रीसारखा असणे हाही दोषच ठरेल. असे हे दोष शास्त्रीय शिक्षण नसल्यामुळे निर्माण होतात. काही गायक म्हणविणाऱ्यात ओरडणे, किंचाळणे, वेडावणे असे आवाजलगावाचे प्रकार दिसून येतात; तर काही कुत्र्यां-मांजराच्या भांडणाप्रमाणे आवाज काढणे ह्यालाच गाणे म्हणत असतात. म्हणून असा प्रकार न होण्याबद्दल काळजी घेणे जरुरीचे आहे. नकली आवाजाने गाणे म्हणणे म्हणजे ते गुणगुणणे होईल. ते गाणे नव्हे! म्हणूनच गुरू करतानाच हा सर्व विचार केला पाहिजे.

गाण्याबरोबर तबल्याची साथ कशी असावी याबाबतचे रत्नकांतजींचे अनुभूतिपूर्ण विचार आमच्या तबलावादकांचे दृष्टीने फारच महत्त्वाचे आहेत. ते असे: गाण्याकरता एकाग्रतेची फार जरुरी असते. म्हणून तबलियाने ठेक्यापलीकडे काहीही वाजवू नये. तबला हे वाद्य गाण्याचे वेळी ठेक्याकरिताच असते. कारण ते (एकसुरी वाद्य) गाण्याची साथ करूच शकत नाही. तबल्याची भाषा निराळी म्हणजे बोल हे निराळे व ते गाण्यात नसतात. मग साथ ती कशी करणार? गाण्याकरिता उत्तम ठेक्याचीच जरूर असते आणि तीच गाण्याची तबल्याची खरी साथ! ज्या सुरांत तबला असेल त्या सुराच्या खर्जात डग्गा असावा व ठेक्याचे जसे उच्चार आहेत ते तबल्यांतून सही सही वाजावे. एखाद्या योग्य वेळी छोटासा मुखडा वाजविल्यास शोभा म्हणून ठीक आहे. पण ती "योग्य वेळ" ओळखता आली पाहिजे! लय ही प्रत्येकाची

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

स्वतंत्र असते. म्हणून गायकाची लय ओळखणे जरूर आहे. "माझ्या मात्रा बरोबर आहेत" हे गणित त्या वेळी उपयोगाचे नाही. तसेच गायक गाताना लयीमध्ये किंचित मागेपुढे होत असतात. हा प्रकार तबलजीच्या लक्षात तावडतोब आला पाहिजे व त्याने गायकाच्या लयीत मिळाले पाहिजे, म्हणजेच गायकाचे गाणे उत्तम जमू शकेल. ह्याकरिता उत्तम गायकांच्या सहवासाची त्याला फार जरुरी आहे. असो. रत्नकांत-जींचे हे सारे विचार प्रातिनिधिक स्वरूपाचे असल्याने थोड्या विस्ताराने ते येथे मुद्दाम नमूद केलेले आहेत.

रत्नकांतजी हे परिचयाभावी प्रथमतः बरेच अबोल वाटतात. त्यामुळे त्यांच्याबाबत कित्येकदा गैरसमजही होतात. परंतु मार्मिक चर्चा करताना ते किती बोलत राहतील याचा नेम नाही. प्रत्येकाने स्वतःची प्रगती करून घ्यावी, आपले ज्ञान वाढवावे, ते शक्यतो निर्दोष करावे याची त्यांना विलक्षण तळमळ वाटते. याच तळमळीपायी ते अनेकांना काहीना काही उपदेश करीत असतात. आजकाल असा उपदेश फारसा कोणाला नको असतो याचेही रत्नकांतजींना सोयरसुतक नसते. काही कलाकारांनी मात्र रत्नकांतजींच्या मार्गदर्शनावर श्रद्धा व विश्वास ठेवून स्वतःमध्ये उत्तम प्रगती केल्याचीही काही आदर्श उदाहरणे माझ्या पाहण्यात आहेत.

मडगावच्या "स्वरमंच" या संस्थेने कै. खाप्रूमाम पर्वतकर यांची दहावी पुण्यतिथी साजरी केली, त्या वेळी दि. ४ ऑक्टोबर १९६४ या दिवशी मान्यवर न्यायमूर्ती व्ही. एन्. पालेकर यांच्या अध्यक्षतेखाली रत्नकांतजींचा भव्य सत्कार करण्यात आला. या समारंभास मुख्यमंत्री माननीय दयानंदरावजी बांदोडकर आणि गोमंतकातील अन्य थोर व्यक्ती उपस्थित होत्या. हा सत्कार करून गोमंतकाने आपल्या या विद्वान अपत्याचे अंशतः तरी ऋण फेडले आहे.

पं. रत्नकांतजी हे मुंबई आकाशवाणीच्या सेवेतून निवृत्त झाल्या-नंतर गोमंतक कला-अकादमीमध्ये शास्त्रीय संगीताच्या प्राचार्यपदी त्यांची बहुमानाने निवड झाली, ही घटना उभयपक्षी गौरवास्पद अशीच आहे. संगीत कलेच्या दृष्टीने हा अत्यंत दुर्मीळ असा मणिकांचन योगच

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

होय. रत्नकांतजींच्या चतुरस्र मार्गदर्शनामुळे कला-अकादमीच्या कार्याचा भावी कालात विशाल वृक्ष उभा राहील आणि अकादमीच्या समर्थ पाठिंब्यामुळे रत्नकांतजींच्या हातून संगीताची विविधांगी सेवा अजूनही मोठ्या प्रमाणावर निश्चितपणे होईल असा विश्वास जरूर वाळगता येईल.

रत्नकांतजी हे एक आग्राघराण्याच्या गायकीचे, तसेच गोमंतकीयांचे खास हक्काचे 'कला रत्न' आहे.

▣ ▣ ▣

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri



गायनहिरा
सौ. हिराबाई बडोदेकर !

कोल्हापूरच्या पॅलेस थिएटरमध्ये सौ. हिराबाईंच्या गायनाचा कार्यक्रम होणार असल्याचे जाहीर झाले. त्यानिमित्त त्या कोल्हापुरास येऊन ख्यातनाम देवल क्लबमध्ये उतरणार होत्या. त्यामुळे देवल क्लबचे वयोवृद्ध आद्य प्रमुख संस्थापक बाबा देवल यांची एकच धावपळ सुरू झालेली होती. खोल्या स्वच्छ करणे, उत्तमोत्तम बैठकी घालणे या एकाच कामांत ते सतत गर्क झालेले होते. येणाऱ्या-जाणाऱ्या प्रत्येकाला 'उद्या हिराबाई येणार आहेत!' ही आनंदाची बातमी ते अतिशय प्रेमाने आणि आस्थेने सांगत सुटले होते. या हिराबाई अशा कोण होत्या की, आजच्या आमदार-मंत्र्याप्रमाणे त्यांची सारी बडदास्त स्वार्थापोटी लाचारीने व्हावी! बाबा देवलांनी संगीताचे सारे सुवर्णयुग अगदी चोखंदळपणे तपासले होते. त्यांनी अल्लादियाखांसाहेबांच्याही पूर्वीची संगीत दुनिया पाहिलेली होती. गोविंदराव टेंब्यांना थोडाफार धाक दाखवून हार्मोनियमचे प्राथमिक धडे घोटावयास लावले होते. कोल्हापूरच्या पंडितमहाराजांकडे लंगोटी लावून बसलेले नारायणराव बालगंधर्व त्यांनी पाहिले होते. त्यांनी मोठमोठे गायक—वादक

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri



सौ. हिराबाई बडोदेकर

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

किती ऐकले, ते त्यांना स्वतःलाही एकदम सांगता आले नसते. असे हे बाबा देवल 'उद्या हिराबाई येणार आहेत' या जपात का गुंतले होते? शिवाय पांचट स्त्रीदाक्षिण्य दाखविण्याचे त्यांचे ते वयही नव्हते. कृतांताची उग्र पदचिन्हे त्यांना केव्हाच दिसू लागलेली होती. मग बाबांची ही स्थिती का झालेली होती? याचे कारण एकच होते. कन्या माहेरपणाला यायची होती!

कोल्हापूरच्या या जलशापूर्वी फक्त एकच वर्ष आणि तेही अगदी प्रथमच हिराबाई कोल्हापूरला आलेल्या होत्या. या एकाच खेपेतल्या एकाच जलशाने कोल्हापूरच्या तज्ञ, अज्ञ आणि सूज्ञ रसिकांना आपल्या-स्वर्गीय गायनाने व लोभस व्यक्तिमत्त्वाने त्यांनी कमालीचे आपलेसे करून सोडले होते. समस्त करवीरकर रसिकांना हिराबाई या आपल्याच घरच्या वाटत होत्या... ठरल्याप्रमाणे हिराबाई आपल्या साथीदारांसह देवल क्लबांत आल्या. रात्री ९-३० ते १-३० पर्यंत त्यांचा जलसा त्यांच्या नेहमीच्या तब्येतीने साजरा झाला! आपल्या आगमनाचे जागते स्मरण ठेवून त्या पुढील कार्यक्रमासाठी परगावी निघून गेल्या. बाबा देवलांच्या रूपाने निरोप देणाऱ्या कण्वमुनीच्या नेत्रांत आसू तरारले! आज सुमारे पन्नास वर्षानंतरसुद्धा मला स्वतःला या दृश्याचे अनेकदा स्मरण होते.

हिराबाई यांचे मूळ घराणे गोमंतकातील कोरगावचे. त्यांच्या तीन पिढ्यांत गायनाचीच परंपरा होती. हिराबाई यांच्या आजींचे नावही हिराबाई हेच होते. या थोरल्या हिराबाई रहिमतपूर येथील माने सरदारांच्या आश्रयाला होत्या. बडोद्याचे राजे श्रीमंत सयाजीराव यांच्या पत्नी श्रीमंत सौ. जमनाबाईसाहेब या मूळच्या रहिमतपूरच्याच. लग्न होऊन त्या बडोद्याला गेल्या, त्या वेळी त्यांचे मानकरी म्हणून सरदार माने हेही बडोद्याला गेले. त्यांच्याबरोबर थोरल्या हिराबाईही गेल्या. बडोद्यात त्यांना माने हेच नाव पडले. या हिराबाई कै. पं. भास्कर-बुवा बखले यांच्याबरोबर खां. फैजमहंमदखां यांचेकडे गाणे शिकल्या. त्यांची गुणीजन खात्यात योजना झाल्यामुळे त्या फक्त दरबारातच गात असत. किराणा घराण्याचे विख्यात गायक अबदुल करीमखांसाहेब त्या

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

वेळी बडोद्याच्या गुणीजन खात्यात होते. सौ. हिराबाई यांच्या मातोश्री श्रीमती ताराबाई माने या अबदुल करीमखांसाहेबांकडे त्या वेळी गाणे शिकत असत.

दि. २९ मे १९०५ या दिवशी मिरज येथे सौ. हिराबाईंचा जन्म झाला. त्यांची जन्मकहाणीही लोकविलक्षणच आहे! सातव्या महिन्यातच या मुलीचा जन्म झाला. आईची प्रकृती बरी नाही. जन्मानंतर मुलीचे रडणे नाही. जिवंतपणाची काहीच खूण दिसेना, म्हणून सुईणीने हे मूल मृतजात समजून तसेच कपड्यांत गुंडाळून बाजूला ठेवून दिले. थोड्या वेळाने मिरजेचे सुप्रसिद्ध धन्वंतरी डॉ. भडभडे यांना बोलावण्यानुसार ते लगेच आले. त्यांनी या नवजात बालिकेला बारकाईने तपासले. पुष्कळ उपचार केले. परिणामतः मुलीत थोडीशी धुगधुगी दिसू लागली. बाळ-बाळंतीण दोघीही सुखरूप! मुलगी हळूहळू योग्य रीतीने वाढू लागली.

काही वर्षांनी हे सर्व कुटुंब पुण्यास राहावयास आले. सौ. हिराबाईच्या मातोश्री श्रीमती ताराबाई, दोन बंधू आणि दोन भगिनी असे हे सर्व कुटुंब होते. पुण्याच्या हुजूरपागा हायस्कूलमध्ये हिराबाईंचे इंग्रजी तिसरीपर्यंत शिक्षण झाले. पुढे काही दिवस मुंबईच्या चंदारामजी हायस्कूल आणि क्वीन मेरी हायस्कूलमध्ये त्यांनी शिक्षण घेतले. आईच्या धाकाच्या इच्छेमुळे त्या शिकत होत्या परंतु त्यांचे शाळेच्या अभ्यासात मुळीच लक्ष नसे. त्यांचे सारे लक्ष गाण्यात होते. त्यांच्या मातोश्री आणि वडील बंधू–ख्यातनाम गायक सुरेशबाबू यांचेजवळ त्या गाणे शिकू लागल्या. त्यांची प्रगतीही झपाट्याने होऊ लागली. मातोश्रींचाही आता विश्वास वाढू लागला. मुलीला कोणातरी बाहेरच्या उस्तादाची तालीम द्यावी, असा मातोश्रींनी निश्चय केला. त्या दिशेने त्यांनी काही प्रयत्न केले. मध्यंतरी एक-दोन गुरुजींची तालीमही घेतली, परंतु त्यात कोणाचेच समाधान होईना. याच सुमारास त्या आपल्या मामांच्या सांगण्यावरून इंदोरचा होलिकोत्सव पाहण्यासाठी गेल्या. तेथे अबदुल करीमखां यांचे भाचे उस्ताद अबदुल वहीदखांची भेट झाली. त्यांचा पूर्वीचा परिचय होताच. त्यांनी हिराबाईंना गाणे ऐकवण्यास सांगितले. हिराबाईंनी

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

त्याप्रमाणे गाणे ऐकविले. बाईचा आवाज, गाणे आणि एकूण सर्व लक्षण यांवर खांसाहेब बहुत खूष झाले. खांसाहेबांनी एकदम सांगितले, "या मुलीला मीच गाणं शिकवणार!' त्याप्रमाणे खांसाहेब मुंबईस आले. ते हिराबाईंच्या घरीच राहू लागले. त्या वेळच्या ज्ञानदानाच्या पद्धतीनुसार सकाळ, दुपार, संध्याकाळ, रात्र अशी दिवसातून कित्येक तासांची तालीम सुरू झाली. अशी तालीम दोन वर्षे झाल्यानंतर १९२० साली हिराबाईंनी खांसाहेबांचा समारंभपूर्वक गंडा बांधला. खांसाहेब आता अधिक कडक शिस्तीने तालीम देऊ लागले. ही तालीम एकूण चार-सहा वर्षे चालली. हिराबाई आता उत्तम तयार झाल्या होत्या. हिराबाईंचे ज्येष्ठ बंधू सुरेशबाबू हे एक सव्यसाची आणि चतुरस्र कलाकार होते, परंतु ते अवलिया वृत्तीचे होते. त्यामुळे आता कुटुंबाच्या चरितार्थाचा सर्व भार हिराबाईंवरच पडला. त्यांना आता काहीतरी द्रव्यार्जनाचा प्रयत्न करणे अगत्याचे होते.

या वेळपर्यंत केसरबाईंचे नाव सर्वतोमुखी झालेले होते. त्या कलकत्त्याच्या ख्यातनाम म्यूझिक कॉन्फरन्ससाठी मधूनमधून जात असत. एक नवोदित गायिका या नात्याने कॉन्फरन्सच्या संचालकांना केसरबाईंनी हिराबाईंचे नाव मुद्दाम सुचविले. इतकेच नव्हे तर कलकत्त्यास गेल्यानंतर केसरबाईंनी हिराबाईंच्या हाताला धरून व्यासपीठावर आणून बसविले. हिराबाईंचे हेच पहिले जाहीर गाणे! हिराबाई खूप जमून गायल्या. या एकाच मैफलीने त्या कलकत्त्याच्या संगीतरसिकांच्या अतिशय आवडत्या गायिका झाल्या. १९२६ साली पुण्यातील आर्यभूषण थिएटरमध्ये तिकीट लावून अभिजात संगीताचा स्वतःच्या गाण्याचा पहिलाच जाहीर जलसा त्यांनी लावला. या या जलशाच्या प्रथेने संगीताच्या जगतात विलक्षण क्रांती घडवून आणली. १९२७ मध्ये सर चुनीलाल मेहता यांनी हिराबाईंना 'गायनहिरा' ही सार्थ पदवी दिली. १९२५ पासून त्यांच्या गायनाच्या ध्वनिमुद्रिका निघू लागल्या. त्या अतिशय लोकप्रिय होऊ लागल्या. त्यांचे जाहीर जलसे, संगीत परिषदांमधून गाणी, खाजगी मैफली, मोठमोठ्या शहरांतील म्यूझिक सर्कल्समधून गाणी, अनेक संस्थानिक— धनिक यांच्याकडील गाणी. अशा प्रकारचे त्यांचे

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

कार्यक्रम भारतातील सर्वच भागांतून सतत होऊ लागले. सुमारे वीस वर्षांपूर्वीच्या काळात हिराबाईंची गाणी न ऐकलेला एकही संगीत-रसिक सापडणे अशक्य होते. त्या १९२९ साली रेडिओवर प्रथम गायल्या.

'स्त्रियांच्या भूमिका स्त्रियांनीच कराव्यात' ही कल्पना नाटच-क्षेत्रातील काही अध्वर्यूंच्या डोक्यांत बदलत्या काळामुळे येऊ लागली. नटसम्राट बालगंधर्वांसारखे अधिकारी पुरुष या कल्पनेचा पाठपुरावा सतत करू लागले. त्यांनी या बाबतीत हिराबाईंना प्रथमतः विचारणा केली, परंतु हिराबाईंनी 'मी नाटकांत कधीच काम केले नसल्याने मला ते जमणार नाही.' असा नम्र परंतु स्पष्टपणे नकार दिला. परंतु बाल-गंधर्वांनी हट्टच धरल्याने हिराबाईंनी बालगंधर्वांच्याबरोबरच कामे करण्यास सुरुवात केली. नटवर्य गणपतराव बोडस यांनी ही कामे बसवून घेतली होती.

हिराबाईंनी मुंबईत गाण्याचे शिक्षण देण्यासाठी 'नूतन संगीत विद्यालय' ही संस्था सुरू केली होती. या संस्थेची शाखा म्हणून १९२८ मध्ये त्यांनी 'नूतन संगीत नाटक मंडळी' स्थापन केली. ही कंपनी काही काळ ठीक चालली परंतु साध्यासुध्या प्रवृत्तीच्या हिराबाईंना स्वतःच्या डोक्यावर कर्जाचा मोठा बोजा घेऊन ही कंपनी १९३४ साली बंद करावी लागली. या बाबतीत त्यांना मनस्वी मनःस्ताप सोसावा लागला. परंतु तोही त्यांनी अगदी शांतपणे सोसला. कंपनीचे हे सारे कर्ज त्यांनी स्वतःच्या मैफलींतून पूर्णपणे फेडले. त्यांनी तीन बोलपटांतून कामे केली. त्यानंतर त्यांनी १९६५ पर्यंत नाटकांतून नाईटवर कामे केली. कोणतेही काम करताना ते अत्यंत शिस्तीने करायचे हा त्यांचा मूळ स्वभावधर्म. त्याला अनुसरूनच त्यांनी त्यांच्या नाटकातील भूमिका परिश्रमपूर्वक सादर केल्या. हे सर्व काही व्यवस्थित चालू असले तरी त्यांचा खरा जीव होता तो त्यांच्या अभिजात संगीताच्या मैफलीवरच !

सौ. हिराबाईंना आवाजाची जन्मजात देणगी लाभली ती असामान्य स्वरूपाची. शेकड्यांत-हजारांत नव्हे तर लाखांतही असा आवाज पहावयास सापडणे दुर्मिळ ! त्यांना स्वराचे बाळकडू मिळाले ते

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

अबदुल करीम खांसाहेबांसारख्या स्वरसम्राटाचे. त्यांना अगदी योग्य–संस्कारक्षम वयात तालीम मिळाली ती किराणा घराण्याच्या उ. वहीदखां यांच्यासारख्या अधिकारी–श्रेष्ठ गुरुची. हे सर्व योग आहेत आणि ते भाग्यानेच येतात, अशी जरी आपण क्षणभर कल्पना केली तरी केवळ इतक्या योगावरच इतकी श्रेष्ठ–युगप्रवर्तक गायिका तयार होणे हे अगदीं अशक्य आहे. ईश्वरी देणगी आणि उत्कृष्ट तालीम या सामुग्रीवर हिराबाईंनी जे अपार परिश्रम केले ते सामान्यांच्या कल्पनेतही येणे अशक्य आहे. वहीदखांसाहेबांसारख्या अत्यंत कडक गुरूच्या शिस्तीने मेहनत करणे ही हिराबाईंच्या आज्ञाधारक आणि निष्ठावंत वृत्तीची जागती निशाणी आहे. अस्ताई–अंतरा, गायकीची मांडणी, बढत, तानपलटे हे सर्व खांसाहेबांच्या आदेशानुसार व आज्ञेवरहुकूमच आले पाहिजेत. त्यांत यत्किंचितही फरक होता कामा नये ही सक्त ताकीद. ते अस्ताई–अंतरे, पलटे शेकडो वेळा घोटून घेत. आश्चर्य असे की, खांसाहेबांच्या या कडक शिस्तीचे पालन हिराबाई आजही– इतका अधिकार प्राप्त झाल्यानंतरसुद्धा पूर्वीच्याच कटाक्षाने करतात. मी त्यांच्या शेकडो मैफली ऐकल्या आहेत, परंतु एखादा अस्ताई–अंतरा कसा तरी ओढून ताणून आणून त्यांनी सम गाठली आहे हे दृश्य मी चुकूनही अनुभवलेले नाही. किराणा घराण्याचे स्वर हे बोधचिन्ह आहे, स्वर हे दैवत आहे. या दैवताचे पूजाअर्चादी विधी या घराण्यात विशेष निष्ठेने पाळले जातात. या विधीची दोन प्रमुख अंगे आहेत. स्वरस्थानांची अभ्यासपूर्वक जोपासना हे एक अंग आणि दुसरे अंग म्हणजे स्वर-विलास. याच साधनेत किराणा घराण्याचे श्रेष्ठ कलावंत आपली उभी हयात खर्च करतात. स्वरांमार्फत आपल्या गायकीचा अनन्य साधारण परिणाम साधणे हेच किराणा गायकीचे मुख्य तंत्र आहे आणि मंत्रही तोच आहे. सामान्य श्रोत्याला ताल समजणे हे सहजासहजी शक्य होत नाही, परंतु स्वराचा स्थूल बोध आणि आनंद ही मात्र त्याच्या कक्षेत येतात. म्हणूनच आजच्या संगीत रसिकांत किराणा गायकी रुचीने ऐकणारेच श्रोते बहुसंख्येने-प्रचंड संख्येने पाहावयास मिळतात. किराणा घराण्याचे हे कार्य संगीतक्षेत्राला उपकारक असेच झालेले आहे–होत आहे!

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

पंच-पंच उषःकालचे स्वरसाधन आणि तानपलटयांचा रियाज हे हिराबाईंचे लहानपणातील संस्कार आजही जसेच्या तसे शाबूत आहेत. ते यत्किंचित्‌ही भंगलेले नाहीत. किराणा गायकीचे सर्व आवश्यक ते संस्कार त्यांच्यावर घडलेले आहेतच. त्याशिवाय बालगंधर्व हेही त्यांचे तितकेच प्रभावी भक्तिस्थान आहे. आकाराच्या स्वच्छ, सुरेल आणि दाणेदार तानेचे त्यांचे आदर्श मुख्यतः बालगंधर्व हेच असल्याने बाईंची निर्मळ-स्वच्छ तान हा त्यांच्या गायकीतील उत्कृष्ट परिणाम साधणारा एक महत्त्वाचा भाग ठरलेला आहे. त्यांच्या मैफलींत एखादी तान शेवाळाल्यासारखी आली आहे किंवा तान कितीही वेगाची असली तरी ती केव्हा अडली आहे असेही माझ्या केव्हाच पाहण्यात नाही.

सौ. हिराबाईंची गायनाची मैफल हा सांगीतिक आनंदाचा परमोत्कर्षच होय. त्यांची काळीसावळी परंतु अत्यंत शालीन आणि विनम्र मूर्ती मैफलीत तंबोरा छेडू लागली आहे, हे नुसते दृश्यही रसिकांना सुखावह होते. त्यांच्या नुसत्या षड्जाबरोबर रसिक 'शांताचिये घरी'चा अनिर्वचनीय आनंद लुटू लागतात. उत्कृष्ट बंदेशीने एकदा-दोनदा अस्ताई-अंतरा म्हणून झाल्यानंतर क्रमाक्रमाने अतिशय सुरेल आलापीने स्वर-विस्तार करीत करीत संपूर्ण मैफल ताब्यात गेणे हे हिराबाईंचे फारच प्रभावी असे सामर्थ्य आहे. त्यांच्या आलापींतील शिस्त, संयम, सुरेलपणा आणि सौंदर्यदर्शन यामुळे रसिक स्वतःला पूर्णतः विसरतात. त्यांचा मूळचा आवाजही तंतासारखाच आहे. त्यांचा आवाज आणि तंबोऱ्याची तार जीव-शिवाच्या भेटीइतक्याच एकरूप होतात. त्यांच्या एकूण कला-कृतीतील हमखासपणे सर्वात अधिक परिणाम करणारा भाग म्हणजे त्यांच्या गळयातील तार षड्ज हा होय! हा तार षड्ज त्यांनी कितीही वेळा लावावा व श्रोत्यांनी तो कितीही वेळा ऐकावा! लहान लहान स्वरगुच्छ तयार करून त्या तार षड्जावर येतात त्या वेळी मैफलीच्या आनंदाची परिसीमा होते! त्यांच्या एकूण मैफलीतील खरा रसोत्कर्ष स्वरांमार्फतच होतो. आपली मैफल ही सर्वप्रकारच्या श्रोत्यांना समाधान देणारी ठरली पाहिजे, हीच दृष्टी त्यांच्या नजरेसमोर सतत असते आणि याच दृष्टिकोनातून स्वतःच्या मैफलीत ख्यालाप्रमाणेच ठुमरी, कजरी, नाटयगीत, भजन, भावगीत असे सर्वच प्रकार एका विशिष्ट

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

दर्जाने त्या ऐकवितात. मैफल सदैव ताजीतवानी रहावी, ती केव्हाही कंटाळवाणी होऊ नये, सुस्त होऊ नये याची आपल्या मैफलीत त्या विलक्षण दक्षता घेतात. त्यांच्या या दृष्टीमुळे त्यांची मैफल पडलेली आहे असे कधीही घडलेले नाही. भारताच्या सर्वच भागांतून त्यांच्या सतत मैफली होत. आणि सर्व मैफलींतून त्यांचा स्वतःचा असा प्रचंड भक्तवर्ग तयार होत असे. त्यांनी रसिकांना जितके गाणे ऐकविले, तितके गाणे आजपर्यंतच्या कोणत्याही कलाकाराने ऐकविले असेल असे वाटत नाही. एका अर्थाने कोणत्याही प्रकारचा गाजावाजा न करता हिराबाईंच्या हातून अनाहूतपणे झालेले हे संगीतप्रचाराचे थोर सांस्कृतिक कार्यच होय. त्यांच्या या असंख्य मैफलींतून त्यांनी गेल्या चार-साडेचार तपांच्या प्रदीर्घ कालखंडात आपले गाणे लाखो रसिकांना ऐकवून त्यांना निर्भेळ आणि श्रेष्ठ असा कला–आनंद दिला. संगीताच्या थोडयाफार व्यासंगाची त्यातून अनेकांना स्फूर्ती मिळाली. अनेकांना खऱ्या संगीत-व्यासंगाची नेमकी दिशाही त्यांच्या कलाप्रात्यक्षिकांतून गवसली. संगीत-प्रसाराच्या दृष्टीनेही हिराबाईंचे हे कार्य आदर्श स्वरूपाचे समजावे लागेल. त्यांनी आपले हे कार्य आकाशवाणीच्या माध्यमातूनही इतक्याच दक्षतेने केलेले आहे. हिराबाईंनी संगीताच्या माध्यमातून जनतेची महान् सेवा केली. समाजानेही त्यांच्या या सेवेची मनःपूर्वक जाणीव ठेवली. संगीतरसिकांनीही हिराबाईंच्या गानकलेवर अमाप प्रेम केले. हिराबाईंची खासगी मैफल असो, थिएटरमधील जाहीर जलसा असो किंवा सार्वजनिक गणपतीउत्सवातील गाणे असो, रसिकांची प्रचंड उपस्थिती आणि हिराबाईंचे गाणे यांचे समीकरण ठरलेलेच असे. हिराबाईंचे हे अवीट गाणे आणि या गाण्याला लाभलेली अफाट लोक-मान्यता ही हिराबाईंची अनेक जन्मांची पुण्याईच समजावी लागेल ! आपण आजही असे काही कलाकार पहातो की, त्यांचा भक्तवर्ग मोठा असतो आणि त्यांचे टीकाकारही बहुसंख्येने असतात. ज्यांच्या कलेबाबत कोठेच दुमत नाही असे भाग्यवान कलाकार अपवादानेच सापडतात. भूगंधर्व रहिमतखां, पं. भास्करबुवा बखले, बालगंधर्व, गोविंदराव टेंबे आणि उस्ताद थिरकवा ही नावे अपवादात्मक म्हणून दिसतात. याच अपवादमालिकेत सौ. हिराबाईंचे नाव सन्मानपूर्वक घेतले जाते !

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

पद्मश्री पु. ल. देशपांडे यांच्यासारख्या श्रेष्ठ कलाकार विद्वानाने सौ. हिरावाईंना 'संगीताच्या अंगणातली तुळस' या सार्थ उपमेने गौरविले आहे. उपमेच्या या एकाच वाक्याने देशपांडे यांनी हिरावाईंची प्रसादपूर्ण कला आणि त्यांचे सात्त्विक जीवन यांचे दर्शन समर्थपणे घडविले आहे. हजार पानांच्या ग्रंथातून जो बोध होऊ शकला नसता तो या एकाच वाक्याने घडून जातो. हिरावाई यांच्या हातून ही जी विविध प्रकारची सांस्कृतिक सेवा घडलेली आहे तिचे नेमके मूल्यमापन होण्याच्या दृष्टीने पाच-पन्नास वर्षांपूर्वीच्यां सामाजिक परिस्थितीचा काहीसा मागोवा घेणे गरजेचे आहे.

भारतीय संस्कृती आणि संगीत यांचे पूर्वापारचे अतूट असे नाते आहे. आपल्या प्रत्येक संस्कारात या ना त्या रूपाने कमी-अधिक प्रमाणात संगीत हे अपरिहार्यपणे येते. वैदिक कालखंडात किंवा त्यानंतरही कित्येक शतके स्त्रियांना संगीताचे शिक्षण देणे ही एक गरजेची वाव समजली जाई. गायचे ते फक्त स्त्रियांनीच आणि त्यांना शिकवण्याचे किंवा त्यांच्या गायनाची साथ करण्याचे काम पुरुषांनी करावयाचे असा सामान्यतः संकेत होता. पौराणिक कालातील अनेक दाखल्यांवरून ही गोष्ट अगदी स्पष्ट होते की, त्या काळी राजघराण्यांतील स्त्रियांनाही नृत्य व गायन कलेचे शिक्षण आवश्यक म्हणून दिले जात असे. पांडव वनवासात असताना बृहन्नडेच्या भूमिकेत असलेल्या पार्थ—धनुर्धराची राज-घराण्यात जी कामगिरी होती ती तेथील राजकन्यांना नृत्य व गायन शिकवणे हीच होती. ही सांस्कृतिक प्रथा कित्येक शतकांची होती. मात्र आमच्या देशावर ज्या वेळी परकीय आक्रमणे सतत येऊ लागली त्यामुळे आमची सामाजिक घडीच विस्कटली. विशेषतः स्त्रियांच्या पावित्र्यरक्षणाची चिंता निर्माण झाली. आणि त्यामुळे पूर्वीची स्त्री या काळात गायन-नृत्यादी अभिजात कलांना वंचित झाली. मात्र अशा अस्थिर काळात विशेषतः मुस्लिम राज्यकर्त्यांच्या अमदानीत ललित-कलांना वाहून घेणारी एक नवी जमातच जन्माला आली. या नव्या जमातीचे नाव कलावंत किंवा 'कळावात' हे पडले. या वर्गाने आमची गायन-वादन-नृत्यकला अनेक हालअपेष्टा सोसून आणि सामाजिक अवहेलना पचवून पिढ्यानपिढ्या तोंड देऊन संभाळली. इतकेच नव्हे

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

तर तिच्या सामर्थ्यात सतत भर घातली. 'कळावात' या वर्गाचे संगीतकलेवरील हे फारच मोठे ऋण आहे. या सर्व गोष्टी घडत असल्या तरी समाजाच्या दृष्टीने मात्र ही कला अगदी उपेक्षितच होती. समाजातील उच्चभ्रू समजल्या जाणाऱ्या वर्गातील पुरुषांनीही संगीताचा कोणत्याही प्रकारचा शौक करू नये हा अलिखित सामाजिक दंडक होता. पुरुषवर्गाची जेथे ही स्थिती तेथे 'स्त्रिया आणि संगीत' या विषयाचा मेळ कसा बसावा? ही परिस्थिती असह्य झाल्यामुळे पं. विष्णु दिगंबर, पं. भातखंडे यांच्यासारख्या थोर व्यक्तींनी संगीतकलेला व कलावंतांना योग्य ते सामाजिक स्थान मिळाले पाहिजे आणि या कलेचा प्रसार झाला पाहिजे या ध्येयाचे कंकण हाती बांधून त्या ध्येय-सिद्धीसाठी योजनाबद्ध असे प्रचंड परिश्रम केले. बालगंधर्व आणि हिराबाई यांच्याही हातून नेमके हेच कार्य घडले आहे. मात्र या दोघांचे मार्ग भिन्न होते. कार्यवाहीही भिन्न होती. हिराबाईंच्या एकूण कार्या-साठी कोणतीही संस्था नव्हती, कोणतीही नियमावली नव्हती. 'आपले गाणे जास्तीत जास्त श्रोत्यांनी वरचेवर ऐकावे, ते अवीट असावे व सौंदर्यसंपन्न असावे', हीच त्यांची कार्यप्रणाली होती. त्यांचे ध्येयही हेच होते. याच ध्येयाबरोबर एक कलाकार या नात्याने स्वतःला एक निश्चित असा सामाजिक दर्जा प्राप्त झाला पाहिजे ही कल्पना मनाशी बाळगून त्यांनी गायन कलेच्या साधनेप्रमाणेच स्वतःची अशी एक नेमकी आचारसंहिता निश्चित करून ती सतत राबवली, आजही राबवीत आहेत. त्यांचे बोलणे, चालणे आणि वागणे ही इतकी सुसंस्कृत आहेत की, समाजातील कोणाही स्त्री-पुरुषांनी त्यांना आदर्श मानावे—गुरुस्थानी मानावे. हिराबाईंचे अवीट गाणे आणि त्यांचे कमालीचे सौजन्यशील वागणे, अशा दुहेरी सामर्थ्यांतून त्यांचे संगीताचें प्रचारकार्य साकार झाले. समाजातील अन्य सभ्य आणि सुसंस्कृत व्यक्तींप्रमाणे कलाकारही सभ्य असू शकतो, तो 'माणूस' असू शकतो हे समाजाला पटविण्यासाठी त्यांची उभी हयात सतत खर्ची पडत आहे. पानशेतच्या पुराने पुण्यात जबरदस्त गोंधळ उडवून दिला. अनेकांची घरे उद्ध्वस्त झाली. अनेकांची अन्नान्न दशा झाली. अशा वेळी स्वतःचे आवश्यक कर्तव्य

१०

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

समजून, ना ओळखीची ना पाळखीची अशी तीस संकटग्रस्त माणसे हिराबाईंनी बोलावून आणून त्यांना स्वतःच्या घरी पाच दिवस निवारा आणि अन्न दिले. आणि तेही कोणत्याही प्रकारचा गाजावाजा न करता! अशा प्रकारचे माणुसकीला साजेलसे कार्य अन्य कोणी श्रीमंत आणि सुसंस्कृत पुणेकराने केल्याचे माझ्या माहितीत नाही!

सौ. हिराबाईंनीं सुध-मुद्रा, सुध-वाणीने आपले नितांत सुरेल आणि प्रसादपूर्ण संगीत लाखो श्रोत्यांना दीर्घ कालपर्यंत सतत ऐकविले. त्या श्रोत्यांपैकी अनेक संगीतरसिक बनले, अनेक श्रोते संगीतभक्त बनले. त्यांच्या गाण्यातून विलक्षण स्फूर्ती घेऊन अनेक श्रोते प्रत्यक्ष कलासाधनेस सहजपणे प्रवृत्त झाले. आज स्त्रियांच्यामध्ये संगीताचा जो क्रियाशील प्रचार वाढत्या प्रमाणात दिसून येतो, त्या भव्य यशाच्या सौ. हिराबाई या प्रथम क्रमांकांच्या मानकरी आहेत. हिराबाईंनी 'कानसेन' तर किती तयार केले असतील त्याची मोजदाद करणे सर्वथैव अशक्य आहे.

सौ. हिराबाईंच्या गाण्यांतील सर्वांत महत्त्वाचा गुण म्हणजे त्यांची विलक्षण तन्मयता हा होय. मैफलीत तंबोरा छेडून नुसता षड्ज लावल्यावरोबर त्या समाधी अवस्थेत—श्रोत्यांसह जातात. हिराबाईंची श्रेष्ठ गायनकला आणि त्यांचे त्यागी जीवन यांचा विचार केल्यास स्थितप्रज्ञ वृत्ती हेच त्यांच्या जीवनाचे प्रमुख असे व्यवच्छेदक लक्षण आहे हेच दिसून येते. हिराबाईंनी भगवद्‌गीता वाचली आहे किंवा नाही ते माहीत नाही. परंतु त्यांनी गीताच आचरिली आहे हे त्यांना जवळून पाहणाऱ्यांना लगेच पटावे!

आज थोरामोठ्या घराण्यांतील सुसंस्कृत स्त्रिया मानसन्मानाने जाहीर मैफलीत बसून गातात, होतकरू मुलीबाळी आपली कला रसिकांसमोर पेश करतात आणि त्यांचे रसिकांप्रमाणेच पालकही अभिमानाने कोडकौतुक करतात, परंतु या बदलत्या समाजस्थितीचा फारच मोठा वाटा—फारच मोठे श्रेय सौ. हिराबाईंनाच द्यावे लागेल. आणि यासाठी आजच्या व उद्यांच्या गायिकांनी हिराबाईंच्या या थोर कार्याबद्दल त्यांचे सदैव ऋणी राहिले पाहिजे!

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

सौ. हिराबाईंच्या सांगीतिक कार्याच्या कक्षा एवढ्यानेच पुऱ्या होत नाहीत. हिराबाई या श्रीमती मोगूबाईंच्याप्रमाणेच एक उत्कृष्ट गुरु आहेत. त्यांनी आजपर्यंत कित्येक विद्यार्थिनींना गाण्याची उत्तम तालीम दिली आहे. सौ. माणिक वर्मा, श्रीमती प्रभा अत्रे अशा समर्थ शिष्यिणी हिराबाईंच्या ज्ञानदानाची महती पटवण्यास समर्थ आहेत. त्यांच्या कितीतरी शिष्यिणी आज मैफिलीच्या क्षेत्रात यशस्वी ठरलेल्या आहेत.

सौ. हिराबाई यांचे ज्येष्ठ बंधु कै. सुरेशबाबू माने हे एक अतिशय प्रतिभाशाली आणि रसीले गायक होते. कल्पक दिग्दर्शक होते. ते अनेक वाद्ये तयारीने वाजवीत. त्यांचीही शिष्यशाखा गुणाने समृद्ध आहे. हिराबाई यांच्या कनिष्ठ भगिनी सौ. सरस्वतीबाई राणे याही एक नामवंत गायिका आहेत. त्यांच्या दुसऱ्या भगिनी श्रीमती कमलाबाई या एक उत्कृष्ट अभिनेत्री व गायिका आहेत. त्यांच्या नाट्यसेवेबद्दल त्यांना महाराष्ट्र शासनाकडून तहहयात मानधन मिळते.

सौ. हिराबाईंच्या जीवनात बहुमानाचे खूपच योग आलेले आहेत. भारत सरकारच्या कलाकारांच्या शिष्टमंडळाच्या एक सभासद म्हणून त्या चीनलाही जाऊन आल्या. त्यांनी स्वतःच्या बऱ्याच मैफली आफ्रिकेतही सादर केल्या, त्यासाठी त्यानी स्वतंत्र दौराच आखलेला होता. भारत स्वतंत्र झाल्यानंतर दि. १५ ऑगस्ट १९४७ च्या रात्री बारा वाजता राजधानीत राष्ट्रगीत म्हणावयाचा पहिला मान सौ. हिराबाईंना मिळाला. १९७० साली भारत सरकारकडून 'पद्मभूषण' ही उपाधी त्यांना प्राप्त झाली. राज्य सरकारने हिराबाईंना मानसन्मानाने तहहयात मानधन देऊन त्यांच्या संगीतसेवेचे सर्वतोपरी चीज केले आहे.

सौ. हिराबाईंच्या हातून संगीतसेवेचे थोर कार्य असेच पुढे चालण्यासाठी त्यांनी 'शतायू' व्हावे, हीच इच्छा प्रत्येक संगीतभक्त करील !

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri



संगीताचे "अग्निहोत्री"
श्रीमान् मलबाराव सरदेसाई

"तुम्ही गोव्याला जाता आहात–फार चांगली गोष्ट आहे, पण एक महत्त्वाचं काम करा. गोव्यात मलबाराव सरदेसाई या नावाचे एक मोठे जहागीरदार श्रीमंत गृहस्थ आहेत. ते संगीताचे मोठे व्यासंगी-विद्वान गृहस्थ आहेत. संगीतशास्त्राचा त्यांचा अभ्यास उत्तम आहे व त्यांची संगीतग्रंथांची लायब्ररीही फार मोठी आहे. त्यात दुर्मिळ ग्रंथ आहेत. ते ग्रंथ पहा. मलबारावांशी संगीतावर काही चर्चा करा. त्यांचे विचार समजून घ्या. त्यांचा परिचय वाढवता आला तर पहा. मलबाराव फार मोठा मनुष्य !"

गोमंतकात प्रथम येण्याच्यावेळी माझे संगीतशास्त्र-अभ्यासाचे गुरु व एक पालक कै. प्रा. ग. ह. रानडे यांचा शुभाशीर्वाद घेण्यासाठी मी गेलो असताना त्यांनी वरील सूचना आवर्जून दिली. प्रा. रानडे यांच्यासारख्या संगीतशास्त्राच्या एका प्रकांडपंडिताने मलबारावांच्याविषयी इतक्या गौरवाचे उद्‌गार काढावेत ही एकच गोष्ट श्रीमंत मलबारावांच्या सांगीतिक तपःश्चर्येबाबत नितान्त आदर निर्माण करण्यास समर्थ आहे. मी प्रत्यक्ष गोमंतकात आल्यानंतर, खाप्रूमामांच्या

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

मलबाराव सरदेसाई

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

पुण्यतिथीनिमित्त जो अविस्मरणीय असा समारोह झाला, त्या वेळी मलबाराव उपस्थित होतेच. त्यांच्याशी माझा याचवेळी प्रथम परिचय झाला. प्रथमदर्शनही याचवेळी घडले. त्यांच्या सुप्रतिष्ठित, आदबशीर आणि विनम्र दर्शनाने मी भारावून गेलो. संगीताविषयीचे त्यांचे निःस्सीम प्रेम आणि कलावंताविषयीचा त्यांचा कमालीचा आदरभाव पाहून या एका प्रसंगानेच माझ्या अंतःकरणात मलबारावांविषयीच्या भक्तिभावाचे बीज रुजले गेले. यानंतर एक-दोन वेळा त्यांच्याबरोबर संगीतावर काही चर्चा करण्याचा सुयोग आला. त्यात त्यांनी केलेल्या सखोल व्यासंगाची मला अनुभूतीही आली. त्यांनी केलेले मार्मिक आणि शास्त्रशुद्ध तरीही रसपूर्ण लेखन वारकाईने अभ्यासण्याची संधी मिळाली. त्यामुळे प्रा. रानडे यांचे मलबारावांच्याविषयीचे गौरवोद्गार किती सार्थ होते ते पूर्णतः पटले. मलबारावजींसारख्या एका थोर संगीतज्ञ व्यक्तीचा झालेला परिचय हा माझ्या जीवनातील एक भाग्ययोगच ठरलेला आहे! आजवरच्या माझ्या जीवनात राजेरजवाडे, श्रीमंत' वडे अधिकारी, स्वतःला संगीतज्ज्ञ किंवा व्यासंगी समजणारे असे कितीतरी महाभाग परिचित झाले, परंतु त्यात कलाप्रेमापेक्षा आत्मगौरवाचीच वहुतांशी साक्ष पटली. अर्थात खरे प्रेम किंवा खरा व्यासंग या गोष्टी अपवादानेच दिसणाऱ्या असाव्यात यात आश्चर्य वाटण्यासारखे काहीही नाही. गोमंतकाचे शिरोभूषण ठरलेल्या या श्रेष्ठ पुरुषाबावत गोमंतकावाहेरच्याही निदान मराठीभाषिकांना तरी काही माहिती देणे अगत्याचे आहे, असे सतत वाटत होते असा योग या लेखाद्वारे यावा हाही एक भाग्ययोगच !

मलबाराव हे मूळचे गोमंतकातल्या सावई–वेरे या गावचे. दि. ३१ डिसेंबर १९११ रोजी पणजी येथे आजोळी त्यांचा जन्म झाला. घरात पूर्वापारपासून संगीताचे वातावरण असल्याने ते संस्कार त्यांच्यावर सतत होऊ लागले. वयाच्या अवघ्या चवथ्या- पाचव्या वर्षीच ते तबला वाजवू लागले. त्यांचे ठेके अगदी लयबद्ध व सुंदर वाजत. इतर वादनकारांची ते नक्कलही छान करीत. या गोष्टींचे त्यांच्या मातोश्रींच्या वडिलांना फारच कौतुक वाटे. गोमंतकात देवाच्या उत्सवप्रसंगी भजनी-सप्ताह होतात. ही चाल अद्यापही आहे. त्या काळी सावई–वेरे या

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

गावचा भजनी–सप्ताह ख्यातनाम असा होता. या सप्ताहाच्यानिमित्ताने गोमंतकातील श्रेष्ठ गायक, वादनाचार्य, भजनी असे कलाचार्य जमत असत आणि सतत रात्रंदिवस गायन-वादन-भजन या गोष्टी– त्याही विलक्षण ईर्ष्येने चालत. हा कार्यक्रम सात दिवस आणि तोही चोवीस तास चाले. निरनिराळी भजनीमंडळे यांत भाग घेत. त्यांच्यात अतिशय ईर्ष्या असे. वेळप्रसंगी तेढही असे. प्रत्येक भजनी मंडळाला तीन तासांचा वेळ ठरवून दिला जाई. याला 'पार' अशी संज्ञा आहे. हे पार फारच चुरशीने रंगत. अशा पारांत कै. विठ्ठल कवळेकर, प्रसिद्ध सनईवादनकार कै. बाबलो रामनाथकर, कै. खाप्रूमाम पर्वतकर, सुप्रसिद्ध तबलिये कै. दत्तारामजी नानोडकर, कै. पंढरी कुंभार जुवेकर अशांसारखे अतिरथी-महारथी कलाकार मोठ्या अहमहमिकेने भाग घेत असत. हे सर्व कार्यक्रम मलबाराव अतिशय आवडीने सतत ऐकत. या सर्व थोर कलाकारांचे वास्तव्य मलबारावांच्या घरीच होई. काल–परवा झालेल्या भजनांतल्या राग, ताल, लय यांच्या डावपेचांवर या सर्व विद्वानांची मार्मिक चर्चा होई. प्रसंगी वादही माजत. प्रत्यक्ष गायनवादन व त्यावरील चर्चा सतत ऐकावयास मिळण्याचे थोर भाग्य मलबारावांना बालपणापासूनच लाभले. यामुळे संगीत कलेबाबत त्यांना विलक्षण आस्था वाटू लागली. त्याचबरोबर कलाकार म्हणजे काही तरी विशेष आहे असे वाटून त्यांचेबाबत मलबारावांची अतीव आदराची भूमिका तयार झाली. मलबारावजींच्या भावी सांगीतिक यशाचे उत्कृष्ट बीजारोपण इथेच झाले. मलबारावजींचे एकूण भाग्यच थोर! त्यांच्या वडील–मातोश्रींनी त्या काळातही चिरंजिवांच्या संगीतषौकाला यत्किंचितही विरोध न करता उलट चिरंजिवासाठी लहानसा मृदंग मुद्दाम तयार करून घेतला. त्यांना उत्तमोत्तम गुरूंच्या स्वाधीन केले. दत्तारामजी नानोडकर यांच्यासारखे थोर उस्ताद तबलिये त्यांना सुरुवातीपासूनच गुरु म्हणून लाभले. मलबारावजींचा हात व तीव्र बुद्धिमत्ता पाहून दत्तारामजीही खूष होत. मलबारावांच्या वडिलांना मुद्दाम बोलावून दत्तारामजींनी एकदा सांगितले की, "हे तुमचं प्रकरण कमी नाही, त्यांचेवर पूर्व-जन्मीचे उत्तम संस्कार झालेले आहेत. याचा ओढा लयकारीकडे जाणार,

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

यांना चांगलं शिकवा ! " ... यानंतर काही वर्षे गेली. वय वाढले. संगीताची आवडही वाढली. मेहनतही वाढली. यावेळपर्यंत मलबाराव तबला तयार वाजवू लागले. त्याचबरोबर नाटयसंगीत, भजने असे प्रकार साधारण गाऊ लागले. बासरी वाजवू लागले. स्वतंत्र हार्मोनियमवादन आणि साथी करू लागले. गावातील हार्मोनियमवादक रघुवीर देविदास यांना मलबारावना पेटी शिकवण्यासाठी त्यांच्या वडिलांनी मुद्दाम बोलावून आणले. हे शिक्षण सुरू झाले. देविदास यांचा भाचा महाद् हा यावेळी तबल्याच्या साथीस असे. त्याच्यामुळे मलबारावना तबल्याची बोलभाषा अवगत झाली. यानंतर श्री. धुंडिराज या तबलावादकांनीही मलबारावना पुष्कळ शिकवले. ते फार आवडीने शिकत होते. तबला-पेटीचे शिक्षण सकाळ-संध्याकाळ चाले. संगीताची आवड व बुद्धिमत्ता पाहून काही घुमटवादनकारांनी त्यांना घुमटवादन-शास्त्राची माहिती दिली. लिहिलेल्या जुन्या वह्या दिल्या. या सर्वांमुळे प्रत्यक्ष क्रियाशीलतेबरोबरच तालशास्त्र वताललेखन यांचाही अभ्यास ते करू लागले.

मलबाराव यांच्यावर संगीताचे जे महत्त्वाचे संस्कार घडले ते मुख्यत: गावातील भजनी–सप्ताहामुळे. या उत्सवाचे निमित्ताने जे विद्वान कलाकार एकत्र जमत, त्यांचे गायन, वादन, शास्त्रचर्चा काही उद्‌बोधक हकीकती व मजेदार किस्से यांचे ज्ञानसत्रच चालू असे. मलबाराव हे सर्व व्यासंगीवृत्तीने अगदी लक्षपूर्वक ऐकत. त्यावर चिंतन –मनन करींत. सप्ताह संपल्यानंतर ही सर्व कलाकार मंडळी आपापल्या गावी निघून जात. ती गेल्यानंतर मलबारावांचे आईवडील संगीतकला व कलाकार यांचेबाबत अतीव आदराने बोलत. याच आवश्यक संस्कारांत मलबारावांची सर्वांगीण वाढ होत होती. विद्यासाधनेची त्यांची तळमळ एकसारखी वाढत होती. कलाकारांबद्दलचा आदरभावही तसाच वाढत होता. ‘ तळमळ असली म्हणजे गुरु आपणहून घरी चालत येतो ’, किंवा ‘ भाव तेथे देव ’, असली बोधवचने अध्यात्माप्रमाणे व्यवहारांतही साकार होतात असा अनुभव नेहमी येतो. श्रीमंत मलबारावांनाही या अनुभवाची प्रचीती येऊ लागली. हार्मोनियमवादनपटू कै. मधुकरराव पेडणेकर यांचा व मलबारावांचा पूर्वापारचा परिचय होताच, परंतु अशाच काही प्रसंगाने मधुकररावजी अचानकपणे मलबारावांच्या घरी

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

'दत्त' म्हणून उभे राहिले. काही दिवसांकरता आलेले मधुकरराव पहिल्यावेळी दोन-अडीच वर्षे राहिले. पुन्हा काही वर्षांनीं आले ते दोन वर्षे राहिले. मलवारावांचे दुसरे गुरुदैवत म्हणजे लयभास्कर कै. खाप्रूमाम् ! त्यांचेही असेच झाले. ते केव्हातरी अधूनमधून येत असत, ते आता वर्षांतून आठ-नऊ महिने तरी त्यांच्या घरीच राहू लागले. आणि तेही सतत चौदा वर्षे! या दोन्ही गुरूंचे व मलवारावांचे पूर्वीच्या अनेक जन्मांचे सूत जमले. मात्र ही किमया घडण्यास या दोन्ही गुरुंचे सौजन्य जसे कारणीभूत आहे त्याहीपेक्षा मलवारावांच्या अंगची– विशेषत: आजकाल जोराने नाहीशी होत असलेली– सर्वस्पर्शी गुणसंपदा हेच मुख्यत: आहे ! विद्येची प्रामाणिक तळमळ, मेहनतीवृत्ती, वागणुकीतील आदवशीर ऋजुता, स्वभावाची सोज्वळता, आजकाल नाहीसा झालेला कमालीचा सेवाभाव व गृहस्थधर्मी कर्तव्याचे मोठ्या दक्षतेचे परिपालन–या दुर्मिळ गुणसंपदेमुळेच हे गुरु आपणहून मलवारावजींकडे आले व त्याच तत्परतेने स्वत:चे मोठे विद्याधन त्यांनी या आपल्या प्रिय शिष्याच्या स्वाधीन बंधुभावाने केले. पूर्वीचे गुरु शिष्याला आपली विद्या सहसा देत नसत, खळखळ करीत असत, विद्या चोरून ठेवीत असत, अशा आक्षेपांना उत्तर देण्यास मलवारावजींनी मिळवलेली विद्या पूर्ण समर्थ आहे, असे जाता जाता सांगावेसे वाटते !

मधुकररावजी पेडणेकर हे स्वत: सव्यसाची वादनकार होते. हाताचे अतिशय तयार. कितीही विकट तानपलटा असो ते तो अगदी सहजपणे व स्वच्छपणे वाजवीत. हात तयार करण्याचे त्यांचे विशिष्ट असे तंत्र होते. विशिष्ट अभ्यास होता. त्याचप्रमाणे त्यांचे संगीताचे शास्त्रीयज्ञानही परिपूर्ण व अद्यावत् होते. तसेच त्यांचे ताल-लयीचे सक्रीय ज्ञानही पक्के होते. खाप्रूमाम् हा तर तालशास्त्राचा अखेरचा महापुरुष ! खाप्रूमाम्, मधुकरराव व मलवाराव असे तिघे एकत्र बसून स्वरशास्त्र, रागशास्त्र, श्रुतिशास्त्र, लय-तालाचे सूक्ष्म गणिती हिशेब, अशा प्रकारची चर्चा– अभ्यास सतत करीत. या सर्व विचारांचा आणि अभ्यासाचा मलवारावजींना अतिशय उपयोग झाला. मधुकरराव व मलवाराव असे मिळून हार्मोनियमची मेहनत चार-चार तास करीत. तबल्याप्रमाणेच पखवाजवादनातही मलवारावजींनी सिद्धी प्राप्त करून घेतली आहे.

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

स्वत:च्या जिवाचे रान करून मलवारावजींनी मोठ्या तळमळीने संगीताची उपासना केली, परंतु त्यांच्या एकूण सांगीतिक कार्याचे वा सेवेचे संपूर्ण समालोचन एवढ्यानेच संपणारे नाही!

मलवारावजींनी गोमंतकांत पूर्वापारपासून चालत आलेले सर्व संगीतप्रकार अभ्यासले. असंख्य लोकगीतांचा बारकाईने अभ्यास केला. अनेक वाद्यांचा स्वत: रियाज केला. अनेक भाषांतले कितीतरी दुर्मिळ ग्रंथ मिळवले. मोठ्या-प्रयत्नाने जुनी-पुराणी हस्तलिखिते मिळवली. एका व्यवस्थेने त्यांचे जतन केले. ही दुर्मिळ ग्रंथसंपदा हे नुसते मलवारावांचेच नव्हे तर समस्त गोमंतकाचे अभिमानास्पद असे धन आहे. मलवारावांनी स्वत:ही ग्रंथलेखन, संगीतावर अनेक स्फुट लेख, संगीतावर व्याख्याने अशा निरनिराळ्या मार्गाने आजवर संगीताची विपुल सेवा केली आहे. त्यांचे हे कार्य आजही पूर्वीच्याच उत्साहाने चालू आहे. त्यांनी लिहिलेले 'खांव-घुमटांच्या सावलीतील संगीत' हे एकच पुस्तक त्यांच्या व्यासंगाची साक्ष पटविण्याइतके उत्कृष्ट आहे. 'गोमंतक कला अकादमी'ने या ग्रंथाला पुरस्कार देऊन यथोचित असा गौरव केलेला आहे. पणजी येथील सदानंद मुद्रणालयाने छापलेले मलवारावजींचे "गोमंतक संगीताची प्रतिमा" हे पुस्तक अभ्यासूंनी अवश्य वाचावे. 'सुलभ स्वर-परिचय' हे त्यांचे पुस्तक पणजीच्या 'विवेकानंद सोसायटी'ने नुकतेच छापले आहे. आकाराने लहान असलेले हे पुस्तक संगीताच्या जिज्ञासूंची 'गीता' ठरावी इतक्या तोलामोलाचे आहे. 'गोमंतकातील नाटकाचा प्राचीन काल' हे पुस्तक त्यांच्या संशोधन व्यासंगाची तेजस्वी निशाणी आहे. याशिवाय अनेक संस्थांचे सन्माननीय अध्यक्ष, उपाध्यक्ष, सल्लागार, आश्रयदाते अशी निरनिराळ्या भूमिकांवरून ते कार्य करीत आहेतच. आकाशवाणीवर संगीताचे एक परीक्षक म्हणून मधून मधून ते सेवा करतातच!

इतकी सर्व अधिकारसंपन्नता असूनही ते स्वत:ला अगदी विनम्र-पणे संगीत कलेचे व कलावंतांचे सेवक समजण्यात भूषण मानतात. संगीतकला आणि कलाकार यांबाबतची त्यांची निष्ठा व भक्तिभाव ही कोणत्या दर्जाची आहेत तें खुद्द त्यांच्याच शब्दांतून अधिक स्पष्ट

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

होण्यासारखे आहे. ते म्हणतात : “ लेखी संगीत, साहित्य संगीत, मनन, चिंतन, लेखन व संशोधन याद्वारे मी संगीताची आणि कलाकाराची सेवा मनोभावे करीत आहे. आज संगीत हे माझे मनरंजनाचे साधन नाही, संगीत हे माझे व्यसन नाही, संगीत हे माझे व्रत आहे ! माझ्या संगीतसाधनेची सुरुवात मनरंजनासाठी झाली. नंतर त्याचे रूपांतर व्यसनात झाले. संगीत हे माझे आज आराध्यदैवत आहे. कलेला व कलाकारांना मी देवासमान मानतो ! ” अशा थोर रसिकश्रेष्ठाला खरे कलाकारही देवच समजतात !

श्रीमंत मलबाराववजी हे एक उत्तम शिकारी आहेत. अजूनही ते शिकारी करतात असे ऐकतो. त्यांचे आरोग्य तर उत्तमच आहे. गोमंतकाच्या हवापाण्यात–निसर्गांत दीर्घायुष्याचे बीजारोपण परमेश्वरानेच करून ठेवलेले आहे. .या दृष्टीने मलबाराववजींना नुसतेच शंभरीचे नव्हे तर ॠषीतुल्य पूर्णायुष्य आणि तेही उत्कृष्ट आरोग्यासह लाभावे व संगींताचे अग्निहोत्र घेतलेल्या या अग्निहोत्र्याच्या कृपा–प्रसादाने अखिल गोमंतक संगीतानेही पूर्ववत् ‘सुफलाम्’ व्हावा हीच मनोमनी प्रार्थना ! !

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

बाकी बोरकर

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri



रसीले हार्मोनियम वादनकार
श्री. बाबी बोरकर

पूर्वीच्या संगीत नाटक मंडळयांच्या परिसरात हार्मोनियमची साथसंगत आणि स्वतंत्रवादन या दोन्ही क्षेत्रांत ज्या कलाकारांनी उत्तम नावलौकिक मिळविला त्यांत श्री. बाबी बोरकर यांचे नाव अवश्य घेतले जाते. नाट्यसंगीतात आपल्या प्रतिभासंपन्न आणि तेढ्या गायकीने ज्यांनी महत्त्वाची भर घातली, अशा कै. मास्टर दीनानाथ मंगेशकर यांचे बाबी बोरकर हे विशेष आवडते पेटीवाले! बोरकर यांच्या उत्कृष्ट साथसंगत-कौशल्याची प्रभावी साक्ष देण्यास ही एकच गोष्ट पुरेशी आहे. बाबूराव यांच्या साथीत दीनानाथांचे गाणे ऐकण्याचा मला अपूर्व योग अनेकदा आलेला होता. खऱ्या अर्थाने तो एक मोठा भाग्ययोग्यच होता, असे मला नेहमी वाटते. दीनानाथांची साथ ते अतिशय झटून करीत. गाणे आणि साथ यांचे ते सवाल-जवाबच चालत. दीनानाथरावांनी रंगभूमीवरून एखादा विकट सवाल टाकावा आणि बाबूरावांच्या अंगुलींनी त्याला त्याच क्षणी जबाब देऊन टाकून एखादा नवीनच सवाल पुन्हा उपस्थित करावा, असा हा पाठ-शिवणीचा श्रवणमनोहर खेळ नेहमीच चाले! मोठ्या ईर्ष्येने व

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

कलात्मकतेने चाललेली ती एक संगीताची मैफलच होई. दीनानाथ यांची एकूण गायकीच इतकी चमत्कारपूर्ण व बेअंदाजी असे की, सामान्य साथीदाराने त्यांत हात घालणे हे महाकर्मकठीण असे काम होते. परंतु बाबूराव या कामांत उत्तमच यशस्वी झालेले होते. हे यश मिळवण्या-साठी बाबूरावनी आपल्या सर्वांगीण प्रयत्नांची पराकाष्ठा केलेली होती. स्वतःवरील जबाबदारी पूर्णपणे ओळखून त्यांनी विशिष्ट दृष्टिकोनांतून वादनतंत्राची मेहनत केली. आणि अशा या मेहनतींतूनच त्यांनी आपल्या कलेला आकार व रंग दिला !

पस्तीस–चाळीस वर्षांपूर्वीची ही हकीकत आहे– एका सकाळी सांगलीच्या मारुती-रस्त्याने मी सहज चाललो होतो. एका घराच्या माडीवरून पॅरिसरीडच्या बासरीसारख्या वाजणाऱ्या अतिशय मंजूळ पेटीमधून " तोडी "चे पलटे ऐकू आले. अतिशय तयार आणि तितक्याच साफसफाईने वाजणाऱ्या पलटचांनी मी अगदी मोहून गेलो. माझे पाय पुढे जाण्यास नकार देऊ लागले. अर्धा-पाऊण तासपर्यंत मी तेथे तसाच उभा होतो. या वादनकाराला प्रत्यक्ष भेटावे असा मला मोह झाला. 'इथं कोण रहातं " अशी मी खालीच चौकशी केली. तेव्हा दीनानाथराव यांचे पेटीवाले बाबी बोरकर हे येथे रहात असून ते स्वतःच मेहनत करीत आहेत, असे समजले. बोरकरांचा–माझा थोडासा परिचय पूर्वीच झालेला होता, त्यामुळे काहीही संकोच न करता मी माडीवर गेलो. वस्तुतः कोणाचाही रियाज चालू असताना त्या वेळी कोणीही दुसऱ्या मनुष्याने तेथे जाऊन साधनेत व्यत्यय आणू नये, हा अलिखित नियम मला पूर्णतः माहीत असूनसुद्धा बाबूरावांच्या पलटचांनी मला त्यांच्या साधनेच्या जागी खेचलेले होते. बाबूरावांनी माझे स्वागत उत्तम केले. त्यांचेकडे मी का आलो आणि कसा आलो हे मी त्यांना अगदी मनमोकळेपणाने सांगितले. माझ्या रसिकतेबाबत त्यांना आनंद वाटला असावा. माझ्या वागण्यातील अगाऊपणाची त्यांनी मनोमनी क्षमा केली असावी. व्यवहारोचित काही कुशल प्रश्नोत्तरे होऊन त्यांनी पुन्हा " पलटे " सुरू केले. पलटचांच्या मेहनतीची महती, पलटचांचे विविध प्रकार, हात अनेक अंगांनी तयार करण्याचे मार्ग,– अशा कितीतरी गोष्टी त्यांनी प्रात्यक्षिकाद्वारे विशद केल्या. आणि हे सर्व मौलिक विचार

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

घेऊनच मी सुमारे दोन तासांनी बाबूरावांचा निरोप घेऊन बाहेर पडलो.

श्री. बाबी बोरकर यांचा दि. १८ मार्च १९०३ साली गोमंतकातील बोरी या गावी जन्म झाला. त्यांचे प्राथमिक शालेय शिक्षण मडगाव येथे झाले. त्यांचे मूळ घराणे हरदासाचे असल्याने संगीत कलेचे संस्कार त्यांच्यावर आनुवंशिकतेने घडलेले होते. १९१३ मध्ये किर्लोस्कर नाटक मंडळीचे मडगाव येथे आगमन झाले होते. त्या वेळी बाबूरावांच्या वडिलांनी बाबूरावांना व त्यांच्या दुसऱ्या बंधूंना खटपट करून किर्लोस्कर कंपनीत पाठवले. याच वेळी मास्टर दीनानाथ, शांतारामबापू कामत अशी मंडळीं किर्लोस्करमध्ये होती. श्री. बोरकर यांना सुमारे पाच वर्षेपर्यंत या कंपनीचा लाभ :घडला. परंतु दुर्दैवाने याच वेळी त्यांच्या वडिलांचे निधन झाल्याने कंपनी सोडून त्यांना घरी यावे लागले. पुढे काही दिवसपर्यंत त्यांनी आपल्या वडिलांची परंपरागत कीर्तनाची नोकरी केली. याच सुमारास श्रीमंत नथूबाईंचे आश्रयाखाली एक नाटचसंस्था निघाली. तिचे संचालक श्री. वल्लेवस्ताद व श्री. बक्कीमाम हे होते. या कंपनीत नृत्य शिकविणे आणि नाटकातून कामे करणे, अशी कामे बाबूराव यांनी केली.

किर्लोस्कर कंपनीत काही फाटाफूट होऊन मास्टर दीनानाथ, कृष्णराव कोल्हापुरे, चिंतामणराव कोल्हटकर इत्यादी मंडळींनी कै. राम गणेश गडकरी यांच्या मदतीने १९१८ मध्ये "बलवंत संगीत मंडळी"ची स्थापना केली. या कंपनीत बाबूराव यांचा प्रवेश झाला. या कंपनीत शारदा, ध्रुव, प्रल्हाद, सौभद्र, विद्याहरण, मानापमान अशा नाटकांतून त्यांनी भूमिका केल्या. श्रेष्ठ संगीताचे बाळकडू त्यांना येथेच मिळू लागले. परंतु पुढे वयपरत्वे आवाज फुटल्यावर मात्र कंपनीतील अगदीच किरकोळ कामे त्यांच्या वाटचास येऊ लागली. मास्टर दीनानाथ यांचे गुरुबंधु वल्लेवस्ताद यांचेकडे ते तबलावादनाचे धडे घेऊ लागले, परंतु वरचेवर होणाऱ्या सर्दीमुळे त्यांना तबलावादनाच्या कष्टदायक मेहनतीस रामराम ठोकावा लागला. याचवेळी त्यांनी आपल्या जीवनाचा सोबती म्हणून हार्मोनियम या वाद्याची निवड केली.

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

हार्मोनियमवर ते मनापासून आणि मोठ्या चिकाटीने मेहनत करू लागले.

संगीत नाटक मंडळयांच्या खास जमान्यातील एक पेटी-वादनकार श्री. दत्तोपंत तारदाळकर हे या सुमारास बलवंत कंपनीत साथीस होते. यांचेजवळच बाबूराव यांनी पेटीवादनाचे धडे घेण्यास सुरवात केली. दत्तारामजी नानोडकर यांचेही अनुभवपूर्ण मार्गदर्शन त्यांना घडत होतेच. बाबूरावांच्या या परिश्रमाकडे आणि त्यामुळे होणाऱ्या प्रगतीकडे दीनानाथराव यांचे बारकाईने लक्ष होतेच. तालमीचे वेळी ते बाबूराव यांना घेऊनच बसू लागले. १९२० साली श्री. तारदाळकर हे कंपनी सोडून निघून गेले आणि त्यांचे जागी नुकतेच दिवंगत झालेले प्रथितयश संगीत–दिग्दर्शक श्री. दादा चांदेकर हे आले. त्यांचा पेटीचा हात व साथीचे कसब हे बाबूरावनी निरीक्षणाने घेतले. ते चांदेकरांचा बाजा परिणामकारकरीतीने वाजवू लागले. त्यामुळे चांदेकरांच्या वेळ-प्रसंगाच्या गैरहजेरीत बाबूरावजींची साथीदार म्हणून हजेरी लागू लागली. मधूनमधून नाटकांतून ते भूमिकाही करू लागले. पुढे मुंबईच्या मुक्कामात चांदेकरांनी कंपनी सोडल्याने हार्मोनियमचे साथीदार म्हणून बोरकर यांची योजना झाली. याच सुमारास मास्टर दीनानाथ यांच्या सर्व प्रकारच्या सहकार्याने बाबूराव यांच्या विवाहाचा समारंभ पार पडला.

१९३४ सालापासून बोलपटांच्या आगमनामुळे नाटक कंपन्यांना उतरती कळा लागली. नाटक कंपन्यांचे सर्वच व्यवहार नुकसानीचे होऊ लागले. जवळजवळ सर्वच मोठ्या कंपन्या धडाधड बंद होऊ लागल्या. त्यातच बलवंत मंडळीही बंद झाली आणि सांगली येथे कोल्हापूरच्या "सोनो फिल्म सिंडिकेट" यांच्या सहाय्याने 'बलवंत कॉर्पोरेशन' या संस्थेची स्थापना मास्टर दीनानाथ आदी मंडळींनी करून बोलपटसृष्टीत नाइलाजाने पदार्पण केले. पूर्वीपासून बोरकर यांचे बिऱ्हाड सांगलीसच असल्याने ते स्वतःही सांगलीसच स्थिर झाले. परंतु या सर्व घडामोडी-मध्ये बोरकरांची आर्थिक बाजू मात्र फारच ढासळली. अपरिहार्यपणे ते अतिशय अस्वस्थ झाले. या अस्वस्थतेवर काही उपाय व विरंगुळा

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

म्हणून सांगली विभागातील एक नामवंत भजनी श्री. माणिकबुवा प्रसादे यांच्या भजनी मंडळात ते सामील झाले. मानसिक व आर्थिक दृष्टीने त्यांना हा खांदेपालट थोडाबहुत सौख्यपूर्ण वाटू लागल्याने त्यांनी वल्लेवस्ताद यांनाही या भजनी मंडळात ओढले. अध्यात्म आणि संगीत या दोन्हींची सेवा त्यांच्या हातून अशा तऱ्हेने घडत होती. त्याचबरोबर संगीत-दिग्दर्शनाची लहानमोठी कामेही ते मधूनमधून करीत होतेच. याच कामाच्या निमित्ताने पद्मश्री पु. ल. देशपांडे, भालजी पेंढारकर, बाबूराव पेंढारकर अशा मानकऱ्यांशी त्यांचे जवळून संबंध आले. याच सुमारास कै. रामकृष्णबुवा वझे यांचे हस्ते बाबूरावनी सांगली येथे "हार्मोनियम क्लास" ही संस्था सुरू केली, परंतु बाबूराव यांची आर्थिक बाजू सावरण्यास ही संस्था अपुरी पडल्याने गोमंतकात आपल्या जन्मगावी परत जावे, असे त्यांना वाटू लागले. त्या वेळी गोमंतकात जाणे हेही तितकेसे सुलभ नव्हते, म्हणून त्यांनी १९५३ साली बेळगावास प्रयाण केले. बाबूराव यांच्या कलेचे एक भक्त व त्यांचे पूर्वापारचे स्नेही श्री. काकासाहेब डिग्रजकर यांनी त्यांना बेळगावास स्वतःच्या घरीच ठेऊन घेतले आणि बाबूरावना सर्व प्रकारची मदत देऊन त्यांच्या व्यवसायाची मुहूर्तमेढही भक्कमपणे रोवून दिली. बाबूराव हे बेळगावास उत्तम तऱ्हेने स्थिर झाले. त्यांचे संगीतविषयक कार्य मोठ्या जोमाने सुरू झाले. त्यांचा शिष्यपरिवारही सतत वाढू लागला. नुसतेच हार्मोनियमवादन नव्हे, तर गायन, व्हायोलिन, बासरी, क्लॅरिओनेट, तबला अशा अनेक विषयांची तालीम देऊन आपला शिष्यगण त्यांनी बहुसंख्येने तयार केला. त्यांच्या या शिष्यवर्गांतील अनेक शिष्य नभोवाणीचेही मानकरी आहेत. बाबूरावजींचे ज्ञानदानाचे हे कार्य आजही तितक्याच उत्साहाने चाललेले आहे.

बाबूरावजींच्या स्वतंत्र पेटीवादनाचे मी अनेक नव्हे तर असंख्य कार्यक्रम ऐकले आहेत. अनेक कारणांनी त्यांचे हे कार्यक्रम मला स्वतःला अविस्मरणीय असे वाटतात. कोणत्याही कलाकाराच्या कलेमध्ये त्याचे स्वतःचे म्हणून काही असावे लागते, ते इतरांच्याहून काही निराळे हवे, तितकेच ते प्रभावी हवे आणि सुंदरही हवे! ज्या कलेमध्ये अशी गुणवत्ता

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

सामावलेली असते तीच कला रसिकांच्या आदरास पात्र ठरते आणि अशीच कला रसिकांच्या अंत:करणांत दीर्घकालपर्यंत ठाण मांडून बसते. बाबूराव यांच्या पेटीवादनात अशा अनेक महत्त्वाच्या आणि दुर्मिळ गुणांचा समन्वय झालेला आहे. त्यांच्या वादनातील एकूण रसवत्ता हा त्यांच्या कलेचा महत्त्वाचा गुण आहे. त्यांचे वादन अवीट असे आहे. ते कितीही ऐकले तरी श्रोत्याला कंटाळा असा केव्हाच येऊ नये. त्यांनी पलटचांच्या मेहनतीने हात खूप तयार केलेला आहे. तितकाच तो स्वच्छही आहे. त्यांच्या हाताला आसही विलक्षण आहे. हार्मोनियम हे वाद्य जात्या तुटक असे आहे, परंतु बाबूरावजींसारख्यांच्या हातांनी मोठ्या कौशल्याने तो तुटकपणा लपवला जातो. त्यांच्या हातामध्ये तानपलटे, खटका, मुरकी, झमझमा असे सर्व प्रकार अतिशय सहज-पणे वाजतात. प्रचारांतील अनेक राग त्यांच्या मैफलीत ते अतिशय परिणामकतेने वाजवितात. त्यांच्या वादनात राग–ताल यांतील पांडित्याचे प्रदर्शन केव्हाच दिसून येणार नाही. कलेतील प्रत्येक काम सुंदर व्हावे, त्यांत सहजता असावी आणि मुख्यत: ती आपल्या श्रोत्यांना मान्य व्हावी– त्यांच्या ती पचनी पडावी, त्यासाठी ते आपल्या जिवाचा आटापिटा करतील. हार्मोनियम, या वाद्याची अंगभूत प्रकृती कोणती आहे आणि तिच्यावर नेमके कोणते अलंकार शोभून दिसतील, याचे सम्यक् ज्ञान त्यांना आहे. आणि त्यांच्या एकूण वादनयशाचे हेच मुख्य मर्म आहे. वादनाच्या दृष्टीने विशोभित किंवा सौंदर्यहानी करणारा प्रकार त्यांच्या वादनात दिसणार नाही. हार्मोनियममधून ख्यालगायकी ज्या प्रमाणात वाजू शकते ते प्रमाण बाबूराव यांना पूर्णत: उमजलेले आहे, त्यामुळे त्यांचे ख्यालवादनही रसपूर्ण आणि सुटसुटीत असे होते. त्यांत विद्वत्तेचे अवडंबर, रूक्षपणा व कलाविघातक कंटाळवाणेपणा असले प्रकार केव्हाच होत नाहीत. त्यांच्या वादनाचा मुख्य आकर्षक भाग म्हणजे मध्यलयीच्या रागदारी– चीजा, ठुमरी व नाटचगीते हा होय. नाटचगीतांतील किंवा ठुमरींतील शब्दांचे सुस्पष्ट उच्चारण हा बाबूरावांच्या कौशल्यपूर्ण वादनाचा एक आदर्श गुणविशेष आहे. त्यांनी पेटीवर हात टाकताच रंगदेवता हात जोडून पुढे उभी राहते. हे दृश्य मी कितीतरी वेळा अनुभवले आहे. त्यांच्या वादनातील सौंदर्यपूर्ण

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

कल्पनाविलास हे त्यांच्या कलात्मकतेतील एक खास सामर्थ्य आहे. पदातील एकएका ओळीवर ते निरनिराळे प्रकार करू लागले म्हणजे श्रोते अक्षरशः मोहून जातात. त्यांचा संपूर्ण कार्यक्रम ऐकणे हा तर सुखावह भाग आहेच, परंतु अनेक निरनिराळ्या कार्यक्रमांच्या अधेमधे त्यांचा कार्यक्रम ऐकण्यात बाबूरावांच्या आणखी काही गुणविशेषांची श्रोत्यांना सुस्पष्ट साक्ष पटते. इतर अनेक उत्कृष्ट कार्यक्रमांचा रंग पुसून टाकून त्यावर आपल्या वादनाचा रंग हमखास जमविण्याचे दुर्मिळ कसब त्यांच्या अंगी विलक्षण स्वरूपाचे आहे. त्यांच्या वादनातील एकूण भरीव गुणवत्तेमुळे त्यांच्या वादनाच्या स्मृती दीर्घकालपर्यंत शिल्लक रहातात असे मला वाटते. गेल्या सुमारे पंचवीस वर्षांत त्यांचे वादन ऐकण्याचा मला योग आला नाही, हे माझे दुर्दैवच होय! या दोन तपांच्या दीर्घ कालावधीत त्यांची कला आणखी कितीतरी संपन्न झाली असेल! त्यांच्या वादनाच्या पूर्वीच्या स्मृती मात्र आजही तितक्याच ताज्या टवटवीत आहेत.

बलवंत नाटक मंडळीच्या निमित्ताने बाबूराव यांना फारच मोठमोठ्या कलाकारांचा सहवास घडला. वझेबुवांची प्रगाढ विद्वत्ता, उस्ताद मुरादखांच्या बीनवादनातील रसीलेपणा, दीनानाथरावांची विजिगीषू गायनकला, चांदेकरांची तयारी आणि प्रतिभासंपन्नता अशा थोर कलाचार्यांच्या कलात्मकतेचे कळत न कळत सुसंस्कार बाबूरावजींच्या वादनावर झाले. कै. मोहनराव रामनाथकर यांच्या पेटीवादनाचे ते भक्त असल्याने मोहनरावांच्या वादनातील रसवत्ता बाबूरावजींच्या हातात आली असण्याची शक्यता आहे.

बाबूराव बोरकर यांची वादनकला जशी गोड आहे, तितकाच स्वभावही गोड आहे. स्वभावाने अतिशय नम्र, वागणे तितकेच मर्यादशील. त्यांनी कोणाचा मत्सर केला आहे, कोणाची निंदानालस्ती केली आहे किंवा कोणाचा उपमर्द व्हावा अशी वर्तणूक त्यांच्या हातून झाल्याचे माझ्या पाहण्यात नाही. मनाने अगदी साफ आणि मोकळे! लहान मुलासारखे. त्यांच्यातील कृतज्ञवृत्तीची किती तरी उदाहरणे माझ्या पाहण्यात आहेत.

११

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

बाबूरावजींनी स्वतःची साधना जितक्या आस्थेने केली, तितक्याच आस्थेने त्यांनी हातचे काही राखून न ठेवता विद्यादानही केलेले आहे– हे पवित्र कार्य ते आजही करीत आहेत. त्यांनी पुष्कळ विद्यार्थी तयार केले आहेत. कै. दत्ताराम शिरोडकर, नरहरी वळवईकर, श्रीमती विमल कर्नाटकी, पांडुरंग रामतीर्थंकर अशांसारखे कितीतरी नामवंत शिष्य त्यांनी तयार केले आहेत. सांगलीचे पांडुरंगराव रामतीर्थंकर यांचे पेटी-वादन ऐकण्याचा मला पुष्कळदा योग आलेला आहे. बाबूरावांच्या पेटी-वादनातील फारच मोठे कौशल्य रामतीर्थंकरांच्या हातात उतरले आहे. आजकाल सांगली विभागात तेही संगीत शिक्षणाचे कार्य आदर्शपणे करीत आहेत.

अनेक संकटांशी झुंज देऊन बाबूरावजींनी आपली संगीत साधना पार पाडली. कै. दीनानाथराव यांची साथ–संगत तर त्यांनी आयुष्यभर केलीच. परंतु जन्मास येऊन बालगंधर्वांची साथ करण्याचे भाग्य लाभावे, अशी त्यांना तळमळ होती. ईश्वरकृपेने त्यांची तीही इच्छा उत्तम-रीतीनें पूर्ण झाली. सोलापूर येथे गंधर्व नाटक मंडळींचा मुक्काम असताना बालगंधर्वांनी तारेने पाचारण करून बाबूरावजींना ऑर्गन-साथीसाठी कंपनीत ठेवून घेतले. बाबूराव यांच्या जीवनात असे किती तरी सुखद क्षण आले. मानवीजीवनात अपरिहार्य असे आणीबाणीचे प्रसंगही येऊन गेले. ते बलवंत मंडळीत असताना १९१८ साली कंपनी-तील एका मोठ्या भक्कम पेटीत लपून बसले आणि पेटीचे दार चुकून बंद केले गेले. इतक्यात कै. राम गणेश गडकरी हे अचानक कंपनीच्या बिऱ्हाडी आले. त्यांच्या लक्षात हा प्रकार आल्याने त्यांनी बाबूरावना 'जीवदान' दिले. बाबूरावनी स्वतःच्या जीवनात सत्कार उपभोगिले आणि अपमानही सोसले. दोन्हीही समतोल वृत्तीने स्वीकारले !

हार्मोनियम या वाद्याचे सामर्थ्य किती मोठे आहे हे त्यांना स्वतःला पूर्णतः पटलेले आहे. रसिकांनाही त्यांनी ते आजवर पटविले आहे. संगीताच्या आजच्या दुनियेत या वाद्याची उपयुक्तता किती आहे, हेही त्यांनी अजमावले आहे. या दृष्टीने नभोवाणीने हार्मोनियमबंदी सर्वांगाने त्वरित उठवून कलाकारांची आणि श्रोत्यांची सोय पाहावी,

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

असे त्यांना स्वार्थापोटी नव्हे तर कलेच्या हिताच्या दृष्टीने वाटते. बाबूरावना वाटणाऱ्या या तळमळीमागे फार मोठे औचित्य आहे यात शंकाच नाही !

एकूण संगीत कलेलाच "कलात्मक" उर्जितावस्था प्राप्त व्हावी आणि यासाठी गुरु, शिष्य, सरकार आणि सामान्य जनता यांनी आटोकाट प्रयत्न करावेत अशी त्यांची मनोमन इच्छा आहे. नामवंत हार्मोनियमवादनकारांनाही सरकारने मानधन देऊन त्यांचा यथोचित गौरव करण्याची प्रथा जरूर सुरू करावी असे त्यांचे आग्रहाचे सांगणे आहे.

मी ऐकलेल्या बाबूरावांच्या पेटीवादनाच्या स्मृती मला अमर वाटतात. त्या नुसत्या स्मृतीनेसुद्धा मला आजही समाधान लाभते. याच आनंदाचा पुनर्साक्षात्कार मला केव्हा घडेल याची मी मोठ्या आतुरतेने वाट पहातो आहे ! !

◘ ◘ ◘

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri



अवलिया श्रीगुरुभक्त
पं. सीतारामबुवा फातर्फेकर

मानवी जीवन हा नियतीचा एक अनाकलनीय असा खेळ आहे ! एक जन्मतःच सर्वप्रकारची भाग्यसंपदा स्वतःच्या कपाळपट्टीवर लिहून घेऊन जीवनात प्रवेश करतो. आरोग्य, अर्थ, विद्या, मानमान्यता, यश अशा सर्व गोष्टी थोड्या-फार प्रयत्नाने त्याला सहज साध्य होत जातात. अपयश, मनःस्ताप या बाबी त्याच्या क्वचितच वाट्याला येतात. जीवनाचा आनंद, समाधान सतत लाभत रहाणे हीच एक किमया त्याच्या जीवनभर घडत असते ! याच्याउलट असे काही जीव सापडतात की, जीवनाच्या पहिल्या श्वासापासून तो अखेरच्या श्वासापर्यंत जीवनाशी सतत झगडा-झगडा ! केवळ हालअपेष्टा सोसण्यासाठी, अपयश पचवण्यासाठी, मानापमान मूकभावनेने गिळण्यासाठीच यांचे जन्म झालेले असतात. एकाच प्रचंड फत्तराच्या काही भागाची सुंदर देवमूर्ती तयार व्हावी– तिची रोज पंचोपचारे पूजाअर्चा व्हावी आणि त्याच फत्तराच्या राहिलेल्या भागाला कुठेतरी (?) घाणीत खितपत पडून रहावयास लागावे याचा अन्वयार्थ कोणी व कसा लावायचा ? याच सर्व प्रकाराला अध्यात्माची किंचित जाणकारी

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri



सीतारामबुवा फातर्फेकर

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

असलेले व्यवहारवादी 'नियतीचा खेळ' हे नाव देऊन मोकळे होतात. हे सर्व असे का होते, याचा उलगडा केवळ मानवी बुद्धीला केव्हाच होण्यासारखा नसला तरी असे उलटसुलट प्रकार सदैव पाहावयास मिळतात. ज्याच्या नशीबी ते असतील त्यांना ते इच्छेने वा अनिच्छेने भोगणे प्राप्त होते! मात्र दुसऱ्या प्रकारच्या जीवनाच्या संस्कारांतून पेटून उठून, आपल्या जीवनाचा होम करून आपल्या संपूर्ण चारित्र्याचे व चरित्राचे बावनकशी सोने बनविलेले काही महाभागही अधूनमधून पाहावयास सापडतात. मला भेटलेल्या अशाच एका गोमंतकीय विद्वान कलाकाराचे नाव आहे– पं. सीतारामबुवा फातर्फेकर !

सीतारामबुवांना मी बरीच वर्षे ओळखत होतो, परंतु त्यांच्या संपूर्ण व्यक्तिमत्त्वाबाबत मला काहीच कल्पना नव्हती. मात्र तो योगायोग– प्रसंग पुण्यातच आला! आग्रा घराण्याचे ॠषीतुल्य गुरु उस्ताद विलायतहुसेनखाँसाहेब यांचा सुमारे पंचवीस वर्षांपूर्वी पुण्यात जाहीर सत्कार झाला. या समारंभानिमित्त अनेक श्रेष्ठ गायकवादकांचे कार्यक्रम झाले. त्यांत खांसाहेबांचे एक शिष्य या नात्याने सीतारामबुवांचीही सेवा घडली. बुवा फारच चांगले गायले. इतका सर्व भाग व्यवस्थित झाला, परंतु या एकूण समारंभात खांसाहेबांना कमीपणा यावा असे काहीतरी घडले. त्या वेळी सीतारामबुवा फारच संतापलेले होते– बिथरले होते. सर्व समारंभ संपल्यानंतर मी आंतल्याबाजूस गेलो. तेथे तर सर्वच वातावरण कमालीचे तंग झालेले होते. समारंभाचे संयोजक अपराधी मुद्रेने खाली मान घालून उभे होते आणि सीतारामबुवा अतिशय संतापलेल्या अवस्थेत– कमालीच्या कडक शब्दांत त्यांची हजेरी घेत होते. मी सर्दच झालो. गुरुसेवेची पहिली संगीत हजेरी व आत्ताची ही रंगीत हजेरी पाहून सीतारामबुवांच्या एकूण व्यक्तिमत्त्वाचा मला निर्णायक असा काहीच बोध होईना ! हा सर्व उलगडा होण्यास मध्यंतरी काही वर्षांचा काळ लोटावा लागला. माझे बालमित्र श्री. आर. जी. जोशी यांच्यामुळे अनेक गोमंतकीय कलाकारांशी घनिष्ठ परिचय होण्याचा सुयोग आला. अशाच एका प्रसंगाने पं. सीतारामबुवांचा परिचय झाला आणि तो आजतागायत वाढत्या स्वरूपाचा आहे– यातूनच असे जोराने वाटू लागले की या अत्यंत सुसंस्कृत

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

अवलिया कलाकाराबद्दल संगीताच्या दुनियेला काहीतरी सांगितलेच पाहिजे !

गोमंतकातल्या फातरफे या गावानजीकच्या ' व्हर्ण ' या खेड्यात सीतारामबुवांचा जन्म झाला. त्यांचे बालपण व्हर्णनजीकच्या एका लहानशा जंगली गावात आजोळी गेले. या गावी खटाराही जाऊ शकत नसे. आजूबाजूला उंच डोंगर, दऱ्या, खोरी आणि जंगल. या ग्रामातील पौरजन म्हणजे अर्धनग्न अवस्थेतील शेतमजुरी करणारे अशिक्षित कुणबी. या खेड्याचे नाव पिल्ला ! बालपणापासूनच बुवांची शरीरयष्टी कृश. त्यातही कृमीरोगाने त्यांना कमालीचे हैराण केले. अशा परिस्थितीत त्यांच्या मावशी चिमणाबाई व्होर्णेकर यांनी बुवांना मुंबईस आणले. बुवांचे शालेय शिक्षण सुरू झाले. बुवांचे फातर्फेकर हे आडनाव या शाळेतच प्रथमतः नमूद केले गेले. बुवांचे शिक्षण इंग्रजी सहावीपर्यंत होऊ शकले. कारण दारिद्र्य आणि आजार यामुळे त्यांना तीव्र इच्छा असूनही शालेय शिक्षणाला रामराम ठोकावा लागला !

कोणत्या तरी कलेचे—विशेषतः संगीत कलेचे वेड असणे ही गोमंतकीयांच्या रक्तातील बाब आहे. असे कलात्मक वेड नसेल तर तो गोमंतकीयच नव्हे असे खुशाल समजावे ! सीतारामबुवांनाही हे वेड होतेच. थोडेफार संस्कारही होते. परंतु सर्वंच परिस्थितीने पिचून निघाल्याने त्यांच्या या इच्छेला मूर्तस्वरूप येण्याचे चिन्ह दिसेना. तळमळ मात्र विलक्षण होती. शेवटी याच तळमळीने त्यांना हात दिला. गोमंतकाचे भूषण ठरलेले अप्रतिम तबलावादनपटू कै. दत्तारामजी नानोडकर यांचेकडे त्यांचे तबल्याचे अध्ययन सुरू झाले. गाणे आणि गायकी यांच्या अंगाने खूबसुरत व दमदार ठेके कसे लावावे, साथसंगत कशी करावी, साथीच्या वेळी बोलभरणा-तुकडे किती प्रमाणात आणि कोणत्या ठिकाणी वाजवून गायनाची मैफल कशी रंगवावी, अशा साथ-संगतीबाबतच्या सर्व बाबी दत्तारामजींनी सीतारामबुवांकडून पक्क्या करून घेतल्या. या तबलावादन विद्येचा बुवांना एक मोठा फायदा झाला. तो असा की, तबल्याचे साथीदार म्हणून ते अनेक गायक-

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

गायिकांकडे सतत जाऊ लागले. कै. सवाई गंधर्व, कै. पं. रातंजनकर अशांसारख्या मातबर कलाचार्यांचे ते आवडते तबलिये बनले. संगीताचार्य पं. रातंजनकर यांच्या सहवासाने संगीत विषयांतील अनेक समस्यांचे त्यांना आकलन होऊ लागले. संगीताचार्यांचा उल्लेख मोठ्या आदरपूर्वक अप्रत्यक्ष गुरु म्हणूनच ते नेहमी करतात. ख्यातनाम व्हायोलिनवादनकार कै. श्रीधर पार्सेकर यांचे मामा कै. परशुरामबुवा पार्सेकर यांनी बुवांना संगीताचे पाठ दिले. विशेषत: गोमंतकीयांना ज्यांच्या सव्यसाची आणि चतुरस्र कलात्मकतेबाबत विलक्षण अभिमान वाटावा असे परशुरामबुवा हे एक श्रेष्ठ कलाकार होते. त्यांनी पित्याच्या प्रेमाने व गुरु या नात्याने बुवांना शिकविले. तसेच पं. यशवंतरावजी लोलयेकर यांनी बुवांना गायनाची तालीम दिली. बुवांच्या तबला साथसंगत कौशल्यामुळे त्यांना मुंबईत तबल्याच्या तालमी मिळू लागल्या. विलायतहुसेनखांसाहेबांनीही त्यांना स्वत:च्या काही तालमी दिल्या. बुवांचा थोडाफार जम बसू लागला. मोठमोठ्या उस्ताद कलाकारांमुळे त्यांची गायकीची समज वाढू लागली. त्याचबरोबर स्वत: प्रत्यक्ष गाणे शिकण्याची तळमळही सतत वाढू लागली. बुवांच्या या तळमळीला ईश्वराने अखेर दाद दिली. कै. सरस्वतीबाई फातर्फेकर या विलायतहुसेनखांच्या नामवंत शिष्या. बाईंना तालीम देण्यासाठी खांसाहेब घरी येत. आणि अशी ही तालीम सीतारामबुवांच्या घरीच चाले. तबल्याच्या साथीस बुवाच असत. खांसाहेबांचे धाकटे बंधू नन्नेखां यांचे शिष्यत्व पत्करण्याचे ठरवून त्यानुसार मुंबईच्या लक्ष्मीबागेमध्ये मोठ्या धार्मिक विधीसह मुंबईतील सर्वच मोठमोठ्या कलाकारांच्या उपस्थितीत हा दीक्षाविधी समारंभ (गंडाबंधन) अतिशय थाटाने साजरा झाला ... तालीम व्यवस्थित सुरू झाली. अनेक रागरागिण्या, अस्ताई–अंतरे, गायकी यांची बुवांना चांगल्या तऱ्हेने ओळख होऊ लागलेली होती. परंतु बुवांचे दुर्दैव पुन्हा जागृत झाले ! नन्नेखांसाहेबांची प्रकृती एकाएकी ढासळली. त्यामुळे मुंबई सोडून ते अत्रोलीला आपल्या गावी गेले आणि तिकडेच त्यांचे दु:खद निधन झाले. म्हैसूरचे महाराज नुकतेच निवर्तल्यामुळे विलायतखांसाहेब मुंबईस स्थायीक झाले. सीतारामबुवांच्या भाग्याने खांसाहेबांनी सीतारामबुवांना तालीम देण्याचे अभिवचन दिले. "तुम मेरे भाईके गंडाबंद शागीर्द हो

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

तुमको बताना मेरा फर्ज है " असे खांसाहेबांनी उद्गार काढले. त्यानुसार तालीम अगदी व्यवस्थित सुरू झाली. खांसाहेबांच्या इतर तालमीच्या वेळीही खांसाहेबांच्या आग्रहावरून ते जाऊ लागले. खांसाहेबांच्या सततच्या सहवासात प्रत्यक्ष गायकीप्रमाणेच संगीतावरील मौलिक चर्चा, काही महत्त्वाचे विचार, महत्त्वपूर्ण किस्से, श्रेष्ठ बुजुर्ग कलाकारांच्या मार्गदर्शक हकीकती, रियाजाच्या आदर्श पद्धती आणि मार्ग अशा विविध विषयांवरील खांसाहेबांचे अनुभूतिपूर्ण विचार सीतारामबुवांच्या कानांवर सतत पडू लागले. बुवांसारख्या चिंतनशील-बुद्धिमान कलाकाराला या सर्वांचा स्वाभाविकपणे अतिशय फायदा होत गेला. बुवांचे ज्येष्ठ आणि कलासंपन्न गुरूबंधू पं. रत्नकांतजीही यावेळीं नेहमीच उपस्थित असत. " खांसाहेबांचा व रत्नकांतजींचा सहवास हा माझ्या जीवनातला भाग्ययोगच होता ", असे कृतज्ञ उद्गार बुवा नेहमी काढतात. बुवांना सुमारे पंधरा-वीस वर्षेतरी खांसाहेबांचा निकटचा सहवास घडला. आकाशवाणीचे सल्लागार म्हणून खांसाहेबांची नियुक्ती झाली, त्यानंतर संगीत नाटक अकादमीनेही खांसाहेबांना बहुमानाने नोकरीस बोलाविल्याने खांसाहेब मुंबई सोडून दिल्लीस गेले. परंतु दि. १८ मे १९६२ रोजी दिल्लीतच त्यांचे अकल्पित निधन झाले. त्यांच्या दुःखद निधनानें साऱ्या संगीत विद्येचा आधारस्तंभच कोसळला. एकूण सर्व संगीतक्षेत्रच हळहळले. खांसाहेबांच्या छात्रांचे आणि आग्रा घराण्याचे कधीच न भरून येणारे नुकसान झाले. त्यांच्या शोकाला आणि दुःखाला सीमाच राहिली नाही. या सर्व शोकांत परिस्थितीतून सीतारामबुवांची सुटका होणे शक्यच नव्हते ! कारण ख़ांसाहेब हे बुवांचे नुसतेच गुरु नव्हते. बुवांचे पालक, पाठीराखे—सर्व काही खांसाहेबच होते. परंतु ईश्वरीइच्छेपुढे कोणाचाच इलाज नव्हता ! ... ...

जगरहाटीनुसार बुवा स्वतःची साधना, विद्यादान अशा कार्यात हळूहळू भाग घेऊ लागले. या वेळपर्यंत बुवांना खांसाहेबांनी पचेल आणि मानवेल अशी विद्या अगदी भरभरून दिलेली होती. खांसाहेबांच्या चरणांशी बसून अतीव श्रद्धेने आणि विनम्र भावाने बुवांनी ती ग्रहण केलेली होती. आता बुवांचे सदैव एकच कार्य चालू होते ते म्हणजे चिंतन आणि मनन !

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

सीतारामबुवा हे विलायतहुसेनखांसाहेबांचे अत्यंत एकनिष्ठ परंतु डोळस शिष्य आहेत. परंतु "जो जो जयाचा घेतला गुण, तो तो म्यां गुरु केला जाण", ही बुवांची उपजत प्रवृत्ती असल्याने श्रीदत्त-महाराजांप्रमाणे त्यांनी मनोमनीं अनेक विद्वानांना गुरुत्वाचा मान दिला. अंजनीबाई मालपेकर, केसरबाई, मोघूबाई असे कितीतरी गुरुजन ते अभिमानपूर्वक मानतात. असे गुरुत्व स्वीकारण्याबाबत घराणे– वय अशा अडचणी त्यांच्याआड केव्हाच येत नाहीत आणि बुवांच्या या वृत्तीमुळे सर्वच थोरामोठ्या कलाकारांची दारे बुवांना सदैव उघडी असतात. मज्जाव हा शब्द कोठेच नाही ! बुवांनी स्वतःच्या साधनेत या सर्व गोष्टींचा अतिशय फायदा करून घेतलेला आहे !

पं. सीतारामबुवा हे मुंबईतील विद्वान, विचारवंत व जबाबदार कलावंत म्हणून ओळखले जातात. मी स्वतः बुवांच्या मैफली ऐकलेल्या आहेत. गाण्यातील प्रत्येक कामगत विचारपूर्वक, शिस्तीने आणि साक्षे-पाने झाली पाहिजे यावर त्यांचा विलक्षण कटाक्ष असतो. कोणी कितीही मोठा कलाकार असो, त्याला शारीरिक-बौद्धिक अशा काही मर्यादा निसर्गानेच पडलेल्या असतात. त्या नेमक्या ओळखून स्वतःचा कलात्मक प्रवास पुरा करीत राहणे, हेच कलाकाराचे मुख्य कसब ठरते. सीताराम-बुवांनी स्वतःच्या या सर्व मर्यादा अगदी बारकाईने जाणलेल्या आहेत. स्वतःच्या शरीर-प्रकृतीचा विचार करून त्यांनी गायकीतील शक्तीची सर्व कामे युक्तीवर आणून ठेवली आहेत. बंदेषयुक्त-चुस्त, अस्ताई-अंतरा, अतिशय शुद्ध रागस्वरूप, सूक्ष्मातिसूक्ष्म लयकारी, गायकीचा साक्षेपी विद्वन्मान्य वापर आणि मैफलीची एकूण परिणामकता–अशा पाच कलमी योजनेवर त्यांच्या मैफलीचे अधिराज्य ते साकारतात. त्यांची मैफल हे खऱ्या अभ्यासूंना उत्कृष्ट खाद्य ठरावे ! त्यांची गाय-कीची एकूण जाणकारी जितकी जबरदस्त, तितकीच ते मूळचे तबलिये असल्याने– ताल आणि लयशास्त्राची समजदारीही विलक्षणच ! ते बोल– उपजअंगाने 'अस्ताई' भरू लागले म्हणजे एखाद्या नृत्यविशार-दिनीच्या मनोहर पदन्यासाची मार्मिक रसिकांना सतत याद यावी ! प्रचारातील आणि अनवट रागरागिण्या व त्यांतल्या उत्तमोत्तम दुर्मिळ चिजा यांचे त्यांचेकडे विपुल भांडार आहे. रागविचार परिपूर्ण असल्याने

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

या दोन्ही प्रकारच्या रागिण्या ते सारख्याच सिद्धतेने आणि विश्वासाने गाऊ शकतात. बुवांच्या समर्थ कलेची हीच प्रमुख वैशिष्टचे आहेत. ही जरूरीची वैशिष्टचे आजकाल अन्यत्र अभावाचेच दिसून येतात.

पं. सीतारामबुवा हे जसे मुख्यत: विद्वानांना मान्य असे कलाकार आहेत, तसेच ते एक सिद्धहस्त–दानी गुरुही आहेत. त्यांचे चार–दोन शिष्यही मी ऐकलेले आहेत. विचाराचा यत्किंचित्‌ही गोंधळ न ठेवता विद्यार्थ्याला ज्ञानाची समग्र उकल करून त्याला डोळस वनविणे ही वाव सीतारामबुवांसारख्या अधिकारी गुरुसाठीच आहे! बुवांनी आजवर पुष्कळ विद्यार्थी– विद्यार्थिनींना तालीम दिलेली आहे. त्यांचे हे कार्य आजही तितक्याच मनोभावे चालू आहे. परंतु तरीही असे वाटते की, बुवांच्या या विद्येचा फायदा अभ्यासूंनी आणि रसिकांनी फार मोठ्या प्रमाणावर करून घेणे अगत्याचे आहे. संगीतातील खरे विद्वान दिवसेंदिवस कमी कमी होऊ लागलेले आहेत. संगीताचा गेल्या चार तपांचा तरी आढावा माझ्यासमोर आहे, म्हणूनच सीताराम-बुवांसारख्या खऱ्या व्युत्पन्न गुरुचे महत्त्व मला अधिक वाटते !

पं. सीतारामबुवा यांच्या जीवनाच्या दोन वाजूंपैकी 'संगीत' ही एक वाजू आहे. बुवांच्या जीवनाची दुसरी वाजू म्हणजे त्यांची अध्यात्मिक भूमिका ! ही दुसरी वाजूही तितकीच भक्कम आहे. गोमंतकाच्या या सुपुत्राने गोमंतकाच्या 'खास' अन्नाला आजवर कधीही स्पर्श केलेला नाही. 'पेया'चे तर नावच नाही ! ते स्वतः आजन्म नैष्ठिक ब्रम्हचारी राहिले आहेत. त्यामुळे अखिल 'स्त्री'जात ही त्यांच्याहिशेवी मातेसमानच आहे. स्वतः सुसंस्कृत व्हावे, आपल्या अखिल गोमंतक समाजाने अधिकाधिक सुसंस्कृत वनावे, आपल्या आजू-वाजूच्या सर्वांनीच संस्कारसंपन्न झाले पाहिजे, यासाठी बुवांची कोण धडपड ! गोमंतकीय स्त्रियांच्या उन्नतीसाठी बुवांनी मुंबईत खूपच यशस्वी प्रयत्न केले. स्वतःच्या खिशाकडे न पहाता दीन-दुःखितांच्या, मदतीला बुवा सदैव हजर ! स्वतःच्या जीवनात असत्य-अप्रामाणिक या शब्दांनाही त्यांनी कधीच थारा दिला नाही. नुसत्या मनानेही कोणाचे कधीच अनहित चिंतिले नाही. 'अवघेचि सुखी रहावे' या श्रेष्ठ मनोवृत्तीचा

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

हा कलाकार हे संगीत क्षेत्राचेच भूषण ठरावे! कै. पं. विष्णु दिगंबरजींनी आपल्या संपूर्ण जीवनाचा होम ज्या दोन गोष्टींसाठी केला, तेच महान कार्य पं. सीतारामबुवांच्या हातून काही प्रमाणात तरी अनाहूतपणे आज होत आहे.

पं. सीतारामबुवा हे एक कट्टर दत्तभक्त आहेत. मुंबईतील ठाकुर-द्वारचे श्रीदत्तमहाराज हे बुवांचे आराध्यदैवत! या दैवतावर बुवांची श्रद्धा विलक्षण. या दैवताचा उत्सव– कोडकौतुक बुवा स्वतःच्या आनंदा-साठी नेहमी करतातच, परंतु कोणावर काही संकट आले, कोणी आजारी पडले तरी त्यांच्यासाठी बुवा महाराजांना स्वतः अभिषेक करून साकडे घालतील. ' मज हृदयी सद्‌गुरु ' याच ध्यानावस्थेत बुवा सदैव मग्न असतात. बुवांच्यासारखा तीव्र निष्ठेचा श्रद्धावान मनुष्य आजच्या काळात तरी प्रदर्शनीय वस्तुच ठरणारी आहे! सीतारामबुवांना दत्त-भक्तीचे बाळकडू बालपणापासून घरातूनच मिळत गेले. बुवांच्या दोन्ही मावशा श्रेष्ठ दत्तोपासक होत्या. त्यामुळे अध्यात्मिक संस्कार बुवांच्यावर बालपणापासूनच सतत होत होते. धार्मिक ग्रंथांचे पारायण, भजन–पूजन –उपासना या सर्व संस्कारांत बुवाही कळत–नकळत गुंतले जात होते. बुवांच्या धाकटया मावशी तर ऐन तारुण्यात सर्व वैभव सोडून श्रीदत्त-सेवेसाठी औदुंबर येथे गेल्या. त्या अखेरपर्यंत तेथेच राहिल्या आणि दत्तसेवेतच त्यांनी आपला देह ठेवला. त्याचप्रमाणे बुवांच्या एक गुरु श्रीमती सरस्वतीबाई जांबावलीकर या उस्ताद विलायतहुसेनखां यांचे वडील मरहूम खांसाहेब नथ्थनखां यांच्या शिष्या होत्या. त्यांनी बुवांना बरीच तालीम दिली. सरस्वतीबाईंना तालीम देण्यासाठी खांसाहेब गोव्यातील जांबावली येथे मुद्दाम येऊन राहिले होते. या सरस्वतीबाईही श्रेष्ठ दत्तभक्त होत्या. ऐन तारुण्यात सर्वस्वाचा परित्याग करून त्या गाणगापूरला गेल्या आणि अखेर तेथेच दत्तचरणी विलीन झाल्या. बुवांच्या अध्यात्मप्रवणतेचे बीज वरील पार्श्वभूमीत सापडते.

सीतारामबुवा हे स्वतः उत्तम लेखक व वक्तेही आहेत. सुप्रसिद्ध चित्रकार श्री. दलाल यांच्या आग्रहावरून ' दीपावली 'च्या अंकांतून व अन्यत्रही बुवांनी संगीतावर मौलिक लेखन केले. मधूनमधून सध्याही

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

करीत असतात. सुस्पष्ट व मर्मग्राही विचार हा त्यांच्या लेखनाचा मुख्य धर्म. त्यांच्या लेखनात ज्ञानबोध, तत्त्वचिंतन, रसिकता आणि मार्मिकता या गुणांचे मुख्यतः दर्शन होते. त्यांच्या भाषेमध्ये वक्रोक्ती, व्याजोक्ती, कोटिक्रम व विनोद या गोष्टी पदोपदी आढळून येतात. गुरू मरहूम विलायतहुसेनखांसाहेब यांचे विस्तृत चरित्र लिहून ते प्रसिद्ध करण्याचा बुवांचा मनोमय संकल्प आहे. शिवाय श्रीदत्तसेवेचे काही महत्त्वपूर्ण इच्छित कार्य आपल्या हातून पुरे व्हावे अशी बुवांची आजची तळमळ आहे. या अवलियाच्या हातून श्रीगुरूसेवेचीच ही दोन्ही कार्ये उत्तम रीतीने पार पडावीत इतकी वळकट श्रद्धा बुवांचेजवळ आहेच !

बुवांनी नुकतेच पासष्टाव्या वर्षात पदार्पण केले आहे. त्यांच्या हातून संगीत व अध्यात्म यांची सेवा आणि कार्यंही उत्तरोत्तर वाढत्या प्रमाणावर होत राहावे हीच माझ्यासारख्याची मनोमय इच्छा ! !

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri



जितेन्द्र अभिषेकी

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri



रसिकांचे लाडके–गायक
पं. जितेंद्र अभिषेकी

पुण्यपुरुष कै. खाप्रूमाम् पर्वतकर यांच्या स्मरणार्थ गोमंतकात "स्वरमंच" ही संस्था स्थापन झाली, या निमित्ताने मीं गोमंतकात प्रथमतःच आलो होतो. त्यानंतर निरनिराळ्या कारणांनी गोव्यात चारदोनदा येण्याचा सुयोग आला. माझे वास्तव्यही वरेच झाले. गोमंतकात खूप फिरलो. संगीतकार, साहित्यिक, सरकारी कर्मचारी, कलाप्रेमी अशा विविध प्रकारच्या लहान–थोर दर्जाच्या व वयाच्या व्यक्तींशी काही चर्चा– विचारविनिमय करण्याचा योग आला. त्यात मला प्रामुख्याने एक गोष्ट दिसून आली ती ही की, कै. पं. रामकृष्णबुवा वझे यांनी पाऊणशे वर्षांपूर्वी गोमंतकात संगीत कलेवावत जी जागृती केली, जे श्रेष्ठ कार्य केले, जे बीजारोपण केले त्यांची प्रसादचिन्हे गोमंतकाच्या कलासक्त भूमीमध्ये आजही स्पष्टपणे दिसून येतात. संगीत कलेच्या प्राप्तीसाठी बुवांनी किती कष्ट उपसले, किती सायास केले. किती अपमान– अवहेलना पचविल्या याचा संपूर्ण इतिहास गोमंतकीयांना ज्ञात आहे. बुवांनी संगीत कलेचा झेंडा भारतावाहेर जाऊन नेपाळसारख्या राष्ट्रांतही त्या काळी दिमाखाने फडकाविला, या

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

सर्वांचा कृतज्ञ अभिमान गोमंतकीयांना आजही वाटतो. मला गोमंतकात भेटलेल्या संगीत रसिकांत बुवांना प्रत्यक्ष पाहिलेले असेही थोडे बुजुर्ग होते, तर बुवांना प्रत्यक्ष पाहू न शिकलेले, परंतु बुवांच्या एकूण सामर्थ्याबाबत व कार्याबद्दल खूप-खूप ऐकलेले असे कितीतरी आजचे विचारवंत रसिक मला भेटले. बुवांच्या कार्याने विलक्षण जागृती आलेलेच हे सारे मला दिसले. बुवांच्या या कार्याचे बीज गोमंतकात अगदी खोलवर रुजले आहे. कोणत्याही बीजाचे अंकूर कोठून कसे जातील, व केव्हा जातील, त्याचे भावी कालात नेमके काय होईल याचा थांगपत्ता खुद्द निसर्गाला तरी असेल की नाही याची मोठीच शंका वाटते! बुवांचे निधन १९४३ मध्ये झाले. त्यापूर्वी दहा वर्षे जन्माला आलेल्या एका बालकामध्ये हे बीज अंकुरीत होण्याची सुचिन्हे दिसू लागली. विकट परिस्थितीवर दुर्दम्य महत्त्वाकांक्षेने मात करण्याची क्रांतिकारी प्रवृत्ती या बालकामध्ये डोकावू लागली. कालांतराने हे बीज चांगलाच आकार धरू लागले. बुवांच्या पावलावर पाऊल टाकून हा मुलगा भावी कालात आदर्श संगीत-साधक बनला!

सुमारे पंचवीस वर्षांपूर्वीची हकीकत– पुण्यातील माझ्या एका ज्येष्ठ गायक-स्नेह्यांचेजवळ गायनाची संथा घेण्यासाठी चौदा–पंधरा वर्षांचा एक मुलगा येत असे. नाकी-डोळी अतिशय उत्तम, तरतरीत आणि करारी मुद्रा असलेले त्याचे दर्शन लोभस वाटे. खाकी चड्डी, खाकी टोपी आणि पांढरा शर्ट हा त्याचा ठराविक पेहराव असे. त्यावेळी तो अगदीच थोडे व प्राथमिक गात असे. परंतु त्याची बसण्याची ऐट, त्याचा विश्वास आणि त्याही परिस्थितीत काही स्वतःची कल्पनाशक्ती चालविण्याची त्याची प्रवृत्ती पाहून 'हा मुलगा पुढे-मागे कदाचित उत्तम गाईलही,' असे माझ्यासारख्या त्रयस्थालाही वाटे. चौकशीअंती समजले की, हा मुलगा गोव्याचा असून तो येथे अनाथ विद्यार्थीगृहात शिकण्यासाठी आलेला आहे. त्याचे नाव जितेंद्र अभिषेकी! त्यानंतरच्या काही वर्षांत या मुलाचे पुढे काय झाले, तो कोठे असतो, काय करतो, याची मला काहीच माहिती लागली नाही. आणि एके दिवशी या सर्वांवर स्वच्छ प्रकाश पडला. तो असा : कोल्हापूरच्या देवल क्लबमध्ये काही प्रसंगाने गाण्याची एक 'जंगी' मैफल झाली. त्या मैफलीत

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

अभिषेकीही गायले. या मैफलीस पुण्याचे तबलानवाज मरहूम उस्ताद मेहबूबखांसाहेब मिरजकर हेही उपस्थित होते. मेहबूबसाहेबांनी त्या मैफलीचे जे वर्णन सांगितले ते त्यांच्याच शब्दांत सांगणे अधिक योग्य! ते म्हणाले, "सगळीच गाणी चांगली झाली, पण त्यांत जितेंद्र असा गायलाय– असा गायलाय! त्यानं सगळ्यांना फाडून खाल्लं. तानेला तयार, बुद्धिवान आणि लयीला तर असा जात होता की, बोलायची सोय नाही. फार उत्तम– फार उत्तम गायला!" मेहबूबखांसाहेबां-सारख्या बहुश्रुत विद्वानाच्या या "रिपोर्टा"ने माझी पूर्वस्मृती एकदम जागृत झाली. आणि काही वर्षांपूर्वीची दुर्गा-झपतालमधील प्राथमिक अवस्थेतील बाल अभिषेकी नेहमी म्हणत ती "सखि मोरी रुमझुम" ही चीज पुन्हा आठवली! यानंतरच्या काळात त्यांचे नाव, कीर्ती आणि दर्जा ही सतत वाढू लागली– आजही वाढताहेत. गोमंतकाच्या या सुपुत्राने भारतभरच नव्हे तर भारताबाहेरही भारतीय संगीताची श्रेष्ठता व सामर्थ्य पटविले. याचा अभिमान भारतीयांना जरूर वाटावा–गोमंत-काला तर तो अधिकच वाटावा! या कर्तबगार गायकाची मला जी अधिक माहिती समजली ती माझे एक ज्येष्ठ व श्रेष्ठ सुहृद आणि अभिषेकींचे महत्त्वाचे गायनगुरु कै. पं. जगन्नाथबुवा पुरोहित यांचे-कडून. प्रत्येक कलासाधकाने अभिषेकींचे चरित्र जाणून घेतलेच पाहिजे, इतके ते तेजस्वी, स्फूर्तिदायी आणि मार्गदर्शी आहे!

जितेंद्रजी अभिषेकी हे मूळचे गोमंतकातील मंगेशी या गावचे रहिवासी. यांचे पहिले आडनाव नवाथे. परंतु त्यांच्या घराण्यात पूर्वापार चालत आलेल्या श्रीमंगेशाची पूजाअर्चा आणि पौरोहित्य या वृत्तीमुळे त्यांचे अभिषेकी हेच आडनाव पडले. दि. १५ सप्टेंबर १९३२ रोजी मंगेशी येथेच जितेंद्रजींचा जन्म झाला. त्यांचे वडील ह. भ. प. बाळूबुवा हे गोमंतकातील ख्यातनाम कीर्तनकार होते. त्यांचा आवाज उत्तम असून ते गातही चांगले. त्यांच्यामागे कीर्तनाचे वेळी उभे राहून झांज वाजवणे–गाण्याची साथ करणे हे काम जितेंद्रजी करीत. गाणे व संस्कृत या दोन्ही विद्यांची संथा या आपल्या चिरंजिवांना बाळूबुवा नित्य नेमाने देत. त्यामुळे स्वर, ताल व उत्तम उच्चार यांचे सुसंस्कार जितेंद्रजींवर बालपणापासूनच घडत होते. आपल्या या हुशार मुलाने

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

आपल्यासारखेच उत्तम कीर्तनकार व्हावे ही बुवांची तळमळ होती. त्याच दिशेने त्यांचे सर्व प्रयत्न चालू होते. परंतु ईश्वरी इच्छा काही निराळीच होती. चिरंजिवांची मनोमय इच्छा आपण नुसतेच गवई व्हावे नव्हे तर–मोठा गायक व्हायचेच ही होती. त्यांचा तो निर्धार होता. गवईपेशा हा चंगीभंगी लोकांचा, हलक्या प्रतीचा उद्योग आहे. सबब आपल्या चिरंजिवांनी गवई न होता कीर्तनकारच झाले पाहिजे, असा वडिलांचा आग्रह. पिता–पुत्रांचे हे मतभेद दिवसें-दिवस तीव्र स्वरूप धारण करू लागले. अखेर याचा परिणाम व्हायचा तोच झाला. जितेंद्रजी घरातून बाहेर पडले. मंगेशीत स्वतःची उत्तम वास्तू, गृहस्थिती व्यवस्थित सुखवस्तुपणाची, पौरोहित्य चांगल्या प्रकारचे ! परंतु 'मला गवैय्या व्हायचंय' या एका जिद्दीपायी एका केवळ पंधरा वर्षांच्या मुलाने फक्त अंगावरील सदरा, चड्डी व टोपी इतक्याच कपड्यांनिशी गृहत्याग करावा, ही एकच गोष्ट जितेंद्रजींच्या भावी यशाच्या दृष्टीने खूपच बोलकी आहे ! जितेंद्रजींनी मंगेशी सोडली ते थेट पुण्यास आले. उत्तम गायक व्हायचे व बी. ए. पर्यंत तरी शिक्षण घ्यायचेच हा त्यांचा एकमेव निश्चय. पुण्यातील अनाथ विद्यार्थी गृहात ते राहिले. मधुकरी मागून तेथेच त्यांचे 'हायस्कूल'चे शिक्षण सुरू झाले. त्याचबरोबर कै. पं. भास्कर-बुवा बखले यांचे शिष्य पं. नरहरबुवा पाटणकर यांचेजवळ सुमारे वर्षभर त्यांनी संगीताचे शिक्षण घेतले. त्यानंतर संगीत आणि संस्कृत या दोन्ही विषयांत विद्वान् असलेले पं. यशवंतबुवा मराठे यांचेकडे ते गायनाची संथा घेऊ लागले. मराठेबुवांच्यामुळे गाण्याचे उत्तम संस्कार होऊन मेहनत आणि कडक शिस्त याची जितेंद्रजींना सवय लागली. गाण्याची मेहनत आणि शालेय अभ्यास या दोन्ही गोष्टी ते अतिशय परिश्रमपूर्वक पार पाडीत होते. १९४९ साली ते एस्. एस्. सी. उत्तीर्ण झाले. यानंतर काही घरगुती अडचणीमुळे पुणे सोडून ते शिक्षणासाठी बेळगावास आले. परंतु दुर्दैव असे की, येथे येताच त्यांना टायफॉईडने गाठले. त्यांचे महाविद्यालयाचे एक वर्ष वाया गेले. त्याहीपेक्षा अधिक दुःखाची गोष्ट म्हणजे या आजारात त्यांचा आवाजच गेला. जितेंद्रजी साहजिकपणेच अत्यंत

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

विषण्ण झाले. नाइलाजाने ते पुन्हा मंगेशीला परत आले. याही परिस्थितीत आपल्याला गाणे यायलाच पाहिजे, हा विचार मात्र त्यांच्या डोक्यात सदैव थैमान घालीत असे. त्याच्या आजूबाजूच्या लोकांच्या दृष्टीने जितेंद्र आणि त्याचे गाणे हा एक चेष्टेचा आणि उपहासाचा विषय झालेला होता. जितेंद्रजींना ते वेळोवेळी अनाहूतपणे उपदेशही करू लागले. अशा परिस्थितीत शेजारच्या वांदिवडे या गावात श्रीमती गिरिजाबाई केळेकर यांचेकडे ते रोज जाऊ लागले. गिरिजाबाई या आग्रेवाले विलायतहुसेनखांसाहेब यांच्या शिष्या. त्यांची रोज मेहनत चाले. ती ऐकायची आणि स्वतःही मेहनत करायची असा त्यांचा दिनक्रम चालू होता. 'काही झालं तरी मला गवई व्हायचंय' या निश्चयाने— व्याकुळतेने जितेंद्रजींचा रियाज चाले. हा क्रम वर्षभर चालू होता. १९५२ साली त्यांनी मंगेशी पुन्हा सोडली आणि ते मुंबईस आले. गेल्या वर्षभराच्या चिकाटीच्या मेहनतीमुळे त्यांचा आवाज पुष्कळच सुधारला, तो काबूत येऊ लागला. याचवेळी मुंबई— आकाशवाणीवर त्यांची चाचणीपरीक्षा होऊन ते मान्य झाले. त्यांना आकाशवाणीवर प्रत्येक महिन्याला कार्यक्रम मिळू लागल्याने त्यांचा आर्थिक प्रश्न काही प्रमाणात तरी दूर झाला. ते मास्टर नवरंग यांच्याकडे गाणे शिकू लागले. सुमारे दीड वर्षांच्या या शिक्षणात ख्यालगायकी व नाटचगीते यांचे संस्कार चांगल्या तऱ्हेने घडले. यानंतर ते प्रख्यात गायक खां. अजमत-हुसेनखां यांच्याकडे गायनाची तालीम घेऊ लागले. त्यांचेकडून जितेंद्रजींना अनेक राग-रागिण्या, त्यातील उत्कृष्ट बंदेषी आणि बलपेचयुक्त तयारीची गायकी यांचा फारच फायदा झाला. यावेळपर्यंत जितेंद्रजींचा आवाज चांगला सुधारू लागला होता. त्यामुळे त्यांची गाण्याची मेहनत दिवसांतून अनेक तास आणि तीही अतिशय उत्साहाने व कसून होऊ लागली. याचवेळी त्यांचे महाविद्यालयीन शिक्षणही चालू होते. ते बी. ए. उत्तीर्ण झाले. त्यांची एक प्रतिज्ञा पूर्ण झाली. दुसरी प्रतिज्ञा पूर्ण होण्याच्या मार्गावर होती.

याच सुमारास जितेंद्रजींना मुंबई—आकाशवाणीमध्ये 'कोकणी' विभागात नोकरी मिळाली. ती त्यांनी काही काळ व्यवस्थितपणे केली,

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

परंतु या नोकरीतून त्यांना गाण्याच्या रियाजाला वेळ मिळेना म्हणून त्यांनी ही नोकरी सोडून दिली. त्यांना या वेळी 'संगीत नाटक अकादमी'ची दरमहा अडीचशे रुपयांची शिष्यवृत्ती मिळाली. त्यांची आर्थिक अडचण दूर झाली. आता ते ख्यातनाम गायक आणि सव्यसाची गायनगुरु पं. जगन्नाथबुवा पुरोहित यांचेजवळ तालीम घेऊ लागले. जितेंद्रजींचे सांगीतिक आणि व्यावहारिक व्यक्तिमत्त्व खऱ्या अर्थाने या वेळपासूनच साकारू लागले. समर्थ गुरु आणि उत्तम विद्यार्थी यांची युती जमून आलीच तर काय किमया होऊ शकते याचा आदर्श वस्तु-पाठ या गुरु-शिष्यांच्या तपःश्चर्येमुळे संगीत दुनियेला ज्ञात होऊ लागला. ही तालीम गुरुकुल पद्धतीने रात्रंदिवस चाले. 'जितेंद्रजी आठ–आठ दहा–दहा तास मेहनत करतात', असे बुवा त्या वेळी नेहमी सांगत. जितेंद्रजींची तीव्र बुद्धिमत्ता, चिकाटी, रियाजातील सातत्य, प्रतिभा, ईर्षा, महत्त्वाकांक्षा आणि जिद्द या दुर्मिळ गुणसंपदेची बुवा अतिशय तारीफ करीत. बुवांनी या आपल्या लाडक्या शिष्याला विद्या तर खूपच दिली. बुवा स्वतः तीन समर्थ गुरूंचे शागीर्द होते. त्यांच्याजवळ विद्याधन अपार होते आणि ते तितकेच मौलिक होते. बुवा स्वतः विलक्षण सौंदर्य-दृष्टीचे, विद्यासंपन्न व अनुभूतीसंपन्न असे कलाकार होते. नुसते संगीतच नव्हे, तर उत्तम साहित्य, सुंदर चित्रकला, कलात्मक खेळ, निसर्गातील सौंदर्य, अशा प्रकारचे सौंदर्य कोठेही दिसले तरी बुवांची सौंदर्योपासक वृत्ती तिकडे धाव घेई. अशा गुरूंच्या सान्निध्यामुळे जितेंद्रजींच्या सौंदर्यशोधक आणि प्रतिभासंपन्न भावभावनांना असंख्य पैलू पडले. रियाज कसा करावा, मैफल कशी 'जमवावी' या महत्त्वाच्या बाबींचे शिक्षणही बुवांनी त्यांना दिले. बुवांनी जितेंद्रजींना अनेक महत्त्वाच्या मैफलींत गावयास लाविले. या मैफलींत जितेंद्रजींच्या गाण्यात काय काय चांगले झाले व काय काय चुका झाल्या या सर्वांचे बुद्धिगम्य व तर्कसुसंगत असे विवेचन ते करीत. प्रेम आणि धाक ठेऊन तालीम द्यावी जगन्नाथबुवांनीच! या सर्व अग्निदिव्यातून जितेंद्रजी तावून-सुलाखून बाहेर पडत होते.

'संगीत नाटक अकादमीची शिष्यवृत्ती' संपल्यानंतरचा जितेंद्र-जींचा १९६२ ते ६५ पर्यंतचा काळ फारच खडतर असा गेला. नोकरी पूर्वीच सोडलेली, जवळ पैसा नाही, गवई म्हणून मानावयास कोणी

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

तयार नाही आणि गाण्याच्या शिकवण्या करायच्या नाहीत हा प्रथम-पासूनचा निर्धार! या परिस्थितीचा जितेंद्रजींना अतिशय त्रास होऊ लागला. या खडतर परिस्थितीत श्रीमती केसरबाई वांदोडकर आणि श्रीमती प्रफुल्ल जोशी यांनी त्यांना फारच मोठा आधार दिला. याच सुमारास कोल्हापूरच्या देवलक्लबमध्ये जितेंद्रजींची एक मैफल झाली. ती अतिशय रंगली. या मैफलीमुळे त्यांचा नावलौकिक होऊ लागला. त्यांना इतरत्र मैफलीची निमंत्रणे येऊ लागली. पैसा आणि अनुभव या दोन्ही दृष्टींनी जितेंद्रजी समृद्ध होऊ लागले. त्यांचा स्वतःचा असा एक रसिकवर्ग तयार होऊ लागला! हे घडत असतानाच त्यांच्या प्रतिभेला एक नवेच आवाहन कै. गोपालकृष्ण भोबे यांच्या शिफारशीमुळे लाभले. 'मत्स्यगंधा' या नाटकाचे संगीत दिग्दर्शन जितेंद्रजी यांच्याकडे सोपवले गेले. गाण्यांना चाली देणे, पार्श्वसंगीत देणे अशा प्रकारचा अनुभव मुंबई आकाशवाणीच्या नोकरीत त्यांनी पूर्वी घेतलेला होताच! 'मत्स्यगंधा' नाटकाच्या संगीताने जितेंद्रजींच्या गळयात यशोमाला घातली. या नाटकातील चाली कमालीच्या लोकप्रिय झाल्या. जितेंद्रजींच्या दिव्य प्रतिभेची साक्ष 'देवाघरचे ज्ञात कुणाला?' या 'यमन' मधल्या एकाच गाण्याने पटवून दिली. 'मत्स्यगंधा' या नाटकानंतर 'लेकुरें उदंड झाली', ययाति–देवयानी, स्वप्न वासवदत्ता–या नाटकांचे संगीत दिग्द-र्शन अभिषेकी यांचेकडे ओघानेच आले. या प्रत्येक नाटकात जे संगीत दिले गेले आहे ते जितेंद्रजींच्या प्रतिभासंपन्नतेची साक्ष उत्कृष्टपणे पटवील इतके प्रभावी आहे. 'भाव तेथे देव' या बोलपटाचेही त्यांनी संगीत दिग्दर्शन केले. या सर्व प्रकारच्या संगीत दिग्दर्शनात त्यांनी नवनिर्मितीचे– स्वतःचे असे खास प्रयोग केलेले आहेत. 'लेकुरें उदंड झाली' या नाटकाचे संगीत तर संपूर्णपणे प्रयोगात्मक आहे. याशिवाय त्यांनी दिलेल्या 'चालींत प्रचलित–अप्रचलित रागदारींतील उत्तम पदे आहेत. त्याचप्रमाणे ठुमरी, गझल, दादरे, लावणी अशा विविध थाटां-तील संगीताचा त्यांनी मोठ्या कौशल्याने आणि परिणामकारकरीतीने वापर केलेला आहे. 'कटचार काळजात घुसली' या नाटकाच्या संगीताने तर अभिषेकींना आजवर मिळालेल्या यशावर कळस चढविला! हे नाटक त्यातील मुख्यतः कल्पनारम्य संगीतामुळेच अतिशय लोकप्रिय

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

झाले. अमाप गाजले ! अभिषेकींच्या नाट्यसंगीतावर बहुतांशी रसिक बेहद्द खूष आहेत, तसेच नाट्यसंगीताचे काही मार्मिक व्यासंगी टीकाकारही आहेत. याचा विचार करता अभिषेकींच्या या संगीत-रचनेला निर्णायक न्याय मिळेल तो अजून काही वर्षांनी ! नेहमीची पूर्वापारची चाकोरी सोडून काही नवप्रवाह सोडणाऱ्या कोणत्याही कलेला या अग्निदिव्यातून जावेच लागते ! याच संदर्भात एक उद्‌बोधक हकीकत सांगण्यासारखी आहे. 'किर्लोस्कर संगीत' म्हणून ज्या नाट्यसंगीताचा आम्ही आज उदोउदो करतो, त्या संगीताची सुरवातीची परिस्थिती लक्षात घेण्यासारखी आहे. कै. अण्णासाहेब किर्लोस्कर यांचे शाकुंतल–सौभद्र ही नाटके ज्या वेळी रंगभूमीवर आली त्या वेळी त्यातल्या संगीता-वर कै. पांडोबा यवतेश्वरकर यांच्यासारख्या एका श्रेष्ठ संगीत आणि नाट्यविशारदाने अगदी कडाडून हल्ला चढविला. श्री. पांडोबा म्हणतात : —'अण्णांनी लावणीचे संगीत देऊन नाट्यसंगीताला हीन पातळीवर आणून ठेवले !' इतकेच म्हणून पांडोबा थांबले नाहीत तर अण्णा-साहेबांना प्रतिउत्तर म्हणून त्यांनी आपल्या त्यानंतरच्या नाटकांतून ख्याली संगीताचाच सर्रास वापर केला. जनतेचा कौल कसा यथाकालच मिळतो याचा बोध होण्याइतकी वरील घटना बोलकी आहे. मात्र एक गोष्ट स्पष्ट आहे ती ही की, अभिषेकींच्या नाट्यसंगीताबाबत क्वचित कोणाचे काही मतभेद दिसून आले तरी ते 'अभिषेकींचे संगीत' या सन्माननीय शिक्कामोर्तबास पात्र झालेले आहे, यांत कोणाचेच दुमत नाही !

नाट्यसंगीत दिग्दर्शनाने अभिषेकींना नावलौकिक आणि धन यांचा खूपच फायदा झाला असेल, परंतु त्यांचे मुळांतील संकल्पित कार्य ते नाही. 'मला गवई व्हायचंय' ही त्यांनी लहानपणी घेतलेली प्रतिज्ञा होती. या प्रतिज्ञेपायीच त्यांनी आजवर जिवाचे रान केले. हसायचे–खेळायचे, मौज करायची, त्या वयात विपरीत परिस्थितीशी सतत टकरा घेतल्या. स्वतःच्या शरीराचीही कधीच पर्वा केली नाही. त्यांचे ध्येय हळूहळू साकारू लागले. नुसताच गवई म्हणून नव्हे तर उत्तम गवई–आदर्श गायक म्हणून ते सुबुद्ध रसिकांच्या आदरास पात्र झाले. स्वतःच्या कलेला पैलू पाडण्याचे त्यांचे कार्य पूर्वीच्याच जिद्दीने आजही चालू आहे. अखिल भारतातील कलासंपन्न– नामवंत अशा कलाकारांची दहा-

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

पाच नावे घ्यायची झाली तर त्यांत अभिषेकींचे नाव कोणालाच टाळता येत नाही. म्यूझिक सर्कल असो, संगीत महोत्सव असो वा संगीत परिषद असो त्यांत अभिषेकींचे स्थान अत्यावश्यक झालेले आहे. सामान्य माणसांच्या प्रतिज्ञा ह्या मोडण्यासाठीच असतात. अभिषेकींसारखा एखादाच भीष्म प्रतिज्ञापूर्ती करू शकतो ! त्यांच्या या घवघवीत यशाचे मर्म बारकाईने पाहण्यासारखे आहे.

पं. जितेंद्रजीं यांची सर्वांगसुंदर मैफल ही एक अतिशय सुखद अशी कलात्मक अनुभूती आहे. त्यांच्या मैफलींतील त्यांचे दर्शनच अर्धे-अधिक काम साधून जाते. कलाकाराच्या नजरेतील विश्वास, त्याची निर्भयता या बाबी श्रोत्यांवर फारच मोठा परिणाम साधून जातात. पहेलवानी मजबूत बांध्याची शरीरयष्टी, रूपसंपदा आकर्षक, मुद्रेवर करारी भाव, दीर्घ तपःश्चर्येचा आत्मविश्वास अशा गोष्टी प्रथमदर्शनीच रसिकांना प्रसन्न करतात. त्यांच्याजवळ विद्येचा भरपूर साठा आहे. त्यांच्या मैफलींत या विद्येचा मोठाच दबदबा असतो. आपली मैफल ते अतिशय शांतपणे व संयमपूर्वक सुरू करतात. बंदिस्त चीज, संथ आणि शिस्तवार आलापचारी, शुद्ध रागस्वरूप, परिणामकारक बढंत, सुव्यवस्थित बोलउपजअंग आणि शेवटी आक्रमक तानक्रिया, हे त्यांच्या गायकींतील स्थूलमानाने प्रमुख गुण आहेत. शिस्त, संयम व नेटकेपणा हा त्यांच्या एकूण जीवनाचाच स्थायीभाव आहे. त्यांच्या या गुणांचे स्पष्ट दर्शन त्यांच्या मैफलीमध्ये सातत्याने घडते. त्यांनी कमावलेला उत्तम सूर व उत्तम लय-ताल ही त्यांच्या सुदीर्घ तपःश्चर्येने प्राप्त झालेली सिद्धी आहे. स्वरांचा लगाव, शब्दोच्चार याद्वारे ते जी भावनिर्मिती साधतात ती पं. अभिषेकींची खास किमया होय. मनोहर कल्पनाविलास हे एक त्यांचे आणखी एक महत्त्वाचे वैशिष्टच ! ते आपल्या मैफलींत शास्त्रीय संगीताप्रमाणेच नाटचसंगीत, ठुमरी, गझल अशांसारखे सर्वच लोकप्रिय प्रकार गातात. मात्र हे सर्व प्रकार ते अतिशय अभ्यासपूर्वक व विचारपूर्वक सादर करतात. त्यामुळे त्यांची एकूण मैफल रसिकांना धुंद करते ! शास्त्रीय संगीत हे खरोखरीच निव्वळ 'शास्त्रीय'च राहिले पाहिजे, त्यांत 'सौंदर्य' असता कामा नये, किंवा जे सुंदर असेल ते शास्त्रीय संगीत नव्हेच, असा एक

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

अलिखित नियम आमच्या अनेक विद्वानांनी आपल्या कलाप्रात्यक्षिकांतून सिद्ध करून दाखविला आहे. अभिषेकींची कला या विचारसरणीपासून सदैव दूर राहिली आहे. ओंगळपणा, कंटाळवाणेपणा, परिणामशून्यता अशा कलाविघातक प्रकारांपासून ते कटाक्षानेच नेहमी दूर राहिले आहेत. सौंदर्याच्या काही चुकीच्या कल्पनेमुळे आजच्या वहुसंख्य गायकांची गायकी नाजूक व निकस होत चालली असल्याचा विचारवंतांचा दावा आहे. तो खरा असेल तर अभिषेकींची अतिशय कसदार आणि तितकीच आक्रमक गायकी रसिकांना खेचू शकत असल्यास ते योग्यच आहे ! कलावंताला त्याच्या कलेबरोबरच ती कला रसिकांना योग्य प्रकारे पटविण्याइतका अभिनय जरूरीचा असतो. असा आवश्यक अभिनय अभिषेकींच्या गाण्यात जरूर असतो आणि म्हणूनच आजच्या रसिकांचे व होतकरू गायकांचे ते अतिशय आवडते असे गायक झालेले आहेत.

पं. अभिषेकी यांच्याशी माझा व्यक्तिगत संबंध अगदीच थोडा आलेला आहे. परंतु कै. जगन्नाथबुवा पुरोहित यांच्यातोंडून अभिषेकींच्या जीवनावर व त्यांच्या असामान्य कर्तृत्वावावत ज्या हकीकती मी वेळोवेळी ऐकल्या त्यावरून मी काही निष्कर्ष काढू शकलो. गायनाचार्य वझेबुवा आणि पं. जितेंद्रजी यांची विचार–आचारसरणी, एकूण जीवननिष्ठा व श्रेष्ठ कर्तवगारी यात पुष्कळच साम्य वाटते. हे दोघेही ' मोडेन पण वाकणार नाही ! ' अशा जिद्दीचे. दोघांनीही परिस्थितीवर सर्वस्वी मात करून आपले ध्येय सिद्धीस नेले. संगीतकलेच्या सिद्धीपायी दोघांनीही अपार कष्ट उपसले, अनंत यातना सोसल्या. दोघेही अचाट मेहनती. दोघेही जवरदस्त महत्त्वाकांक्षी आणि पट्टीचे मैफलबहाद्दर ! संगीताच्या दुनियेत दोघांनीही आपापल्या कुवतीनुसार संगीतकलेत निश्चित आणि निर्णायक असे स्थान पटकाविले आहे !

' पुढे पाऊल टाका म्हणजे जमीन मागे सरकेल ' हे जीवनसूत्र पं. अभिषेकींनी आजवर आचरले आहे. आजही ते मुळीच थांवलेले नाहीत, उद्याही ते थांवणार नाहीत–केव्हाच थांबणार नाहीत !

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

पं. अभिषेकींनी आज अखिल भारतभर नावलौकिक कमावला आहे. भारताच्या सर्वच भागांत त्यांच्या मैफली सदैव चालू असतात. परंतु याही सर्व धावपळीत त्यांचा स्वत:चा संगीतव्यासंग सतत चालू असतो. पं. रत्नकांतजी यांच्यासारख्या आग्रा घराण्याच्या थोर विद्वानाजवळ ते अजूनही गायनाची तालीम घेत असतात. ते केवळ इतक्यावरच थांबलेले नाहीत. ज्या निष्ठेने त्यांनी संगीत विद्या मिळविली, त्याच निष्ठेने ते या विद्येचे दान मोठ्या प्रमाणावर आणि तेही निरपेक्षरीतीने—गुरुकुलपद्धतीने आजकाल करू लागले आहेत. त्यांचे हे कार्य अतिशय मौलिक असे आहे. त्यांच्या या कार्यातून नजीकच्या भावी काळात व्युत्पन्न गायक तयार होतील अशी आजच सार्थ खात्री वाटते.

पं. अभिषेकींनी स्वत:च्या कर्तबगारीवर पुण्याजवळच्या लोणावळ्यास एक अलीशान वास्तू खरेदी केली आहे. त्यांचे तेथेच नेहमी वास्तव्य असते. अनेक संस्थांचे सन्माननीय सल्लागार म्हणून ते काम पाहतातच. त्यांच्या कार्याचा एकूण पसारा प्रचंड आहे. तो सतत वाढणारा आहे !

पं. जितेंद्रबुवा यापुढेही दीर्घकाळपर्यंत अशीच पावले टाकताहेत आणि जमीन मागे सरकते आहे, हेच दृश्य पहायला मिळावे, हीच एकमेव अपेक्षा ! !

◘ ◘ ◘

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri



Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri



Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi